# श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ.

श्रीमंत रामराव कृष्ण जठार संस्थान ग्वाल्हेर स्वानंदसाम्राज्यकर्ते यांस तारीख १६ जून १९०२ ला श्रीमहाराजांनीं पाठविलेल्या पत्रांतील मानभावादि मतांची समीक्षा:—

## मानभावमतसमीक्षा.

मळरचना नांवाच्या प्रकरणांतील मतवाद:— जीव व परमात्मा दोन्ही भिन्न आहेत व नित्य आहेत. जीव हा अविद्येनें बद्ध आहे, व ईश्वर हा मायेचा देह घेऊन जीवाला उद्धरण्याकरितां अवतार घेत असतो. ती अविद्या अनित्य आहे. तिचें निरसन झाले ह्मणजे जीव परमेश्वराचे ठिकाणीं जातो, परंतु परमेश्वर होत नाहीं.

## वरील मतांवर शंका

**शंका** (१)— जीव नित्य आहे, आणि अविद्या अनित्य आहे, तर जीवाला अविद्या केव्हां पासून लागली ? आणि ती लागण्याचें कारण काय ? अनादि आहे ह्मणाल तर तिचें निरसन कसें होईल ? उत्पन्न झाली नाहीं, परंतु तिचें निरसन होतें ह्मणाल तर जी उत्पन्नच झाली नाहीं तिचें निरसन होणें ह्मणजे वांझोटीचा पुत्र मेला असें ह्मणण्यासारखें होय. **शंका** (२) ईश्वर हा मायेचा देह घेतो तर तो उपाधि बद्ध होईल, मग त्यास मुक्त ह्मणतां येणार नाहीं. ? **शंका** (३) ईश्वर मुक्त आहे, परंतु तो जीवाकरितां मुद्दाम मायाबद्ध होतो, असें ह्मणाल तर त्याला एवढी उपाधी घेण्याची गरज काय ? **शंका** (४) त्याला करुणाच तशी आहे ह्मणून तो मायेचा देह घेतो, असें ह्मणाल तर करुणा हा गुण मायेचा आहे असें तुमच्याच महावाक्यांत सांगितलें आहे, ह्मणून ईश्वरही मायाबद्ध आहे काय ? **शंका** (५) जीव जर परमेश्वर होत नाहीं, तर त्याला स्वतंत्र सुख मिळणार नाहीं. त्यामुळें भीति कायम राहील. मग मोक्ष कशाचा ? ह्मणून परमेश्वरानें जीवाला परमेश्वरच केले पाहिजे. **शंका** (६) जीव व ईश्वर एक कसा होईल असे ह्मणाल तर ईश्वराच्या आंगीं अघटित सामर्थ्य नाहीं असें कबूल करा, आणि तसें ह्मणाल तर

कार्य करण्यास कारण होत नाहीं हें उघड आहे. केवळ अज्ञान शद्बानें जर जगत्कार्य भासत असेल तर तें कोणत्याहि शद्बानें भासावयास पाहिजे. मग शब्दमात्र अज्ञान व जगत्कार्य यांचा कार्यकारणभाव कशास हवा ? सारांश, शशशृंग व खपुष्प इत्यादि शद्बांप्रमाणें अज्ञान या शद्बाची प्रवृत्ति झाली असल्यामुळें त्यास भावरूप व कारण मानणें विसंगत आहे या शास्त्रीबोवांचे म्हणण्यांत खालीं दिलेले मुद्दे आहेत. (१) शद्बमात्र म्हणजे शद्बाचेंच अस्तित्व, अर्थाचें नाहीं. (२) अज्ञान शद्बमात्र असल्यामुळें जगद्रूप कार्य करण्यास समर्थ नाहीं. (३) केवळ अज्ञानशद्बानें जर जगत्कार्य भासत असेल तर तें कोणत्याही शद्बानें भासावयास पाहिजे. (४) अज्ञान व जगत्कार्य यांचा कार्यकारणभाव सिद्ध होणार नाहीं.

## पृष्ठ २२ वरील पत्राचा अर्थ

(१) ज्यानीं अतिकरुणेनें सच्चिदानंदतनु धारण केली, ज्यांच्या चरणसुखस्पर्शानें श्रीइंद्रायणीच्या जलाला तीर्थत्व प्राप्त झालें; संसारदु:खाच्या निवृत्तिकरितां अनेक साधनें करूनहि दु:खनिवृत्ति न झाल्यामुळें ज्यांची हृदयें विदीर्ण झालीं आहेत, असे पुरुष दीन होत्साते तनुमनसमर्पणपूर्वक आळंदींत राहून ज्या दयाब्धीला भजतात, अशा त्या श्रीसद्गुरुज्ञानेश्वरमहाराजांना मी नमस्कार करितों.

( २ ) जिचें स्तनपान करून मला हें सुंदर शरीर प्राप्त झालें आहे. जी देवी नेहमीं प्रेमानें माझें मस्तकावघ्राण करून ( सुख देत होत्साती ) माझे बाल्यांतील अनेक कष्ट निवारण करिते, व जी ब्रह्मानंदरसाच्या योगानें नम्रझालेल्या आपल्या मृदुल करानें अज्ञानापासून होणाऱ्या माझ्या त्रिविध दु:खरुपी अग्नीला शमवीते, त्या यमुनाआईच्या करुणाविकसित शोभायमान चरणकमलाला मी नमस्कार करितों.

( ३ ) अध्यारोप व अपवाद यांच्या योगानें भासणाऱ्या संसाराला व संसारभावालाच अनुक्रमें बंध व मुक्ति अशा संज्ञा आहेत. अध्यारोपानें हें सर्व मायिक जगत् चैतन्यावर भासतें. वेदान्तनिष्णात

तुमचें मत स्वीकारून अर्थ कोणता ? वरील सार्ही शंकांचें उत्तर मान-आवांनां देतां आले नाहीं.

## डार्विनमतसमीक्षा.

या मतांत मनुष्यांची उत्क्रांति मानली आहे. मनुष्यप्राणी हा पूर्वींचा मासा होता, व नंतर माकड होऊन हळुहळु मनुष्य झाला. तशीच पृथ्वी वायुरूप होती, व ती घनरूप झाली. या सर्वांचें कारण एक कांहीं तरी आहे.

आशंकाः— डार्विन जें कारण मानतो तें उपादान मानतो कीं निमित्त मानतो कोण जाणे निमित्त मानत असल्यास तें जगदोपादानाहून भिन्न असलें पाहिजे, व त्याची उत्क्रांती न झाली पाहिजे, आणि तसें मानल्यास उत्क्रांतीचें उपादान कोणते ? बरें निमित्त कारणच नाहीं, तर उपादानाचे ठायीं उत्क्रांतीचें सामर्थ्य कोठून आलें ? अनादिच आहे असें ह्मणेल, तर सर्वच गोष्टी त्या कारणांत अनादि असल्या पाहिजेत; आणि एका बरोबर सर्वांचीच उत्क्रांती झाली पाहिजे; परंतु तसें होत नाहीं. कांहीं गोष्टींची अपक्रांतिही होते. हल्लीं जे पृथ्वींत हाडांचे अश्मीभूत सांपळे ( Fossils ) सांपडतात त्यांपेक्षां आपलें शरीर किती अंशानें कमी आहे बरें असो. त्याच मतांत एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, मनुष्याची बुद्धि जास्त वृद्धिंगत होऊन स्तुतिप्रियत्व हा गुण हळुहळु नष्ट होईल. येथें एक शंका येते कीं, स्तुतिप्रियत्व आणि कर्तव्यशक्ति हे दोन्ही धर्म चित्ताचे किंवा बुद्धीचे असून त्यांतच एका गुणाची उत्क्रांति व्हावी व एका गुणाची अपक्रांति व्हावी, याचें कारण काय ? आकाश हें स्वतंत्र सत्व असून त्याची उत्क्रांति कां होत नाहीं ? बरें दृश्यपदार्थामध्यें तरी ज्ञानाची उत्क्रांति होते कीं शरीराची होते ? शरीराचीच होते ह्मणाल तर ज्या पदार्थापासून ज्याची उत्क्रांति होत असेल त्यापदार्थाची हळुहळु अपक्रांति झाली पाहिजे. जसें माशाचा माकड झाला ह्मणजे मासा नष्ट झाला पाहिजे, आणि माशाचें नष्ट होणें ह्मणजे त्याची अपक्रांतीच होय, आणि असाच सिद्धान्त मानला तर मग कारणाचें अनादित्व व अनंतत्व कोठें राहिलें ? अनंत जें ठरवावयाचें तें एका नियमावरून किंवा एका उदाहरणावरूनच ठरत नाहीं, तर त्याला सर्व

नियम, सर्व उदाहरणें व सर्व आधार सारखेच असले पाहिजेत. ज्ञानाची उत्क्रांति मानली तर माशांची व मनुष्याची जाणीवशक्ति एकच आहे. माशालाही स्वपोषक विषय व स्वविषयानंदाचें भान आहे, आणि मनुष्यालाही स्वपोषकपदार्थ व स्वविषयानंदाचें भान आहे, ह्मणून दोघांचीही जाणीवशक्ति एकच आहे. त्यांत ज्ञानाची उत्क्रांति कोणती? माशापेक्षां मनुष्याचें ज्ञान उंच आहे, हीच त्याची उत्क्रांति हें ह्मणणें संभवत नाहीं, कारण दोघांच्याही विषयांची भिन्नता आहे. मनुष्याच्या विषयांचे ठायीं माशाला सुख होत नाहीं, ह्मणूनच त्यास मानव विषयांची प्रतीति नाहीं. जसें घृतानें मासा मरतो ह्मणून त्यास घृत सुखकर नाहीं; व इच्छा नसल्यामुळें त्यास त्याची प्रतीति नाहीं. तसेंच माशांचे विषयानें मनुष्यास सुख होत नाहीं. जसे शेवाळादिक पदार्थ मासा भक्षितो, व मनुष्य भक्षीत नाहीं, कारण त्यास शेवाळाची सुख प्रतीति नाहीं. आतां दोघांचेही दृष्टीविषय एकच आहेत, ह्मणजे शेवाळ आणि घृत हे दोन्ही पदार्थ माशास व मनुष्यास सारखेच दिसतात मग विषय भिन्न कशाचे? हें ह्मणणें सम्यक् नाहीं, कारण विषयाची दृश्यता दोघांसही समान घडते, तर विषयाचें रूपांतर, ज्ञानाची एकता, कांहीं शक्तींचें समानत्व, कांहीं शक्तींचें पृथकत्व, आकृतींचें विलक्षणत्व हे गुण माशांमध्यें व मनुष्यामध्येंही आढळतात, मग ह्याचेंच नांव का उत्क्रांति? बरें मृत्तिकेपासून सर्वांची उत्क्रांति मानावी तर वृक्षादिकांची व्यवस्था कशी? वृक्षादिकांपासून हलुहलु जीव प्राणी झाले असें मानावें तर हें घडत नाहीं, कारण हें परिणामी कार्य कारणांत न मिळालें पाहिजे; परंतु जगांत तर क्रिया अत्यंत भिन्न आढळतात. वृक्षाचे बीजाचा वृक्षच होतो, आणि मनुष्याचे वीर्याचा मनुष्यच होतो. याप्रमाणेंच अन्य गोष्टी. मनुष्याचे प्रेताची माती होते, आणि झाड तुटून पडलेल्या काष्टाचीही माती होते. त्यांत कांहीं मातीचें, निमित्त कारण जो कुलाल त्याच्या द्वारा, घट होतात; कांहीं मातीमध्यें किडेही आढळतात. त्यांत कांहीं किडे नियमित कालीं असतात. जसे मृग, देवगायी, शिदोड इत्यादि. त्यांत शिदोडावर मीठ घातलें ह्मणजे पाणी होतें. याप्रमाणें रसायनरीत्या कांहीं पदार्थ विरुद्धत्व पावतात, मग या नाना पदार्थांचीं कारणें निरनिराळीं

अशा आचार्यांपासून प्राप्त झालेल्या बोधानें आत्मसुखाचे ठिकाणीं तल्लीन झालें असतां जो संसाराच्या अत्यंताभावाचा प्रत्यय त्याला अपवाद ह्मणतात. आई ! हें मी तुला विस्तार करून सांगतों ऐक.

(४) एकस्वभावात्मक वस्तूचे ठिकाणीं जो भिन्नपणा भासवितो त्याला उपाधि ह्मणतात. सूर्य एक असूनहि घट व जल या उपाधीमुळें दोनपणाला प्राप्त होतो, त्याप्रमाणेंच येथें सत्वादिगुणानीं युक्त असणारी, सदसद्विलक्षण, ब्रह्मसत्तेनें सत्तावान् झालेली माया, ब्रह्माच्या आनंदस्वभावाचें आच्छादन करून खोटाच जगद्रूपी भिन्न आभास भासविते.

(५) अस्मत्प्रत्ययगोचर विषयी व युष्मत्प्रत्ययगोचर विषय हे प्रकाश व अंधाराप्रमाणें परस्पर विरुद्ध आहेत. ( अस्मत्प्रत्ययगोचर विषयी हा कधीं युष्मत्प्रत्ययगोचर विषय होत नाहीं व युष्मत्प्रत्ययगोचर विषय हा कधीं अस्मत्प्रत्ययगोचर विषयी होत नाहीं. ) म्हणून त्यांचा ऐक्याध्यास होणें शक्य नाहीं; तथापि सर्व लोक या जड देहालाच मी ह्मणजे आत्मा आहें असें समजत असल्यामुळें या त्यांच्या प्रतीतीवरून ( विषयविषयींचा ) ऐक्याध्यास झालेला दिसतो. गुरुचरणावर ज्यांचा दृढ विश्वास आहे असे पुरुष मात्र या अध्यासस्वरूपी अविद्येचा नाश करून घेतात.

(६) ईश्वर, जीव, शुद्धब्रह्म, जीवेश्वरांचा भेद, माया, व चैतन्य यांचा योग, असे सहा पदार्थ मुनींनीं अनादि मानिलेले आहेत. या सहांपैकीं नित्य, पूर्ण व अतिसुखरूप असें ब्रह्म मात्र केव्हांहि नाश पावत नाहीं; बाकी पांच पदार्थ श्रौतज्ञानानें बाधित होतात.

(७) भ्रमकालीं भ्रमानें बद्ध असतो म्हणून व भ्रम नाहींसा झाल्यावर भ्रमच राहत नाहीं ह्मणून ज्याप्रमाणें भ्रमाचा आदि कळत नाहीं, त्याप्रमाणें जीव मायेमध्यें असतो तोंपर्यंत मायाबद्ध असतो ह्मणून व माया निवृत्त झाल्यावर मायाच राहत नाहीं ह्मणून मायेचा ( जीवाला माया केव्हांपासून लागली याचा ) आदि कळत नाहीं. आई ! मी तुलाच विचारितों, तुला आत्मविस्मृति केव्हां पासून झाली सांग बरें ? जर तूं ह्मणशील कीं मला याचें ज्ञान नाहीं तर मग

मानावीं काय ? असेंच दुसरें उदाहरण, शेण आणि गर्दभमूत्र यांच्या मिश्रणानें विंचू उत्पन्न होतात; परंतु शेण आणि गोमूत्र हे तरी काय ? तर अन्नाची व पाण्याची अपक्रांति, व विंचू हे काय ? तर शेणाचें व गोमूत्राचें रूपांतर ! असा दृष्टान्त घेणें रूपांतराचा, व सिद्धान्त ठरविणें उत्क्रांतीचा हें शोभेल तरी पण ? बरें निर्जीव पदार्थांचे सजीव पदार्थ होणें ह्याचें नांव उत्क्रांति असें मानावे, तर मग जें कांहीं मूळ कारण असेल तें अत्यंत निर्जीव होते, व हळुहळु आतां सजीव होत चाललें आहे असें मानावें लागेल, आणि तसें मानल्यास अत्यंत भविष्यकाळीं सर्व प्राणी सजीव झाले पाहिजेत, व त्यांच्या जातीही ठरवितां न आल्या पाहिजेत; पण असें होणें संभवनीय नाहीं, कारण आतांच एकमेकाविरुद्ध क्रिया जगांत आढळतात. सजीव प्राणी सजीवांस विरुद्ध आहेत, म्हणजे नाशक आहेत, व निर्जीव पदार्थ निर्जीवांस नाशक आहेत. जसे सर्प, व्याघ्र हे मनुष्यादि सजीवनाशक, तसेंच अग्नि, जळ हे कर्पूरलवणादि निर्जीवनाशक. आतां निर्जीव पदार्थही सजीव नाशक आहेत जसें लवणशिरोडादि. सर्वांचा, कारण जी मृत्तिका तिचे ठायीं लय होतो ह्मणाल, तर कर्पूरादिकांचा लय मृत्तिकेचे ठायीं कोठें होतो ? शिवाय धात्वादिकांचा विचार राहिलाच, आणि गुरुत्वाकर्षणशक्तीची उत्क्रांति कशी होते हें कळत नाहीं; म्हणून कांहीं वस्तूंचें समानत्व, कांहीं वस्तूंची उत्क्रांति, कांहीं वस्तूंची अपक्रांति, कांहीं वस्तूंचें रूपांतर, कांहीं वस्तूंचें अखंडत्व, या सर्वांस उत्क्रांतीच नांव द्यावयाचें कीं काय ? हें वैविध्य एकाच कारणांत राहतें तर मग तेथें प्रतिबंध करणारी शक्ति कोणती ? व उत्क्रांति होण्याचें निमित्त काय ? बरें, उत्क्रांति कारणासहीत होते, किंवा नुसत्या शक्तीची होते ? कारणासहित होते ह्मणाल तर वरील गोष्टींप्रमाणें त्या कारणाची अपक्रांति होत होत त्यापासून होणाऱ्या कार्यांची हळुहळु उत्क्रांति झाली पाहिजे. असें मानलें असतां कारणाचें अनंतत्व नष्ट होईल, आणि तसें मानल्यास कारण सांत झाल्यामुळें अत्यंत भविष्यकाळीं सर्वांचे कांहींतरी सजीव, निर्जीव, विरुद्ध, अविरुद्ध एक कार्य झालें पाहिजे. तसें झालें ह्मणजे उत्क्रांतिवाद खुंटला. येथें कोणी अशी शंका करतील कीं, उत्क्रांतिवाद खुंटला कशाचा,

कार्याची आणखी उत्क्रांति होईल, तर त्यास मी विचारतो कीं, अत्यंत भूतकाळीं जें कारण मानतों तें देखील कोण्या भूतकालीन कारणाचें कार्यच असेल; असें जर मानलें तर कार्यच कार्याचें कारण व कार्यच कार्याचें कार्य असें मानावें लागेल. शक्तीची उत्क्रांति होते व कारण निराळें राहतें असें ह्मणावें, तर ही उत्क्रांति होण्याची शक्ति कारणांत आली कोठून ? स्वभावानें आली हें म्हणणें शोभत नाहीं. कारणाचा स्वभाव व कारणाची शक्ति त्याची उत्क्रांति ह्मणणें ह्मणजे वरील गोष्टी प्रमाणेंच आहे. बरें कोणी ती शक्ति कारणामध्यें आणून ठेविली, व नंतर तो आणणारा तिची उत्क्रांति करूं लागला असें मानावें तर ती शक्ति आणणाऱ्यास किती काल लोटला ? व तें आणण्याचें निमित्त काय ? ही आणण्याची क्रिया आकाशरूप पोकळींतच घडली कीं आणखी कोठें घडली ? आकाशांतच घडली असें म्हणाल तर त्याची उत्क्रांति कां होऊं नये ? आकाश व काल ह्यांची उत्क्रांति होत नाहीं, केवळ द्रव्याचीच उत्क्रांति होते असें म्हणाल, तर मग तें उपादान कारण, अथवा त्याचेमध्यें शक्ति आणून ठेवणारा जो कोणी असेल तो निमित्त कारण हे दोघेही द्रव्यरूप मानावे कीं द्रव्यरहित मानावे ? द्रव्यरूप मानलें तर त्या द्रव्याची उत्क्रांति कोण्या कारणापासून झाली ? द्रव्यरहित मानलें तर त्यापासून द्रव्याची उत्क्रांति कशी संभवेल ? बरें एक कारण द्रव्यरूप मानणें व दुसरें कारण द्रव्यरहित मानणें हें सम्यक् नाहीं. कारण जेथें द्रव्य आहे तेथें कोणत्याही द्रव्याची उत्क्रांति असली पाहिजे, आणि द्रव्यरहीत आहे त्यापासून तर द्रव्योत्क्रांति संभवत नाहीं, आणि द्रव्यच नित्य आहे त्याची उत्क्रांति होत जाते हें म्हणणें संभवत नाहीं, कारण त्या द्रव्याचे परमाणू कोणत्या तरी शक्त्याश्रित असले पाहिजेत, आणि तसें मानावें तर त्या शक्तीलाही स्थान पाहिजेच. ही क्लृप्ति बसवितां येत नाहीं, म्हणून आग्रहानें द्रव्यच नित्य आहे त्याची उत्क्रांति होते असें म्हटलें, तर पुन्हा वरीलप्रमाणें त्या द्रव्याच्या एका अवस्थेची अपक्रांति व दुसऱ्या अवस्थेची उत्क्रांति मानावी लागेल, आणि तसें केलें ह्मणजे शेवटची जी अवस्था होईल तेथें तरी उत्क्रांतिवाद खुंटलाच पाहिजे. कोणी ह्मणेल कीं, उत्क्रांतीला शेवटची अवस्थाच नाहीं, कोणतीही

अवस्था तिची पहिलीच आहे, तर मग कोणत्याच वस्तूची अपक्रांति न झाली पाहिजे. असो. अशा अनियमित सिद्धांतासच तुम्ही उत्क्रांति म्हणतां काय ? आणि आग्रहानें तसें मानत असाल तर डार्विनमताभिमानीयानो ! तुह्मी उत्क्रांति प्रत्यक्ष अथवा अनुमान यापैकीं कोणत्या प्रमाणानें सिद्ध करून दाखवितां ? ह्या सर्व प्रश्नांची उत्तरें डार्विनकृत उत्क्रांतिमतांत मिळत नाहींत. असो; कोणत्याही बाजूंनीं पाहिलें असतां हें डार्विनचें मत अगदीं असिद्ध आहे. इति उत्क्रांतिमतखंडन समाप्त.

## स्पेन्सरमतसमीक्षा.

नास्तिकमतापेक्षां हा गृहस्थ अंमळसा आंत शिरलेला आहे अशी माझी खात्री झाली, ह्मणून त्या मताचें येथें दिग्दर्शन करतो. स्पेन्सरचे दहा ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यांत प्रथम ग्रंथ आदितत्व हा होय. त्याचे दोन भाग आहेत. पहिल्या भागाचें नांव अज्ञेयमीमांसा व दुसऱ्याचें ज्ञेयमीमांसा. या दोन्ही भागांशीं अत्यंत विरोधच ह्मटला पाहिजे. ज्ञेयमीमांसेमध्यें उत्क्रांतितत्वाचेंच अनुकरण केलें आहे, व आणखीही कांहीं गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांमध्यें असेंही सांगितलें आहे कीं, देहापुरतेंच ज्ञान असल्यानें आपलें भागत नाहीं. आणखीही कांहीं गोष्टींचें ज्ञान पाहिजे. हा मुद्दा ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. ह्यापेक्षां हा भाग वर्णन करण्याचें प्रयोजन नाहीं. अज्ञेयमीमांसा नामक प्रथम भागांत धर्म आणि शास्त्रांचे एकीकरण सांगितलें आहे, व तें सर्वांशीं अगम्य आहे, असें ह्मणतात. आकाश, काल, द्रव्य, गती, शक्ति, मन, जीव हे सर्वच पदार्थ अज्ञेय आहेत व त्यांच्या मुळाशीं कांहीं अज्ञेय अधिकरणही आहे, अशी आपली भावना अनपेक्षज्ञानद्वारा आपणास शिकविते. हें अनपेक्ष ज्ञान ह्मणजे भावनेचें अस्तित्व, दुसरें कांहीं नाहीं. या प्रतिपादनावरून मनांत बऱ्याच शंका येतात.

शंकाः— या सर्वांसच जर अज्ञेय मानावें तर ही एकदेशीय ज्ञानशक्ति कशी उत्पन्न झाली ? तिचेंही अंतःस्वरूप अज्ञेय आहे ह्मणाल तर मग भावनाच नष्ट होईल, आणि तसें न मानलें तर बाह्यस्वरूप ज्ञानमय असणें व अंतःस्वरूप अज्ञेय असणें या प्रश्नाचा उलगडा कसा ? बरें जें कांहीं अज्ञेय आहे तें सर्वदेशीय आहे कीं एकदेशीय आहे ?

सर्वदेशीय ह्मणाल तर एकदेशाचेठायीं ही ज्ञानशक्ति स्थित कशी झाली ? आणि एकदेशीय ह्मणाल तर सर्वदेशीय ज्ञेयाचेठायीं एकदेशीय अज्ञेयत्व कसें राहिलें ? आतां बाह्यपदार्थांकडे वळूं. आकाश व काल हे आहेत किंवा नाहींत ? नाहींत ह्मणावें तर त्यांचे अस्तित्वाची भावना करतां येते. बरें, शक्तीचें अंतःस्वरूप जरी सांगतां येत नाहीं तरी द्रव्य परमाणूंशीं आणि तिजशीं बरेंच तादात्म्य आहे. आतां द्रव्याचें स्वरूप पाहूं. द्रव्यघटक परमाणूंला धरून भावना, आंत गेल्यावर द्रव्यांतःस्वरूप नेणिवेमुळें, परत येत असेल तर मी पृच्छा करितो कीं, भावनेचें स्वरूप द्रव्यरहित काय राहतें ? द्रव्यरहित वस्तूचें स्वरूप आहे कीं नाहीं ? नाहीं ह्मणाल तर तें बरोबर नाहीं. कारण सर वुइल्यम् ह्यामिल्टन् मताच्या अनुयायी यांनीं अशी एक क्लृप्ति बसविलेली आहे कीं, त्याचें स्पेन्सरकडून उत्तर देवविल्या जात नाहीं. सर वुइल्यम्चे अनुयायी ह्मणतात, द्रव्याचे जे अत्यंत सूक्ष्म परमाणू व त्यांचे तुकड्यांचे तुकडे जरी घेतले तरी ते कोणत्या शक्तीवर कायम राहणार ? संयोग शक्तीवरच कीं नाहीं ? येथें स्पेन्सरला होय ह्मणावें लागते. यावरून विचार करूं. सर वुइल्यम् मतानुयायांनीं मानलेली जी ही संयोग शक्ति, ती सर्वाधिष्ठानीं आश्रित असली पाहिजे. अधिष्ठानच नाहीं अशी जर कल्पना कराल तर तें बरोबर नाहीं. कारण शक्तीला कोणत्या तरी पदार्थाचा आश्रय असल्यावांचून तिची स्वरूपसिद्धि व कार्यसिद्धि होत नाहीं. ही शक्ति परमाणूंचीच आहे असें कदाचित् ह्मणाल तर ते कार्यरूपी परमाणू कशाचे बनले ? किंवा स्वयंभू आहेत ? स्वयंभू मानल्यास नास्तिकांप्रमाणें विश्वांतील द्रव्य तेवढें स्वयंभू आहे असें कबूल करावें लागेल. स्पेन्सरनीं जी धर्माचीं मूलतत्वें विवरून दाखविलीं त्यांत नास्तिक, अद्वैत, एकेश्वरवादी आदिकरून सर्व धर्माचें खंडन केलें, पण अद्वैत धर्मास त्यांनीं जो बाध आणला होता त्याची सिद्धि बरोबर केली नाहीं, कारण त्यांनींच पांचव्या प्रकरणांत एकेठिकाणीं ह्मटलें आहे कीं, आपणांस विश्वांत जे दृश्यादृश्यरूप चमत्कार भासतात ते सर्व मिळून बनलेलें विश्व कोण्यातरी एका अज्ञेय कारणरूप महाशक्तीचा प्रादुर्भाव आहे; आणि ती शक्ति सर्वव्यापीही असेल. यावर एक शंका येते कीं, नानाविध

चमत्कारांनीं बनलेलें हें दृश्यादृश्य विश्व ज्या शक्तीचा प्रादुर्भाव आहे, ती शक्ति पूर्वीं नानाविध चमत्कारांची एकत्र झालेली सांठवण असावी, आणि तसें मानलें तर नास्तिकाप्रमाणें विश्व स्वयंभू आहे असें कबूल करणें भाग पडतें. अद्वैतवाद्यांनीं तरी एका बीजाचें विश्व बनलें असें सांगितलें, आणि तुमच्या मतांत तर सर्वच पदार्थ त्या अज्ञेयशक्तिरूप कारणांत बीजरूपानें नित्य आहेत. मग तुमच्या मतांत व नास्तिकांच्या मतांत भेद तो काय ? तुह्मी अज्ञेयशक्ति मानलेली आहे, व त्यांनीं परमाणू मानलेले आहेत. असेंच जर तुह्माला विश्वाचें बीज कायम राखणें होतें तर नास्तिकांचेंच अनुकरण केलें पाहिजे होतें. अस्तु. ती अज्ञेय शक्ति सर्वव्यापी असेल असें जें तुह्मी संशयात्मक सांगितलें, त्यावरून असें दिसतें कीं, तुमचा निश्चय कोणत्याच मतावर झाला नाहीं. कारण सर्वव्यापित्वांत आपली ज्ञानशक्तीही आली, आणि संशय आणि निश्चय हे दोन्ही आपल्या ज्ञानशक्तीचे घटक आहेत. त्यांत कोणत्या घटकावर तुह्मी आहांत ? येथें कदाचित् असें ह्मणाल कीं, आह्मी संशयवादी नाहीं, तर हें सम्यक् नाहीं; कारण तुह्मी जें केवलाचें अस्तित्व मानतां तें अज्ञेय आहे असें ह्मणतां. तर मग आपली जी ही ज्ञानशक्ति ती नाहीं कीं आहे ? नाहीं ह्मणाल तर तुह्मीच तुह्माला अज्ञेय झाले. मग व्यवहार कसा चालणार ? आणि केवलाच्या अस्तित्वाचें ज्ञान तरी कसें होणार ? कारण जें अस्तित्व मानावें लागतें तें कोण्यातरी पदार्थाचें आश्रित असलें पाहिजे. कारण जगांत कोठेंही अशी उपपत्ति आढळत नाहीं कीं, वस्तूचा आहेपणा निराळा काढून वस्तु वेगळी करावी. वस्तूचा आहेपणा निराळा करणें ह्मणजे त्या वस्तूला नाहींपणाच देणें होय. तात्पर्य जी वस्तु आहे ती मुळींच नाहीं असें ह्मटलें ह्मणजे झालें. मग असेंच तुह्मी व्यवहार चालविणार कीं काय ? नाहीं म्हणाल तर हें कबूल करावें लागेल कीं, अस्तित्व ज्या वस्तूचें मानावयाचें त्या वस्तूचा आभास आपल्या ज्ञानशक्तीस झाला पाहिजे, त्यावांचून अस्तित्वच ठरवितां येणार नाहीं, आणि आभास मानला तर ज्ञानशक्ति मानलीच पाहिजे, कारण अज्ञेयाचा अज्ञानांत आभास संभवत नाहीं; म्हणून ज्ञानशक्ति मानल्यावांचून गत्यंतर नाहीं. मग ज्ञानशक्ति जी मानली ती क्षणिक आहे कीं स्वयंभू

आहे ? क्षणिक आहे म्हणाल तर ती कोण्या कारणापासून उत्पन्न झाली ? अज्ञेयापासून म्हणाल तर ज्ञेयानुसार ज्ञान असतें हा नियम आहे. मग तें ज्ञेय प्रत्यक्ष असो वा अनुमेय असो, यथारूप असो किंवा आभासरूप असो, पण ज्ञान म्हटलें कीं तेथें ज्ञेयाचें अस्तित्व पाहिजेच. अस्तित्व तर आभासावांचून होतच नाहीं. आतां एवढें मात्र खरें कीं, तुमची भावना अज्ञातविषयिणी असल्यामुळें त्याचे गुणधर्म तुम्हास कळत नाहींत. म्हणून इतक्यानेंच ज्ञानशक्तीचें क्षणिकत्व ठरत नाहीं. आणखी अज्ञेयापासून ज्ञान होणें म्हणजे आंधारापासून प्रकाश उत्पन्न होण्यासारखें विरुद्ध म्हणणें होय. ही सर्व भ्रांति आहे असें म्हणाल, तर अज्ञेयास भ्रांति व्हावयाची नाहीं, भ्रांति जी व्हावयाची ती ज्ञेयानुसार ज्ञानशक्तीसच झाली पाहिजे, आणि असाच सर्वत्र नियम आहे. कदाचित् म्हणाल कीं, ज्याप्रमाणें आंधारांत घुबडास प्रकाश दिसतो, त्याप्रमाणें ज्ञानशक्ति भ्रांतीनें आपणास भासते, हें म्हणणें असिद्ध आहे. कारण घुबडास आंधारांत जो प्रकाश भासतो तो अंशतः त्याच्या डोळ्यांत असतो, आणि बाह्य आंधार अत्यंत प्रकाशाभावरूप नसल्यामुळें त्या आंधारांतील भावरूप जो प्रकाश त्याचा घुबडाच्या डोळ्याशीं संबंध झाल्यामुळें त्याला आंधारांत प्रकाश भासतो. या दृष्टान्ताचा वरील गोष्टीशीं मेळ घालूं. आपणास ज्ञान जें होतें तें दृश्यरूप विश्वाचें असो, किंवा केवलाच्या आभासास्तिक्याचें असो, पण तें ज्ञेयानुसार असलेंच पाहिजे, आणि तसें म्हटलें कीं, जें कांहीं भावरूप सत्य आभासरूपानें ज्ञेय होत असेल तें ज्ञानमय असलें पाहिजे. अज्ञानमय मानलें तर ज्याप्रमाणें आंधाराचें प्रतिबिंब पडत नाहीं, त्याप्रमाणें त्याचाही आभास न झाला पाहिजे, पण येथें तर आभासावांचून भागत नाहीं; म्हणून प्रकाशाप्रमाणें हें सत्यही ज्ञानमय असलें पाहिजे. आतां एवढें मात्र खरें कीं, घुबडाचे डोळे आकुंचित असल्यामुळें हा प्रकाश सूर्याचाच आहे असें त्यास ज्ञान होत नाहीं, परंतु त्याचा व्यवहार मात्र प्रकाशांतच चालतो. इतक्यानेंच सूर्य प्रकाशमय नाहीं असें होईल काय ? त्याचप्रमाणें ही आभास घेणारी ज्ञानशक्ति व्यष्टिरूप असल्यामुळें समष्टिरूप ज्ञानाचें तिजकडून आकलन होत नाहीं, इतक्यानेंच ती अज्ञेय ठरते

काय ? असो. ही आभास घेणारी ज्ञानशक्ति स्वयंभूच मानली पाहिजे. ही वीर्यांत कोठें होती म्हणाल, तर ज्याप्रमाणें घुबडाचे डोळे सूक्ष्मरूपानें अंड्यामध्यें होते, त्याचप्रमाणें विषय आकुंचित असल्यामुळें ही ज्ञानशक्तिही सूक्ष्मरूपानें वीर्यांतच होती. त्याचा आपणास अनुभव कां येत नाहीं असें म्हणाल, तर तुह्मांस निद्रेंतील ज्ञानाचा तरी अनुभव कोठें येतो ? परंतु जागृतींत स्मृति मात्र होते, त्यावरून असें अनुमान होतें कीं, निद्रेंत लीन रूपानें ज्ञान आहे, त्याचप्रमाणें जाग्रदादि अवस्थांत असणारी आपली ज्ञानशक्ति वीर्यांत लीनरूपानें होती, असें कार्यपद्धतिद्वारा अनुमान निघतें; म्हणून ज्ञानशक्ति स्वयंभूच मानली पाहिजे. मग ती स्वयंभू ज्ञानशक्ति व अज्ञेय महाशक्ति या दोहोंचे बनलेलें तें महासत्य आहे काय ? तसें मानाल तर आपली ज्ञानशक्ति अज्ञेयापेक्षां बलवत्तर होईल; कारण प्रकाशामध्यें जसा घुबडाचा व्यवहार चालतो, त्याचप्रमाणें आपलाही व्यवहार आभासरूप ज्ञानामध्यें चालतो. क्रिया जी करावयाची ती ज्ञानावांचून घडत नाहीं, अज्ञानाला क्रिया करण्याचें सामर्थ्य नाहीं. यावरून जगद्रूपक्रिया ज्या शक्तीनें होते ती शक्ति ज्ञानमय असली पाहिजे. इतकेंही करून अज्ञेयच म्हणाल, तर हा पोरखेळ हट्ट आहे, त्यास कांहीं प्रमाण नाहीं. सर्व वस्तूंचे मानानें आकलन होत नाहीं, हेंच आमचें प्रमाण असें ह्मणाल, तर सर्व वस्तू अनाकलनीय आहेत, आणि केवलही भावरूप आहे. अशा आपल्या अनपेक्ष ज्ञानरूप भावनेचें अस्तित्व कोठें जाईल ? जेथें अस्तित्व आहे तेथें आभास असलाच पाहिजे. आभास आहे तर ज्ञान असलेंच पाहिजे, आणि ज्ञान आहे तर तें ज्ञेयानुसार असलें पाहिजे. ज्ञेय असून आभास कसा अंगिकारिला असें ह्मणाल, तर ज्याप्रमाणें सूर्याचे अवघड प्रकाशाचा डोळ्याच्या सूक्ष्म प्रकाशामध्यें प्रतिबिंबरूप आभास घडतो, त्याचप्रमाणें समष्टिरूपज्ञेयाचा व्यष्टिरूप ज्ञानशक्तीमध्यें आभास घडतो. अर्थात् हें सिद्ध झालें कीं, जगत्क्रिया करणारी महाशक्ति कोणत्या तरी एका सर्वव्यापी सदधिष्ठानावर आश्रित आहे हें निर्विवाद आहे. पुरे, आतां पुष्कळ प्रमाणें देत बसत नाहीं. विचारवंतानें विचार करून आणखी उपपत्ति जुळवून घ्याव्या.

मग अधिष्ठानाचा पक्का बोध झाला म्हणजे तें अधिष्ठान द्रव्याचें अंतःस्वरूप व भावनेचें अंतःस्वरूप आहे हें तुम्हासच कळेल. मग ह्या अंतःस्वरूपासच अज्ञेय म्हणावयाचें काय ? होय म्हणाल तर मग ही ज्ञानशक्ति कशी झाली ? ही भ्रांति आहे म्हणाल तर अज्ञात अधिष्ठानावर भ्रांति होण्याचा संभव नाहीं, असें पूर्वीच सांगितलें. तें कांहींही असो, त्यासर्वांचें मनानें आकलनच होत नाहीं म्हणाल, तर तें बरोबर नाहीं, कारण ज्याचें मनानें आकलनच होत नाहीं त्याच्या अस्तित्वाचें ज्ञान तरी कसें होईल ? अस्तित्वाचें ज्ञान होण्याचें प्रयोजन काय ? असें म्हणाल तर तुमच्या मतानें सर्वच अज्ञेय झालें, मग अर्थात तुम्हीही तुम्हाला अज्ञेयच झाले. असें असतां देहापुरत्या ज्ञानानें आपलें कार्य भागत नाहीं, आणखी कांहीं ज्ञान पाहिजे हें दुसऱ्या भागांत कशाला म्हटलें ? तें कांहीं असो, शब्दानें सांगतां येत नाहीं असें म्हणाल, तर मी विचारतों कीं, मनानें जें तुम्हाला अज्ञेय वाटतें तें शब्दांनीं सांगतांच जर येत नाहीं, तर ग्रंथामध्यें तुम्ही काय लिहून ठेविले ? भलतेंच कांहीं प्रतिपादन केलें असेल कीं नाहीं ?

सारांश, तुम्हाला जें अज्ञेय वाटतें तें तुमच्या अज्ञानामुळें. एरव्हीं जें कांहीं आहे तें अज्ञेय मुळींच नाहीं. तर ज्ञेयाज्ञेयातीत स्वयमानंदरूप तटस्थ आहे, आणि त्याचाच आभास हें जगत् आहे. ह्या सिद्धान्त सोडून अज्ञेय म्हणत होत्साते घोटाळ्याचे ग्रंथ लिहिणें हेंच का तुमचें मतभेद सहिष्णुत्व ? वाहवा काय सुबक उपदेश हा !! अहो मलाही कळालें

---

वरील पत्राचें उत्तर श्रीमंत जठार साहेबांनीं ता० जून १९०२ ला लिहून पाठविलें तें येणें प्रमाणें:—

"तुमचा लेख एकंदर वाचल्यानंतर फार मौज वाटली. मयूरपक्षांच्या डोळ्यांप्रमाणें डोळे बाळगण्यापेक्षां तुमच्यासारखें प्रज्ञाचक्षूच होणें फार उत्तम आहे. डार्विन्, स्पेन्सर वगैरेंचीं मतें जितकीं तुम्ही धुंडाळून चिकित्सा केली तितकी दुसऱ्यानें केलेली आढळली नाहीं. हे तुमचे लेख कोणत्या तरी मासिक पत्राकडे अथवा केसरी सारख्या वर्त्तमान पत्राकडे जरूर पाठवून प्रसिद्ध करावें अशी आमची अग्रहानें शिफारस आहे."

नाहीं व दुसऱ्यालाही कळत नाहीं असें ह्मणून आपलें ठाममत कशावरही न देतां निसटून जाणें हें गुरुत्वाचें लक्षण नव्हे. तर गुरु तोच ह्मणावा कीं, शिष्याच्या सर्व शंका जो हरण करितो. इत्यादि प्रश्न मी स्पेन्सरमतानुयायांपुढें मांडले. परंतु एकाही शंकेचें उत्तर त्यांनीं दिलें नाहीं. त्यावरून मला असें वाटलें कीं, कोणत्याही बाजूनीं पाहिलें असतां हें स्पेन्सरचें मत अगदीं असिद्ध आहे. इति स्पेन्सरमत खंडनम्.

## श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ.

### रा० रा० हरिभाऊ केवले यांस पाठविलेलें पत्र १ लें.

ॐनमो श्री गोपीरमणा । गोकुळवासी करुणाघना । कालियांतका दानवभंजना । विश्वव्यापका विश्वपते ॥ १ ॥ अहो श्रीहरीरूपें भगिनी। तुह्मां माथा ओळगो चरणीं । आणि सलगीये विनवणी । करित असों ॥ २ ॥ तरी अंतका न भितां । दोघी आळवूं नंदसुता । सेवेमाजीं जन्मानंता । आक्रमूं सुखें ॥ ३ ॥ आणिकही साह्यकारिणी । कृष्णललना चातुर्यखाणी । वैसल्या पाहुनी हरिदिनी । प्रतिक्षे तुझ्या ॥ ४ ॥ स्त्रीपुरुष नव्हे आत्मा । ऐसी न धरावी प्रमा । सेवकप्रीतिमुळें स्त्री जीवात्मा । सेव्यत्वें परमात्मा पुरुष ॥ ५ ॥ दोही दिठीं एक कांत । येणें सुखें जन्मानंत । क्षणैक क्षमभांत । आपजेल ॥ ६ ॥ यालागीं ऐसें कीजे । आपजे तरी हा ठावो पाविजे । हरिगायनीं उवाइजे । अंतःप्रेमा ॥ ७ ॥ अथवा शारीरत्रासें । आजिचिया दिना नुमसे । येथूनि पुढें कुवासे । नियमबद्धे ॥८॥ आणि निद्रेचा उल्हासू । चाखिजे वृंदावनसौरसू । दोन्ही सांडूनि पौरुषु । कामिन्या यावें ॥ ९ ॥ नाना पुरुषाचें संवर्धन । तो पातिव्रत्यांश धर्म । ह्मणूनि दोघी पुरुषोत्तम । वशत्वा आणूं ॥ १० ॥ अहो अरुषवाणी इया । ठावो न द्यावा कोपचया । आपजे तरी या । ना हरी ह्मणावा ॥ ११ ॥ श्री ज्ञानेश्वर माउली । वंदूनि तत्पाउली । विनती या संपविली । पत्रिका ही ॥ १२ ॥

ॐतत्सदिति श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ.

मुक्काम उमरावती मिती ज्येष्ठ वद्य ११ शके १८२५.

## श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ.

### हरिभाऊस पाठविलेलें पत्र २ रें.

ॐनमो श्रीगुरु निष्पापा । विश्वात्मया ब्रह्मरूपा । भक्तवत्सला मायबापा । त्रिविधतापा अनकल ॥ १ ॥ भूर्भुवस्वाः ही पूरात्रिपुटी । गोविली प्रणवें एके गाठीं । ते विश्वपट सूत्रकंठीं । मिरवित असे ॥ २ ॥ म्हणोनियां जी वेदमूर्ति । ही त्रयपुरी कीर्ति । गाजे परी श्रुती । अभिप्राय ॥ ३ ॥ हा अविद्याभ्रमू नाथिला आह्मां । तो हरुनी दाविली सच्चित्प्रमा । येणें अर्थें हरीशर्मा । नाम तुह्मां विराजे ॥ ४ ॥ तुह्मां करावें कुंठित । हा तो नाहीं मम हेत । परी कांहीं कारण निमित्त । लिहिणें असे ॥ ५ ॥ तुम्ही मागील पत्रोत्तरीं । लिहिलीं वाक्यें मानकुसरी । ही अकृपा लेंकु-

---

१ हें पत्रोत्तर सूक्तिरत्नावलि द्वि० यष्टि उत्तरार्धाच्या दहाव्या पृष्ठावरील महाराजांच्या पत्राचें उत्तर असून तें वेदान्तप्रचूर असल्यामुळें येथें घेतों:—

### हरिः ॐ तत्सत् श्रीगुरुदेवदत्त प्रसन्न.

वृत्त भुजंगप्रयात.

जयाची जगीं एक सर्वत्र सत्ता । जयाची कृपा चेतवी स्फूर्ति चित्ता ।
असे जो सदा सच्चिदानंदठायीं । नमस्कार माझा गुरूदत्तपायीं ॥ १ ॥
जया सेवितां दैन्य कोठें दिसेना । जयाच्या कृपें नासती भाव नाना ।
जयाची कृपा मुक्तिकैवल्यदानी । नमस्कार माझा गुरूपादपद्मीं ॥ २ ॥

ओव्या.

अहो जी गुरु गुलाबराया । डोई ठेवूनि उभय पायां । नमन करी हरि सखया । कृपामूर्ते ॥ १ ॥ लक्षितां आपले प्रसादपत्र । आनंदें रोमांचित सर्वगात्र । कीं तें उपदेश सुधापात्र । मज गमे ॥ २ ॥ पत्रिका असे लहान । निर्देशी सच्चिदानंदपद गहन । दीप ज्योती दिसे सान । परी प्रकाश थोर ॥ ३ ॥ चंद्रसूर्य आकृति सान । प्रकाशी कीर त्रिभुवन । कीं नेत्र बाहुली बिंदुप्रमाण । दीप्ति बहू ॥ ४ ॥ ऐसिया पत्रिके द्यावया उत्तर । सामर्थ्य नाहीं किंचिन्मात्र । विषयही गूढ फार । मी तों मतिहीन ॥ ५ ॥

रावरी । काय म्हणोनियां ॥ ६ ॥ हो जी आपुलिया लेंकुरा । घालितां मानवचनें पाखरा । तें तो दुरभिमानीं थारा । सावियाचि घे ॥ ७ ॥ यालागीं ऐसें न करावें । मज चिरंजीवचि लिहावें । एवढें मागत जीवें-भावें । कृपालु बा गुरुमूर्ति ॥ ८ ॥ आणि दुसरी विज्ञापणा । श्रीरामराव गुरुराणा । जो ग्वाल्हेर संस्थाना । वास्तव्य करी ॥ ९ ॥ तन्मुखनिर्गत सुधाकुंड । जो स्वानंद साम्राज्य उत्तरखंड । तो आगत तरी प्रचंड ।

---

न जाणें ओवीपद्यश्लोकरचना । संबंधही पडला नाहीं जाणा । काय हो मी मूढ तुह्मी नेणा । मजसी महाराजा ॥ ६ ॥ असो प्रसंगीं पाहिजे बोलिलें । ह्मणूनि स्मरूनि तुमचीं पाउलें । बोलेन जें बोलविलें । आपुले प्रसादें ॥ ७ ॥ सूत्रधार सूत्राधारें । बाहुली नाचवी एकसरें । तैसें आपुलेंच पत्राधारें । करी प्रयत्न ॥ ८ ॥ आतां मी सांगू कांहीं स्वतंत्र । तरी न्यून काय जी तुमचें पत्र । जें मूर्तिमंत कैवल्यदानपात्र । तात्पर्येंसी ॥ ९ ॥ वंद्यवंदक करूनि मिस । सूत्रप्राय बोलिले केवळ सारांश । कीं जे कैवल्यकनकमूस । अद्वैत सिद्धान्ताची ॥ १० ॥ वेद नेतिनेतीति अनुवादी । परी भेटी नाहीं साम्राज्यपदीं । मग मौन्येंचि अनेकांची मांदी । सारूनि सुखरूप होई ॥ ११ ॥ कीं जो जो भेटी करावा लाग । तो तो सुखैकघनीं होय अलाग । जे वस्तूसी नसे अंगप्रत्यंग । वस्तु अंगे स्वतः सिद्ध ॥ १२ ॥ सूर्य सर्वांसी प्रकाशी । मा स्वतः काय अप्रकाशी । वस्तु सूर्यासीही प्रकाशी । तरी काई नाहीं ह्मणों ये ॥ १३ ॥ वस्तु अनाम अरूप । वस्तु नांवही मिथ्या जल्प । परी करावा लागे आरोप । जे द्वैत-निषेधें अद्वैत प्राप्ति ॥ १४ ॥ हेंचि व्यतिरेकें जडनिषेधें । दाविलें निजा-त्मस्वरूप प्रसिद्धें । जें ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या श्रुत्युनुरोधें । प्रमाणा येई ॥ १५ ॥ ऐसेंचि ज्ञानी जाणती । व्यतिरेकें वस्तूतें ओळखती । परी जनीं जनार्दन न जाणों लाहती । जें मुख्य वर्म ॥ १६ ॥ ह्मणूनि तयांही पूर्णपणें न कळे । कीं देहाकारें जागृति वेळे । हें दृश्यजात देखतां डोळे । चैतन्यासीं अभाव ॥ १७ ॥ हेंचि ज्ञानियाचें न कळणें । जे स्वरूपच्युति ऐसें बरळणें । आणि तत्प्राप्ति साधन करणें । जडमूढ समाधि ॥ १८ ॥ ते चुकती हें वर्म । जें सत्यज्ञानमनंतं ब्रह्म । जें अनेकीं व्याप्त एक पूर्ण ।

पाठवावा ॥ १० ॥ आणि सदाचारस्मृति । तेही पाठवा शीघ्रगती । पत्रोत्तर तत्संगतीं । पाठवावें कृपेनें ॥ ११ ॥ माझे अरुष हे बोल । अप्रसादिक फोल । परी हे बोबडे बोल । ग्रहण कीजे गुरुमाये ॥ १२ ॥ अहो तनुमनेंसहित । केला साष्टांग प्रणिपात । चरणीं अर्पिलें आर्षलिखित तें तुम्हां समस्त प्रीति पावो ॥ १३ ॥

ॐ तत्सत् श्री हरिभाऊ समर्थ.

मुक्काम माधान
श्रावण शके १८२५

---

सदोदित अन्वयें ॥१९॥ तेंही सर्वं खल्विदं ब्रह्म या श्रुति । अन्वयीं दाविली उपपत्ति । जें जाणणें सर्वांप्रति । तें चैतन्य अनेकीं एकत्वें ॥ २० ॥ आणि ज्ञानी सगुणभक्ति निषेधिती । तेणें प्रारब्धकर्मीं तया गुंतागुंती । जे नित्य समाधीसी अप्राप्ति । देहवंता ॥ २१ ॥ तें भक्तिरहस्य अतिगूढ । दाविला त्याचाही निवाड । जें विश्वरूपें स्वानंदतरूवाढ । सुवर्णालंकार दृष्टान्तें ॥ २२ ॥ वरी अमृतबिंदुसिंधुन्याय । एक अमरत्व जैसा प्रत्यय । तैसेंचि सगुण रामकृष्ण ब्रह्ममय । हेंही प्रतिष्ठिलें ॥ २३ ॥ एकेक निरूपणाची नवाई । काय वाणूं सद्गुरु आई । कीं सच्चिदानंदरूपें आई । मजसी पान्हावली ॥२४॥ शेवटीं शिवो भूत्वा शिवं यजेदिति । श्रुति घेऊनी प्रमाण भूती । सगुणस्फुरण सोहंभावप्रतीति । विशद करूनी दिधली ॥२५॥ कीं ते पूर्ण समाधी सहजस्थिती । कैवल्य मुक्ति विदेहस्थिती । चरमाख्य जियेतें ज्ञानी म्हणती । अल्पमती मज वाटे ॥ २६ ॥ जी नव्हे जडमूढवत् । चैतन्य नाहीं काष्टपाषाणवत् । कर्मीं नैष्कर्म्य जिचेनि प्राप्त । तीच समाधि श्रेष्ठ जी ॥ २७ ॥ जेणें गुरुशिष्य संप्रदाय । ब्रह्मप्राप्ति असे उपाय । वेदान्तग्रंथांही नये विपाय । सारासार मध्यवर्ती जे ॥ २८ ॥ इतुकें सान निरूपण । या रीतीं कळसासी आणून । प्रेमपान्हा ओसंडला पूर्ण । माउलीये बाळका ॥ २९ ॥ कीं तो अनुग्रहामृत घट भरून । देऊं पातलीस दासालागून । कीं हा अनुभवामृताचि संपूर्ण । बालरूपें अवतरला ॥ ३० ॥ ऐसें पुढत पुढती किती वाखाणूं । कां खद्योत जैसा प्रकाशी भानू । कीं बालहरिण पंचाननू । पुढें धांवे ॥ ३१ ॥ येथें बोला-

## श्री ज्ञानेश्वर माउली.

### रा. रा. गणपतराव सावळीकर यांना पाठविलेलें पत्र.

ओवीः– ॐ नमो जी देवदेवा । स्वामी सद्गुरु ज्ञानदेवा । त्वद्दासपदरजधुळसेवा । जन्मोजन्मीं घडो कीं ॥ १ ॥ नलगे मोक्ष न लगे मुक्ति । न लगे विद्या न लगे युक्ति । तुमचिया सेवेची आसक्ति । राहो चित्तीं महाराजा ॥ २ ॥ अहो गणपती चिरंजीवा । जरी तुम्हां ब्रम्हानुभव व्हावा । तरी सद्गुरु ज्ञानदेवा । शरण प्रेमें जावें कीं ॥ ३ ॥ हृदयीं असावा अनुताप थोर । क्षणिक पहावा संसार । मनासक्ति विषयांवर ।

---

वया नसे उरी । परी धैर्य केलें समर्थांपुढारी । जे अंजुली भरून समुद्राभीतरीं । जलराज पूजिला ॥ ३२ ॥ कीं पक्वान्नाचें भरूनि ताट । माता भरवी बाळका गोमट । तों बाळकाचि लीलें उलट । मातेलागी जेववी ॥ ३३ ॥ ऐसा समर्थाचा अपराधी । नसतेंच करी अनधिकारी । परी शरण जाणूनि अनन्यधी । क्षमापिजे दयाळा ॥ ३४ ॥ आतां कधीं होईल दर्शन । बाळाची आर्त पुरवाल कृपेंकरून । हें उत्तरीं सविस्तर लेखन । व्हावें ही विनती माझी ॥ ३५ ॥ पुढतीं हीच विज्ञापना । जें लेखनीं न्यून तें पूर्णपणा । करूनि लिहिजे सुधारणा । जैसी महाराजा ॥ ३६ ॥ दैवयोगें झाली भेटी । कां करूं दैन्यगोष्टी । धनी कराल कृपादृष्टीं । हाचि पूर्ण विश्वास ॥ ३७ ॥ माता लक्षी अज्ञान बालका । तैसे पाळा ळळे सेवका । हेंचि मागणें नायका । ऐसें होऊं नये ॥ ३८ ॥ सद्गुरुचरणकमळीं । प्रेम भावें होऊनि अळी । गुंजारव करो मन्मति भुलली । कृपामृताकारणें ॥ ३९ ॥ वेडें वांकुडें लेखन । सद्गुरुचरणीं असो अर्पण । हेंचि वंदन विज्ञापन । पुढतपुढती ॥ ४० ॥ सद्गुरु दत्तावंदन । तैसेंचि सर्वात्मानंदालागून । तोचि भाव तव पदींही पूर्ण । सर्वदां समानत्वें ॥ ४१ ॥

हरिः ॐतत्सत् श्रीगुरुदत्तात्रय अवधूत प्रसन्न.

उमरावती
मि० श्राव० शुद्ध ५
बुधवार.

समार्थांचा आज्ञांकित.
**हरि गणपत केवले.**

ठेवूं नये सर्वथा ॥ ४ ॥ मृत्यूचें बाळगावें भय,। चिंतावे श्रीगुरूचे पाय । आत्मानुभवाची सोय । नित्य धरावी ॥ ५ ॥ वाईट कर्मासाठीं परतंत्र । उत्तम परमार्थीं असावें स्वतंत्र । मुखें प्रणवसहित मंत्र । गुरूपदिष्ट जपावा ॥ ६ ॥ आंगींचे जे उच्छृंखल गुण । समूळ सांडावे निरीक्षून । गुरुशास्त्रमुखें ज्ञान । प्रेमें ऐकत असावें ॥ ७ ॥ आंगीं राखावें वैराग्य बळा । इंद्रियां वळावें सकळां । प्राणायामें प्राणकळा । अभ्यासावी ॥८॥ अंतरीं असावी श्रीगुरुभक्ति । बुद्धीसी ब्रह्मविचारासक्ति । जीवासी द्यावी जीवन्मुक्ती । ब्रह्मानुभवें ॥ ९ ॥ तुमचें प्रेमबद्ध पत्र । अक्षरशः वाचलें स्वतंत्र । तेणें आनंद झाला थोर । परी दुःखही वाटलें ॥ १० ॥ कांहीं पत्र सहज सुरस । कोठें केले दिसती सायास । करुणा नसतांही भाव विशेष । आणिला बळें ॥ ११ ॥ तरी ऐसें न करावें । आधीं प्रेममूळ धरावें । मग कारुण्यस्वभावें । चढे आंगीं ॥ १२ ॥ ताई ऐसा चित्तीं । प्रेम आणावा निश्चिती । मग सहज कारुण्यसंपत्ति । वचनीं भरे ॥१३॥ यालागीं सांडोनि देहाभिमान । सदा करावें भगवद्भजन । संतसेवा सद्गुरुस्मरण । हें मुख्य साधन प्रेमाचें ॥ १४ ॥ इतर योगादि करिती साधनें । प्रेम उत्पन्न नव्हे तेणें । जैसें घटाचिया जलसिंचनें । गंगाप्रवाह चालेना ॥ १५ ॥ तुह्मांतें सर्वथा नाहीं भीति । आत्मब्रह्मैक्य स्मरावें चित्तीं । मग जेथें जाल तेथें खंती । वाटों न द्यावी ॥ १६ ॥ तुह्मी कोठेंही असावें । परी ताईतें सांभाळावें । पूर्ववचन पाळावें । स्विकारिलें जें ॥ १७ ॥ मिळवूनि प्रेमाचा कळस । प्यावा ज्ञानसुधारस । सांडावे संसृतिसायास । कावाड कष्ट ॥ १८ ॥ घेउनी तनुमनधन । जावें ज्ञानेश्वरा शरण । मग मोक्ष धरील चरण । निश्चय जाणा हा चित्तीं ॥ १९ ॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु.

---

वे० शा० सं० गोविंदशास्त्री पंचभाई यांना पाठविलेलें पत्र.

श्रीगुरू आचार्य वेदमूर्ति गोविंदशास्त्री पंचभाई महाराज यांचे चरणीं चिरंजीवी पंचलतिका इचा शिरसाष्टांग प्रणिपात विनंती. आपल्या एक एक उपकाराचें स्मरण केलें ह्मणजे हृदयच्छेद होऊं पाहतो. पण आह्मी मात्र दुर्दैवी असल्यामुळें आमच्या हातून कांहींच सेवा होऊं

शकत नाहीं, त्याविषयीं वाईट न वाटतां उलटें आपण येथें कां येत नाहीं असे पुष्कळ वेळ उद्गार काढले, पण आपण कांहींच उत्तर न देतां उलट मौनच मात्र धारण केलें; एवढा आपला माझे ठिकाणीं विश्वास बसण्यापुरती माझी योग्यता नाहीं. माझ्या आंगीं एवढा कोणताच मोठा चमत्कार नाहीं कीं, मी बोलेन तसें होऊं शकेल, व पुढेंही तो चमत्कार यावयाचा नाहीं. त्यामुळेंच माझी निंदा लोकांनीं मागें केली, आतां करतात व पुढेंही करतील; आणि माझें वर्तनही सहजच असें असतें कीं, ज्याच्या योगानें लोकांनीं माझी निंदाच करावी. ही गोष्ट सांगण्यासारखी नव्हे, पण तुह्माला मात्र कांहीं कारणामुळें सांगणें भाग पडलें. ह्मणून आपल्या समक्ष माझी निंदा कोणी केली असतानां आपणास वाईट वाटणें साहजिक आहे; कारण पुत्राची निंदा पिता सहन करीत नाहीं. परंतु तसें आपण वाटूं देऊं नये, कारण श्रीकृष्णास जर मी पती मानित आहे तर त्यांच्या आज्ञेप्रमाणें वागणें हें आमचें सर्वस्वी कर्तव्य आहे. ह्मणूनच " अमानित्वमदंभित्वमहिंसाक्षांतिरार्जवम् " या गीतेंतील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें अपमान करून घेण्याकडेच माझें फार लक्ष असतें. शिवाय " तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित् । अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः " हें भगवद्वाक्य सोन्याच्या अक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखें आहे, आणि चमत्कार वगैरे जे कांहीं होतात ते व्यावहारिक लोकांनां खुष ठेवण्याकरितां असतात. परमार्थांत त्याचा लेशही उपयोग पडत नाहीं. ह्मणूनच श्रीतुकाराम महाराज ह्मणतात:—

अभंग.

सोन्याचे पर्वत करवती पाषाण । अवघे रानोरान कल्पतरू ॥१॥
करवेल मंत्रयंत्र अनुष्ठान । नेववेल प्राण ब्रह्मांडासी ॥ २ ॥
ब्रह्माविष्णुशिव होतील चाकर । नित्यची किंकर इंद्र चंद्र ॥ ३ ॥
परी ते दुर्लभ श्रीकृष्णाचे पाय । तेथें हे उपाय न चलती ॥४॥
तुका ह्मणे माझा ऐसाची निश्चय । आठवीन पाय तुझे देवा ॥५॥

या अभंगांत प्रत्यक्षच चमत्काराचा निषेध केला आहे. आतां निंदेविषयींही तुकाराम महाराज असेंच ह्मणतात:—

निंदकाचें घर असावें शेजारीं । येवातो बाहेरी गुण दोष ॥१॥

निंदक हा माझा कंठींचा ताईत । त्यानें सर्व हीत केलें माझें ॥२॥

याचप्रमाणें कौषीतक्युपनिषदांत एक श्रुती आहे. "तस्य ते गृण्हन्ति सुहृदः साधुकृत्यान् द्विषत: पापकृत्यान् पुत्रादयो धनान् सर्वे पापपुण्ये विधूय निरंजनं शाश्वतमुपेति द्विव्यम् । " श्रुत्यर्थः– जो ब्रह्मनिष्ठ असतो त्याची स्तुति करणारे जन त्याचें पुण्य घेतात, द्वेष करणारे जन पाप घेतात, आणि त्याचे पुत्रनात्वादिक त्याचें धन घेतात. तो स्वत: तर पापपुण्य या दोहोंचाही नाश करून शाश्वत जें निरंजन पद त्याचे ठिकाणीं प्राप्त होत असतो. या श्रुतींत ब्रह्मनिष्ठांनां पुत्र असावेत असें सांगितलें, ह्मणूनच श्रीगुरुआज्ञेवरून मनकरणिकाचे ठिकाणीं मी गर्भस्थापन केला आहे. त्याहीबद्दल पुष्कळ पुरुष विशेषेंकरून निंदा करितात, पण त्याबद्दल मला कांहींच वाटत नाहीं. आतां आपणच सांगावें महाराज कीं, मी श्रुती स्मृती आणि संतांच्या आचरणाप्रमाणें चालावें किंवा लोकांनां खुष ठेवण्याकरितां व्यावहारिक चमत्कार दाखवून त्याप्रमाणें चालावें ? कबीर महाराज ह्मणतातः–

दोहा.

निंदक हमारे इष्ट है व माबापसे पार ।
आप डुबे मंझारमें हमे उतारत पार ॥ १ ॥

या सर्व वचनांवरून माझा पक्का निश्चय झाला आहे कीं, मला चमत्काराची अगर कोणी साधु ह्मटलें पाहिजे याची बिलकुल आवश्यकता नाहीं, आणि ह्मणूनच कोणी मजविषयीं कांहींही उद्गार काढले तरी आपण वाईट वाटूं देऊं नका. ऋषीपत्न्यांनीं श्रीकृष्णाला अन्न नेऊन देतांनां, आणि गोपींनीही श्रीकृष्णाबरोबर रासक्रीडा करतांनां त्यांचीही निंदा अतिशयच झाली. तितकी तर माझी अझून झालीही नाहीं. तितकी व्हावी अशी माझी फार इच्छा आहे. परंतु आपल्या कृपेनें प्रभू तसें केव्हां घडूनें आणील कोण जाणे. शिवाय तुकारामबुवानें एका बाईचें पोट आलें असतांनां आपलें नांव सांगून लोकांकडून आपणास [illegible] बसवून घेतलें अशींहि उदाहरणें दिसतात. आपणास ठाऊकच आहे कीं, कुंभारे बोवानें मला " ज्ञानेश्वर सो[illegible]ा " असें ह्मटलें होतें त्यावरून त्यांच्याशीं मी भाषण वर्ज केलें. अ[illegible]. आपणाला मात्र माझ्यामुळें फार

त्रास होत आहे. पण ही गोष्ट नेमानें व्हावयाचीच. त्याबद्दल खेद करून उपयोग नाहीं. कारण " त्वां सेवतां सुरकृता बहवोऽन्तरायाः " या भागवतांतील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें भगवद्भक्ति पूर्ण बाणेपर्यंत देवता विघ्नें करीत असतात. ह्मणून जे कोणी आपणास त्रास देतात, त्यांच्या मनामध्यें देवताच स्वतः प्रेरणा करीत असतात. त्या बिचाऱ्यांचा कांहींच अपराध नसतो. शिवाय " सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता परो ददातीति कुबुद्धिरेषा " इत्यादि श्लोकांत नेहमीं समाधान वृत्तीच ठेवण्यास सांगितलें आहे. महाराज, आपलें संचित तर दग्ध होत चाललें आहे. क्रियमाणही हळुहळु अभ्यासानें क्षीण होईल. पण प्रारब्ध जें कर्म तें मात्र भोगलेंच पाहिजे. " प्रारब्ध कर्मणां भोगादेव क्षयः " अशी श्रुति आहे. यद्यपि योगशास्त्रानें पुरुष प्रारब्धाला जिंकून टाकतो असें सांगितलें आहे, तथापि प्रारब्ध कर्माचें दुःख जोंपर्यंत येऊन पडलें नाहीं तोंपर्यंतच त्याचा उपाय करावा असें सांगितलें आहे. " हेयं दुःख मनागतम् " इत्यादि सूत्र त्याविषयीं प्रमाण आहे. पण आपणाला रोग होण्यापूर्वीं जर ह्या कन्येची भेट झाली असती तर बरें झालें असतें. पण आतांही आपली जी आज्ञा असेल ती मजकडून होईल तितकी साह्यता करून पाळण्यास मी तयार आहे. पण दुसऱ्याचें मात्र ऐकणार नाहीं. आपण स्वतःच सांगितलें पाहिजे. पुण्यास तर माझा एका रांडेच्या हातून जोडे खाण्याचा विचार होता पण मंडळींनीं ती गोष्ट घडूं दिली नाहीं. हे महाराज, येथवर मी आपलें रडत गाणें मला वाटलें तितकें गाइलें. आतां मुख्य गोष्ट ही कीं, जेवढें कांहीं विश्वांत आपणास चांगलें आणि वाईट भासतें तेवढें आपल्या अज्ञानामुळें भासत असतें. आत्मा आणि परमात्मा कांहीं निराळा नाहीं. पण आपल्या डोळ्यावर अज्ञानाचा पडदा आला असल्यामुळें तो आपल्या हृदयांत असूनच कोट्यावधी योजनें दूर भासतो. पण खरोखर तो प्रभू आपल्यापुढें उभाच आहे. आपणच मात्र त्याच्याकडे पहात नाहीं, त्याला त्यानें काय करावें ? आपणच आपणास विसरलों हें न जाणून मनुष्य देवावर दोष देत असतो. पण त्यानें तरी आपणास विकत पिसें लावून घेऊन तुम्हाला मिथ्या साह्य देण्याइतकें पुण्य कोठून आणावें ? आपणास जो

भुलला आहे त्याला श्रुति स्पष्ट चोर ह्मणते. श्रुतिः— योऽन्यथा संतमात्मानमन्यथा प्रतिपद्यते । किं तेन न कृतं पापं चौरेणात्मापहारिणा ॥ तसेंच श्रीमत्सद्गुरुतात ज्ञानेश्वरमहाराज ह्मणतात " शास्त्रसिद्ध ब्रह्मबुद्धि उपजविसी । तरी कां आपआपणासि बुझसी ना रया. " निळोबाराय म्हणतातः— घरीं चूकलें ठेवणें सर्व कांहीं । उगा धुंडतो भूवरी देश दाही, आणि " जुनें ठेवणें मीपणें तें कळेना " असें समर्थ रामदासही ह्मणतात. याप्रमाणें हा अल्पलेख पुष्पपंकोलिकान्यायानें द्विजराजचरणीं समर्पण केला. श्री ज्ञानेश्वर माउली समर्थेत्यनेनालम् ।

ता. क.— हें पत्र ऐकून आपणास तातडी होईल पण तसें मात्र पावसांत करूं नये, ही माझी विनंति आहे, आणि त्याप्रमाणें कराल अशी आशाही आहे. मात्र प्रसादोत्तर जरूर पाठवावें.

---

## श्री ज्ञानेश्वर माउली.

रा० हरिभाऊस पाठविलेलें पत्र ३ रें.

सा. प्रणिपात उपरी वि. **दो ओठीं एकी गोठी । दो डोळा एकी दिठी । तेवि दोघीं जिहीं सृष्टी । एकचि जेवी ॥ १ ॥**

( अमृ० अ० १ )

प्रथम अलंकार आणि नंतर सोन्याची ओळख ही घातक आहे, हें तुम्हाला पूर्वी सांगितलें होतेंच. म्हणून प्रथम सोनें कळलें पाहिजे, आणि नंतर अलंकाराची मजा भोगली पाहिजे. " ज्ञानात् ध्यानं विशिष्यते " ह्मणजे पूर्वांग ज्ञान पाहिजे. याहून बारकीच्या ओवीचा खुलासा मी सध्यांच करूं शकत नाहीं. हे शब्द जरी तुम्हाला व्यर्थ वाटले तरी आह्मांला सार्थ आहेत. पण स्वार्थ सुटून परमार्थ दृष्टीचा सामानार्थ कळला पाहिजे. याला अति आर्त झाल्यावांचून उपाय सोपा नाहीं. म्हणून सद्गुरुकृपाच त्रिविध तापाला निवारिते. कोणी प्रत्यक्ष सूर्यचंद्र लोकावर जरी गेले तरी तुह्मी तशा नादीं न लागून अमृतानुभवाच्या एका एका ओवीचा शंभर शंभर जन्मपर्यंत जन्मरहित असा अभ्यास कराल काय ? असें मी तुह्मांस विचारतो— उत्तर यावें:— कळावें.

आपलाः—**गुलाब.**

ता. क.— आपण येऊन गेल्यानंतर " राधाविलास " नांवाचें आख्यान करण्यास प्रारंभ झाला आहे. त्या आख्यानांतील झालेल्या सर्व कविता येथें देतां येत नाहींत. तथापि मासल्याकरितां १।२ देतों. येथें आपण आल्यावर सर्व आख्यान वाचण्यांत येईलच. कळावे.

आर्या.

विकसितहरिमुखलज्जा लज्जिततलगलरतिरसरसितस्मिता ।
विस्मितेक्षणक्षपितधीनमुनिविदलिह्याचिमातितमशमिता ॥१॥

पद.

मदविव्हललोचना । अपदरकुचदरदरुनिमदनभर विनवि कुमदमोचना ॥धृ.॥

अशा रीतीच्या बऱ्याच कविता राधाविलास आख्यानांत झालेल्या आहेत, आपण येथें आल्यावर सर्व वाचण्यांत येतीलच. असो. इत्यनेन अलम्.

---

## श्री ज्ञानेश्वर माउली.

रा. विठ्ठलराव केकरे यांस पाठविलेलें पत्र.

स्रग्धरावृत्त.

वंदे ज्ञानेश्वराख्यं गुरुमतिकरुणापूर्णकैवल्यमूर्ति ।
श्रींद्राण्यंभोऽभिषेकश्रियमधिगतवद्यत्पदानंदगंधैः
दीनाः संसारदुःखैरभिहतहृदयास्साधनावाप्तिवंतोऽ
प्यालंब्यां यं दयालुं नततनुमनसः स्वर्चयन्ति स्म संतः ॥१॥
पीत्वा स्तन्यं यदीयं ह्यहमधिगतवान्सौष्ठवं तानवादेः ।
प्रेम्णावघ्राय मौलिं प्रहरति मम या शांकरी बाल्यकाष्टं ।
मौढ्यात्रासानलं मे शमयति सुकरैरमृतानंदनम्रै- ।
वंदे तद्भ्राजमानं सकरुणविमलं यामुनं पादपद्मम् ॥२॥
अध्यारोपापवादोद्गतभवविभवौ बंधमुक्त्यर्थसंज्ञा ।
वध्यारोपेणमायाकृतजगदखिलं चिद्विवर्तं विभाति ।
श्रौताचार्यात्तबोधात्परमनिजसुखे यो न विश्वावभासः ।
सोऽयं बाधोपवादः शृणु जननि धिया विस्तरेण प्रवक्ष्ये ॥३॥
वस्तुन्येकस्वभावे विघटयति च यो भिन्नतां सह्युपाधि ।
स्सूर्योऽप्येकोऽद्वितीयो घटसलिलवशाद्दृश्यते तद्वदत्र ।

माया सत्त्वादियुक्ता सदसदवचना ब्रह्मसत्तात्तसत्त्वाऽऽ
च्छाद्यानंदस्वभावं जगदुदयभिदा भासयत्यन्यथैव ॥४॥
अस्मद्युष्मन्मतिज्ञौ विषयिविषयकौ भातमोवद्विरुद्धा ।
वत्यंतानात्मकत्वान्नमिलितुमुचितौ तन्मयत्वं तथापि ।
अन्यस्मिन्नन्यबुद्धिः कुणपनिजतया सर्वलोकप्रतीते ।
रध्यासाख्यामविद्यां गुरुवचनपरा नष्टतामुन्नयंति ॥५॥
ईशो जीवो विशुद्धा परमचिदु विभागोऽनयोर्जीवविष्ण्वो ।
माया तच्चिन्नियोगो मुनिविनिगदितं षट्कमेतद्ध्वनादि ।
तत्रैकं ब्रह्म पूर्णं सुखघनममृतं सार्वकालेप्यबाध्यं ।
तद्भिन्नाः पंचभावा निगमनिगदितज्ञानतोऽतं प्रयांति ॥६॥
भ्रांत्यां भ्रांत्यैव बद्धस्तदपहननतो नैव तस्याः प्रलाभः ।
तद्वन्मायास्थितौ वा तदपहतिदशायां न मायाजनिज्ञा ।
पृच्छाम्यादौ कदा ते स्मरणमभिहतं ब्रह्मभावस्य मात ।
नं ज्ञानं तद्ध्यनादिप्रकृतिरभिमता किन्तु विद्याविनाश्या ॥७॥
जाड्याद्धेतुः प्रधानं न कापिलकुमतं नापि निस्साक्षिशून्यम् ।
ईशेनाधिष्ठिताश्चेदणव इति कथं स्थौल्यतोऽस्थौल्यतो वा ।
आद्ये तद्धानमंत्ये पततिबलतया कंठ ईशांतवत्वं ।
तस्मादस्माकमज्ञोपाहितमभिमतं वैदिकं चिन्निदानम् ॥८॥
द्वेधा तत्कारणं स्यात् प्रथममयि ह्युपादानमन्यन्निमित्तं ।
मृत्तंतुः कांचनं वा घटपटकटकादौ कुलालादिकं वै ।
अस्मद्वेदांतसिद्धावुभयमपि भवेत्कारणं ब्रह्मतत्त्वं ।
तंतोर्जंतुर्यथैको ह्युभयविधतया स्वाप्नके वाथ चेतः ॥९॥
तत्र द्वेधा विवर्तं परिणतिगमुपादानमुत्पाद्यलब्धि ।
रज्जुः सर्पस्य दुग्धं घृतदधिविषये भिद्यतेऽस्मान्निमित्तं ।
विश्वस्मिंश्चिद्विवर्तं परिणतिजननी संमतानादिमाया ।
सा यस्याज्ञामुपेत्येतदिह निगदितं चिच्छिवाख्यं निमित्तं ॥१०॥
धन्या मान्या स्वनन्या गुरुचरणयुगं सेवमानाः प्रशान्ता ।
श्चैतन्यं चिंतयंतो मतिपतितजनान्तारयंतो व्यटन्तः ।
श्रीमद्विष्णौ शिवेऽस्मिन्नविषयविषये प्रेम संस्थापयंतः ।

संतः संपीतवंतः श्रुतिवचनसुधामंबिकांके लुठंतः ॥११॥
यत्कार्यं कारणे नो मिलति परिणतिस्सेऽयमन्यो विवर्तः ।
योऽत्यक्त्वैव स्वरूपं भवति परमयेऽसौ द्विधैवात्र विद्यात् ।
अध्यस्तो रज्जुसर्पः कनककटकमंबावनध्यस्तरूपो ।
ऽध्यस्तं विद्याद्यविश्वं स यदुपतिरनध्यस्ततो नापनेयः ॥१२॥
तस्माद्भक्तिः सुसिद्धा परचिदधिगमे श्रीगुरोरीश्वरस्य ।
ज्ञाने स्थैर्यं प्रयाते शिवभजनगुणोऽयं परानंदलाभः ।
योगे प्रेम्णापदांभोरुहयुगुलमयि स्थापयित्वा स्वचित्ते ।
नेत्राश्रुक्षालितं तद्विरहयुतमतौ लालनेनानुभाव्यम् ॥१३॥
गोविंदानंदसिंधौ द्रुतसलिलमयी प्रीतिमंदाकिनी या ।
प्रोल्लासैः संप्रयाता मधुररसवशात्स्वच्छवात्सल्यतो वा ।
सद्भावापूर्यमाणो हरिहरचरणांभोरुहस्थायिभावः ।
संसारासक्तिनाशे रसघनपरमानंदताव्यक्तिमेति ॥१४॥
जीवोऽणुश्चेत्कथं स्यात् सकलतनुमतिर्मध्यमश्चेद्विनाश ।
स्तद्दोषः स्यान्महीयानिति कपिलमतं श्रौतमप्यास्ति तद्वत् ।
एवं सांख्यं तथापि प्रकृतिकृतितया हेयमन्यान्ययुक्ते ।
स्तस्मादास्माकमेव श्रुतिशिखरगिरा साधु मीमांसनीयम् ॥१५॥
केचित्कर्मैव काम्योज्झितमुदितपदप्राप्त्युपायं प्रतीता ।
स्तच्चोपास्त्यायुतं कामरहितमिति वा केचिदुद्घोषयंति ।
ज्ञानं कर्मेति केचिद्यजनसहितया विद्ययैवेत्थमन्ये ।
ज्ञानादेवेति वाक्याद्वयमिह सहसा नानुमन्यामहे तान् ॥१६॥
कर्मैतत्कर्तृबुद्ध्या भवति तनुमनोवर्णगर्वान्वितत्वात् ।
ज्ञानं कर्तृत्वहानौ श्रुतिसुमतिमता जायते ब्रह्मणो वै ।
एवं भेदे विमूढा द्वयमपि विवदंत्यात्मनः प्राप्तिहेतुम् ।
ते वन्हिं शीतमंबूभयमहह तृडुच्छेदकामाः पिबंतु ॥१७॥
जिज्ञास्यं तद्यतोऽस्य स्थितिजनिविलयास्सर्ववेत्तुर्भवन्ति ।
सत्यं ज्ञानं ह्यनंतं सुखघनममृतं सर्वतोऽतर्बहिर्यत् ।
तद्दूरे तत्समीपे निगमकृदनुभूत्यैव विज्ञेयमेकम् ।
वेदाः स्तुन्वन्ति तस्मिन् जडमननपरा मोहमायांत्यसंताः ॥१८॥

त्रैगुण्ये मुख्यशुक्लोपहितचितिरये विश्वहेतौ निमित्तम् ।
तद्वत्कृष्णप्रधानोपहितचितिरुपादानमेतत्तदाख्यम् ।
मिश्रे यत् बिंबितं चिद्भवति विषयभुक् त्वंपदेनोच्यमानम् ।
मायात्रैविध्यमेतद्यदि विलयमियाच्छिष्यते वाक्यलक्ष्यम् ॥१९॥
मन्यन्ते केचिदस्मिन् बहुविधमलिनांशादनेके हि जीवाः ।
केचित्त्वज्ञानमेकं भवति लघुतया तेन जीवो न नैकः ।
एवं जीवे विवादस्तदपि हरिरिहैकोऽस्ति सर्वप्रसिद्धः ।
कर्ता भर्तानुमंता सुजनहृदयगः सर्वशक्तिः परात्मा ॥२०॥
वाचस्पत्यं मतं यत्प्रतिविषयभुजस्सृष्टिभेदाद्धरेर्भित् ।
चेत्पृच्छामः किमेषो भवति तव मते व्यापकोऽव्यापको वा ।
आद्येऽनेकत्वहानिर्भवति तदपरेऽव्यापकत्वात्स मर्त्यः ।
चेदप्येवं हतोऽयं निगमगुणगुरुस्त्वं ततो ज्ञानशून्यः ॥२१॥
आत्मादिक्कालआकाशमिति विभुगणस्तार्किकेनोक्त एव ।
पृच्छामस्तं किमेषां भवति तव मते संकरोऽसंकरो वा ।
आद्ये हेयं कुभाव्याद्भवति तदपरे वाग्वधोऽव्याप्यवृत्तेः ।
तस्मादास्माकमेकं परमचिदु विभु न्यूनतो मर्त्यमन्यत् ॥२२॥
जीवेशौ जीवजीवौ चिदचिदचिदचिच्चिज्जडे पंचधा भित् ।
चेदीशोऽव्यापकः स्यादिति वदसि तदा पूर्वदोषाः प्रयान्ति ।
भिद्यद्यस्मन्मतेऽपि व्यवहृतिविषये स्वप्नवत् किन्तु कल्प्या ।
संघाते त्वानवस्थ्यादवयवविधया दुर्विभाव्या मृषैव ॥२३॥
जीव स्वानिष्ठभुक्तेरयि परमपराधीन एवेति केचित् ।
त्वन्ये पूर्णः स्वतंत्रो हरिरपि न कदा चिन्नियंतेत्थमाहुः ।
अस्माकं स्यात्स्वतंत्रो नवकृतिविषये किन्तु देवोऽनुमंता ।
कार्मैर्बद्धोऽविचारी नियतकृतिफलं पारतंत्रेण भुंक्ते ॥२४॥
नित्यं प्रारब्धमत्र प्रबलमिति तदा भुंक्ष्व हालाहलं त्वं ।
यत्नश्चेत्तर्हि किं ते श्रमसमकरणे नाऽपि सर्वत्र लाभः ।
यस्मात्पौर्वं प्रयत्नात्प्रबलमतिमता शक्यते जेतुमस्मिन् ।
दैवाद्भोगोऽस्तु मुक्त्यै गुरुपदयुगुलं सेवमानो यतेत ॥२५॥
जीवोऽयं पूर्वभोगे हरिनियतिवशो यत्नयोग्यः कथंश्चेत् ।

यन्नापेक्षी शिवोपीति न भवतु तदा निर्दयोऽसौ कुबुद्धिः ।
पापात्स्वर्गं सुपुण्यान्नयतु नरकमप्येवमात्मेच्छयैव ।
स्याद्वैयर्थ्यात्तदुक्तश्रुतिशिखरगिरां सर्वथा मानहानिः ॥२६॥
आत्माऽभावस्य मातः कथमधिगमनं ज्ञानतोऽज्ञानतो वा ।
आद्ये त्वात्माश्रयादिर्भवति तदपरे व्याहतिर्नाम दोषः ।
तद्वद्दोषौ प्रसक्तौ कृतहननमथो यो कृताभ्यागमोऽपि ।
सत्वेऽप्येवन्न किंस्यादिति निगद न तद्दृष्टतस्सिद्धतश्च ॥२७॥
आत्माऽनित्योऽथ नित्यः प्रथम उपगते पूर्वदोषाः प्रयान्ति ।
अंत्ये मांसास्थिमज्जामलरुधिरमयाचेतनाच्चेतनोऽन्यः ।
मानं सुप्तिः परस्मिन् स्मरणमिति कथं तुल्यदृक् चेत्स सन्प्राक ।
निद्रासाजात्यवृद्धेर्मरणमथ चितो नैव नाशः प्रकल्प्यः ॥२८॥
बुध्यन्ते तत्वमस्यादिभिरिह सुधियो जीवदेवैक्यभावम् ।
तत्रद्वेधा स्वरूपं तटगमिति भवेल्लक्षणं तत्पदस्य ।
यस्माद्भूम्यादिकानां स्थितिजनिविलयास्तत्तटस्थं च विद्यात् ।
सत्यं ज्ञानं ह्यनंतं सुखमयममृतं ब्रह्मलक्ष्म स्वरूपम् ॥२९॥
श्रोतुर्देहेंद्रियाद्यैर्विरहितसुचितिस्त्वंपदेनोपदिष्टा ।
भोक्त्री साक्षिण्यतः सा भवति च द्विविधा मानसोपाधिराद्या ।
अंत्या मायाविमुक्ता चलनविरहिता स्वापरोक्ष्यैकगम्या ।
त्यक्ते चोपाधियुग्मे भवति च सहजा लक्ष्ययोगेन मुक्तिः ॥३०॥
प्रत्यक्षं न प्रमाणं परचितिविषये स्पर्शशब्दाद्यभावात् ।
सामान्यान्नानुमानं श्रय परमपरोक्षान्वितं वैदिकं वै ।
वाक्यार्थाद्ब्रह्मबोधः पदपरिणयनाद्वाक्यबोधो विधेयो ।
तत्राद्यन्तत्पदस्य द्विविधमपि भवेल्लक्षणं सत्समुक्तम् ॥३१॥
सत्यं किं यस्य कालत्रय इह न भवेद्बाधनं तच्च ब्रह्म ।
किं ज्ञानं जाग्रदादौ यदुजननि भवेत्सर्वदा स्वप्रकाशम् ।
आनंदः कोऽयमात्मा प्रियतमपरमोऽन्यद्यदर्थे प्रियं स्यात् ।
तस्माद्ब्रह्मत्वमात्मा निगमनिचयतो युक्तितः स्वप्रतीतेः ॥३२॥
माया त्रैगुण्यरूपा तदुपहितचितेरीक्षणाद्बुद्धिसंज्ञा ।
संकल्पोऽहं बहुस्यामहमभिमननात्सांख्यवेदान्तयोगः ।

तस्मात्तन्मात्रमाद्यं गगनमयि ततो वायुरग्निस्ततश्चाऽऽ ।
पोऽग्नेरद्भ्योमहीति त्रिगुणमयमिदं पंचकं प्राकृतं च ॥३३॥
व्यस्तैः सत्वांशकैर्ज्ञानकरणगणना चित्तमेतत्समस्तैः ।
द्वैतद्वृत्ती विमर्षात्मकमिदमु मनो निश्चयात्कार्यबुद्धिः ।
तद्वद्व्यस्तै रजोंशैः कृतिकरणगणः प्राणवायुः समस्तै ।
र्व्यानोदानादिसंज्ञां स च भजति तथोपाधिभेदात् क्रियावान् ।३४।
मायायाः शुद्धसत्वे प्रतिफलितचितिर्देवसंज्ञामुपेयात् ।
सत्वे मिश्रे तथैव प्रतिफलितचितिर्जीवतां याति मातः ।
तत्रेक्षादिप्रवेशांतकमिह जगदुद्भावितं शंकरेण ।
कर्त्ता भोक्ताऽहमित्यादिपरमधिगमान्तं भवेज्जीवक्लृप्तम् ॥३५॥
मायायां बिंबितं यत् भवति जननि चिज्जीवसंज्ञं तदुत्थम् ।
बिंबत्वारोपयुक्तं चिदयि विमलभं वासुदेवं वदामः ।
तस्मिन्सर्वज्ञतायाः निजकृतिफलनायैव जीवेन क्लृप्ताः ।
निष्कामं प्रेम किन्तु भ्रमरहितविवर्त्तं भवेद्वस्तुतंत्रम् ॥३६॥
भूतैर्युक्तो व्रजेद्वान्यतनुपरिणये नैव तत्तूर्णलब्धेः ।
पंचम्यां वा नरः स्यादिति वचननयाभ्यां व्रजेत्तैः सहैव ।
पापी नित्यं कुमार्गे पततु सुकृतिनोऽप्येवमेवं प्रवृत्ताः ।
क्षीणे पुण्ये द्युलोकाच्छिवशिव जननि द्वेऽपि हेये विरक्तैः ॥३७॥
शेषैरेषां स्तमोंशैर्विरचितमखिलं पंचकं स्थूलसंज्ञम् ।
द्वेधैकैकं विभज्यार्धकमपि पुनरेतच्चतुर्धा विभज्य ।
एकैकस्यार्धकेऽन्यैर्जननि सुमिलितैरष्टमांशैस्तु पंच ।
भूतान्याकाशवायुज्वलनजलभुवो भूतसर्गस्ततस्स्यात् ॥३८॥
दैवः सर्गोऽष्टधाजादिरयि सुजनिदे पंचधा तिर्यगस्ति ।
मानुष्यं त्वेकमेव द्विजनृपतिवणिक्पादजैः कल्पितं च ।
कर्त्ता भोक्ताऽत्र जीवः कृतिफलविषये वासुदेवोऽनुमंता ।
वेदान्तांतःप्रवेशो निजविमलमतेः सात्विकात्तारतम्यात् ॥३९॥
वेदाः शैवा न जीवाद्भुतनृपकथनात् प्रार्थनात् क्लृप्तवृत्ते ।
नैवं सद्वर्तमानाश्रमनमपि कृपायोगतः श्चोदनातः ।
विद्याधिक्यात् प्रणेतुः श्वसनवचनतः सर्ववित्त्वं प्रसिद्धम् ।

बालानां मातृवद्यो परमहितवचःप्रेरकत्वाद्दयालुः ॥४०॥
भ्रांतं विश्वं न सत्यं क्षरणपरतया नाप्यसत्यं प्रतीतेः ।
विज्ञानैकस्वरूपं क्षणिकमपि न हि प्रत्यभिज्ञास्मृतिभ्याम् ।
अन्यत्प्रत्यक्षलोपाद्गुणगुणिपरता नान्यथोक्तिस्सुयोग्या ।
नाख्यानं यौगपद्यादपि भवति ततो नस्त्वनिर्वाच्यमेव ॥४१॥

---

श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ.

रा. रा. बाळकृष्णपंत केकरे यांनां पाठविलेलें पत्र.

श्रीमज्ज्ञानेश्वरं वंदेऽऽलंद्यामानंदविग्रहम् ।
कारुण्यकारणं कांतं कैवल्यकमलालयम् ॥१॥

ज्यांचे शरीर पांच भौतिक नसून केवल आनंदस्वरूप आहे, व जे करुणेला कारण असल्यामुळें साकारत्वाला प्राप्त झाले आहेत व अत्यंत कारुण्यास्तव भीतीचा त्यापासून लेशही होण्याचा संभव नसल्यामुळें अत्यंत सुंदर व जे केवळ मोक्षश्रियेचें घर आहेत, अशा श्रीक्षेत्र आळंदीवासी श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराज यांनां वंदन करितों.

ब्रह्मज्ञानं समाश्रित्य भजनाच्छिवकृष्णयोः ।
चिरंजीव सुजात त्वं परमानंदतामृतात् ॥२॥

हे तात ! ब्रह्मज्ञानाचा आश्रय करून शिव आणि कृष्ण यांच्या भजनापासून उत्पन्न होणारें परमानंदरूप अमृत पिऊन चिरंजीवी हो.

अन्नपूर्णाचमूकाकूशांतादुर्गाशकुंतलाः ।
नत्वैता जननीः सर्वा लेखयेत्वान्निबोधनम् ॥३॥

सौ. अन्नपूर्णा आई, गं. भा. काकू, सौ. दुर्गा आई, सौ. शांता आई, चि. शकुंतला आई, या सर्वांनां नमस्कार करून आपल्याकरिता कांहीं उपदेश लिहितों.

नास्तिकानां समर्थं चिन्नास्तिकानामचेतनम् ।
तथापि नाममात्रोऽयं विवादो दृश्यते मया ॥४॥

आस्तिक लोक सर्व समर्थ असें चेतन जगाचें कारण मानतात व नास्तिक जगाचें कारण जड मानतात. तथापि तेही जड सर्व समर्थ

मानतातच. म्हणून नास्तिकांचा व आस्तिकांचा वाद नुस्ता नाममात्रच आहे.

जडवादे शक्तिनाशो गृह्णीयो न चेत्तदा ।
अशक्यो यः कल्पयितुं चिद्विनाशः कथं भवेत् ॥५॥

जडवाद ( मटेरियालिझम् ) कसाही जरी मानला तरी शक्तिनाश मानतांच येत नाहीं. तर मग कल्पना करण्यासही अशक्य अशा चेतनाचा नाश कसा मानतां येईल ?

जगत्प्रश्न समाधान उपपत्तिचतुष्टयम् ।
शून्याद्वेश्वर शून्याभ्यामुत्क्रांतेश्चपुनर्भवात् ॥६॥

जगाच्या कारणाविषयीं आपल्याला चार प्रकारचे मत दिसतें. १ कोणी शून्यापासून जगताची उत्पत्ति मानतात. २ कोणी शून्यापासून ईश्वरानें जगत् उत्पन्न केलें असें म्हणतात. ३ कोणी उत्क्रांति (evolution) मानतात. व ४ कित्येक पुनर्जन्म मानतात.

सर्वत्र सुलभोऽभाव एको नान्योऽनधिकृतेः ।
ततश्चेत्दृश्यते किंन्नो सर्वस्मिन्सर्वसंभवः ॥ ७ ॥

जे शून्यापासून ह्मणजे अभावापासून जगदुत्पत्ति मानतात, त्यांनां अत्यंताभावच घेतला पाहिजे. कारण प्रागभाव, प्रध्वंसाभाव, अन्योन्याभाव या सर्वांनां अधिकरण पाहिजे. उ० प्रागभावाला कपाल अधिकरण असतें. प्रध्वंसाभावाला कपालच अधिकरण असतें. व अन्योन्याभावांत घटाभावाला पट व पटाभावाला घट अधिकरण आहे. म्हणून शून्य म्हणजे अत्यंताभावच घेतला पाहिजे. आतां हा अत्यंताभाव सर्वत्र सुलभ असल्यामुळें कोठें कांहींही उत्पन्न झालें पाहिजे होतें. परंतु तसें होत नाहीं.

ईश्वरेण कृतं सर्वमुपादानंविना यदि ।
स्वस्माद्भिन्नं स्वरूपं वा विकल्पद्वयसंस्थितिः ॥८॥

ईश्वरानें जगत् शून्यापासून म्हणजे उपादान कारणावांचून उत्पन्न केलें असेल तर तें जगत् त्यानें आपल्याहून भिन्न उत्पन्न केलें ? अथवा तें तत्स्वरूपच आहे ? याप्रमाणें दोन कल्पना येतात.

पूर्वदोषो भवेच्चाद्येऽभावोपादनतस्तथा ।

सर्वसर्वज्ञताऽन्ये स्यात् किमर्थं दृश्यतेऽल्पता ॥९॥

प्रथम पक्ष मानला तर अत्यंताभाव मानतांनां जो दोष आला होता तोंच येथेंही येता. म्हणजे ईश्वरानें अभावापासून जगत् उत्पन्न केलें असें होईल. व असें मानलें म्हणजे ईश्वरानें कोठेंही कांहीं उत्पन्न करावें. आईबापावांचून सोन्यापासूनच मनुष्य करण्याला काय हरकत होती ? दुसरे पक्षीं जगत् त्याचें स्वरूप असलें तर प्रत्येक पदार्थ सर्वज्ञ असला पाहिजे. मग आपल्याला अल्पज्ञता कां दिसावी ? कारण ईश्वर सर्वज्ञ आहे.

भ्रमः सादिरनादिर्वाऽऽद्ये पौर्वो दोषसंश्रयः ।
अंत्ये निवर्तते कस्माज्ज्ञानाच्चेदिष्टमेवहि ॥१०॥

ही अल्पज्ञता भ्रमानें वाढते असें म्हटल्यास हा भ्रम उत्पन्न झाला आहे किंवा अनादि आहे ? उत्पन्न झाला असें मानल्यास कशापासून उत्पन्न झाला ? अभावापासून झाला असें म्हणाल तर पुनः मागील दोष येतात. अनादि मानला तर नाहींसा कशानें होतो ? ज्ञानानें नाहींसा होत असेल तर इष्टापत्तिच आहे.

असमर्थं समर्थं वाऽचेतनं विश्वकारणम् ।
आद्ये नियम्यरूपं स्यात् द्वितीये चिद्व्यवस्थितिः ॥११॥

जगताचें कारण जें तुम्हीं जड मानता तें असमर्थ मानता किंवा समर्थ मानता ? पहिल्या पक्षीं असमर्थ मानलें तर तें नियम्यरूप होऊन नियंत्याची अवश्यकता लागते. दुसऱ्या पक्षीं त्याला जगाच्या व्यवस्थेचें ज्ञानही असलें पाहिजे. कारण अज्ञानानें व्यवस्था होत नाहीं, आणि तसें मानलें म्हणजे मग तें आमचें चेतनच झालें.

अनंतमथवा सान्तं जगतः कारणं जडम् ।
उभयत्रापि नोत्क्रांतिः पूर्णत्वाच्छक्त्यसंभवात् ॥१२॥

आतां जगताचें कारण जड हें अनंत म्हणजे पूर्ण आहे, किंवा सांत म्हणजे अपूर्ण आहे ? कोणतेंही जरी मानलें तरी जगताची उत्क्रांति संभवत नाहीं. कारण पूर्ण आहे तर पुढें उत्क्रांतीनें पूर्ण होण्याची गरज नाहीं. व जर अपूर्ण आहे तर मग पूर्ण कसें होणार ? कारण अपूर्णामध्यें पूर्ण होण्याची शक्तिच नाहीं.

नीतिः स्वभावात्तीर्येक्षु याऽस्ति सा मानवेषु च ।
प्रयत्नेन समुत्पाद्या कथमुत्क्रांतिशंसनम् ॥१३॥

पशूपासून उत्क्रांति होत होत मनुष्य प्राणी झाला आहे, असें जर मानलें तर पशूंचे ठिकाणीं जी एक प्रकारची नीति दृष्टीस पडते. उ० अहिंस्र प्राण्यांची हिंसा करण्याकडे मुळींच प्रवृत्ति होत नाहीं. त्यांचा कामविकार नियमीत काळींच उत्पन्न होऊन त्यांनां सजातीयच स्त्री पाहिजे असते. अशा प्रकारची नीति प्राप्त करण्याकरितां मनुष्याला पुष्कळ प्रयत्न करावे लागतात. असें असतांना पशूपासून मनुष्याची उत्क्रांति कशी सांगतां येईल ?

भविष्यत्येव मे मुक्तिर्यथाकालमुपेक्षया ।
वर्द्धनं विषयासक्तेरुत्क्रांति स्थितिभाषणम् ॥१४॥

मुक्ति व्हावयाची असेल तेव्हांच होईल. आमची तितकी अजून उत्क्रांति झाली नाहीं अशी मुक्तीची उपेक्षा करून उत्क्रांतिवादी आपली विषयासक्तिच वाढवीत असतात. तथा चोक्तः—

आहार निद्रा भय मैथुनं च सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम् ।
धर्मोहि तेषामधिको विशेषो धर्मेणहीनाः पशुभिः समानाः ॥१५॥

असेंच ह्मटलेंही आहे कीं, आहार, निद्रा, भय, मैथुन हे पशूंनां व मनुष्यांनां सारखेच आहे. त्यांत मनुष्यांत पशूपेक्षां धर्मच विशेष आहे. व तो धर्म केला तरच होण्यासारखा आहे. उत्क्रांतिसाध्य तो कांहीं दिसत नाहीं. हा धर्म नसला तर मनुष्याची स्थिति पशू सारखीच आहे. उलट श्रृंगादिकामुळें पश्वादिकांच्या ठिकाणीं असलेलें बळ आपल्या ठिकाणीं फारच कमी आहे.

तस्मात्स्वकर्मणा जंतोरुच्चनीचत्वसंस्थितिः ।
प्रेत्यभावे सुखं दुःखमयं पक्षः सुसंगतः ॥१६॥

ह्मणून बऱ्या वाईट कर्मानेंच प्राण्यांनां उच्चनीचत्व जन्म प्राप्त होतो. व याप्रमाणें कर्माच्या योगानें पुनर्जन्म होऊन त्या कर्माचें फळ सुख किंवा दुःख भोगावें लागतें. असें मानणेंच सयुक्तिक आहे. या

प्रमाणें परमताचें खंडण करून सिद्ध केलेलें स्वमत पुढें विस्तारानें सांगतों.

वेदान्तवेद्ये शुद्धे भा मनसोऽनाद्यविद्यया ।
तस्यामहंकृतिर्जीवस्तत्कुध्यानाज्जगत्स्थितिः ॥१७॥

वेदांताच्या योगानें जाणल्या जाणारें जें शुद्ध ब्रह्म त्याचे ठिकाणीं अनादि अविद्येच्या योगानें चित्त भासतें. त्या मनाच्या भानांतील मी मी ह्मणणारी वृत्ति जीव होय. व त्या जीवाचें आपल्या खऱ्या स्वरूपास विसरून वासनेच्या मागें मी मी व माझें माझें करीत फिरणें याल कुध्यान ह्मणतात. व या कुध्यानानें जगदुत्पत्तिच होते.

मनसो मृदु संवेगो वासना शब्दभाग्भवेत् ।
मध्यमः स्वप्नभानं स्याज्जगद्भानं तु तीव्रता ॥१८॥

मनाचा मृदु संवेग याला वासना म्हणतात. व मध्य संवेगानें त्या वासनेनुरूप स्वप्नांत प्रत्यक्ष गोष्टी दिसतात. व तीव्र संवेगानें जागृतींत दिसतात. याप्रमाणें हें जगत् आपल्या मनाच्या तीव्र संवेगानें उत्पन्न झालें आहे.

पूर्वजन्मास्मृतेर्नास्ति मैवमाशंक्यतां कदा ।
बाल्यस्यापि स्मृत्यभावात्स्वाभावस्तत्र किन्नहि ॥१९॥

स्मृति नाहीं म्हणून पुनर्जन्म नाहीं, असें ह्मणतां येत नाहीं. कारण आपल्याला बाल्यावस्थेची तरी काय स्मृति आहे ? व ती स्मृति नाहीं ह्मणून बाळपणीं आपला अभाव होता काय ? नाहीं.

वासना कर्मचाज्ञानात्तद्ध्यानाच्च जनिर्मृतिः ।
ध्यायतीवेति वेदोक्तेर्वासना बंधनं महत् ॥२०॥

मागें सांगितलेल्या अनादि अविद्येच्या योगानें आपल्या स्वरूपाची विस्मृति व त्यामुळें वासना व कर्म होत असून त्या वासनेच्या तीव्र ध्यानानें जगत् भासतें व सुखदुःख होतात. “ ध्यायतीवेति ” या श्रुतीवरून वास्तवीक हें कांहींच होत नसून वासनेच्या ध्यानानेंच सर्व घडून येतें, असें सिद्ध आहे. याप्रमाणें वासनारूपी हें एक मोठें बंधन आहे.

विवेकपूर्वकज्ज्ञानात् भवध्यानविपर्ययात् ।

अत्यंतदुःखसंबाधः परमानंदसंस्थितिः ॥२१॥

विचारानें व युक्तीनें नीट समजून घेऊन व हें जें बंधनकारक ध्यान याच्या उलट ध्यानानें तिन्ही दुःखांची अत्यंत निवृत्ति व परमानंदाची प्राप्ति होते.

विवेकः सांख्यनिर्धाराद्ध्यानं योगाद्विशेषतः ।
ज्ञानं वेदांततः किंतु देशिकोक्तिव्यवस्थया ॥२२॥

सांख्य-शास्त्रानुसार पुरुष असंग आहे, अशा तऱ्हेचा विचार करून योगानें तसेंच ध्यान करावें. ज्ञान वेदांतशास्त्राध्ययनानेंच होतें. गुरु सर्वत्रच पाहिजे. कारण गुरुवाक्यावांचून परस्पर शास्त्रांमध्यें काय रहस्य आहे, हें कळत नाहीं.

दुःखं स्वभावतो द्वेष्यं तन्नाशेच्छा प्रजायते ।
देहादिभ्योप्यात्मरत्याधिक्यादानंदतात्मनि ॥२३॥

दुःख हें साधारणतःच कोणाला आवडत नाहीं. व ह्मणूनच त्याच्या नाशाची इच्छा असते. व सर्वांपेक्षां आपणच आपल्याला जास्त प्रिय आहोत. आपल्या सुखाच्या आड येणाऱ्या सर्व वस्तु आपल्याला नकोशा होतात. देह देखील रोगावगैरेनीं ग्रस्त झाला असतां नकोसा होतो. परंतु आपण आपल्याला कधींच नकोसे होत नाहीं. यावरून आपलेच ठिकाणीं परमानंद आहे.

द्वौ क्रमौ चित्तनाशाय वसिष्ठाचार्यसंमतौ ।
योगस्तद्वृत्तिरोधो हि ज्ञानं सम्यगवेक्षणम् ॥२४॥

चित्ताचा नाश करण्याचे वसिष्ठाचार्यांनीं दोन उपाय सांगितले आहेत. एक योगानें सर्व मनोवृत्तींचा रोध करणें, व दुसरा साक्षीरूपानें आपण आपल्यास पाहणें. हें जरी कठीण आहे तरी मी पुढें स्पष्ट करीत जाईन.

योगाभ्यासविरक्तिभ्यां वृत्तिरोधः प्रजायते ।
वैराग्यं जायते नित्यं संसारे दोष दर्शनात् ॥२५॥

योगाभ्यास व वैराग्य यांनीं वृत्तींचा रोध होतो. व वैराग्य संसारांत नित्य दोष पाहिल्यानें उत्पन्न होतें.

अभ्यासो जायते सम्यगीश्वरप्रणिधानतः ।

प्रणिधानं द्विधा प्रोक्तं सगुणं निर्गुणात्मकम् ॥२६॥

अभ्यासयोग ईश्वरप्रणिधानानेंच होतो. हें प्रणिधान दोन प्रकारचें आहे. सगुण-साकार व निर्गुण-निराकार.

विषयाभ्याससंस्कारं साकारोपासनाज्जहि ।
ध्यातृध्येयैक्यतावाप्तौ निरालंबे मतिस्थितिः ॥२७॥

सर्व विषयांपेक्षां अत्यंत सुंदर अशा सगुणरूप मूर्तीची उपासना करून अनेक जन्मांतील विषयांच्या अभ्यासानें झालेल्या संस्कारांचा नाश होतो. व नंतर ध्याता व ध्येय एक होऊन त्यांतील सगुणपणा जाऊन निर्गुणाचे ठिकाणीं मति स्थिर होते.

तथापि पुनरुत्थाने भाति विश्वस्य सत्यता ।
कर्तव्यं तन्निरासार्थं वेदांतश्रवणादिकम् ॥२८॥

तथापि पुनः व्युत्थान झालें असतां जग खरें वाटतें. त्याकरितां श्रवणमनननिदिध्यासनेंकरून वेदांताभ्यासच केला पाहिजे. ह्मणजे रज्जूवर सर्पाभास झाला असतां तेथून पळून गेल्यास तो दिसणार नाहीं. परंतु येथें सर्प दिसला होता अशी बुद्धि राहते. आणि रज्जूच्या ज्ञानानें त्याचा बाध झाला असतां तशी बुद्धि राहत नाहीं. करितां ज्ञानच आवश्यक आहे.

श्रोतव्यं गुरुशास्त्राभ्यां मंतव्यंचोपपत्तिभिः
ध्येयं सततयावृत्त्या ज्ञातव्यं स्वानुभूतितः ॥२९॥

श्रीगुरु व शास्त्र यांपासून श्रवण करावें. युक्तींनीं मनन करावें. व मननानें ठसलेल्या सिद्धांताचें सतत चिंतन करणें याला निदिध्यासन ह्मणतात. ब्रह्माचा जो साक्षात्कार होतो तो अनुभवाशिवाय कोणत्याच रीतीनें गम्य नाहीं.

इतिबोधात्पुराऽप्येवं मम चेत्तन्न विस्मर ।
पत्र विचार्यतां नित्यं व्यवस्थाया विशेषतः ॥३०॥

हें मला पूर्वीच माहीत होते, असें जर वाटत असेल तर तेंच विसरूं नको व पत्रांत व्यवस्था विशेष असल्यामुळें याचा आपण नित्य विचार करीत जावा.

उपदेशक्रमो राम व्यवस्थामात्रपालनम् ।

ज्ञप्तेस्तु कारणं शुद्धा शिष्यप्रज्ञेतिहिस्मृतिः ॥३१॥

श्रीवसिष्ठमुनि सांगतातः— रामा! बरोबर व्यवस्था लावून देणें हेंच गुरूचें काम आहे. जाणणें केवळ शिष्याच्या बुद्धीवर अवलंबून असतें.

लिखितं बाळकृष्णैतद्यथाज्ञानं यथामतिः ।
सर्वं समर्पितं प्रेम्णा श्रीज्ञानेशपदांबुजे ॥ ३२ ॥

अहो बाळकृष्णराव! यथामति हें जें कांहीं लिहिलें, तें सर्व श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरणकमलीं समर्पण करून पत्र संपवितों.

श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु.

---

**श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ.**

१

**श्रीमंत तुकोजीराव महाराज पवार, संस्थान देवास.** यांना उमरावतीहून पाठविलेले पत्र पहिलें तारीख १३।८।१३.

अभंग.

१ कल्याणनिधान मंगळमंगळ । स्वानंद सोज्वळ सत्यरूप ॥१॥
निर्गुण सगुण जया ह्मणे वेद । नामीं रूपीं भेद न सांपडे ॥२॥
जीवाचा सोयरा सुखाचा सांगाती । श्रुतिपदें गाती ध्याती मुनी ॥३॥
मायबापगुरू स्वामी ज्ञानराज । कृपें भवकाज त्यांचे नामें ॥४॥

२ इंदिरेनें मज दिधलें टाकुनी । श्रीकांत ह्मणूनी मायबाप ॥ १ ॥
जन्माचा दरिद्री अखंड करंटा । वरी दृढ ताठा अल्प ज्ञानें ॥ २ ॥
तुह्मी महाराज पूर्वी तपःशीळ । तेणें हें सोज्वळ राज्य प्राप्त ॥ ३ ॥
मेळ कैसा होय दीना भाग्यवंता । आळंदीच्या कांता गातां सौख्य ॥४॥

३ तान्हेपणा पासूनिया मी आंधळा । नाहींच लाभला मायबाप ॥१॥
नाहीं सद्गुरूची झाली आंगें सेवा । न पूजिलें देवा स्नेहभावें ॥ २ ॥
देहासक्तिस्तव प्रमादही होती । उंच वर्णाहातीं घेत सेवा ॥ ३ ॥
ऐसें लाजिरवाणें परमार्थी जिणें । हित माझें जाणें ज्ञानराजा ॥४॥

४ यानसंधिविग्रहांत जे कुशळें । तयांसी भूपाळें मान द्यावा ॥१॥
सामदाम भेद दंडा अनुकुळें । तयांसी भूपाळें मान द्यावा ॥ २ ॥

आह्मां गरिबांचें तेथ नाहीं काज । तुह्मी महाराज भाग्यवंत ॥ ३ ॥
आळंदीवल्लभ चिंतावा आवडी । प्रेमाच्या कावडी वाहोनियां ॥ ४ ॥

५ माझी तव स्थिति उनाड जन्माची । तेणें समर्थांची मैत्री करूं ॥ १ ॥
न कळे श्रीमंता कैसा द्यावा मान । रामराम कोण परी करूं ॥ २ ॥
उभें व्हावें कोठें कैसी कीजे स्तुति । न कळे निश्चिती मज कांहीं ॥ ३ ॥
कृपें तुम्ही पाठविलें आज्ञापत्र । परी त्या उत्तर काय देऊं ॥ ४ ॥
अत्यंत दरिद्री नेणें धनसुख । मागतसे भीक प्रतासाठीं ॥ ५ ॥
प्रतासाठीं [1]देवें बोलाविलें मातें । परी म्यां दोघांतें भाक दिली ॥ ६ ॥
म्हणोनियां माझा हरला उपाय । ज्ञानेश्वरमाय न क्षोभावी ॥ ७ ॥

६ प्राण गेलियाही असत्य भाषण । न कीजे भूषण सज्जना हें ॥ १ ॥
नाहीं माझी शक्ति थोर चमत्कारीं । तुह्मां कोणपरी रिझवूं मी ॥ २ ॥
कौमुदीसारिखें नेणें मी संस्कृत । तेथें तों पंडित असतील ॥ ३ ॥
त्यांचा मज धाक वाटे बहू मनीं । तेथें मी येउनी काय करूं ॥ ४ ॥
माझी विद्या थोर आहे हें सांगूनी । तुह्मां नेणों कोणी फसविलें ॥ ५ ॥
ज्ञानेश्वरीवीण मज न ये कांहीं । ज्ञानराज आई जाणताहे ॥ ६ ॥

७ स्वप्न परमाणू आरंभ वादातें । पुसतां मी तेथें काय बोलूं ॥ १ ॥
पंचद्रव्यवाद दीधितीकारांचा । पुसतां मी त्याचा काय बोलूं ॥ २ ॥
स्फोटवाद किंवा पदशक्तिवाद । बोलतां आनंद कोण तेथें ॥ ३ ॥
वादांत रंजन होय पंडितांचें । विनोदें आमुचें हास्यमात्र ॥ ४ ॥
आळंदीवल्लभ दीनांचा सांगाती । तयांचे संगतीं मात्र इच्छा ॥ ५ ॥

८ श्रीलक्ष्मणनाथस्वामीमहाराजभेटी । घ्यावी ऐसें पोटीं होतें फार ॥ १ ॥
श्रीलक्ष्मणनाथस्वामी सोयरा सज्जन । तयांचे चरण आठवावे ॥ २ ॥
करावा जतन आपुला विश्वास । कदा आणिकांस स्मरूं नये ॥ ३ ॥
आळंदीश तेणें होय कृपावंत । करिताती संत सर्व दया ॥ ४ ॥

९ आमुचिया शरीरा लागलाहे रोग । सुदैवाचा भोग ईश्वरेच्छा ॥ १ ॥
तयामुळें जातां कोणाच्या घरास । होतो फार त्रास आणिकांसी ॥ २ ॥
म्हणोनियां देवें ठेविलें ज्या स्थिति । राहे तैशा रीती जेथें तेथें ॥ ३ ॥

---

[1] जुन्या संस्कृत ग्रंथांत राजाला देव म्हटलें आहे.

आळंदीवल्लभ ज्ञाननाथ स्वामी । विश्वांतर्यामी सर्व जाणे ॥ ४ ॥
१० न होती हे माझे बोल गौरवाचे । अंतरीचें साचें सांगितलें ॥ १ ॥
मजहुनी माझे स्नेही विद्यावंत । मजपुढें ग्रंथ वाचिती जे ॥ २ ॥
गुरू श्रीनिवास मुळे भालेराव । नाना हरिभाऊ ख्यात्रे बापू ॥ ३ ॥
पंडितादि त्यांत बोलावुनी कोणी । फेडावी पारणी लोचनांची ॥ ४ ॥
व्यर्थ निजगर्वी मज पडूं द्यावें । ज्ञाननाथीं भावें वेडभरे ॥ ५ ॥
११ तुम्हांचिये गृहीं होतां माझा मान । तेणें माझें मन फोंफावेल ॥ १ ॥
विसरेल मग म्हणीं ज्ञाननाथा । भय वाटे चित्ता फार ऐसे ॥ २ ॥
वंदूं नये माथा पायींची पादुका । मी तो प्रजा निका राव तुझी ॥ ३ ॥
एवढा समर्थें द्यावा आशिर्वाद । उपजावा बोध ज्ञानदेवीं ॥ ४ ॥
१२ व्रत संपलिया कचिद्दिवापाठीं । शीलनाथभेटी येईन मी ॥ १ ॥
तेव्हां मी घेईन देवदरुपण । आणो नारायण घडवोनी ॥ २ ॥
बोवडिये बोल ऐकुनी मराठी । न मानावी पोटीं खंती देवा ॥ ३ ॥
ज्ञाननाथें मज सांभाळावें आतां । पुरे झाली चिंता संसाराची ॥ ४ ॥
१३ बोलतो तेवढा नाहीं मी विरक्त । कवित्व करीत मानासाठीं ॥ १ ॥
परी मज एक विश्वास बरवा । तुझीही धरावा तोचि चित्तीं ॥ २ ॥
नीतीनें संसार करावा बाहेरी । अखंड अंतरीं कृष्ण ध्यावा ॥ ३ ॥
हेंचि केलियानें माझें समाधान । व्रत ही संपूर्ण केलें जाणा ॥ ४ ॥
सद्गुरुमुखानें जाणावें निर्गुण । भजावें सगुण आवडीनें ॥ ५ ॥
ज्ञानानें तोडावा उपाधीचा भास । ज्ञानगर्वनाश भक्तिबळें ॥ ६ ॥
वैराग्यानें कीजे दोहींचें रक्षण । नीतीनें शिक्षण प्रजालोक ॥ ७ ॥
पराविया नारी माउली समान । संतापुढें मान वांकवावी ॥ ८ ॥
देवासस्वामीया आणिक यावीण । तेथेंही येऊन काय सांग ॥ ९ ॥

श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु.

**श्रीज्ञानेश्वर माउली.**

१०

**हर्दा, तारीख २।९।१३.**

**श्रीमंत तुकोजीराव महाराज पवार यांना पाठविलेलें पत्र दुसरें.**

**१ ज्ञानराजस्वामी सदा यशवंत । नित्य श्रुति संत गाती जया ॥ १ ॥**

कोटी विघ्नें ज्याच्या नामें हरताती । सर्व भूतपती तोचि एक ॥ २ ॥
वैष्णवांचा विष्णु शैवांचा शंकर । सच्छिष्या दातार गुरुराजा ॥ ३ ॥
आळंदीवल्लभपायीं नमस्कार । करुनियां पत्र पाठविते ॥ ४ ॥
२ इहलोक काय जीवितावधीचा । परलोक साचा श्रुतिसिद्ध ॥ १ ॥
स्वर्ग मोक्ष दोन्ही तयाचेचि भाग । मिळती अव्यंग सज्जनातें ॥ २ ॥
एका सुख एका दुःख हे दिसती । ह्मणोनी प्रतीति पूर्वकर्मा ॥ ३ ॥
एकची ईश्वर भिन्न भिन्न करी । कर्मावीण तरी विषम तो ॥ ४ ॥
प्रकृतीस्वभावें नियंता मुकुंद । भक्तावरी शुद्ध दया त्याची ॥ ५ ॥
कर्मफळ देणें राजस स्वभाव । सात्विक स्वभाव दासकृपा ॥ ६ ॥
उपाधीविरोध उपहितीं नाहीं । दया न्याय दोहीं चालविता ॥ ७ ॥
आळंदीवल्लभ सुखाचा सांगाती । सर्व धरूं चित्तीं आवडीनें ॥ ८ ॥
३ अत्यंत विश्वास अत्यंतची युक्ति । दोन्ही व्यर्थ होती प्रसंगानें ॥ १ ॥
युक्तीनें सामान्य ओळखावें आधीं । विशेषाची सिद्धी विश्वासानें ॥ २ ॥
जन्मला जो तया पाहिजे जनक । सामान्य सम्यक युक्तिसिद्ध ॥ ३ ॥
पितयाचें नांव विश्वासेंचि कळे । ह्मणोनी सोंवळें चित्त कीजे ॥ ४ ॥
सुखदुःख फळे कर्मअनुमानें । धर्माधर्म मनें आकळावे ॥ ५ ॥
बळियांसी संधी साधितां उत्तम । सुरक्षावा धर्म आपुलाची ॥ ६ ॥
जया रोगीं त्याचि औषधीचें काम । उंच नीच नियम त्यांत नाहीं ॥ ७ ॥
तैसा उंच नीच नाहीं धर्म कोणी । सर्व नारायणीं आवडते ॥ ८ ॥
परी ज्याचा त्यानें उचित करावा । स्वामी ज्ञानदेवा आवडे तें ॥ ९ ॥
४ आरंभ नाहींच कोण्याही वस्तूसी । अवस्था विशेषीं मात्र भासे ॥ १ ॥
ह्मणोनियां जन्म मृत्यु सर्वासवें । मोक्ष विश्वीं जीवें मिथ्यादृष्टि ॥ २ ॥
ऐसें दृढ ज्ञान वृत्तिसंधि ध्यान । मोक्ष तरी पूर्ण हाता चढे ॥ ३ ॥
वृत्तिव्युत्थानीं तों धर्म काम अर्थ । तीन पुरुषार्थ सेवावेची ॥ ४ ॥
धर्माच्याचि पाठीं लागूं नये ऐसें । जेणें अर्थ नासे समूळची ॥ ५ ॥
अर्थीही तेवढें घालूं नये मन । जेणें प्रजाजन कंटाळती ॥ ६ ॥
काम तो सेवावा शरीरापुरता । कामा हातीं चित्ता देऊं नये ॥ ७ ॥
देशकालवशें धर्म तो अधर्म । अधर्म तो धर्म होऊं लागे ॥ ८ ॥
तथापि तयांत एक मुख्य बीज । शरण्य सहज ज्ञानराजा ॥ ९ ॥

५ समर्थी भेटणें मज नाहीं ठावें । ह्मणोनी न यावें होतें मनीं ॥ १ ॥
परी चारपांच आलीं पाचारणें । भेटीचा ह्मणोनी विनिश्चय ॥ २ ॥
आहे ऐसी देवें ठेवितां प्रकृती । येईन निश्चिती आठ दिनीं ॥ ३ ॥
उशीर झाल्याची असू द्यावी क्षमा । तुह्मीं गुणाब्धी महाराजा ॥ ४ ॥
सुहृद पहाया पाठविलें पुढें । तयासी रोकडें क्षेम कीजे ॥ ५ ॥
ज्ञानेश्वर माझा विश्वाचाचि रावो । आश्वासन देवो तुह्मां आह्मां ॥ ६ ॥

श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु. आपला.

**श्रीज्ञानेश्वर माउली. गुलाब.**

११ हर्दा ता. १२।२।१४.

## श्रीमंत जगदेवराव भाऊसाहेब महाराज पोवार, संस्थान देवास, मोठी पाती, यांनां पाठविलेलें पत्र.

श्रीमंत भाऊमहाराज यांचे चरणीं चिरंजीव गुलाब याचे सा. न. वि. वि. आपलें पत्र मी येथें नसल्यामुळें फिरत फिरत मला पोंहचलें. त्यामुळें जबाब देण्यास उशीर लागला. याबद्दल क्षमा असावी. मागची पाठविलेलीं पत्रें आपल्याला उशिरां मिळालीं. पण हें तरी पत्र आपणास लौकर पोंहचेल अशी आशा करितो. मला वाटतें आपल्या लोकांस जितकी इंग्लिश शिक्षणाची आवश्यकता आहे तितकीच किंबहुना जास्त संस्कृत शिक्षणाची आवश्यकता आहे. मी आपणास कांहीं वैदान्तिक पत्रें पाठवीत जाईन असें कबूल केलें होतें. त्याप्रमाणें हें मी पहिलें पत्र पाठवीत आहे. त्यांतील विचार आपणास पटल्यास किंवा शंका आल्यास लौकर कळविण्याची कृपा व्हावी.

माझें पहिलें मत असें आहे कीं, परमेश्वराकडे एकवेळ प्रेम लागल्यास इतर क्षुल्लक बाबतीकडे हलुहलु लक्ष कमी होत जातें. तथापि खाण्यापिण्याच्या बाबतींत सावधपणा असून इतर बाबतींत जेव्हां विदेहीपणा दिसतो, तेव्हां तें खरें प्रेम नसतें हें खास आहे. परमात्म्याचें ध्यान आपल्या हृदयांत करावें लागतें. तेव्हां आपण आंतमध्यें कोठें बसावें, कोठें उभे रहावें, इत्यादि अनेक गोष्टी मी योगी ह्मणविणाऱ्या साधूंस विचारल्या आहेत. पण मी गरीब असल्यामुळें ते उलटे रागावले.

" युगपत्ज्ञानानुत्पत्तिर्मनसोलिंगं " एकदम दोन ज्ञानें एकावेळीं न होणें हें मनाचें लक्षण आहे असें न्यायसूत्रांत म्हटलें आहे. तेव्हां खाण्यापिण्याच्या बाबतींत सावधपणा व बाकीच्या बाबतींत विदेहीपणा हें भगवद्भक्तीचें लक्षणच होऊं शकत नाहीं. यावर असा आक्षेप येण्याचा संभव आहे कीं, मग भगवद्भक्त खातपीतच नाहींत काय ? तर खातात पितात असें मी कबूल करितो. परंतु जेव्हां ते प्रेमसमाधींत असतात तेव्हां ते खातपीतसुद्धां नाहींत. जेव्हां ते व्युत्थानांत येतात तेव्हां ते खाण्यापिण्याच्या बाबतींतच काय पण सर्वच बाबतींत सावध असतात. जितकी प्रेमसमाधी अधिक वाढेल तितका त्यांचा व्यवहार क्षीण होतो. चमत्कार करणें सुद्धां भगवद्भक्तांस मोठें कठिण वाटतें. कारण आपल्या प्रियकराला उगीच श्रम द्यावे अशी त्यांची इच्छा नसते. परमेश्वर सर्व शक्तिमान् आहे. त्याला श्रम कशाचे ? हा आक्षेप घटकाभर खरा धरतां येईल परंतु हा ज्ञानाचा स्वभाव आहे प्रेमाचा स्वभाव नाहीं. ज्ञान्याचें म्हणणें असें असतें कीं देवानें आपल्यास प्रत्येक ठिकाणीं साह्य केलें पाहिजे. भक्तांचें म्हणणें याच्या उलट असें असतें कीं परमेश्वराच्या कामाकरितां आपण देह, प्राण व मनानें झिजलें पाहिजे. परमेश्वराचें आपणास कांहीं नको. प्रेमांत आपलेपणाच विरून गेल्यावर परमेश्वरास प्रत्येक ठिकाणीं सहाय करण्यास कोणी बोलवावें ? प्रेमसमाधीला उद्देशून व व्युत्थानाला उद्देशून काढलेले तुकाराममहाराजांचे उद्गार याविषयीं प्रमाण देतोंः—

अभंग.

सदा माझे डोळां जडो तुझी मूर्ति । रुक्माईच्या पती सोयरिया ॥ १ ॥
गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्वकाळ ॥ २ ॥
विठू माउलीये हाचि वर देईं । येउनियां राहीं हृदयीं माझ्या ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज न मागों आणिक । तुझ्या पायीं सुख सर्व आहे ॥ ४ ॥

अभंग.

आणिक दुसरें मज नाहीं आतां । नेमिलिया चित्तापासोनियां ॥ १ ॥
पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं । जागृतीं स्वप्नीं पांडुरंग ॥ २ ॥
वळली वळण इंद्रियां सकळां । भाव तो निराळा नाहीं दुजा ॥ ३ ॥

तुका ह्मणे नेत्रीं केली ओळखण । तटस्थ हें ध्यान विटेवरी ।। ४ ।।

यांत बाह्य प्रेमसमाधि व आंतर प्रेमसमाधि या दोन्हीही महाराजांनीं वर्णन केल्या आहेत. या स्थितीस उद्देशूनच सत्पुरुषानें शांत असावें, गंभीर असावें, इत्यादि शास्त्रवचनें आहेत. अभंगांत जागृतीं स्वप्नीं असें जें म्हटलें आहे त्याचा अर्थ जागृत्प्रेमसमाधि व स्वप्नप्रेमसमाधि असा आहे. भगवंताचा जेव्हां भक्तांना संयोग असतो, तेव्हां जागृत्प्रेमसमाधि होतो, व वियोग असतो तेव्हां स्वप्नप्रेमसमाधि होतो. स्वप्नसमाधिविषयीं गीतगोविंदकारांचेंही असेंच ह्मणणें आहे:—

ध्यानलवेन पुरःपरिकल्प्य भवंतमतीवदुरापम् ।
विलपति हसति विषीदति रोदिति चंचति मुंचति तापम् ।

याप्रमाणें प्रेमसमाधिविषयीचें निरूपण झालें. आतां प्रेमसमाधीहून इतर वेळीं भक्तांच्या चित्ताची कशी स्थिती असते हेंही तुकाराम महाराज वर्णन करितात.

अभंग.

मऊ मेणाहूनी आह्मी विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं ऐसें ।। १ ।।
अमृत तें काय गोड आह्मांपुढें । विष तें बापुडें कडू किती ।। २ ।।
मायबापाहूनि होऊं कृपावंत । करूं घातपात शत्रूहूनी ।। ३ ।।
भले तरी देऊं गांडीची लंगोटी । नाठाळाचे काठी देऊं माथा ।। ४ ।।
तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड । जया पुरे कोड त्याचे परी ।। ५ ।।

अभंग.

ऊठ भडवीच्या जाय तूं येथोनी । माझिया कीर्तनीं बैसूं नको

इत्यादि तुकारामाच्या अभंगास पुष्कळ लोक नांवें ठेवितात, परंतु प्रेमसमाधीहून इतरवेळीं लोकव्यवस्थेविषयीं ते उद्गार आहेत.

" मऊ मेणाहूनीं " या वर दिलेल्या अभंगांत प्रेमसमाधीहून इतरवेळीं भगवद्भक्तांत प्रसंगीं सावधपणा कसा असतो हें दाखविलें आहे. भवभूतीनींही असेंच उद्गार काढले आहेत.

" वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।
लोकोत्तराणां चेतांसि को नु विज्ञातुमर्हति " ।।

अभंगाचाच अर्थ या श्लोकांत आहे. दुसरें माझें मत असें आहे

कीं, परमेश्वर निराकार असला तरी प्रथम साकारावर चित्त स्थिर करून नंतर निराकारांत त्याचा प्रवेश केला पाहिजे. ईश्वर नाहीं असें जे ह्मणतात त्यानां सोपें व शास्त्रीय उत्तर असें आहे कीं, या रसायनशास्त्राच्या नियमाप्रमाणें पाणी उत्पन्न होतो, परंतु गणित हें बुद्धींतच राहत असतें. इतर जडपदार्थांत रहात नाहीं. तेव्हां सृष्टींतील इतकें पाणी जें तयार झालें आहे त्याच्या रासायनिक मिश्रणाला ज्या बुद्धींतून गणिताचा उपयोग झाला आहे ती Universal intellect परमेश्वरावांचून क्षुल्लक जीवाची असणें संभवनीय नाहीं. जड पदार्थांत बुद्धि आहे असें मानल्यास जड व चेतनाचा भेद नाममात्र होऊन परब्रह्म सर्वव्यापक आहे या वेदान्त तत्वाचाच अनुवाद झाल्यासारखा आहे. तेव्हां जडशास्त्रदृष्टीनें किंवा धर्मदृष्टीनें परमेश्वर आहे हें ठरलेलेंच आहे.

ही दोनच मतें सध्यां मी या पत्रांत लिहून पाठवीत आहे. माझा सुरतरुग्रंथ तयार होत आला आहे. तो मी आपणाकडे पाहण्याकरितां पाठवीन. त्यावरून माझी अंतस्थ मतें काय आहेत, व तीं उदात्त आहेत किंवा नाहींत या सर्व गोष्टींचा आपणास सहजच उलगडा होईल.

याप्रमाणें मी आपली स्थिती लिहिली आहे. तसा मी आपला उणेपणाही थोडासा लिहितो. कारण आपला उणेपणा न दाखवून केवळ भपकेपणा दाखविणें ह्मणजे फसविणें होय असें माझें मत आहे. प्राचीन ऋषींनीं आपला उणेपणा देखील दाखविला आहे. मी जरी निस्पृह आहे तरी व्रताकरितां व ग्रंथादिकांकरितां माझ्या मनांत केव्हां केव्हां पैशाच्या आशेचा अंकुर उत्पन्न होतो. तो कलंक आहे हें मला ठाऊक आहे, व तो मी कमी करण्याची खटपटही जोरानें करीत आहे. हा लेख पसंत पडेल तर मोठ्या महाराजांनांही वाचून दाखवावा, अशी मी विनंती करितो.

आपला.

**गुलाबराव गुंडोजी मोहोड.**

---

**रा. रा. भय्यासाहेब तांबे यांनां पाठविलेलें पत्र १२**

तीर्थस्वरूप भय्यासाहेब यांचे चरणीं चि. गुलाबचे कृतानेक शिर-

सा. प्रणिपात. वि. वि. लिहिण्यास कारण कीं, येथें एक पंडित आला होता. त्याच्याशीं बापूचा न्यायांत वाद झाला. परंतु बापूच्या प्रश्नाचें त्यानें उत्तर न देऊन तुमच्या महाराजांची मला विद्वत्ता पहावयाची आहे असें तो ह्मणाला; परंतु व्रतामुळें मला विशेष वेळ नसल्यानें व येथेंही मजविषयींच्या मत्सरी मंडळीकडून तो आला असल्यानें " माझ्या मंडळीशीं तूं वाद कर किंवा लेखी वाद तूं माझ्याशीं कर. बोलून इथें कोणी मंडळी समजणारी नसल्यामुळें नुसत्या बोलण्या बोलण्यांत मी विरोध एव्हां वाढवीत नाहीं " असें म्हटल्यावर तो निघून गेला. त्याला कांहीं येत नव्हतें असें माझी मंडळीसुद्धां सभेंत सिद्ध करून देण्यास तयार आहे. वरून वैदिक व आंतून तांत्रिक असलेल्या मंडळीकडूनच ह्या पंडित आला असल्यामुळें मी याच्याशीं लेखी वादाचें बोलणें घातलें. असो ही किटकिट, याच्याशीं आपल्याला काय करावयाचें आहे ?

मी सध्यां एक पुस्तक वाचीत आहे. हें पुस्तक ह्मणजे कांहीं तत्वशास्त्र नव्हे किंवा परलोकाची वाट दाखविणारें एखादें धर्मशास्त्रही नव्हे. हें एका गरीब व शूर माणसाचें चरित्र आहे. पैसा व स्त्रिया प्रसंगीं कशा घातक होतात, ब्रह्मज्ञान भगवद्भक्ति आणि वैराग्य या तीन गोष्टी बाजूला ठेऊन बाकीचा व्यवहार पाहिल्यास सद्गुण व दुर्गुण कशास म्हणावें हें निश्चितपणें कळणें कठिण आहे. कारण दैवानें यश आल्यास दुर्गुणी पुरुष व्यवहारांत सद्गुणी बनतो; व दैव प्रतिकूळ झाल्यास अपयशी पुरुष दुर्गुणी बनतो. मातींत टाकून दिलेलें सुवर्ण जसें मळत नाहीं त्याप्रमाणें दैवानें अपयशाखालीं झांकलेल्या पुरुषाचे सद्गुणही लोकांनां मोहून टाकीत असतात. " सूतो वा सूतपुत्रो वा यो वा को वा भवाम्यहम् । दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् " ॥ हें कर्णाचें एका नाटकांत दिलेलें ह्मणणें अक्षरशः खरें आहे, इत्यादि उत्तम गोष्टी ह्या पुस्तकांत मला वाचण्याला मिळाल्या. हें पुस्तक उमाजी नायकाचें चरित्र होय. रमाबाई रानड्यांचें पुस्तक वाचण्याविषयीं बाबूरावानें जशी मला प्रेमानें सूचना केली होती तसें हेंही पुस्तक वाचण्याविषयीं मी आपल्याला प्रेमानें सूचना करितो. बायकांतील कजागपणा व पुरुषांतील परोत्कर्षासहिष्णुत्व हे दोन दोष ज्या दिवशीं निघून जातील

त्या दिवशीं नियम्यनियामकाची आवश्यकता मुळींच लागणार नाहीं. असो.

हर्दा तारीख १२।१२ } आपला नूतन चिरंजीव.
गुलाब.

---

## रा. रा. तांबे तहसीलदार यांनां पाठविलेल्या पत्रांतील उन्माद–विषयक माहितीः— पत्र १३

उन्माद सात प्रकारचे आहेत. वातपित्तकफोन्माद, सन्निपातोन्माद, विषोन्माद, मानसोन्माद व भूतोन्माद. यांतील वातपित्तकफोन्माद व सन्निपातोन्माद यांचा अर्थ आपल्यास समजलाच असेल. विषोन्माद म्हणजे मद्यादिकांपासून झालेला. मानसोन्माद म्हणजे कामक्रोध लोभ द्वेष किंवा मनास बसलेला झटका यापासून एकदम झालेला. आतां भूतोन्मादाचें निरूपण करितो. देवांच्या गणाला भूत म्हणतात. पाप नव्हे असें पुण्य कर्म आग्रहानें विपरीत केले असतां या योनींत जन्म होत असावा. ते देवादिकांचे गणच आंगामध्यें शिरतात. देवादिक शिरत नाहींत. जे प्रत्यक्ष देवादिक आंगामध्यें शिरतात असें ह्मणतात त्यांनां भूतविद्या येत नाहीं असें सुश्रुताचार्यांचे म्हणणें आहे. ते गणभूत १८ आहेत. १ देवगणभूत २ असुरगणभूत ३ गंधर्वगणभूत ४ उरग (नाग) गणभूत ५ यक्षभूत ६ ब्रह्मराक्षसभूत ७ राक्षसभूत ८ पिशाच ९ प्रेत १० कुष्मांडकभूत ११ कालादे १२ औकीर १३ वेताल १४ पितर १५ गुरु १६ ऋषी १७ वृद्ध आणि १८ सिद्ध. या प्रत्येक गणांचा पुन्हां कोटिकोटि परिवार आहे. या प्रमाणें अनंत असा हा भूतलोक आहे. हीं सर्व भूतें रात्रीं व्यवहार करणारी, भयंकर रक्तमांस इत्यादि भक्षण करणारी आहेत. परंतु देवाचे किंवा ऋषीचे ज्याचे ज्याचे ते गण आहेत त्या देवादिकांच्या नांवानेंच त्यांची ख्याति आहे, पालकाच्या नांवानें चाकराची ख्याति होते त्या प्रमाणें. ह्या भूतांतून कोणतेंही भूत आंगांत शिरण्याचें कारण वृद्धवाग्भटांनीं सांगितलें आहे तेंच येथें उतरून घेतो. "तेषां पुनरनुप्रवेशकारणं सद्यःपूर्वकृतो वा प्रज्ञापराधो विशेषतः" यांतील कोणत्याही भूताचें आंगांत शिरण्याचें कारण हठानें केलेला

प्रज्ञापराधच आहे. सामर्थ्य असतांही सभेंत द्रौपदीला नग्न करतांनां पाहिल्यामुळेंच भीष्मादिक माहात्म्यांच्या शरीरांतही राक्षसभूतांनीं संचार केला अशी कथा प्रमाणशिरोमणी महाभारताच्या वनपर्वांत आहे. वेदावर निष्ठा ठेवणाऱ्या हिंदूस व्यासापेक्षां अधिक कोणतें प्रमाण असणार? ज्याला देहाच्या पलीकडे कांहींच दिसत नाहीं अशा नास्तिकाची गोष्ट निराळी. परंतु श्रुतियुक्तिअनुभवानें ज्याचा परलोकाविषयीं निश्चय आहे त्याला भूतादिकांपेक्षां व्यासाचेंच प्रमाण अधिक वाटलें पाहिजे, आणि वाटतेंही. ते महाभारतांतले श्लोक येथें देतोंः—

भीष्मद्रोणकृपादींश्च प्रवेक्ष्यंत्यपरे सुराः ।
यैराविष्टाः घृणां त्यक्त्वा योत्स्यंते तव वैरिभिः ॥११॥
( वनपर्व अध्या० २५१ )

अर्थः— दैत्य म्हणाले दुर्योधना तूं काळजी करूं नकोस. कारण भीष्माचार्य द्रोणाचार्य कृपाचार्य यांच्या शरीरामध्यें दुसरे राक्षस शिरतील व त्यांच्या योगानें मंदबुद्धि झालेले ते भीष्मादिक करुणासागर असले तरी दयेचा परित्याग करून भूतवश झालेले ते पांडवांबरोबर निकरानें लढतील. तात्पर्य यांनां शरीरांत शिरूं देण्याला प्रज्ञेनें केलेला मुख्य अपराधच कारण आहे.

एखाद्या रोगानें पिडलेल्याच्याही आंगामध्यें हे भूतपिशाच शिरत असतात. हीं भूतें पाप भोगण्याच्याकाळीं आंगांत शिरतात असें नाहीं. क्रियमाण पापकर्माच्या आरंभीं देखील यांचा अंमल बसतो. यांनां शिरण्याची संधी सांपडण्याचीं ठिकाणें वृद्धवाग्भटांतील उत्तरस्थानाच्या सातव्या अध्यायांत दिलीं आहेत. तीं येणेंप्रमाणेंः— एकटे असतांनां, ओसाड घरांत असतांनां, किंवा चौरस्त्यावर जाण्याचा प्रसंग आला असतांनां, अथवा संध्याकाळीं शुचिर्भूत नसलें तर अथवा पौर्णिमेस किंवा आमावास्येच्या दिवशीं इत्यादि. आणखी पुष्कळ शिरण्याचीं ठिकाणें आहेत. आतां हे देव ज्याच्या आंगांत शिरावयाचे त्याच्यावर कसा परिणाम करितात तें सांगतोंः--

देव व असुर ग्रह नुसते त्याच्याकडे पाहूनच अथवा त्याच्या मनांत विकार उत्पन्न करून त्याच्या आंगांत शिरतात. गंधर्वभूत स्पर्श

करून आंगांत शिरतात. नागभूत लागावयाचा असल्यास त्याला लहरी आल्या सारख्या होतात. यक्षभूत आपला वास त्याला देतात म्हणजे मनुष्याला कांहीं कारण नसतां एक प्रकारचा उत्तम वास येतो, व वासाच्या द्वारें यक्षभूत त्याच्या आंगांत शिरतात. राक्षसभूत खांद्यावर बसून त्याचें आंग जड झाल्यासारखें वाटतें. ते त्याला आपलें वाहन करतात व नंतर आंगांत शिरतात. पिशाचादिक भूत आलिंगन दिल्यासारखें करतात नंतर त्याला विस्मृती पडते, व ते आंगांत शिरतात. पितर गुरु ऋषी वृद्ध व सिद्ध हे भूत तर नुसते शाप देऊनच त्याच्या आंगांत शिरतात. याप्रमाणें भूतांची रीति लिहिली. आतां प्रत्येक भूत आंगांत शिरल्याचीं लक्षणें थोडकीं लिहितों. देवभूत लागलेला मनुष्य चांगलें आचरण करूं लागतो, व थोडेसें संस्कृत बोलतो. बहुशः शुक्ल १ चे दिवशीं त्याच्या आंगांत येतें. बहुशः म्हणण्याचें कारण इतर वेळेलाही येतें. असुर ग्रह क्रोधी असतात. ते द्वादशीच्या दिवशीं किंवा शुक्ल १४ च्या दिवशीं बहुशः येतात. ग्रह शब्दाचा अर्थ सर्वत्र भूत समजावा. या लेखांत आलेल्या देव वगैरे शब्दांचा अर्थ त्या त्या जातीचे भूत समजावा. मुख्य देव किंवा असुर समजूं नये. गानवाद्य आवडणारे, परस्त्रीची इच्छा करणारे, चोष्याचारयुक्त, गंधर्वभूत समजावे. हे चतुर्थी, अष्टमी, द्वादशी, किंवा चतुर्दशी दिवशीं येते. परंतु बहुशः असेंच सर्वत्र समजावें. मागेपुढें सांगितलेलीं सर्वच भूतें कोणत्याही वेळेला येतात. झोंप घेणारे, विनाकारण रागावणारे चपल व बहुशः ब्राह्मणाच्याच आंगांत असणारे नागभूत समजावे. हे नागभूत पंचमीच्या दिवशीं किंवा माध्यान्हीं येते. चांगलेपणा, सुंदररूप, कोणाला काय देऊं अशी वर देण्याची इच्छा आंगांत आल्यावर दिसून पडल्यास ते यक्षभूत समजावे. त्याची बहुशः तिथी शुक्ल ७ किंवा ११ दशी. विद्वान पण आचारहीन अशीं चिन्हें दिसल्यास ब्रह्मराक्षस समजावें. याची येण्याची वेळ शुक्ल ५, ८, पूर्णिमेची चंद्रदर्शनाची वेळ किंवा संध्याकाळ. द्वितीया, तृतीया, अष्टमी या तिथींनां राक्षसपिशाच येत असतात. पाप करण्याची आवडी, दुसऱ्याचा द्वेष, कोणाला टाकून बोलणें, पुष्कळ खाणें, कृष्णपक्षांतील नवमी आणि द्वादशीच्या दिवशीं रोग जास्त वाढणें

इत्यादि लक्षणें झाल्यास राक्षसभूत आंगांत आहे असें समजावें. स्वतः च्या विषयीं अभिमान वाळगणारे, बहुधा खोटें बोलणारे, नानाप्रकारच्या चेष्टा करणारे पिशाचभूत समजावे. इतर भूतांचीं लक्षणें मी सध्यां लिहीत नाहीं.

---

### श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ.

पत्र १४ हर्दा, ता. २।१२।१३.

रा. भटसाहेब वकील यांचे चरणीं सा. दंडवत वि. वि. आपलें कृपापत्र ता. १ चें आजच मिळालें, मजकूर समजला. आपण माझी भेट घेतलीच पाहिजे होती अशा प्रकारचा मी अधिकारी असेल असें मला वाटत नाहीं. शिवाय मी शूद्र आहे. त्यामुळें माझ्या वाणीमध्यें अधिकार येणेंही शक्य नाहीं. तथापि आपण जे प्रश्न लिहिले आहेत त्यांचीं उत्तरें यथामति लिहून पाठवितों; आपणास पसंत पडतील तर पहावें.

पहिल्या प्रश्नाचें उत्तर— कर्माचा नियम प्रत्यक्षानें किंवा अनुमानानें निघतो असें हिंदुशास्त्राचें मत नाहीं, कारण प्रत्यक्षप्रमाण अत्यंत अल्प आहे. म्हणजे प्रत्यक्ष प्रमाणानें समजणारी गोष्ट तिन्ही काळीं असूं शकेल असा निश्चय सांगतां येत नाहीं. अनुमान प्रत्यक्षापेक्षां व्यापक आहे खरें पण तेंही सामान्य गोष्टींचा बोध करीत असतें, विशेष गोष्टीचा

---

१ तें पत्र येणेंप्रमाणें:—

### श्रीगजानन प्रसन्न.

ता. ३० नोव्हेंबर १९१३
मुंबई, पोष्ट काळबादेवी
ठाकुरद्वारासमोर.

रा. रा. सत्पुरुष गुलाबराव गोंडूजी मोहोड माधानकर यांचे सेवेसी नम्र शिष्याचे अनेक रामराम वि. वि. आपण मुंबईस दोनवेळ येऊन गेला. मागें डा० देशमुख यांचे घरीं आपला मुक्काम होता, व अलिकडे आला होता त्यावेळीं सरदारगृहांत होता असें वाटतें. आपली समक्ष भेट घेण्याची दोन्ही प्रसंगीं फार इच्छा होती. पण माझ्या आळसामुळें क्षुल्लक कारणाकरतां तो योग जमवून आणण्याचें माझ्या हातून

बोध करीत नाहीं. जसें फोनोग्राफ पाहिला म्हणजे कोण्यातरी माणसानें हा केला आहे येवढें ज्ञान अनुमान करून देतें, पण एडिसन साहेबांनींच तो केला आहे असें ज्ञान अनुमानानें होत नाहीं, तर तें केवळ शाब्द-प्रमाणानेंच होऊं शकतें. कितीही अनुमानावर अवलंबून राहिलें तरीही कांहीं गोष्टी शाब्दप्रमाणानें घ्याव्याच लागतात. जसें— आपला पिता कोण याविषयीं आपल्या जवळ तादृश प्रत्यक्षप्रमाण कांहीं नसतें. बरें, अनुमानप्रमाणाचा देखील येथें कांहीं उपयोग होतो, असें म्हणावें तर तसेंही होत नाहीं. कारण सर्वांना बाप आहे ह्मणून मलाही बाप असला पाहिजे, इतकेंच काय तें अनुमान होऊं शकतें. तेव्हां आपलें पितृज्ञान आपल्याला अत्यंत शाब्दजन्य आहे, असें ह्मणणें भाग पडतें. जें जें अत्यंत शाब्दजन्य असतें तें तें अत्यंत अदृश्य असतें. कर्माचेही असे दोन परिणाम होतात. एक दृष्ट व दुसरा अदृष्ट. अदृष्ट परिणामाचें फळ दुसऱ्या जन्मांत होतें. दृष्ट परिणामाचें फळ याच जन्मांत होतें. कर्मा-पासूनच आपण प्रश्न केला असल्यामुळें चार्वाक वाद आपल्याला पसंत नाहीं, असें मी गृहीत करतो. कारण वरच्या पायरीपासून आरंभ कर-णारानें खालची पायरी उल्लंघिलीच असली पाहिजे असें अनुमान करणें साहजिक आहे. कर्मानें चित्तशुद्धि होतें असें ठरलेलें आहे, असें आपल्या प्रश्नांत वाक्य आहे. तेव्हां अर्थातच चार्वाकाची पायरी आपण घेतलेली नाहीं. ह्मणूनच मी दिलेल्या उत्तरावर चार्वाकाचे आक्षेप आपल्याला

---

घडलें नाहीं. याबद्दल आतां वाईट वाटतें. या पत्रासोबत कांहीं प्रश्न पाठविले आहेत. आपल्यासारखे विद्वान, थोर सत्पुरुष फारच दुर्मिळ आहेत. आपल्या पायाजवळ विनंती इतकीच आहे कीं, त्यांचीं उत्तरें आपण आपल्या अधिकारयुक्त वाणीनें दिल्यास मजवर महदुपकार होतील. पण तशीं उत्तरें देण्यास सवड न झाल्यास निदान कोणत्या ग्रंथांत त्यांचीं उत्तरें सांपडतील तें कृपा करून आपण कळविल्यासही महदुपकार होतील. कळावें, लोभ असावा अशी गरीब दासाची नम्र विनंती आहे. हे रामराम.

महादेव वामन भट, पत्ता— वकील हायकोर्ट मुंबई.

करतां येणार नाहींत. वादामध्यें पहिली पायरी चार्वाकाची आहे. पण ती आपण सोडली असल्यामुळें तेच संशय पुनः काढून पूर्वीच्या प्रश्नाच्या खालचे प्रश्न न करण्याविषयीं मी विनंति करितों. पूर्वजन्मांतील कर्म जर न मानलें तर विनाकारण एकाला सुख व एकाला दुःख देणाऱ्या परमेश्वराकडे विषमता येते, ह्मणून अदृष्ट मानणें भाग आहे. आतां या अदृष्टाचा व जन्माचा अन्योन्याश्रय अनादि आहे, असें आमच्या हिंदुशास्त्राचें मत आहे. मला वाटतें हें अनादि सांगणें कांहीं अलौकिक नाहीं. विचार केला तर कोणत्याच पदार्थाला आरंभ आहे असें दिसत नाहीं. कोणताही पदार्थ आपल्या पूर्वीच्या अवस्थेचें अवस्थांतर असतो, हें जडशास्त्रानेंही ठरल्यासारखेंच आहे. हाच नियम कर्मासही लागू आहे. परंतु हें कर्म दोन प्रकारचें आहे. यमरूप आणि नियमरूप. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह या पांचास यम ह्मणतात. स्नानसंध्या, देवतार्चन, जप इत्यादिकांस नियम ह्मणतात. यम व नियम दोन्ही बरोबर केले असतां चित्तशुद्धि अवश्य होतें. पण जे केवळ नियम करतात व यम करीत नाहींत त्यांनां त्यापासून कांहीं फायदा होत नाहीं. आपण साठ साठ वर्षेंपर्यंत कर्म करणारांचें उदाहरण दिलें ते याच कोटींतील असावेत असें माझें मत आहे. मनुमध्यें असें स्पष्ट ह्मटलें आहे. तो श्लोक येणेंप्रमाणें:—

"यमान् सेवेत सततं न नित्यं नियमान्बुधः।
यमान्पतत्यकुर्वाणो नियमान्केवलान्भजन्" ॥२०४॥

मनस्मृति—अध्या. ४

---

(१) कर्मानें चित्तशुद्धि होतें असें ठरलेलें आहे तर तीं कर्में करतांनां मनावर त्यांचा संस्कार किंवा व्यापार कसा घडून चित्तशुद्धि होतें ? चित्तशुद्धि ह्मणजे संकल्प विकल्प नाहींसे होऊन चित्त स्थीर होणें असा मी समजतो. आपल्या समाजांत जुन्या पद्धतीनें त्रिकालसंध्या, पंचमहायज्ञ वगैरे रोजचीं नित्य व नैमित्तिक कर्में करणारे व तीं नैमित्तिक कर्मेंही श्रुतिस्मृतिप्रणितमार्गानें करणारे भिक्षुक शास्त्री पंडित व गृहस्थ बरेच आहेत, व ६०।७० वर्षेंपर्यंत अशीं कर्में करीत

भावार्थ–यमाचें नित्य सेवन करावें. नियमांचें ज्यावेळीं सांगितलें असेल त्यावेळींच सेवन करावें. म्हणजे संध्या प्रातःकाळीं व संध्याकाळींच करावी. परंतु अहिंसा व सत्य इत्यादिकांचें सेवन सतत करावें. जो यमांचें सेवन करीत नाहीं व केवळ नियमाचें पालन करितो, तो पतन पावतो, असें ह्मटलें आहे. तेव्हां साठ वर्षे काय हजार वर्षे जरी यमांवांचून नियमांचें सेवन केले तरीही चित्त अशुद्धच राहणें साहजिक आहे. आपण संकल्पविकल्प नाहींसे होणें ही चित्तशुद्धीची व्याख्या केली आहे पण ती थोडीशी व्यापक झाली आहे. हिंदुशास्त्रांत संकल्पविकल्प नाहींसे होणें हें उपासनेचें फळ सांगितलें आहे. कर्म उपासना व ज्ञान या तिघांची तीन कार्यें वेदान्तडिंडिमकारांनीं दाखविलीं आहेत. तीं येणें प्रमाणें—

कर्माणि चित्तशुद्ध्यर्थमैकाग्र्यार्थमुपासना ।
मोक्षार्थं ब्रह्मविज्ञानमिति वेदांतडिंडिमः ॥

भावार्थः—कर्मानें चित्तशुद्धि होते, उपासनेनें चित्त एकाग्र होतें, आणि ब्रह्मज्ञानानें मोक्ष होतो, असा वेदांताचा डिंडिम आहे. आपण केलेल्या चित्तशुद्धीच्या लक्षणाचा एकाग्रतेंत अंतर्भाव होतो. ह्मणून असद्वासना मात्र निवृत्त होणें, याचेंच नांव चित्तशुद्धि आहे. चित्तशुद्धि झाली तरी चांगल्या वासना हजारों मनांत येत राहतात. त्याला विक्षेप ह्मणतात. त्याच्या निवृत्तिकरितां उपासनेची जरूर आहे. चित्तशुद्धी झाल्यावरही चांगल्या कामाकरितां काम क्रोध असले तर मला हरकत वाटत नाहीं. मुक्तेश्वरानें स्पष्ट ह्मटलें आहे. "काम असावा ईश्वरभजनीं। क्रोध असावा इंद्रियदमनीं। तीर्थ प्रसादादि ग्रहणीं। लोभ अत्यंत असावा" नियमाचा संस्कार अदृष्टरूपानें होत असून यमाचा दृष्टरूपानें मनावर

---

राहिलेले दिसतात. पण त्यांच्या मनाचे संकल्प विकल्प जाऊन त्यांचें चित्त शुद्ध झाल्यासारखें त्यांच्या बाह्य वर्तनावरून तरी दिसत नाहीं. इतकेंच नाहीं तर रागलोभादि मनोविकारही तादृश कमी झाल्याचें दिसत नाहीं याचें कारण काय ?

(२) "मनसैव कृतं कर्म न शरीरकृतं कृतम्" (योगवा०) या न्यायानें आपणां नित्य कर्में करतांनां ह्मणजे पूजा अर्चा रुद्राभिषेक जपादि कर्में

संस्कार होतो. ह्मणजे यमाची मनास संवय लागते व नियमापासून देवता या मार्गांतील विघ्नें दूर करतात. ह्मणून या दोहोंचाही अभ्यास समुच्चयानें केल्यासच कर्मापासून चित्तशुद्धि होते. हेंच आपल्या पहिल्या प्रश्नाचें उत्तर मला सुचलें तसें दिलें.

दुसऱ्या प्रश्नाचें उत्तरः—माझ्या मतानें असें आहे कीं, मनांत दोन वस्तु एकाकालीं धरतांच येत नाहींत. " युगपज्ज्ञानानुत्पत्तिर्मनसो लिंगं " असें गौतमाचार्यांचें न्यायदर्शनांत सूत्र आहे. दोन ज्ञानें एकाकालीं न होणें हें मनाचें लक्षण आहे, असा त्याचा अर्थ आहे. पाश्चात्य सायकॉलजींतही अटेन्शनसंबंधानें असेंच ह्मटलें आहे. तेव्हां तोंडानें जे केवळ रुद्राचा जप करितात व मन दुसरीकडे लावतात त्यांचा तो जप सुटतच असला पाहिजे. मन जर कर्मांत गुंतलेलें असेल तर शब्दोच्चार पुरा होणें शक्यच नाहीं; आणि इतकेंही करून जर कोणी करीत असेल तर फोनोग्राफाप्रमाणें चित्तावांचून नुसत्या शब्दोच्चारानें कर्मापासून कांहींच फायदा होत नाहीं असें माझें स्पष्ट मत आहे. कारण तसें करणें ह्मणजे यम सोडून नियम करणेंच होय. ह्मणून या प्रश्नाचें उत्तर देखील प्रथम प्रश्नाच्या उत्तराचा शेषच आहे.

तिसऱ्या प्रश्नाचें उत्तरः— ध्यान ही योगांतील सातवी पायरी आहे. त्यामुळें ध्यान करणाऱ्याला हा प्रश्नच होत नाहीं. कारण तेथपर्यंत गेलेला पुरुष प्रथमच प्रत्याहार व धारणा यांच्या योगानें सूक्ष्म देहावर आपला तैजसाभिमान स्थापन करीत असतो, व विश्वाभिमानाचें त्यांत प्रविलापन करितो. त्यामुळें हृदयाकाशांत ध्यान करणें त्याला सहज होतें. स्थूलदेहाला जशी बैठकीची अपेक्षा आहे तशी सूक्ष्मदेहाला नाहीं, कारण तो अपंचीकृत आहे. आतां प्राणायामामध्येंही ध्यान सांगितले आहे खरें, परंतु वितर्क समाधि पूर्ण झाल्यानंतर सांगितले आहे. नवशिक्याला सांगितले नाहीं. नवशिक्याला ध्यानाचा उपदेश शरीराच्या बाहेर सांगि-

---

करतांनां मन पूज्य देवतेकडे एकाग्र करून त्या कृत्यांत गुंतल्याखेरीज नुसता शब्दोच्चार करून कर्माचा संस्कार मनावर अल्पतरी घडणें शक्य आहे कीं काय ?

टला आहे, व या नवशिक्याच्या ध्यानाला मानस पूजा म्हणतात. तुकाराममहाराजांनींही आपल्या मानस पूजेंत "रत्न सिंहासन वर प्रभावळ। त्यावरी सोज्वळ वस्त्र मृदु ॥१॥ लोडउशा मागें टेकाया बाजूला। त्यावरी बैसला स्वामी माझा ॥ २ ॥ असें म्हटलें आहे. यांत हृदयकमळाचें नांव नाहीं. " देवो भूत्वा देवं यजेत् हे वाक्य ब्रह्मज्ञान झाल्यानंतर भक्ति करणाराविषयीं आहे, नवशिक्याविषयीं नाहीं. शिवाय या प्रश्नाचें उत्तर देण्याला सद्गुरुच समर्थ असतात, माझ्या सारख्या गरीबानें काय उत्तर द्यावें. ?

चवथ्या प्रश्नाचें उत्तरः---मंत्राचे न्यास करणें ह्मणजे त्या त्या देवतानां हाका मारून आपल्या अवयवावर बसवून ठेवून पिशाच्यादिकांनां आपल्या शरीरांत शिरू न देणें, असा न्यासांचा अर्थ आहे. या न्यासाचें फळ अदृष्ट आहे, कारण हा न्यास नियमांत येतो; ह्मणून याचें उत्तर पहिल्या प्रश्नाच्या उत्तरांत आलेंच आहे. मंत्ररूप देवता आहे ह्मणजे तो मंत्र त्या देवतेचें नांव आहे. एखाद्यानें हाक मारली असतां जसा एखादा ओ देतो, त्याप्रमाणें मंत्र माझें नांव आहे, असें ती देवता समजत असते. पत्रांत या गोष्टीचा इतकाच खुलासा मी करूं शकतो. मन हें अपंचीकृत आहे, ह्मणून मनानें ध्यान केलेल्या देवतेस, अपंचीकृत ज्या पृथिव्यादि पंचतन्मात्रा, त्यांचे उपचार करणें योग्य आहे. कारण त्या भूतांचा ईश्वरामध्यें लय व्हावा व आपल्या मागचें संसार झेंगट सुटावें असा त्या क्रियेचा अर्थ आहे. कारण पंचतन्मात्रा व मन हें जीवास चिकटल्यानेंच संसार लागलेला आहे. त्याचा ईश्वरांत लय झाला ह्मणजे संसार नष्ट होतो, असें हिंदुयोगशास्त्राचें मत आहे. लय होणें ह्मणजे अर्पण केलेल्या पदार्थांचें विस्मरण पडणें इतकाच अर्थ योगशास्त्रांत घेतला आहे. या गोष्टीची फोड माझ्यानें झाली तितकी केली

---

(३) ध्यान करतांनां "हृदि विन्यस्य" ह्मणजे देवतेचें ध्यान हृदयामध्यें करावें असें सांगितलेलें आहे. मग हृदयांत देवाचें ध्यान केल्यावर आपली बैठक ह्मणजे ध्यान करणाऱ्या जीवाची बैठक कोणती ? " देवो भूत्वा देवं यजेत् " हें तत्व ध्यानांत ठेवून ध्यान कसें करावयाचें ?

आहे. विशेष महात्म्यांनां ठाऊक असेल. ध्याता, ध्यान, व ध्येय या तिहींची संगती कशी जमवावयाची हा प्रश्न योगशास्त्रानुसार ध्यान करणारास येतच नाहीं. नवशिक्यानें असें करावें कीं, ध्येय आपल्या पुढें सिंहासनावर धरावें, ध्यानकर्ता शरीरीं असतोच. ध्येयाला एक सारखें मनापुढें आणणे याचें नांवच ध्यानक्रिया. तेव्हां तिची विशेष संगती कशी ? याची जरूर नाहीं. इतकेंच मला या विषयीं येथें लिहितां येतें. याप्रमाणें चवथ्या प्रश्नाचें उत्तर मला सुचलें तसें दिले.

पांचव्या प्रश्नाचें उत्तर:—या प्रश्नाचें उत्तर वर आल्या सारखेंच आहे. फक्त केशवादि नांवाचा अर्थ अवतारपर न घेतां नित्यमूर्तिपर ध्यावा. सर्व कर्मांत भावनेची अपेक्षा आहे, हें मीमांसाशास्त्रांत शाब्दी भावना व आर्थी भावना इत्यादि सांगून स्पष्ट केलेंच आहे.

साहाव्या प्रश्नाचें उत्तर:—माझें मत असें आहे कीं, वाचकाकडे व वाच्याकडे पृथक् लक्ष्य ठेवण्याची गरज नाहीं. वाचकाचा स्वभावच असा आहे कीं, त्याच्याकडे लक्ष्य लागले कीं, वाच्याकडे लागतेंच. वाच्य वाचकाच्या संबंधाचें मात्र ज्ञान करून घेतले पाहिजे; पण वेदाध्ययन मात्र यांत येत नाहीं. कारण अध्ययन हें उपासनेंत येत नसून नियमाचें अंग आहे, आणि नामस्मरण हें उपासनेचें अंग आहे. ह्मणून वेदाध्ययनाचें फळ निराळें आहे. मला सहावा प्रश्न जितक्या रीतीनें समजला तितक्या रीतीनें मी उत्तर लिहिलें.

सातव्या प्रश्नाचें उत्तर:- माझें मत असें आहे कीं, जीव कर्म करतांनां स्वतंत्र आहे, व फळ भोगतांनां परतंत्र आहे. " कृतप्रयत्नापेक्षस्तु विहितप्रतिषिद्धावैयर्थ्यादिभ्यः " असें ब्रह्मसूत्र असून, ज्याचा जसा

---

(४) मंत्रांचे न्यास शरीराच्या अवयवाचे ठिकाणीं करावयाचे ह्मणजे त्या क्रियेचा अर्थ काय ? मंत्ररूप देवता आहे ह्मणजे काय ? पृथ्वी वगैरे तत्वांचे गंध फूल वगैरे उपचार ध्यानस्थ देवतेस करतात हें काय ? ध्यानकर्त्ता, ध्यानविषय, ध्यानक्रिया या तिहींची संगती ध्यान करतांनां कशी जमवावयाची हें मला कळत नाहीं. त्याची फोड कृपा करून करावी.

प्रयत्न असेल तसेंच ईश्वर त्याच्याकडून करवितो असा त्याचा अर्थ आहे. या सूत्राच्या भाष्यांत आचार्य म्हणतात– ईश्वर हा पाण्याप्रमाणें साधारण कारण आहे, आणि ज्याचा त्याचा यत्न बीजाप्रमाणें असाधारण कारण आहे. आंब्याच्या झाडालाही पाणी पाहिजे, व निंबाच्या झाडालाही पाणी पाहिजे, ह्मणून पाणी हें साधारण कारण होय. पण आंब्यानें गोड होणें, व निंबानें कडू होणें हें त्याच्या त्याच्या बीजावर अवलंबून आहे. ह्मणून बीजें हीं असाधारण कारणें होत. अनेक कार्यांचें जें कारण त्याला साधारण ह्मणतात, आणि एकाच कार्याचें जें कारण त्याला असाधारण ह्मणतात. आतां प्रारब्धाची निवृत्ति यत्नानें होते असें माझें मत आहे, पण प्रारब्ध बलवान् असलें तर यत्न लंगडा पडतो. तेव्हां प्रारब्ध कोणत्या प्रकारचें आहे हें पाहिलें पाहिजे. प्रारब्ध केवळ साधारण असेल तर औषधी सारख्या यत्नानेंच त्याचा जय होतो. प्रारब्ध जर दैविक असेल तर, औषधीसारखा भौतिक प्रयत्न लंगडा पडतो. त्याला मंत्राची किंवा योगाची अपेक्षा लागते. योगानें अनेक शरीरें निर्माण करून आपलें कर्म एकदम भोगून टाकतां येतें. शिवाय प्रारब्ध ह्मणजे भोग होण्याची सुरुवात होते तेव्हांच म्हणतात. बाकीचें कर्म संचितांत असतें. समजा कीं, तीन वर्षांनीं तुह्मांला कांहीं व्हावयाचें आहे, तर आतां ते कर्म, प्रारब्ध झालेलें नाहीं सध्यां तें संचितांतच आहे, असें माझें मत आहे. प्रत्यक्ष भोग सुरू झाल्यास मग मात्र प्रारब्धकर्म भोग दिल्यावांचून निवृत्त होत नाहीं. ह्मणूनच भुक्त दुःखाविषयीं निवृत्तीचा उपाय

---

(५) रोजचें कर्म कसें करावें ह्मणजे करतांनां मनाची बैठक व भावना कशी ठेवावी ? उदाहरणार्थ– संध्या करण्यास सुरुवात केली, तर केशवादि नामोच्चार केल्याबरोबर परमेश्वरानें हे अवतार घेऊन भक्तांचें रक्षण पूर्वीच्याकाळीं केलेलें आहे ही भावना जागरूक असली पाहिजे कीं नाहीं ? मार्जन करतांनां अंतःशुद्धि व बहिःशुद्धि पाणी मंत्रून तद्वारा करीत आहों अशी कर्त्याची भावना पाहिजे कीं नको ? याचप्रमाणें अर्घ्य, उपस्थान, व ब्रह्मयज्ञ वगैरे करतांनां. तशी नसेल तर चित्तशुद्धि होण्यास कर्माचा उपयोग होईल कीं काय ?

शास्त्रांत सांगितला नाहीं, आणि वर्तमान दुःख देखील भोगल्यावांचून निवृत्त होत नाहीं. आतां ज्वरावर औषध घेतलें तर आतांचा ज्वर निवृत्त होत नाहीं तर पुढच्याक्षणीं येणारा ज्वर निवृत्त होतो. मलेरियाची आलेली पाळी किनिन दाबत नाहीं तर येणाऱ्या पाळीचा निरोध करते. " हेयं दुःखमनागतम् " असें पतंजलीचें योगशास्त्रांत सूत्र आहे, आणि पुढें येणाऱ्याच दुःखांचा नाश होतो असा त्याचा अर्थ आहे. आतां एखाद्याला एवढ्या प्रयत्नाचें ज्ञान नसेल तर कसें करावें ? तर तो त्याचाच अपराध आहे असें मी म्हणतो. त्यांत दैवाचें कांहीं नाहीं तें ज्ञान त्यानें मिळवून घ्यावें. समजा कीं, तसें ज्ञान होण्यासारखी परिस्थिति नसली तर ज्या परिस्थितींत तो असेल त्या परिस्थित्यनुसार शास्त्रानें जो त्याला धर्म सांगितला असेल तो पाळावा, म्हणजे हळु हळु दुसऱ्या जन्मांत तरी फायदा होईल. मुंबईला पत्रानें बातमी येण्याला येथून एक दिवस लागतो. परंतु तारेनें बातमी एक मिनिटांत येते. त्याप्रमाणें तीव्र प्रयत्न जो करतो तोच एका जन्मांत संचिताचा नाश करूं शकतो. साधारण मनुष्याला जन्म लागतात; पण कोणाच्याही शुभ

---

(६) नामस्मरण करतांना ( यांत मी वेदाध्ययन जप यांचाही समावेश करतो ) नामाचा जो उच्चार आपण करतों तिकडे आपले लक्ष ठेवावें असें " ब्रह्मसिद्धान्त म्हणून रा. बाबागर्दे यांनीं केलेल्या ग्रंथांत म्हटलेलें आहे. नामाचा उच्चार करतांना नामी याचें स्मरण ठेवलें पाहिजे तर नामाच्या उच्चाराकडे लक्ष गुंतून राहिल्यास ध्यानाचा विषय जो नामी म्हणजे देव तिकडे लक्ष कसें ठेवावें ?

(७) संचित प्रारब्ध व क्रियमाण अशीं कर्मं आहेत. या जन्मांत भोग घेऊन संपवून टाकण्याकरितां संचितांतून काढून ठेवलेलें जें कर्म त्या कर्माच्या भोगांत क्रियमाण कर्मानें फरक होईल किंवा नाहीं ? होत नसेल तर मंत्र वैद्यक व ज्योतिष वगैरे शास्त्रांनीं भोगपरिहारार्थ जे औषधी मंत्र इत्यादि उपाय सांगितले आहेत त्यांचें वैय्यर्थ्य होतें. फरक होत असेल तर कोणत्या ठरीव गोष्टी बदलतात व कोणत्या बदलत नाहींत ?

यत्नाचा नाश होत नाहीं. ''नहि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति ।" असें भगवंताचें वाक्यही आहे. आतां जसें पापाचा शुभकर्म नाश करितें तसें पापही शुभकर्माचा नाश करण्यास समर्थ आहे, अशी शंका योग्य होणार नाहीं. कारण पापाचा नाश करण्याकारितां प्रायश्चित्त ह्मणून निराळें कर्म सांगितलें आहे. आतां शास्त्रावर जर विश्वास नसेल तर पुण्यपापावरही विश्वास असणें शक्य नाहीं, कारण पुण्यपापांची सिद्धि प्रत्यक्षानें किंवा अनुमानानें होतच नाहीं. हिंदु बौद्ध व जैन या तीन धर्मांत कर्मवाद विशेष मानला आहे. पण तो आप्तवचनावरच अवलंबून आहे. हेंच आपल्या सातव्या प्रश्नाचें उत्तर मला सुचलें तसें दिलें. तथापि याविषयीं पुष्कळ ऊहापोहाची जरूरी आहे.

आठव्या प्रश्नाचें उत्तरः— हा प्रश्न थिऑसफीला अनुसरून आहे पण थिऑसफीला अनुसरून मला उत्तर देतां यावयाचें नाहीं. कारण

---

(८) मंत्राच्या जपाचा व्यापार प्रारब्ध बदलण्याचे कामीं कसा घडतो, ह्मणजे मी मंत्राचा जप केला ह्मणजे जपाचीं अक्षरें बीजें वगैरेचा पुनरुच्चार वारंवार केला, यामुळें आकाशांत त्या ध्वनीचा कोणता परिणाम घडून मागील ठरीव गोष्टी बदलतात. उदाहरणार्थ एखाद्या जीवास प्रारब्धभोग ह्मणून ४० व्या वर्षी प्लेगसारखा मोठा रोग होण्याचें नियतीनें ठरलेलें आहे. टाळतां येणारें प्रारब्ध व न टळणारें प्रारब्ध असें दोन भाग मानतात. त्या समजुतीप्रमाणें हें प्रारब्ध त्या जीवाचें टळणाऱ्या प्रारब्धापैकीं आहे अशी आपण कल्पना करूं, व तें टळण्याकरितां त्या जीवानें शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें मृत्युंजयाचा जप केला किंवा करविला तर जप करण्यामुळें मंत्राच्या बीजांचा व इतर अक्षरांचा पुनरुच्चार झाल्यामुळें सृष्टींत असा कोणता व्यापार घडतो कीं, त्यामुळें अशी कांहीं अदृष्टशक्ति निर्माण होते कीं, त्यामुळें ह्या जीवाची प्लेगच्या रोगाची सर्व लक्षणें नाहींशीं करून त्यास तो व्यापार रोगमुक्त करतो. थिऑसफीच्या कांहीं ग्रंथांत असा उल्लेख आहे कीं, अंतरिक्षांत जीवांच्या कर्माचा रेकार्ड असतो म्हणजे त्याचें प्रारब्ध लिहिलेलें असतें, तर ते कसें पुसलें जातें ?

तिकडे माझा विशेष व्यासंग नाहीं. या प्रश्नाचें माझ्या मतानें उत्तर असें आहे कीं, वारंवार जपानें जपाची देवता प्रसन्न होऊन रोग करण्याचा आपला बेत रहित करिते. हें मंत्रशास्त्रानुसारें उत्तर झालें. योगशास्त्रानुसार याचें उत्तर असें आहे कीं, मंत्राचा वारंवार उच्चार केल्यानें व भावना त्या मंत्रावर एकाग्र केल्यानें मनाची तीव्र शक्ति वाढते, आणि शरीर हें मनाच्या अत्यंत ताब्यांत असल्यानें रोगाचा प्रतिबंध होतो. योगशास्त्राचें मत असें आहे कीं, मन तीव्र झाल्यास कोणत्याही वस्तूचें आकर्षण करितां येतें. ध्वनीचा परिणाम मनांत होतो असें व्याकरणशास्त्र व पातंजलशास्त्राचें मत आहे. आपल्याला थिऑसफीप्रमाणें उत्तर पाहिजे असल्यास माझा नाइलाज आहे.

नवव्या प्रश्नाचें उत्तर:— जुन्या वैद्यकाविषयीं मी स्वतः खटपट करीतच आहे. त्याबद्दल " वैद्यवृंदावन " नांवाचा ग्रंथ मी लिहीत आहे, परंतु मी गरीब आहे. मजजवळ पैसा नाहीं. मी व्रतापुरत्या पैशाची मात्र भिक्षा मागत असतो. बाकी कोणास पैसा मागावयाचा नाहीं असा माझा निश्चय आहे. कारण पैसा देणाऱ्यानें इतक्या लौकर कार्य कां झालें नाहीं असें विचारलें तर मजजवळ देण्याला पुरावा नाहीं, व तो गोळा करण्याकरितां खटपटही करण्याची माझी इच्छा नाहीं. शिवाय मी ब्राह्मणाच्या पक्षाचा असल्यामुळें माझी जाती जोरानें माझ्याविरुद्ध आहे, व मी शूद्र आहे एवढ्यावरच कांहीं ब्राह्मणही माझ्याविरुद्ध आहेत. या दोन पेंचात मी सांपडल्यामुळें माझ्या हातून एखादें कार्य सुरळीत होईल असें मला वाटत नाहीं. "बोद्धारो मत्सरग्रस्ताः प्रभवः स्मय-दूषिताः " हें भवभूतीचे उद्गार सर्वत्रच खरे होत आहेत. त्याला टक्कर देण्याची माझी छाती नाहीं.

दहाव्या प्रश्नाचें उत्तरः— ज्या श्रुतिस्मृतींत वर्णाश्रम कर्में सांगितलीं आहेत त्याच श्रुतिस्मृतींत तीर्थाटण व सत्संगही सांगितला आहे.

---

ध्वनिशास्त्राप्रमाणें sound creates, sound preserves and sound destroys असें ठरलेलें आहे तर, ध्वनीच्या योगानें वस्तु उत्पन्न कशा होतात व नष्ट कोणत्या व्यापारानें होतात ?

तेव्हां गांवोगांवीं सत्संगाकरितां फिरणें हें ज्या मुमुक्षूला अभिमान नाहीं, त्याला योग्य वाटणें साहजिक आहे. सद्गुरु सच्छिष्य शोधीत असतात असें माझें मत नाहीं. कारण सर्व वेदान्तशास्त्रांत साधनचतुष्टयसंपन्नालाच गुरुकडे जाण्याचा अधिकार सांगितला आहे. गुरूनें शिष्याकडे जावें असें कोठेंही सांगितलें नाहीं. एखाद्याच्या दैवानें कदाचित् घरींच सत्पुरुष भेटत असतील, पण तेवढ्यानें सत्संगाकरितां फिरणें सोडणें म्हणजे एकाला द्रव्याचा हांडा सांपडला ह्मणून दुसऱ्यानें शेतांत जाणें सोडून देण्यासारखें आहे. आतां ज्याला आपल्याला साधू फसवितील असें वाटत असेल त्यानीं पाहिजे असल्यास जाऊं नये, पण जो मुमुक्षू आहे त्याला फसविण्याला कोणीही समर्थ नाहीं, असें माझें मत आहे. याविषयीं पुष्कळ ग्रंथांत मी लिहिलेलेंही आहे. स्वतः गुरु शोधण्याविषयीं तुकाराममहाराजांचे उद्गार काय आहेत ते येथें लिहितोः–

अभंग.

अग्नि हा पाचारी कोणासी साक्षेपें । हिवें तोचि तापे जाऊनियां ॥ १ ॥

---

(९) हल्लीं जुन्या वैद्यकास उतरती कळा लागून तें नष्टप्राय झाल्यासारखेंच आहे. कोट्यावधी रुपयांची विलायती औषधें येथें खपत आहेत, व जुन्या मात्रा, रसायनें, भस्में, काढे वगैरे सर्व औषधाचे प्रकार निरुपयोगी ठरल्यासारखे आहेत. वैद्यसंमेलनें सभा वगैरे मधून मधून भरतात, व डाक्टराचे आणि वैद्याचे वादविवाद होतात. त्या वादाचे विषय पुष्कळ आहेत, पण महत्वाचा विषय ह्मणजे आर्यवैद्यकाची वातपित्तकफ या त्रिधा प्रकृतीच्या पायावर रचलेली रोगनिदानाची पद्धत हा होय. वेदान्तशास्त्रांत पांचभौतिक शरीर असून अमुक भाग पार्थिव, अमुक तैजस असें ठरलेलें आहे. आपल्या सर्व शास्त्रांच्या सिद्धान्ताची एकवाक्यता असल्यामुळें, वातपित्तकफाची मीमांसा आपल्यासारख्या अधिकारी पुरुषानीं लोकांपुढें मांडल्यास पुष्कळ डाक्टरांचे दुराग्रह नाहींसे होऊन जुन्या पद्धतीचें पर्यालोचन करण्याची त्यास बुद्धि होऊन, आर्यवैद्यक सजीव होऊन महत्कार्य होईल. तरी या वातपित्तकफाच्या पद्धतीचें विवरण आपण करावें अशी विनंती आहे.

उदक ह्मणे काय याहो मज प्यावें । तृषित तो धांवे सेवावया ॥ २ ॥
काय वस्त्र ह्मणे याहो मज नेसा । आपुलें स्वइच्छा जग वोढी ॥ ३ ॥
तुक्यास्वामी ह्मणे काय मज स्मरा । आपुल्या उद्धारा लागुनीया ॥ ४ ॥
श्रुतिही असेंच ह्मणते–" तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् "॥ झालें. आपल्या प्रश्नाचीं उत्तरें माझ्या मतीला सुचलीं तशी दिलीं. तीं रुचल्यास गोड करून घ्यावीं. आतां हें कोण्या ग्रंथांत आहेत असें मला ठाउक नसल्यामुळें मी एकदमच लिहून पाठविली. प्रेमाची वृद्धि असावी. कळावें ही विनंती.

आपला अपरिचित–गुलाबराव.
गोंडुजी मोहोड मोकद्दम माधान हल्लीं
मु० हरदा.

## श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ.

हरदा. ता. १४-१२-१३

श्रीमहाराजांकडून पहिल्या पत्राचें उत्तर गेल्यानंतर पुन्हां तारीख १०-१२-१३ तारखेस रा० भट साहेब वकील यांचे कडून दुसरें पत्र आलें. त्यांत त्यांनीं श्रीमहाराजांच्या कांहीं उत्तरावर शंका विचारल्या आहेत, त्यांचें समाधान या पत्रांत आहे.

---

(१०) एखादा मुमुक्षु पुरुष वर्णव्यवस्थेनुरूप श्रुतिस्मृतिप्रणीत धर्मकर्मे करीत आहे तर, त्याच कर्मानुष्ठानानें त्याच्या चित्ताचे संकल्प विकल्प नाहींसे होऊन चित्तशुद्ध होऊन सद्गुरू त्यास भेटतील किंवा त्यानें गुरूच्या शोधार्थ गांवोगांवीं हिंडून गुरू शोधून काढले पाहिजेत ? सद्गुरूही सच्छिष्य शोधितच असतात व तसा शोधून काढून त्यास कृतार्थ करितात. वाळलेल्या गवतास काडी ओढून तें पेटविण्यासारखाच सद्गुरूपदेशाचा प्रकार आहे असें वाचल्याचें स्मरतें. ह्मणजे शिष्याच्या मनाची पूर्ण तयारी झाल्यावर सद्गुरू लांब नाहींत. ते तात्काळ भेटतातच, व त्याची तयारी होणें ह्मणजे ओलें गवत वाळून जळण्यास तयार होण्यासारखेंच आहे, व गुरूच्या एका शब्दानें शिष्याचें कार्य होतें असें म्हणतात. तर यापैकीं खरें कोणतें ? कळावें ही विनंती.

रा. रा. भट साहेब वकील यांचे चरणीं सा. दंडवत वि. वि. आपलें कृपापत्र पावलें. मजकूर समजला.

जाती जन्मसिद्ध आहे अशा आशयाचेच मी मुमुक्षुमध्यें लेख लिहिले आहेत. शिवाय मी आपल्याला उघडपणें शूद्र ह्मणवीत आहे. ज्याचा जो धर्म आहे तोच त्याला तारक आहे अशी माझी समजूत आहे. ब्राह्मणाला वेदद्वारा व शूद्राला पुराणद्वारा मोक्षप्राप्ति परमेश्वरानें सांगून ठेविली आहे. ती आज्ञा उल्लंघन करणें ह्मणजे परमेश्वरावरून विश्वास काढून टाकण्यासारखेंच आहे. आपण पहिल्या प्रश्नाचें उत्तर गोड करून घेतलें असें आपल्या पत्रावरूनच समजत आहे. चार्वाक मताचा जो मी उल्लेख केला, तो मी आपल्याला अनुसरून केला नव्हता, पण युक्तीच्या सांखळीमध्यें करणें पडल्यामुळें केला होता.

दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरावर जी आपली शंका आहे तिचें उत्तर मला इतकेंच सुचतें कीं, चित्त वारंवार जरी दुसरीकडे धांव घेतें, तथापि त्याला वारंवार वळवीत जावें. एखाद्या वृक्षाची शाखा लववूं लागलें म्हणजे प्रथम तिच्यामध्यें स्थितिस्थापकता असल्यामुळें कांहीं कालपर्यंत ती सोडली कीं वर जाते. ह्मणून तिला लववून कांहीं बांधून किंवा हातानें धरून ठेवावें लागतें, व नंतर ती कायमची लवली ह्मणजे मग तिचें वर जाणें आपोआपच कमी होतें. त्याप्रमाणें जप करतांनां कोर्टांतील खटल्यांकडे लक्ष गेलें तर तें जबरदस्तीनें ओढून आणणें व कांहीं काल पर्यंत हठानें तेथेंच थांबवून ठेवणें याबांचून दुसरा उपाय मला तरी माहीत नाहीं. पण असें कांहीं दिवस करावें लागेल खरें. चित्ताच्या निरोधाकरितां केवळ अभ्यासच हितावह होत नाहीं, तर त्याला वैराग्यही अपेक्षित आहे. कारण ज्याच्यांत आसक्ति अधिक तिकडे चित्त अधिक गुंतत असतें. अभ्यासानें चित्ताचा चंचलपणा जरी दूर होत असला तरी आसक्ति दूर होत नाहीं. यामुळेंच उच्च अशा चित्त एकाग्रतेच्या तत्वावर उभारलेल्या मेस्मेरिझमपासून झालेल्या दुष्परिणामामुळें अमेरिकेंत कायदा करण्यापर्यंत पाळी आली आहे. "चले वाते चलं चित्तम्" हा कांहीं योगशास्त्राचा सिद्धान्त नव्हे. ही एक प्रकारची बाळ-युक्ति आहे. कारण "प्रच्छर्दनविधारणाभ्यां वा प्राणस्य" असें पतंजलीचें

सूत्र असून प्राणाचा रेचक, पूरक व कुंभक करणें हाही एक मन स्थीर करण्याचा उपाय आहे, असा त्याचा अर्थ आहे. सूत्रांत जो "वा" शब्द आहे तो विकल्पदर्शक असल्यामुळें पूर्वीच्या मनोनिरोधादि उपायापेक्षां प्राणायामाचें गौणत्व तो सुचवीत आहे. शिवाय प्राणायामानें मनाची चंचलताच नाहींशी होते, आसक्ति नाहींशी होत नाहीं. कारण पाण्यामध्यें बुडी मारून श्वास रोकून तास तासभर राहणारे मी पाहिले आहेत. परंतु ज्याकरितां ते बुडी मारतात ते त्या श्वासरोधामध्येंही आपलें कर्म करीत असतात. म्हणून प्राणायामाबरोबर क्षणोक्षणीं विषयांतील दोष मनांत आणण्याची आवश्यकता आहे. शिवाय प्राणायाम आपण किती वेळ पर्यंत करतां, हें मला माहीत नाहीं. प्राणायामाचें पुरे कार्य केवल-कुंभक झाल्यावांचून होत नाहीं. आतां आपल्या मनांत अशा प्रकारची आसक्ति आहे असें मात्र माझें म्हणणें नाहीं. परंतु मला मनोनिरोधाचा उपाय वाटला, तो मी सांगितला. केवळ प्राणानेंच मन चलित होतें असें नाहीं तर मन चलित झाल्यानेंही प्राण चलित होतो. शोक व क्रोध या मनोवृत्तीमुळें जोराचा श्वास चाललेला आपण पाहतों. म्हणून प्राणनिरोधा-वर भरंवसा टाकून मननिरोध होईल असें मानण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तर प्राणाचा व मनाचा निरोध करण्यास एकदमच आरंभ केला पाहिजे. अमनस्कखंडांत मनाच्या योगानें प्राण चंचल होतो, व प्राणाच्या योगानें मन चंचल होतें असें म्हटलें आहे. गीतेंत सहाव्या अध्यायांत—

> " यतो यतो निश्चलति मनश्चंचलमस्थिरम् ।
> ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् " ॥

असें स्पष्टच म्हटलें आहे. प्राणायामांत ध्यान करतानां मात्रा मोजण्यांत चूक होण्याचा संभव आहे. तथापि उत्तम प्राणायामाची संवय होईपर्यंत ध्यानाकडे मृदु लक्ष ठेवावें व मात्रा मोजण्याकडे तीव्र लक्ष ठेवावें; आणि पुढें ध्यानाकडे तीव्र लक्ष ठेवून मात्रा मोजण्याकडे मृदु लक्ष ठेवावें. म्हणजे पहिल्या कक्षेंत मधून मधून ध्यान सुटल्यास हरकत नाहीं, व दुसऱ्या कक्षेंत मधून मधून मात्रा चुकल्यास हरकत नाहीं. असेंच सर्व योगी करीत आले आहेत, हें मला ठाऊक आहे. दोन्ही ठिकाणीं एका-वेळीं तीव्र मन राहणें शक्य नाहीं, व तसा उपाय मला ठाऊकही नाहीं.

मध्यें मध्यें विजातीय वृत्ती येणें याचें नांव धारणा आहे, व विजातीय वृत्ति मुळींच न येणें याचें नांव ध्यान आहे. पण अशा प्रकारची धारणा व ध्यानें योगाची सहावी व सातवी पायरी आहे. ह्या दोन्ही पायऱ्या साधण्याकरितां प्रत्याहार ही पांचवी पायरी चांगली साधली पाहिजे. प्राणायाम ही योगाची चवथी पायरी असून सातव्या पायरीच्या दृष्टीनें त्यांतील ध्यान अर्थातच चुकीचें असावयाचें. डोळे जरी सूर्याला पाहतात तरी त्यावर उडून कोणाला जातां येत नाहीं, त्याप्रमाणें इच्छा जरी मोठ्या फळाची करितां येते, तरी तें मिळवून घेण्याला हळु हळु अभ्यासाचीच जरूर आहे.

तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरावर जी आपली शंका आहे तिचें उत्तर यथामति देतो. "देवो भूत्वा देवं यजेत्" या वाक्याचा जपाचे वेळीं कोणी उपयोग करीत असले तरी ते भावना रूपानेंच करीत असले पाहिजेत. त्याचा वास्तविक उपयोग तर ज्ञानानंतरच आहे. न्यासाचा उपयोग आपण आपला देह देवतेचें रूप करावें असा नव्हे, तर देवतेच्या आश्रयानें मंत्रजपाला पुण्यमय अधिकारी शरीर व्हावें असा आहे. देवतेचें स्वरूप आपण झाल्यावर अहंग्रह ध्यान करणेंच उरतें. पृथक् ध्यान उरतें असें कोणतेंही शास्त्र ह्मणत नाहीं. आतां हें ध्यान अहंग्रहरूपच करावयाचें असेल तर, जीवाची बैठक विचारण्याचें कारण नाहीं. कारण हृदयांतच ध्याता व ध्येयाची संस्थिति असते. पृथक् ध्यान करावयाचें असेल व तें हृदयांतच करावयाचें असेल तर हृदयकमळाच्या कर्णिकेंत मूर्ति स्थापन करून उजवीकडच्या पंकोळीवर आपली बैठक स्थापावी, व रेचक प्राणायामानें हृदयकमळ ऊर्ध्व करावें, असें तांत्रिक ह्मणतात. पण मला असें वाटतें कीं, हृदयांत ध्यान करतांनां मी ध्यान करतो इतकें स्मरण असणेंच पुरे. आपली बैठक कोठें स्थापावी या विचाराची अवश्यकता नाहीं. कारण एवढी स्मृतीच तीव्र झाली ह्मणजे ध्यात्याचा विसर पडतो. ध्याता व ध्यान विसरून जाऊन ध्येयाकाराचीच स्फूर्ति राहणें यालाच समाधि म्हणतात, व हा समाधीच ध्यानाची परम सीमा आहे. बैठक स्थापण्याकरितां स्थूल शरीराच्या आकाराचें जें आपल्याला सूक्ष्म व्हावें लागतें, ती अडचण नुसत्या ध्यानस्मृतींत येत नाहीं. समाधि

होण्याला जितके उपाधि कमी असतील तितकें बरें. ब्रह्मसिद्धान्तमाला ग्रंथ मी पाहिला आहे. त्यांतील आपण दाखविलेला उपाय बरोबर असलाच पाहिजे. त्या संबंधांत माझें कांहीं ह्मणणें नाहीं. ज्याला जो उपाय साधेल त्यानें तोच करावा. रोजच्या कर्मांत ज्या आपल्याला अडचणी येतात, त्या आपण मला विचारतों ह्मणतां तथापि ब्राह्मणा-पासूनच ब्राह्मणाला आलेली विद्या वीर्यवती होत असते असें श्रुतिस्मृतीचें ह्मणणें आहे. तथापि मला जसें ठाऊक होतें तसें उत्तर दिलें. एक क्रिया मृदु व एक क्रिया तीव्र हेंच या सर्व अडचणींतील मर्म आहे, असें सर्व करीत आलेले साधू सांगतात. पुढें ठेविलेल्या मूर्तीचें ध्यान करितांनां जप चुकतो, व जप करतांनां ध्यान चुकतें तर यांत कांहीं मोठेंसे आश्चर्य नाहीं; परंतु जपावर अधिक आसक्ति असल्यास ध्यानाकडे लक्ष मधून मधून नेत जावें, व ध्यानाकडे अधिक आसक्ति असल्यास जप मधून मधून चुकण्याची पर्वा करूं नये. जपांतील चुकी ध्यानाचें पुण्य दहन करिते, असें गरुडपुराणांत ह्मटलेंही आहे. ह्या गोष्टी निष्काम कर्मासच लागू आहेत. सकाम कर्मामध्यें तर जप प्रधान आहे. शिवाय जप कर-ण्याचें वेळीं तीव्र ध्यान करण्याचा विधी सांगतां येणें शक्यच नाहीं. कारण अतिशय ध्यान झालें ह्मणजे श्वास सुद्धां क्षीण होतो, आणि जपांत तर अक्षरें उच्चारावीं लागतात. ह्मणून मृदुध्यानाचाच तेथें विधी आहे, आणि तेवढें ध्यान व तेवढा जप होणें शक्य आहे. कारण संध्या करतांनां कोर्टाच्या खटल्याकडे मन जातें, या आपल्या लिहिण्यावरून दोन मृदुकार्यें मन एकाकालीं करूं शकते असें होतें. दोन कार्यांचा तीव्र संवेग मात्र मन एकाकाळीं धारण करूं शकत नाहीं, असा माझ्या मागील पत्रांतील लिहिण्याचा अर्थ आहे. इतरत्र जर मन जात असेल तर तेथून त्याला हठानें ओढून आणावें. असें ओढून आणण्याला कांहीं काळ लागेल खरा, परंतु हा काल वाईट वासना निरोधाचे कामींच खर्च होत असल्यामुळें वाईट वाटूं देण्याचें कारण नाहीं. मला इतकेंच या प्रश्नाचें उत्तर माहीत आहे.

चवथा, पांचवा व सहावा या तीन प्रश्नांचा बिलकुल उल्लेख नस-ल्यामुळें त्यांचीं उत्तरें आपण गोड करून घेतलीं असावींत.

सातव्या प्रश्नाचें उत्तरही आपण गोड करून घेतलें असें आपल्या पत्रावरून दिसतें. आपला पापपुण्यावर व शास्त्रावर विश्वास आहे, हा माझा पहिल्या पत्राचे वेळींच निश्चय झाला होता. फळ ज्योतिष्याला अनुसरून आपण मंत्र जप करीत आहां हें फार चांगलें आहे. परंतु मंत्र सिद्ध, साध्य, सुसिद्ध किंवा रिपु आहे, याचा आपण कोणातरी मोठ्या मांत्रिकाकडून शोध करून घेतल्यास ठीक होईल.

" सिद्धः फलति कालेन साध्यः फलति वा न वा ।
सुसिद्धः स्मरणादेव रिपुः साधकमारकः " ॥

असें मंत्रशास्त्रवचन आहे. माझें तर मत असें आहे कीं, ब्राह्मणांनां भगवति गायत्रीजननीवांचून दुसऱ्या मंत्राकडे धांव घेणें कल्पतरू सोडून एरंडाजवळ भिक्षा मागण्यासारखें आहे. वेदोक्त मंत्राचीं योग्य पुरश्चरणें कलींत चतुर्गुण सांगितलीं आहेत. तींच ब्राह्मणाला हितावह आहेत.

आठव्या प्रश्नाच्या उत्तराविषयीं जो उल्लेख केला आहे त्याविषयीं माझें म्हणणें इतकेंच कीं, शब्दब्रह्म व स्फोट हे आर्यशास्त्रांतील शब्द केवळ वादाचे वाचक नाहींत. शब्दब्रह्म ह्मणण्याचा अर्थ असा आहे कीं, ब्रह्माचें साधन शब्द आहे ह्मणूनच त्या शब्दाचे ठिकाणीं ब्रह्मदृष्टि करावी. ही एक प्रकारची भावना आहे. अनुभूतिप्रकाशांत स्वामि विद्यारण्य असेंच ह्मणतात:—

" यदोंकारस्य सार्वात्म्यं ध्यानार्थं तन्नवस्तुतः ।
यद्ब्रह्मणस्तु सार्वात्म्यं वस्तुतोऽप्येतदीक्षताम् " ॥

भावार्थ:— ॐकाराचें जें सर्वात्मकत्व सांगितलें आहे तें केवळ ध्यानासाठीं आहे, खरें नव्हे; आणि ब्रह्माचें जें सर्वात्मकत्व सांगितलें आहे तें ध्यानासाठींही आहे व खरेंही आहे. असाच देश शांकरभाष्यांतही आहे. स्फोटवाद वैय्याकरणाचा असून व्याकरणमहाभाष्यांत व शब्दकौस्तुभादि ग्रंथांत त्याचें लक्षण असें सांगितलें आहे कीं, वर्ण क्षणोक्षणीं नाश पावतात. ह्मणून ते अर्थबोध करून देण्याला समर्थ होत नाहींत. तर बुद्धीमध्यें अर्थासी संबंध जुळविणारा एक स्फोट नांवाचा अदृश्य संबंध राहतो. गणितांतील बिंदुप्रमाणें हा गृहीत होय.

हा स्फोट प्रत्येक शब्दांतील एक एक वर्ण स्पष्ट करीत असतो, आणि शब्दाच्या शेवटच्या वर्णाचे वेळीं तो बुद्धींत अगदीं स्पष्ट होतो, व मग बुद्धींत अर्थाचा प्रकाश होऊं लागतो. या स्फोटाचा व अलिकडील ध्वनी-शास्त्राचा कांहीं संबंध नाहीं. शिवाय कांहीं बीजांचा अर्थ न कळला तरी त्यांचा परिणाम होतोच, असें मंत्रशास्त्राचें ह्मणणें आहे; आणि स्फोट-वाद तर अर्थ समजण्याकरितांच आहे. आर्यशास्त्रांत जडकारणवादाचा स्वीकार नाहीं, ह्मणून मंत्राभिमानिनी देवताच जापकाचे मनोरथ पुरवितें, असें सर्व आर्यशास्त्रें म्हणतात. बौद्धशास्त्रांत चेतनकारणवाद नाहीं, ह्मणून ध्वनीचेच विशिष्ट आकार बनून मंत्र होतात असें त्या शास्त्रांत ह्मटलें आहे. याविषयीं बौद्धांच्या समाधिराज सूत्रावरील भाष्यें पहावींत. थिऑसफीचा माझा कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं. तिचा थोडासा उपयोग आपल्याला होत असला तरी आर्यांनीं सर्वथा तिच्या मागें लागणें योग्य नव्हे, इतकेंच काय तें माझें मत आहे, व तें मी आपल्या सूक्तिरत्नावलींत लिहिलेंही आहे.

नवव्या व दहाव्या प्रश्नाचें उत्तर आपण गोड करून घेतलेंच आहे. डॉक्टर देशमुखासारखे विद्वान् मला साह्य करतील कदाचित्, परंतु पैसा हातीं आल्यावर माझें मन आहे तितकें शुद्ध राहील कीं नाहीं ही शंका आहे. ह्मणून मी त्या कामांत पडूं इच्छित नाहीं. शिवाय मी आंधळा आहे. माझ्या पैशाची कोणी कशी वाटाघाट करावी, या संबंधांतही मी बराच असमर्थ आहे. डॉ० देशमुखांनीं मागें मला पादुका मिळवून देण्यांत बरीच मदत केली आहे. पुस्तकें व व्रतें या-वांचून दुसऱ्या कोणत्याही कामांत दुसऱ्यांनां त्रास द्यावयाचा नाहीं असा माझा निश्चय आहे. व्रतांची साधारण सोय झाली आहे. पुस्त-कांचीही परमात्मा करीत आहे. इतकेंही करून पुढें नारायणाची इच्छा असेल तसें.

अजपाजपासंबंधांत जी आपली शंका आहे तिचें उत्तर यथामति देतों. २१६०० जपांत त्याला कमी जास्त करितां येतो असें माझें मत आहे. ज्याला मंत्रयोग करावयाचा असेल त्यानें मात्र २१६०० जप बरोबरच ठेविला पाहिजे; पण हठयोगी, लययोगी किंवा राजयोगी

यांनां त्याची जरूर नाहीं. श्वास कमी जास्त झाल्यानें आयुर्मर्यादाही कमी जास्त होते. जप कमी झाल्यास देवतांचा क्षोभ होतो, व जप जास्त झाल्यास प्राणाचा क्षोभ होतो. ह्मणून प्राणायाम करून वेळ वाढवून जप कमी करावा आणि देवतांचा अर्पण जप मानसीक प्रणवोच्चारानें किंवा अनाहतनादानें भरून काढावा.

या प्रमाणें आपल्या प्रश्नांचीं उत्तरें मला यथामती सुचलीं तशीं दिलीं. तीं रुचल्यास आपण गोड करून घ्यावीं. कळावें ही विनंती.

आपला अपरिचित्
हुर्दा, ता. १४।१२।१३ } गुलाबराव गोंडुजी मोहोड
मोकद्दम माधान हल्लीं मु. हुर्दा.

## श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ.

पत्र १६ ता. २३।२।१४

रा. रा. बडबडे संस्थान फलटण यांनां पाठविलेलें पत्र.

सा. दंडवत वि. वि. आपलें ता. ७।१२।१३ ई. चें पत्र आतांच हातांत पडलें. वाचून आनंद झाला. सर्वज्ञ परमेश्वर आहे. तथापि

---

फलटण ता. ७।१२।१३

रा. रा. बडबडे फलटणकर यांचेकडून आलेलें पत्र.

श्री साधुवर्य गुलाबराव महाराज चरणाचे शेवेशी. इंग्रजी भाषा वैकृत आहे म्हणून मंत्रमय नाहीं, वगैरे मजकूर मुमुक्षु ता. २७।११।१३ वरून कळला.

आह्मी आस्तिकपक्षी असून मंत्रशास्त्रावर पूर्ण भरंवसा आहे. आरबी, फारशी, इजिप्शियन, खालिया, अखाडियन, चिनी, जपानी, वगैरे भाषांत मंत्रशास्त्र आहे, व त्याबद्दल ग्रंथ आहेत. तर हें कसें? "अब्राक ३ ब्रा" "काबला" वगैरे ज्यूइश लोकांत मंत्रयंत्रशास्त्राचे प्रकार आहेत, तर हें कसें? सदरहु वेदबाह्य मतांत देखील मंत्रशास्त्र आहे, मग त्या भाषा वैकृत आहेत तर मंत्रमय कशा आहेत? दुसरें, महानुभाव भाषा व त्यांचें मंत्रशास्त्र व लिपी कशी आहे? याची माहिती कळविण्यांत यावी.

आपल्या शंकेचें समाधान यथामती लिहितो. मी शूद्र असून बाल्यांध असल्यामुळें माझें ज्ञान बरोबरच असेल असें मला वाटत नाहीं. माझ्या आंधळ्या डोळ्यामुळेंच शूद्रधर्म जी सेवा तीही चांगली घडून येत नाहीं. उलटे दुसऱ्यालाच मला पाणी अन्न द्यावें लागतें. त्यांत माझें शरीर रोगी असल्यामुळें दुसऱ्यांनां माझ्यापासून फारच त्रास होतो अशा स्थितींत माझें ज्ञान कितीसें असणार याचें अनुमान शहाण्यानां करितां येण्यासारखें आहे. तथापि मोठ्यांच्या मागणीचा अनादर होऊं नये ह्मणून मी कांहीं तरी लिहितो.

मंत्र दोन प्रकारचे आहेत. नैगम आणि साबर. द्रव्यदेवताप्रकाशक ते नैगम मंत्र होत असें निरुक्तांत ह्मटलें आहे, आणि केवळ ध्वनीच्या योगानें कार्य करणारे ते साबर मंत्र होत. नैगम मंत्र हे लिंगसामर्थ्यामुळें देवताव्हानप्रधान आहेत, आणि साबर मंत्र ध्वनिप्रधान असल्यामुळें क्षुद्रसिद्धिदायक आहेत. तत्वज्ञानाला मदत करणारे साबर मंत्र होतात असा कोठेंही विधी नाहीं, व असा कोणाचा अनुभवही नाहीं. साबर-मंत्र हे ध्वनिप्रधान असल्यामुळें त्यांची भाषा नियत नाहीं. बहुतेक साबरमंत्र विकृत भाषेंत आपल्याकडील तंत्रांतही आहेत. उदाहरणार्थ :— भूतडामरतंत्र पहा "कालाबिच्छु पदं प्रोक्तं कातर्योला पदं पुन: । क्या कालेति पदं प्रोक्तं क्या कौलेष पदं पुन: ॥ अर्थात् कालाबिच्छु कातर्योला क्या काला क्या कौलेष. अशा प्रकारचा मंत्र भूतडामरांत विंचू उतरण्याविषयींचा आहे. भूतडामराचें नांव नागार्जुनादिकांच्या ग्रंथांत आहे. तेव्हां हें तंत्र त्यां-

---

नंदपुत्र कृष्ण व वसुदेव पुत्र कृष्ण एकच आहेत काय ? यामल तंत्रावरून भिन्न असल्याचा मोहमयवाद निघाला आहे. मोहनिवारणार्थ विनंती केली आहे. आमचा मोह सदरहु बद्दल दूर व्हावा. कृपा करून जिज्ञासूच्या शंकेचें समाधान होईल अशी फार आशा आहे.

आपला.
चरणकृपाभिलाषी.
आपाजी कृष्ण.

च्या ग्रंथाच्या पूर्वीचें आहे यांत संशय नाहीं. अशा वेळसही अर्धहिंदुविकृतशब्द त्यांत मिसळलेले दिसतात. यासंबंधांत प्रसिद्ध महात्मा तुलसिदास असें ह्मणत आहेत:— चौपाई— कलि बिलोकि जगहित हर गिरिजा । साबरमंत्रजाल जिन सिरजा ॥ अनमिल आखर अरथ न जापू । प्रकटप्रभाव महेसप्रतापू ॥१॥ अक्षरांचा नियम, अर्थाचा संबंध व जपाचा नियम नसतांही साबरमंत्राचें फल दृष्टीस पडतें, हा ईश्वराचा प्रताप होय, असें या चौपाईचें तात्पर्य आहे. अरबी वगैरे भाषेंत असे मंत्र आहेत. ते साबरच आहेत. तत्वज्ञानाविषयीं अदृष्टोत्पादक नाहींत तर दृष्ट क्षुद्र फल देणारे आहेत. मंत्रशास्त्र मनुष्याच्या भाषेंत आहे एवढेंच नाहीं तर पक्ष्यांच्या आवाजांत देखील आहे. अरबी व इंग्रजी भाषेंत जे मंत्र आहेत ते मला थोडे माहित आहेत. परंतु द्रव्यदेवताप्रकाशक असा मंत्र त्यांत कोणताही नाहीं. शिवाय साबरमंत्र तरी हिंदुस्थानांतूनच अनेक देशांत गेले आहेत, असें मेरुतंत्रावरून समजतें. कारण "शूद्रादि यवनान्तानां वाममार्गो परःस्मृतः"॥ चांडाल व द्वीपांतरवासी लोकांनीं शाबरमंत्राचा अभ्यास करावा, ब्राह्मणांनीं करूं नये असें त्यांत ह्मटलें आहे. पारशिकतंत्र शिवप्रोक्त आहे, असेंही त्यांत वचन आहे. इतर भाषेंत मंत्रशास्त्र अशाच तऱ्हेनें गेलें आहे, असें माझें मत आहे, आणि ते सर्व साबर आहेत. मेरुतंत्राचें नागार्जुनाच्या तंत्रांत उदाहरण आहे. उपलब्ध झालेल्या वैद्यक ग्रंथांवरून नागार्जुनाचा काल बऱ्याच पूर्वीचा आहे, असें ठरत आहे. कारण पादलिप्ताचार्यबौद्धाकडे यांनीं कांहीं दिवस साबरविद्येचा अभ्यास केला असा इतिहास सांपडतो. बौद्धांच्या महायानपंथांत जी माध्यमिक शाखा आहे, तिजवर नागार्जुनाचा संस्कृत मोठा ग्रंथ आहे. स्पंदप्रदीपिकेंत प्रत्यभिज्ञाचार्य उत्पलदेव यांनीं देखील त्यांची वचनें उद्धृत केलीं आहेत. तेव्हां मेरुतंत्र बरेंच प्राचीन आहे यांत संशय नाहीं. आतां क्षेपकवादच मानावयाचा असल्यास ज्याला जें आवडणार नाहीं त्याला तो क्षेपक ह्मणेल ह्मणून याबद्दल ऊहापोह करण्याला मी असमर्थ आहे. याप्रमाणें सावरमंत्राविषयीं गोष्ट आहे. नैगममंत्र हे द्रव्य देवताप्रकाशक आहेत. ते ज्या तऱ्हेनें ह्मणावयाचे त्याच तऱ्हेनें ह्मटले

पाहिजेत; कारण देवता परोक्षप्रिय आहेत असें वेदान्तवचन आहे. आपले नांव आपाजी आहे. त्याबद्दल कोणी जाणून आप्या ह्मटलें तर आपणास जें वाटेल तेंच मंत्राच्या विकृतीवरून देवतांस वाटतें. एखाद्या लहान मुलानें आप्या ह्मटलें तर आपणास हांसे येईल हें खरें आहे. परंतु मोठ्या मनुष्यानें जें आपाजी ह्मणून आपल्यापासून काम करून घ्यावयाचें तें त्याला मिळावयाचें नाहीं. आतां ईश्वराचें नांव कोणत्याही भाषेंत घेण्यास हरकत नाहीं, हें खरें आहे, परंतु मंत्र ह्मणजे नुसतें नांवरूपच नसतें, तर त्यांत द्रव्याचा प्रकाश केलेला असतो; व विनियोगासी त्याचा संबंध असतो. ह्मणूनच तुकाराम महाराजांच्या अभंगानें लग्न लावणाऱ्यांचें मला मोठें आश्चर्य वाटतें. वास्तविक असें करण्यांत वेदावरही विश्वास ठेवावा लागतो, व तुकाराम महाराजांच्या अभंगावरही विश्वास ठेवावा लागतो. पण असें करणें ह्मणजे आमच्या विश्वासामुळें तुमच्या विश्वासांत कांहीं तथ्य नाहीं असें ह्मणून एखाद्याला धिःकारणेंच आहे, दुसरें त्यांत कांहीं नाहीं; कारण विश्वासपक्षीं दोघेही सारखेच आहेत. आतां ज्याला कर्मवाद मान्य नसेल त्याला विनियोगही मान्य नसावयाचा हें साहजिकच आहे. त्याच्याशीं स्वतंत्रपणें पूर्वपक्ष उत्तरपक्ष करतां येतील; परंतु मी आस्तिक आहे असें आपण पत्रांत लिहिलें आहे, त्या अर्थी आपल्याला कर्मवाद मान्य असलाच पाहिजे. कारण जीव, ईश्वर, कर्म, पुनर्जन्म, सृष्टि, उत्पत्ति, स्थिति, लय, मुक्ति आणि वेदाचें प्रामाण्य इतक्या गोष्टी ज्याला कबूल आहेत त्यालाच हिंदू आस्तिक म्हणतात. मग त्याच्या प्रकारांत कितीही वाद असो, त्याच्या खंडणमंडणाचें हें स्थल नव्हे. कारण तसें केलें तर पत्राच्या ऐवजीं ग्रंथच होईल. कांहीं लोक शास्त्राचें व पुराणाचें प्रामाण्य मानतात. वेदाकडे फारसें लक्ष देत नाहींत, तथापि पुराणेंच वेदाची प्रशंसा करीत असल्यामुळें त्यांचें तें मत परंपरेनें वेदप्रामाण्यमूलकच आहे, असें ह्मणावें लागतें. मानभावांचें मत जरी वेदपुराणाला सोडून आहे असें तादृश दिसतें तरी, उपनिषदांतील कांहीं श्रुतींत व कांहीं पुराणांत त्या मताचें मूळ सांपडतें. बौद्धादिकांची गोष्ट तशी नाहीं. कृष्ण ही पौराणिक देवता मानभाव मानतात, व उपदेश करण्याच्या

पहिल्याच मंत्रांत तिचा उल्लेख आहे, ह्मणून मानभावांचें मत परंपरेनें वेदमूलकच होय. मानभावांची तीन स्थळें व त्यावरील बंध मला येत आहेत हें खरें आहे. तथापि लोकांना उपदेश घेतल्यावांचून कळवूं नये असा त्यांचा निर्बंध असल्यामुळें लोकांपुढें त्या गोष्टी जाहीर करून एका समाजाला आपलें शत्रुत्व पत्करावयास लावण्यास मी तयार नाहीं. म्हणून त्यांची लिपी व शास्त्र मला माहीत आहे, तरी उघडपणें सांगणार नाहीं. पण एवढें मी खास सांगतो कीं, मानभावधर्म कोणाला कितीही संशययुक्त वाटत असला तरी, तो थिऑसफीपेक्षां लाखपट चांगला आहे असें मी म्हणतो. मानभावांच्या लिपी १४ आहेत त्या सर्व मला हातानें लिहून कशा सांगतां येतील ? म्हणून याबद्दल माफी असावी. आतां दोन कृष्णा बद्दल जो यामलयंत्रांत उल्लेख आहे, तसा तो स्कंदपुराणांत व पद्म-पुराणांतही आहे; आणि चैतन्यसंप्रदायांतील लघुभागवतामृतांतही आहे. कृष्ण जरी दोन आहेत तरी त्यांची मूळ मूर्ति एकच आहे. शिवाय प्रत्येक गोपीला जर एक एक कृष्ण रासांत मिळाला होता तर या दोन कृष्णांतच काय आश्चर्य आहे ? जितके उपासक तितकीं रूपें धरणें हें पारमेश्वरशीलच होय. दोन कृष्ण असले तरी ते दोन ईश्वराचीं रूपें आहेत असें कांहीं नाहीं. तेव्हां एका ईश्वरानें कोटी कृष्ण रूपें धरिलीं तरी उपासकांना मोह पडण्याचें कांहीं कारण नाहीं. अशा रिकाम्या मोहानें लाभ कांहींच होत नसून साधारण उपासनेच्या अंतःकरणाला मात्र प्रतिबंध होतो. माझ्याच्यानें झालीं तशीं आपल्या प्रश्नांचीं उत्तरें पाठविलीं आहेत. गोड करून घेणें व स्नेह वृद्धिंगत करणें हें मोठ्यांचें शील असतें, तेव्हां त्याविषयीं कांहीं लिहिणें नको. कळावें.

आपला.

हर्दा, माघ व. १४ शके १८३६ } गुलाबराव गोंडूजी मोहोड
ता० २३।२।१४ } माधानकर हल्लीं मु. हरदा.

## श्री ज्ञानेश्वर माउली.

रा. रा. बाबागर्दे यांस पाठविलेलें पत्र १ लें. (१७)

श्लो० शिखरिणी–नमस्ते आचार्य स्वपदपदवीप्रेमवरद । नमस्ते सर्वात्मन् मुरहर सुरस्वर्गपुरद । नमस्ते यो राति श्रियमभिनतायाघ्यघवते । नमस्तेऽलंदीश स्वजन सुखकर्त्रे भगवते ॥ १ ॥ नमो बाबाजीच्या शुभ विभवदा पादकमला । परब्रह्मीं श्रौतीं तनुमतिरती यत्सुविमला । विनंती कीं मातें प्रभुलिखित तें आज मिळलें । पहातां देवांचें अति मजवरी प्रेम कळलें ॥ २ ॥ स्वबाळातें वाणी जननि जन तैं उत्तम ह्मणे । अभिप्रायें याची स्तुतिपद असें मी गणि मनें । उगा या वांचोनी मज पदभवा गौरव कसा । पदींच्या जूतीचा पदिंच दिसतो उत्तम ठसा ॥ ३ ॥ स्तुती आत्म्याची ही तरि सहज सौख्यीं उभयता । स्तुती देहाची तैं मजसि उमटे फार भयता । तनू आधींची हे जडमलिन निंद्या सदहिता । वरी शूद्राचीया कुळिं उपजली वेदरहिता ॥ ४ ॥ स्वधर्में विप्राची मज चरण-सेवा न घडली । परंतु दुर्दैवें विपरीत कृती मात्र जडली । अशा नीचा मातें निज समजुनी लाड करिता । न हे आश्चर्याचे सरळ सुजनीं प्रेम पुरता ॥ ५ ॥ अभावें नेत्राच्या बहुतकरुनी अन्नसलिला । द्विजा देणें लागे हृदयीं अति हें जाचत मला । वृथा वेदान्ताचें मिष करुनि मी वैभव धरी । अशा माझी कैसी करिल करुणा कोण उदरीं ॥ ६ ॥ असो या शोकातें वदुनि पुढती काय करणें । भवत्पादांभोजा नमुनि बरवें मौन धरणें ॥ व्रजेशप्रेमाचा मधुरतर वाहो हृदिं झरा । अशा आशिर्वादा वदुनि

---

१ शूद्रास २ जूती हा शब्द वैदिक संस्कृतांत आहे म्हणून घातला आहे.

---

रा. रा. बाबागर्दे यांजकडून आलेलें पत्र खालीं घेतलें आहे.

पद– भला जन्म हा तुला लाधला. या चालीवर.

गुलाबराया तुला बघाया इच्छा होती मनीं । होय ती पूर्ण तुझ्या दर्शनीं ॥ धृ० ॥ कीर्ति ऐकुनी मूर्ति देखिली हृदयीं तव म्यां जशी । हुबेहुब दिसली नयना तशी ॥ धन्य माय ती अशो विभूती जन्मे जीच्या कुशीं । विरळा भूवरि रत्नें अशीं ॥ चाल ॥ मम बहुलजन्म-

मजला पावन करा ॥ ७ ॥ परब्रह्मज्ञानें जग निखिल हें बाधित गमे । तथापि प्रारब्धें पुढति विषयीं अंतर रमे । तयातें जिंकाया विषय अर्पावे हरिपदीं । अहंता ही आटे भजन करितां बोलति सुधी ॥ ८ ॥ दिव्या-पासोनियां सम जरि दिवा अन्य उजळे । तरी आधींल्याचे प्रथमपण हें कैंच न गळे ॥ कृपें तेवीं ज्याच्या चितिमति वळे त्या न भजुनी । कृतघ्न ज्ञानी तो भववश सदा चित्समजुनी ॥ ९ ॥ अहो स्वप्नीं मिथ्या जननि अपुली ही जरि दिसे । तदाही सत्पुत्रीं परमपूज्यत्वार्ति उमसे ॥ तसा मिथ्या विश्वीं मधुरमय भेटे गुरुहरी । उपेक्षा तैं त्याची पशुविण दुजा कोणि न करी ॥ १० ॥ कळे संधी तेव्हां सुजनहृदयीं खेळत चिती । उठे वृत्ति तेव्हां विषय अवघे चाल करिती ॥ निराकारीं संधी सगुण-चरणीं वृत्ति जडतां । भवाब्धी आटे हा श्रम बहु निरोधीं न पडता ॥ ११ ॥ जशी स्वप्नीं मिथ्या युवति तरि कामार्ते डुलवी । तसा ज्ञानी रागी तरि मग तया भ्रांति भुलवी ॥ यशोदाबाळाच्या चरणकमळा वांचुनि कदा । अनंतोपायांनीं तुटति न महागर्व विपदा ॥ १२ ॥ हिरण्या जाणे त्या नग बघुनियां तोष उपजे । हिरण्या नेणें तो बघुनि भुलतो पित्तलहि जें ॥ तसा ब्रह्मज्ञानी सगुण भजनें सौख्य मिळवी । विना ज्ञानें ध्यातां जयविजयसा चित्त चळवी ॥ १३ ॥ पिता तूं माता तूं बहिणसुत तूं या शतपदीं । बळें अध्यासाच्या सकळ जन होती नतपदीं ॥ तया आचार्यांचें वचन निवटी त्वं म्हणवुनी । परब्रह्माहंता तदपि मनुजाची नच उणी ॥ १४ ॥ गुरुक्ति त्वं बोधें परमसुख शिष्याप्रति मिळे । तदा त्वं पूज्यत्वें उलट जैं त्याची मति वळे ॥ ऋणातें वाचेच्या तहिं मुकुनि घे भक्ति पदवी । स्वयें वाचे साधु हरि वदुनि आनास वदवी ॥ १५ ॥ गुणाच्या दृष्टीतें जरि निरखितां सांख्यविषयें । तदा माया-

---

कृत पुण्योदय जाहला । त्यामुळेंचि दर्शन हें तव झालें मला ॥ टीप ॥ ज्ञानेश्वर मम तात असा जो दर्शविशी भाषणीं ॥ वाटे सत्याचि मज तो ध्वनी ॥ गुलाबराया० ॥ १ ॥ तात म्हणासि तूं अलंदिनाथा तेवीं जो श्रीपती । मानिसी त्यातें माझा पती ॥ हेंहि वावगें दिसे न मजला पाहतां गोपीमती । जडल्या भगवंतीं ज्या अती ॥ चाल ॥ पडे विसर

बिंबी यदुपति मिळे सत्वनिचयें ॥ स्थिति ज्ञाना सत्वाविण न च असें तात वदले । तदा कैसी भक्ति त्यजतिल समोपाधिमय्ले ॥ १६ ॥ समोपाधी झाले तरि वरपणा ये हरिपदा । शुची सत्वादी तो म्हणुनि भजिती सज्जन सदा । अदंभादी साधू गुण सहज ज्या रीति उरली । तशी ब्रह्मज्ञाच्या मनिं उमटते माधवरती ॥१७॥ असें लाहे बोधा न भजुनि मनीं जो हरहरी । विरागाद्यभ्यासीं षडरिचय त्याची मति हरी ॥ अहंकर्तृत्वें धी भ्रमुनि सुखसंधी न कळवी । हरिप्रेमाकृष्ट प्रतिपद परानंद मिळवी ॥ १८ ॥ परज्ञानें ज्याचे चिदचिदखिल ग्रंथि सुटले । मुनी तेहि प्रेमें व्रजवरचरित्रीं विनटले ॥ कुठें थारेना तो गुरु शुक नृपा भक्ति वदला । उपेक्षूनी देवा किमपि न फिटे वेदवदला ॥ १९ ॥ विदेही साधू तो हरिगुणसुधा अंतरि भरी । अनादी साधूंच्या कृति न कधिही दूषित करी ॥ जना वाटे वेडा परि अधिकृताचा भव हरी ॥ गुरुत्वाच्या इच्छेविण गुरुपणा ज्याप्रति वरी ॥२०॥ विदेही होवोनी बहुत तनु सोंगास करिती । दुराचारालागीं बळकटपणें चित्तिं धरिती ॥ श्रुतीतें नेणोनी विषयफळ जें भोगिति कुडे । यमाजीच्या दंडें मरुनि मग त्यां दुर्गति घडे ॥ २१ ॥ अरागद्वेषत्वें शिशुसम जरी पंडित वसे । यथेच्छा विण्मूत्रादि करण परी त्याप्रति नसे ॥ असें सूत्रीं भाष्यीं म्हणति मुनि आचार्यहि सवें । वृथा चाळे तस्मात् शठ करिति ते उत्तम नव्हे ॥ २२ ॥ पिशाचादी वृत्ती

---

कदाचित स्वामीचा सेवका । अंकुरहि होईल सख्य भक्तिचा सुका ॥ टीप ॥ परि क्षणहि पतिविरह न साहे पतिव्रता कामिनी । नच ही प्रीति व्यभिचारिणी ॥ गुलाबराया० ॥ २ ॥ ग्रंथविमर्शन सज्जनदर्शन छंद हाचि लागला । बहुतां दिवसांपासुनि मला ॥ अक्कलकोट स्वामी प्रमुखी जो जो यति ऐकिला । तो तो साक्षेपें देखिला ॥ चाल ॥ कुणि बसे मुक्यापरि कुण्यातानि बडबडे । कुणि शैशवलीला दावी लोकांपुढें ॥ टीप ॥ अशा विभूती वंद्य होति जरि लोकपापहारणीं ॥ न मिळे मोक्ष तयांपासुनी ॥ गुलाबराया० ॥ ३ ॥ अंध म्हणति मतिमंद तुला जे अंध तेचि तत्वतां । नसती ज्ञानचक्षु ज्यां स्वतां ॥ मुनी जागतो तीत असे जी निशाचि सर्वा भुतां ॥ असें हरि सांगे कुंतीसुता ॥ चाल ॥

न दिसति कुठें वेदगदिता । परी ढोंगी मूर्खा बहुत गमते त्यांत मुदिता । विनाज्ञानाभ्यासें सकल करणीं संसृति फळे । न दंभें कोणाचें करुनि तपही चित्त उजळे ॥ २३ ॥ चमत्कारेच्छूच्या निजमनिं उगा काम उमळे। चमत्कारेच्छूची यवनमुखलाळें तनु मळे ॥ चमत्कारेच्छू तो निगमरहिता धर्म समजे । ह्मणोनी मातें हो रुचति तुमच्या वृत्तिसम जे ॥२४॥ स्वधर्माचारानें हृदयशुचिता जैं प्रगटते । उपास्तीनें तेव्हां सहजचि अचांचल्य घटतें ॥ परब्रह्मज्ञानें निखिलहि अविद्या मळ झडे ॥ मुकुंदाच्या प्रेमें अभिभवहि दैवाप्रति घडे ॥ २५ ॥ समाधीवांचोनी सहज सुख बुद्धाहि न मिळे । हरिप्रेमासक्ता सुखमयचि उत्थानहि फळे ॥ समाधिव्युत्थानें जरि विदितवेद्यास नसती । तरी जीवन्मुक्ती पद निरखितां अंगिं दिसती ॥ २६ ॥ यदृच्छावृत्त्यंशा वचनगत सद्बोध हरितो । चिदाभासत्वानें तदपि मतिविक्षेप उरतो । अहंब्रह्मज्ञानी चरमपद तें चित्तिं धरुनी । चिदाभासाहंता हरिति हरिसेवाचि करुनी ॥ २७ ॥ पितामाताबंधु पतिसुतसुमित्रादि भलते । रमानाथीं नातें जुळवुनि मिळे भक्तिबळ तें ॥ कृतज्ञज्ञात्यांची हरिस भजणें पूर्विल प्रथा । जनातें ताराया स्फुरति ह्मणुनी मापतिकथा ॥ २८ ॥ रसा यावच्छक्ती रचुनि भरिली ही शिखरिणी । तुह्मां प्रीती पावो मधुर रुचि जेवीं शिखरिणीं ॥ तुझ्या चित्तीं बाळे अतितर वसो ईश्वररती । अशा आशिर्वादें मज मिळवुनी द्या व्रजपती ॥२९॥

---

निष्णात असे जो शाब्दि परीं तो गुरू ॥ उद्धवासि ऐसे वदे भक्त सुरतरू ॥ टीप ॥ अशा लक्षणें युक्त दिसे जो त्याच्या पदवंदनीं ॥ व्हावें तत्पर साधकजनीं ॥ गुलाबराया० ॥ ४ ॥ सर्व शास्त्रिं तव विचित्र पाहुनि शिक्षणरहिता गती । गमसी केवळ शंकर यती ॥ प्राकृत कविता तुझी स्मरवि मज खचित अळंदीपती । बापा तवगुण वानूं किती ॥ चाल ॥ बा कृपा असावी तव ह्या दीनावरी । मज करीं नुपेक्षा भक्त अडाणी जरी ॥ टीप ॥ द्यावी मज शेवटची जागा भक्तिसुधाभोजनीं ॥ प्रार्थी कृष्णसूनुवंदुनी ॥ गुलाबराया० ॥ ५ ॥

चरणरज.
बाबा गर्दे.

पदीं पोल्हारांचा रुणझुण असा नाद उठतो । करींच्या चक्रानें हृदयरिपुचा बंध तुटतो ॥ जना ताराया जो अवतरुनि आलंदित वसे । तया स्वामीपाया नमुनि लिखिता अर्पित असे ॥ १० ॥

श्रीमत्सद्गुरूज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु.

---

रा. रा. ता. क. हरीभाऊ केवले यांस विनंती.

देखोनी मजला गुलाबचरणा जें प्रेम वाटे मनीं ॥ तें या गीत मुखें करी प्रकट मी तें दाखवा वाचुनी ॥ त्या ऐकोनि निघे समर्थवदनांतूनी प्रसादोत्तर । जें जें तें हरिभाऊ सर्व कळवा खालील पत्यावर ॥

मित्र बाबागर्दे.

पत्ता— बाबागर्दे यांस C/o Trimbak Khando Garde Homiopathic Practisioner Agra Road Dhentia ( Khandesh Dist. )

I hope to reach Dhentia about the 21st Thursday, 15-1-15

Buldana.

## पत्र १८ वें.

### रा. रा. काशिनाथ धर्माधिकारी यांनां पाठविलेलें पत्र.

श्रीज्ञानराज गुरुच्या पदपंकजातें । मी वंदिते स्मरति हो सदपंकज्याते ॥ पावावयास यदुवल्लभपादचर्या । साष्टांग वंदन तुह्मांसहि विप्रवर्या ॥ १ ॥ आलें सुपत्र तुमचें परि नाठवीलें । यालागिं आजवरि नोत्तर पाठवीलें ॥ माझ्या प्रमादस्तव चुकी घडली समाजी । मी याचिते द्विजवरा करणें क्षमा जी ॥ २ ॥ ही काव्यशक्ति तुमची रुचिरा नवाजी । पाहोनि कोण न ह्मणे शिखि हा नवा जी ॥ जी सूक्तिमाजि भरिते यमकासमान । ती आवडे गिरिवरा चमकासमान ॥ ३ ॥ जो साधुदेव विषयीं नरमाधिकारी । तो काय होईल पदा परमाधिकारी ॥ यालागि सांडुनि भवा रघुराज गावे । नोहे असें तरि उगीं मग कां जगावें ॥४॥ गोविंद माधव अशी सुपदें वदावीं । येणेंचि मोक्षपथ सत्कृपदेव दावी ॥ नामाविणें न कलिकर्तन आन कांहीं ॥ आसक्ति साधनचर्यीं चढवूं नका ही ॥ ५ ॥ जो हंस देहिं फिरतो सकला जनांच्या । त्यालाचि देउनि करीं अपुल्या मनाच्या ॥ नामास ठेवुनि तदा ह्रयसन्निधानें । सोहंस्वरूप करुनी

---

### रा. रा. काशिनाथ धर्माधिकारी यांनीं पाठविलेलें पत्र.

नंदस्यनंदनमनंतमनादिमध्यम् । निर्द्वंद्वमद्भुतमलंकृतगोपवृंदम् ॥
मंदाकिनीसुजलधूतपदारविंदं । वंदे मुकुंदमनघं सुरवृंदवंद्यम् ॥ १ ॥

आर्या.

सन्मानसकमलवना भवनाशक जो हरी विकासविता ।
त्रासविता दुष्टांतें पावो गोपीमुखांस हासविता ॥ २ ॥
विश्व चराचर सुंदर विविध चमत्कारयुक्त तें ज्यानें ।
निर्मुनि इच्छामात्रें भासविलें सच्चिदात्मतेजानें ॥ ३ ॥
त्या प्रभुला नमन असो श्रीकरुणामृतपयोधिला भावें ।
विधिहर सुरवर वांछिति कीं यत्पदरज सदैव लाभावें ॥४॥
श्रीअलकावतिपतिपद भावें भज नित्य परमसुखद मना ।
हेंचि खरें बा भेषज दुर्धरसंसारविषयविषदमना ॥५॥
सद्गुरु गुलाबराया जाया भवभयलया तुह्मां नमन ।

मिळवा निधानें ॥ ६ ॥ हेंही नव्हे परि हरी नयनांत जावा । तैं आधि इंद्रियचर्यीं नयन त्यजावा ॥ तो श्यामसुंदरतनू भजका कृपाळ । भेटे सुदीनसुजना करुणानृपाळ ॥ ७ ॥ कर्में करोनि अति आग्रह तो नसावा । कर्में त्यजोनि न घडो विषयीं विसावा ॥ कर्में समर्पण करोनिच माधवातें । केल्या झडे मळ जसा घनबाध वातें ॥ ८ ॥ शृंगार जो तनुवरी करि चारुगात्री । तो आरशांत दिसतो प्रतिबिंबगात्रीं ॥ बिंबेश्वराप्रति तसा नव मान हो तो । देतांचि जीव यदुनाथसमान होतो ॥ ९ ॥ वैराग्य हें न उपजे जरि इंद्रियातें । सोडी न तों षडरिमुद्गर तंद्रि यांते ॥ यासाठिं दोष विषयीं बरवें पहावें । ठेवोनि चित्त चरणीं हरिच्या रहावें ॥ १० ॥ वैकल्य तें प्रहरणें यतमानसाचें । वैराग्य तैं उपजतें यतमान साचें ॥ अग्रीं दिसे विषय तो हरिच्या पदातें । अर्पोनि संहरी मुनी महदापदातें ॥ ११ ॥ हे ईतुके हरिस भोग समर्पिले हो । हे ईतुके न हृदयांतुनि सर्पले हो ॥ ऐसाचि मानसिं जया सुविवेक होतो । त्याला विराग नव हा व्यतिरेक होतो ॥ १२ ॥ चित्तांत राग परि इंद्रिय नानुकूल । दोघांमधें सगुण मूर्तिच हो दुकूल । एकेंद्रिय

---

युष्मत्पदपूजावें वाटे वाहोनि सुमसमान मन ॥ ६ ॥
सत्संगतिगंगेचें अवगाहन गमतसे महापर्व ।
तनु वाक्काय मनाचे निववी तापत्रय क्षणीं सर्व ॥७॥
मत्पूर्वपुण्ययोगें तुमचें पदकमल लागतां सदना ।
सहजचि मजला लाधे मंगलमयपर्व तें कुमतिकदना ॥८॥
बहु गौरवास्पद गमे मज तुमचे चर्मचक्षुहीनत्व ।
स्पष्टचि सिद्ध करी हो या योगानें पुनर्जननतत्व ॥ ९ ॥
धन्यचि तुमची व्रजपत्तिपदकमलीं प्रेमलक्षणा भक्ती ।
यदमृतमय रसपानें व्रजवनिता तुच्छ मानिती मुक्ती ॥१०॥
श्रीज्ञानेशवरदकर सत्यचि तुमच्या शिरीं सदा विलसे ।
चरित अलौकिक ऐसें याविण कोणी गमेन दाविलसे ॥११॥
अनुभवयुक्तिश्रुतियुत वाणी तुमची अमोघ सन्महित ।
श्रवणीं सादर ऐकुनि साधति निज कितिक सुजन जन्महित ॥१२॥

श्रुति तया ह्मणती विरक्ति । एवं मिळे त्रिकर्मांप्रति पादरक्ति ।। १३ ।। अस्तित्व होय विषया परी भाव नाहीं । मिथ्या ह्मणोनि हृदयीं लव हाव नाहीं ।। त्यातें विराग वशिकार असें ह्मणावें । ज्ञानात्त कृष्णरति सत्फळ हें गणावें ।। १४ ।। योगेंहि जाय जरि चित्त असें लयाला । प्रारब्ध कर्म फिरवी पुढती तयाला ।। श्रीकृष्णभक्तिच बळें त्रिगुणास वारी । वैराग्यही पर मिळे मग या प्रकारीं ।। १५ ।। मागेंचि जे विवरिली अपरा विरक्ति । ती तोडिते त्रिषयिची रसभावशक्ति ।। आणीक बोलिलि पुन्हांहि परा विरक्ति । ती ज्ञान देउनि पुनः उरवीत भक्ति ।। १६ ।। एवंच भक्तितरु भक्तिच बीज याचें । प्रेमोत्थ पक्व फळ भक्तिच योग्य साचें ।। आळंदिपीठपतिनामसुधारसाला । जे सेविती नच तया विपदा विशाला ।।१७।। श्री ज्ञानदेव करुणार्णव नित्य गावा । जावों नये किमपि हो कृतिमिथ्यगावा ।। एवं वसंततिलका करुनी रसाच्या । पूजार्थ अर्पु गुरुपाउलसारसाच्या ।। १८ ।।

---

नश्वर भवजन्यसुखा भुलले जन जे मना न आवरुनी ।
युष्मत्सदुक्ति सहजचि फिरविल त्यातें असत्पथावरुनी ।। १३ ।।
निर्मळ निज वचनामृत पाजा मज पत्ररूप पात्रानें ।
याविण काय करावी इच्छा मजसारख्या अपत्रानें ।। १४ ।।
मजसम मूढां बहु दे संसृतिचें प्रखर आतप त्रास ।
शमवा सत्वर नाथा ठेवुनि शिरि निजकरातपत्रास ।।१५।।
हितकर उपदेशामृत पान सदा मजकडोनि करवा हो ।
दीनदयाळा तुमचा स्वशिरिं हा दीन अभयकर वाहो ।।१६।।
जें कांहीं अधिकोत्तर पत्रीं झाले असें कृपाला हो ।
ठेवा क्षमा तयाची हा जन तुमची सदा कृपा लाहो ।। १७ ।।
विस्तर असो दयाब्धे निज मळमति शुद्धतर करायातें ।
हा काशिनाथ विनवी कीं प्रेमें आप्तजन करा यातें ।। १८ ।।

आपला.

कृपाकांक्षी–काशिनाथ.

श्री ज्ञानेश्वर माउली.

पत्र १९ वें. मु. आकोला फार्म.

बाबागर्दे यानां पाठविलेलें पत्र २ रें.

श्लोक— पृथिवीवृत्त- प्रणम्य जगदीश्वरं हृदयशुद्धिकौधीवरं । अलंदिमणिमद्वयं भवभवाब्धिनौधीवरं ॥ यदीय चरणाश्रितस्सकल किल्बिषैर्मुच्यते । तदीय करुणालवाल्लिखितमेतदत्रोच्यते ॥ १ ॥ पदास मिळवावया विसकुमार बाबाजिच्या । पदाम्बुजनना नमो सुसुकुमार बाबा-जिच्या ॥ सुपत्र तुमचें प्रभो मजसि आज हो पावलें । कवित्व सुरपा-दपा धरणिवृत्त जें फावलें ॥ २ ॥ तुझ्या हृदयिं गोपिवत्प्रभुरती भवद्दो-लणें । जरि स्तव तथापि हा वर ह्मणोनि म्यां डोलणें । परंतु विधिच्या वरें दनुजलेंकुरें मातलीं । तसा न मज गर्व हो अट हि पाहिजे घातली ॥ ३ ॥ विनिंदि मजलाचि जो सहज तुष्ट तों काळ जी । परि स्तवित जो मला बहु तदीय हो काळजी ॥ विनिंदक जना ममावगुण सांपडे नेटुनी । परि स्तवितया भल्या सुगुण दावुं मी कोठुनी ॥ ४ ॥ सुमाय रिझते सुताप्र-तिच घालुनी भूषणें । भवत्कृत सुतस्तवें गुरु तसे तुह्मी तोषणें ॥ गुणीं रसिं विहीन मी ललित मात्र कोंडा वरी । उनाड निज लेंकुरा स्तवुं नयेचि गोडावरी ॥ ५ ॥ असो घडु भवद्वरें हृदय चित्खतारावली । वृथा श्रुति पथाविणा नयनवित्खतारावली ॥ न घालि हरिच्या गळां करुनि नाम हारावली । उगे श्रम तदीय ते पढुनी नामहारावली ॥ ६ ॥ रमापपद आसुवें भिजवि ब्रह्मसारागिरी । अशास मग पाहिजे मनिं कशास कारा-गिरी ॥ जपें न न तपेंहि जो अणुहि गर्विता फावतो । न योग करितां

---

बाबागर्दे यांजकडून मुंबई मुक्कामाहून पत्रोत्तर आलें तें.

श्री हरि गुरुभक्त परायण गुलाबराव महाराज यांचे चरण सेवेसी.

श्लोक पृथिवीवृत्त–प्रसाद तुह्मि धाडिला सदय होवुनी जो मला । प्रवासांत असतांचि तो सुसमयीं मला पावला ॥ गिरामधुर तूमची प्रत्यांतही छंदतो । जया शिखरिणी कवी कषी ह्मणति फारची आवडता ॥१॥ प्रसन्न तुमची गिरा सुरवेदि प्रवाहा परी । कवित्व रचना

---

१ निखिललोकहृद्धीवरं = असें पाठांतर आहे.

कळे भजकपाठिं तो धांवतो ॥ ७ ॥ जसा पवनमंत्र हा उलट हंस सोहं ध्वनी । तसा सम न जीव हा शिवचि होय सोहंध्वनी ॥ अहंपण परंतु तें उभय ठायिंचें ना जिरे । ह्मणोनि यदुवल्लभस्मरण सर्वदां साजिरें ॥ ८ ॥ हरिग्रहण योग्य तें जंव निजात्मसंशोधनीं । मग श्रम उगेचि कां करितसा अहंरोधनीं ॥ खरें तदपि जागणें अधिक नीजणें सांडुनी । न संधित अहं पहा मतिविशेषता मांडुनी ॥ ९ ॥ परंतु चपळा मना किमपि भाव हा ना कळे । तरंग उठतां कसा जलधिथांव साना फळे ॥ मन स्थित ह्मणोनियां करिति योगि ज्या कारणें । सवृत्तिकहि तारितो मधुर नाम हाकारणें ॥ १० ॥ न वृत्ति उठती कशा सलिलबुद्बुदाचे परी । अशाच वदल्या बहु अवधुतादि सद्वैखरी ॥ खरें परि जलालयीं लहरि दो निमित्तीं घटे । शुभा शशिज आदिमा पवनजा दुजी संघटे ॥ ११ ॥ समुद्र पवनें चढे प्रबल जैं तुफानावरी । महाकुशल तेथवां तराणिया नफा नावरी ॥ शशांकजनिता शुभा लहरि सागरीं ऊठती । तदा भय विवर्जिते सहज तारुही सूटती ॥ १२ ॥ अशा हृदयवृत्तिही द्विविध सत्वजा कामजा । शुभा प्रथम दूसऱ्या अशुभ घेति ना सामजा । स्वभावजचि आदिमा ह्मणुनी भक्तियोगीं सुखें । सहाय करिती हरिस्मरण चालतांनां मुखें ॥ १३ ॥ तरंग पवनोत्थ ते पवनरोधनें नासती । तशा विषयवासना पवनरोधनें नासती[1] ॥ हरिस्मरण मात्र हें उभय कार्य सारें करी । हिरण्य परि घेति हे सुजन आर्य झारेकरी ॥१४॥ सकाम करितां श्रम प्रणवमंत्रपारायणीं । तदा न उदयं दया हृदयसिद्धनारायणीं ॥ सुरालय सुरालयीं स्वसुख शेवटीं अल्प ना । ह्मणोनि हरि चिंतिजे त्यजुनि पोटिं संकल्पना ॥ १५ ॥ विराग न नरा बरा जगति राग[2] जेणें घडे । उपासन न मान्य तें चरण[3]-सारसें ऊघडें ॥ रुचेन चितिचातुरी विषय

---

किती सरल जी मनाला हरी ॥ प्रगल्भ उपदेश गर्भित सुनम वाणी असी । करिश्रवण जो रुझे त्वरित भक्ति तन्मानसीं ॥२॥ द्विजावरि बहू दिसे सहज भक्ति जी त्वन्मनीं । दिसे न तसिभूवरी क्वचितही इदानींतनीं ॥ तसा द्विजहि आढळे जगिं न योग्य जो भक्तिला । ह्मणोनि

---

१ न+असती=रहात नाहींत. २ क्रोध. ३ वैदिकाचार. ब्रह्म. अ. ३ पा. ३

वासना तर्पणें । ह्मणोनि तनुमानसा दनुजनाशना अर्पणें ॥ १६ ॥ न वा-गृणविमोचना स्वगुरुरूपशर्वापदा । नमीं शठ तया कशा चुकति बोध-गर्वापदा ॥ न रंग हृदया जया चढत कृष्णसंकीर्तनीं । दिनेशकुमरागृहीं पडत तो महाकर्तनीं ॥ १७ ॥ कुणी यदुप–भक्तितें ह्मणति योग्य कां आयका । परद्विपमधीं हिनें विवश होति हो वायका ॥ मिळेल मग देशही रिपु पडोनियां खालते । अशाऽशुचिकुलोद्भवा समयिं मांसही चालतें ॥ १८ ॥ बहु व्रजपभक्तही ह्मणवितात आह्मामधें । स्वमान मिळवावया त्यजिति सिद्ध सामा मदें ॥ त्यजूनि बहु शास्त्र ते महिवरादि आवेशितो । परंतु शतमूर्ख हे बत उगे द्विजां द्वेषिती ॥ १९ ॥ पराशरज बोलिले भजनयोग ज्या लाभला । द्विषड्गुणधरामराहुनि कुजाति तोही भला ॥ न विप्रसम देवता पुढति वाक्य हें फावलें । ह्मणूनि उभयान्वयें भजन-साम्य हो पावलें ॥ २० ॥ समत्व भजनीं असो विषमता असो भोजनीं । समत्व हरिकूजनीं विषमता क्रतूपूजनीं । अपक्क समदानही विषमकार्यना-द्यर्पणीं ॥ समत्व चितिदर्पणीं विषमता बरी तर्पणीं ॥ २१ ॥ स्वभक्त्य-भिमतिस्तव द्विजविधान नासूं नये । द्विजेंहि परि कर्मठें हरिजनांस हांसूं नये ॥ दरिद्रचि असें कुणा कधिंहि तोंड वासूं नये ॥ अधर्म करुनी गळां स्वजिरज्जु फांसूं नये ॥ २२ ॥ न शूद्र निगमें तरे प्रणवकोटि संकल्पुनी । न विप्रहि तरे वृथा यदुप नाम हें जल्पुनी ॥ पुराण हरिभक्ति दे श्रवण योग्य शूद्रां जनां । स्वभक्तिरसिं मीनता हरिच देत मुग्धा जना ॥ २३ ॥ बळें द्विजचि होउनी निगम जो वृथा सांवडी । विरक्ति न तया

---

न गमे अहो नवल त्यांत कांहीं मला ॥३॥ जिथें सुदृढ बोध ठाव न तिथें असे भक्तिला । असाचि बहुधा जगीं नियम दीसतो दृष्टिला ॥ परंतु तुमच्या प्रभो हृदयिं भक्ति जैशी दिसे । तसा सुदृढ बोध ही नवल जाहलें हें कसें ॥४॥ विराग तव देखुनी मम मनीं तुका आठवे । स्वबोध दिधला तुला मजगमें अळंदीधवें । तुझ्या बघुनि भक्तिला झुरति मत्सरें गोपिका । शिरीं धरिन मी अशा पदभवाचिया पादुका ॥ ५ ॥

चरणरज,

बाबागर्दे.

परी यमचि भक्षितो आवडो ।। स्वकीय अणु सोडुनी परधनार्थ जो धांवतो । वदान्य असला तरी सहज चोरता पावतो ।। २४ ।। गुरुद्विज-पदाम्बुजीं मम अखंड वाढो रती । स्वधर्मपरिपालनीं निजमना जडो आरती । न स्वप्नगत भोग्य ही जननि जेविं पुत्रादिकां । अधर्म न बरा तसा पठितवेदसूत्रादिकां ।। २५ ।। स्वदैववश सन्मुनी बहुतधर्म हो सांडिती । परंतु फळ भोगितां मग न दीनता मांडिती । व्रजेश परबायका हरी ह्मणोनि तद्वायका । बळें हरिती भिल्ल हें चरित भारतीं आयका ।।२६।। पढोनि निगमांतही उगिच धर्म जो वारिता । न पाप चिति मी असें ह्मणुनि त्यास संहारिता ।। श्रुति स्फुट कळे असा असल आततायी तरी । तयास वधितां म्हणे स्मृति न दोष ये अंतरीं ।। २७ ।। स्वजीव जरि ईश्वरा रचित दृष्टिसृष्ट्यन्वयें । तथापि न तदिच्छया भलतिशीच सृष्ट्य-न्वयें ।। स्वयें अबुध होउनी हरिस देत सर्वज्ञता । स्वपाद हणि त्या अशा कवण दे अपूर्वज्ञता ।। २८ ।। कदापि न शके रचूं उलट ईश्वरा जीव हा । वृथाचि मग गर्व कां वचनमात्र निर्भेव हा ।। वडील यदुवल्लभा समजुनी मनीं जो भजे । तयाप्रतिच शोभतें निगम–वित्त नि तोभ जें ।। २९ ।। उपास्ति–सम भक्ति ते ह्मणति तुच्छता वासना । उपा त परि अज्ञ घे रुचत भक्ति निर्वासना ।। उपास्ति निजयत्नजा कृतिसमु-त्थिता भावना । गुणश्रवण ज्या घडे सहज भक्तिनिर्भावना ।। ३० ।। ह्मणे तनु न हे विभू सगुण माधवाची अणू । तयास कळली नसे चिति पढोनि वेदां अणू ।। पुरीततिंत भासते जगनभादि सारे जरी । खसाम्य-विभुता सदा हरिविषीं नव्हे साजिरी ।। ३१ ।। न मध्य न महत्यणू सकल शब्द–लक्ष्या चिती । तथापि सुगमा गमे पदविबोध–पक्षा चिती ।। विरुद्ध न तदा कदा सगुण माधवाची तनू । दिसे कनक–भूषणीं वपु-गुणीं तसा चेतनू ।। ३२ ।। सुवृत्ति असतां तळीं अगुण जो भला आठवी । स्ववृत्ति उठतांक्षणीं सगुण अंतरीं साठवी ।। स्वयें अगुण होउनी सगुण चिंतितो सादरें । तदीय चरणांबुजीं भ्रमर चित्त हा आदरें ।।३३।। तुह्मां विनवितें प्रभो चरण मस्तकीं घेउनी । यथावचनरूप हें पृथिविदान हो देउनी । प्रसन्न करुं इच्छितें वर गुरो मला पाठवा । अखंड अवतार हा मम मनीं वसो आठवा ।। ३४ ।। अळंदिपति सद्गुरु स्मरणदीप जैं

पाजळे । सदा चिति विशेषता कळुनि भास हा पां जळे ॥ विशेष चिति-सौरसें निखिल हारपे दर्प तो । नमोनि शतदां तया लिखित पाउलीं अर्पितो ॥ ३५ ॥

श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु.

---

रा. रा. विठ्ठल रामचंद्र सी. २७ यांनां पाठविलेलें पत्र.

रा. रा. विठ्ठल रामचंद्र, सी. २७, पनालाल टेरेसेस्, ग्रांट रोड, मुंबई, यांस सा. दंडवत वि. वि., आपलें कृपापत्र पावलें. वाचून आनंद झाला. आपण जसा प्रश्न विचारला, अशा प्रकारचे प्रश्न मला अनेक लोकांनीं विचारले आहेत. कांहीं लोक योगाचा अभ्यास करण्याकरितां मजजवळ येऊन, झाला नाहीं ह्मणून निघून ही गेले आहेत. आपला ही प्रश्न त्याच कोटींतला असल्यामुळें यथामती उत्तर लिहितों. रुचेल तर ग्रहण करावें.

मन स्थिर होत नाहीं, एवढ्या सबबीवर राजयोगाचा अभ्यास करावा असें वाटणें साहजिक आहे. परंतु राजयोगांत तरी मन स्थिर स्वतः करावेंच लागतें. आपोआप होत नाहीं. आपल्या सारख्यांचा प्रश्न विचारण्याचा उद्देश असा असतो कीं, जसें कांहीं मन कोणी हातानें दाबून स्थिर करावें. पण तसें होत नसतें. आपल्यालाच तें हळुहळु करावें लागतें. माझ्या आतेच्या मुलाला चिलमेचें व्यसन होतें. म्हणून कोणी सांगितलें कीं तूं तंबाखू खात जा. ह्मणजे तुझी चिलीम सुटून जाईल. तेव्हां त्यानें तंबाखू खाणें सुरू केले. परंतु चिलीम सोडण्याचा कांहीं यत्न केला नाहीं. त्यामुळें एका व्यसनाच्या ऐवजीं त्याला दोन व्यसनें जडलीं. तशीच गोष्ट क्रियेची आहे. मनाचा आपल्या हातानें हळूहळू निरोध केल्यावांचून एखादी शारीरिक क्रिया केल्यानें मनाचा निरोध होतो असें नाहीं. माझा एक स्नेही निंबदेव आहे. त्यानें षट्क्रिया केल्या. जीभ टाळूला लाविली परंतु तो म्हणाला, मला अमृताच्या ऐवजीं टाळूंतून शेंबूडच माझ्या जिभेवर येतो. मनानें सत्रावीचें ध्यान केल्यावांचून अमृतस्राव होत नसतो. कितीही कसरत केली तरी मनाची एकाग्रता स्नायूवर केल्याशिवाय फायदा होत नाहीं असें सँडो स्वतः ह्मणतो.

तेव्हां आपल्या हातानें मनाचा मुळींच निरोध न करितां कोणता तरी उपाय शोधणें हें योगशास्त्रसंमत नाहीं. बरें, ज्याला आपल्या सारखाच प्रश्न करावयाचा आहे. तो ब्रह्मदेवासारखा गुरू असला तरी त्याला अडवू शकेल. गुरूनें प्रथम सांगितलें कीं, बाळा सत्य बोल. म्हणजे तो म्हणेल, माझें सत्यावरच मन बसत नाहीं. सत्याच्या ठिकाणीं मन स्थिर करण्याकरितांच मला एखादा योग सांगा. तेव्हां गुरूंनीं काय करावें बरें ? सत्य तर योगाच्या पहिल्या पायरींत यमांतच आहे. तेव्हां गुरूनें यमाच्या खालीं आणखी कोणता योग आणावा बरें ? एकाबाईनें मला विचारलें होतें कीं, माझें पतीच्या सेवेंत मन बसत नाहीं. तर कांहीं उपाय सांगा. तेव्हां दृढ श्रद्धा ठेव. इतकेंच मला लाचार होऊन सांगावें लागलें. एवढ्यानें तिनें ऐकलें ह्मणून बरें झालें. समजा तिनें ह्मटलें असतें कीं माझी श्रद्धा बसत नाहीं तर यालाच कांहीं उपाय सांगा. तर मी काय केलें असतें बरें ? श्रद्धा कांहीं तुळसीची माळ नव्हे कीं हातानें घेऊन मसकन् तिच्या गळ्यांत टाकली असती ? स्वतः होऊन जो मनाचा निरोध करण्यास तयार नाहीं. केवळ उपायावरच ज्याची भिस्त आहे त्याला योगापासून तरी काय उपयोग होणार ? म्हणूनच अभ्यास आणि वैराग्य या दोघांच्याही योगानें मनाचें ग्रहण[1] करावें, असें भगवंतानें गीतेंत ह्मटलें आहे. जेथें जेथें मन जातें तेथून तेथून त्याला बलानें ओढून आणून आत्म्यावर स्थापन करावें, असेंही भगवंतांनीं सहाव्या अध्यायांत " यतो यतो निश्चरति " या श्लोकांत म्हटलें आहे. तात्पर्य, राजयोगांत देखील मननिरोधाकरितां स्वतःचा प्रयत्न पाहिजेच. ज्याच्या-त्यानें प्रयत्न होत नाहीं, जें केवळ परतंत्र आहे, असें क्षिप्त आणि मूढ चित्त योगास अधिकारी नाहीं. तर ज्याला थोडातरी स्थिरतेचा अनुभव आहे. असें प्रयत्नवान् विक्षिप्त चित्तच योगास अधिकारी आहे. हा योगशास्त्राचा सिद्धान्त होय. माझा उपदेश ऐकण्याकरितां बैस मला बसवतच तर नाहीं. तुम्हीं मला बसविलें पाहिजे. असें कोणी म्हणेल तर त्याला उपदेश तरी कसा करावा ? अशा सर्वशास्त्रविरुद्धांना शिकविणारे

---

१ निरोध करावा.

भगवान् सूर्यनंदनच समर्थ आहेत. या विषयीं एक गोष्ट लिहितों. एका पुरुषाची स्त्री त्याच्याशीं कांहीं बोलत नव्हती. तेव्हां तो खिन्न होऊन घरांतील बायांजवळ त्यानें तिचें गाऱ्हाणें सांगितलें. तेव्हां तिची मोठी जाऊ तिला म्हणाली कां ग ? तूं आपल्या पतीशीं भाषण कां करीत नाहींस ? ती म्हणाली– काय करूं ? मला त्यांच्याजवळ जाण्याचीच भीति वाटते. जाऊ म्हणाली– तर मग तूं दुरून बोलत जा. ती म्हणाली– मला बोलण्याचीच तर लाज वाटते. तेव्हां जाऊ म्हणाली– दुसऱ्याच्या हातून सांगून पाठवीत जा. ती म्हणाली– दुसऱ्याला बाई असें सांगणें मला कसेंसेंच वाटतें. जाऊ म्हणाली– तर मग तूंच खुणेनें त्यांनां कळवीत जा. तेव्हां ही स्त्री म्हणाली– तेंच तर कठीण आहे मोठी जाऊ म्हणाली– तर मग मरूं दे त्यांनां खुशाल. तेव्हां ती म्हणाली– देवाची मर्जी. अशा बिलकूलच प्रयत्नानें खुणाखाणाही न करणाऱ्या मनुष्याच्या मनाचा राजयोग काय हातानें निरोध करील होय ? मनोनिरोधाचा प्रयत्नानें अभ्यास करणें, याचेंच नांव राजयोग आहे. प्राणसंयमन, संधिसाधन, पटलनिरास, त्रिपुटीपरिहार आणि समाधिसंजीवन इत्यादि गोष्टीकरितांच फक्त योगांत गुरूची अपेक्षा आहे. प्रयत्नाकरितां नाहीं. कितीही वेळ पर्यंत प्राणाचा निरोध झाला तरी मनाचा प्रत्याहार शेवटीं प्रयत्नानेंच करावा लागतो. नुसत्या प्राणायामानें मन थोडावेळ मूर्छित होतें. पण इष्टस्थळीं एकाग्र होत नाहीं. असा योगशास्त्राचा सिद्धान्त आहे. आतां मस्तकावर हात ठेवून जर कोणाच्या मनाचा कोणी निरोध करीत असेल तर ती कला मी जाणत नाहीं.–

" नाहीं देवापाशीं मोक्षाचें गाठोळें । आणोनी निराळें द्यावें हातीं ॥ "

असें समर्थ श्री तुकाराम महाराजांनीं म्हटलें असून, गुरूपाशीं ज्ञानाचा गोळा नाहीं कीं जो सगळा आणून देईल. तर गुरू सांगतील तो पंथ शिष्यानें जबरीनें सर केला पाहिजे. कित्येक बुद्धीच्या विश्वासावर गुरूला मानीत नाहींत, त्यांचा देहाभिमान व नामरूप केवढाही विवेक केला तरी सुटत नाहीं, असा अनुभव आहे. जे केवळ गुरुवरच भरंवसा ठेवितात, व प्रयत्न करीत नाहींत ते महंमदाच्या वकिलीनें पापांचें बक्षीस मागणाऱ्या मुसलमानाप्रमाणें होत. त्यांचा आळस कधींच जात

नाहीं. ह्मणून गुरुप्रतीति, शास्त्रप्रतीति, व आत्मानुभव या तिहींच्या साह्यानेंच मनुष्यानें चालावें. शास्त्रप्रत्यय ह्मणजे शास्त्रांत सांगितलेला सामान्य मार्ग. गुरुप्रत्यय ह्मणजे आपल्या अधिकारानुसार शास्त्रांतून गुरूनें आंखून दिलेला मार्ग. आत्मप्रत्यय ह्मणजे प्रयत्नानुसार आलेला निरोधाचा अनुभव, व त्याचा पुन्हां गुरुशास्त्राशीं पडलेला मेळ. अशाच अर्थाची एक स्मृतीही आहे. " स्वयं प्रतीतिः स्वगुरुप्रतीतिः शास्त्रप्रतीतिर्मनसश्चरोधः ।। दिने दिने यस्य भवेत्स योगी सर्वेषु कालेषु सुसंमतोऽभूत ।। मागें लिहिल्याप्रमाणेंच या श्लोकाचा अर्थ आहे. मला सुचलें तसें आपल्या पत्राचें उत्तर लिहिलें. भाषेच्या न्यूनाधिक्याची क्षमा होईल, अशी आशा आहे. पत्र वाचून प्रेमोत्तर लौकर पाठवितील. कळावें.

आपला.

उमरावती.
ता. १५।५।१४

गुलाबराव गुंडोजी मोहोड.
मोकद्दम माधान, हल्लीं मुक्काम उमरावती.

---

वेद. रा. रा. श्रीनिवासशास्त्री हरिदास यांनां पाठविलेलें पत्र.

तीर्थ. अण्णासाहेब यांचे चरणीं सा. न. वि. वि. वेद. नरहरशास्त्री धर्माधिकारी येथें येऊन आपलें मुख्य मुक्काम सांगितल्यामुळें मी हें पत्र पाठवीत आहे. श्रीमहाराजांच्या ह्मणण्याप्रमाणें आतां आपण काय करावें ? असें नरहरीचें व मंडळीचें झालेलें बोलणें त्यानें मला सांगितलें. मला प्रायः आपलाच भरंवसा आहे. मधून मधून थोड्याशा आपल्या जरी बोलाचाली झाल्या असल्या तरी प्रसंगीं एकमेकांपासून कधींही तुटून राहणार नाहीं असें माझें तरी निदान धोरण आहे. आपल्या मनुष्यापुढें प्रसंगीं हार खाण्यांत देखील मला कांहीं वाटत नाहीं. " क्वचिद्दिव्यंशौर्य क्वचिदपि रणे कापुरुषता " या गोष्टी पुरुषाच्या अंगवळणीं असल्यामुळें त्या अर्धांगिच्या आंगीं सहजच असणार. मला धुळींतून बाहेर काढण्याचें काम आपण व मुळेप्रभृती मंडळीनें केलें हें मी कधीं विसरणार नाहीं. आतां माझें गाऱ्हाणें कसें आहे हें थोडेंसे लिहितों ह्मणजे आपणास कामाची दिशा निवडून घेतां येईल. प्रथम लोककल्याण करावयाचें म्हटलें तरी आपल्या स्वार्थाचा अंश त्यांत

असलाच पाहिजे असें माझें मत आहे. तो स्वार्थ ह्मणजे स्वतःची सद्गती मोक्ष इत्यादिक होय. आपल्यास ज्या सिद्धान्ताची जरुर आहे तोच सिद्धान्त आपण लोकांजवळ कळकळीनें सांगू शकतो. केवळ लोकांकडे लक्ष्य देऊन आपला पारलौकिक स्वार्थ आपण धरला नाहीं तर स्वतःच ऐहिक चार्वाकासारखें बनून धार्मिकाच्या नांवाखालीं धर्मावर कुऱ्हाड घालणारे आपणच होत असतों. या विषयींचें हल्लींचें एक उदाहरण लिहितोंः—

सध्यां वेद० काण्हेरेशास्त्री उमरावतीला आले होते. त्यांचेकडे नरहरीनें जाऊन कांहीं शंका विचारल्या. तेव्हां ते म्हणाले, तुम्ही शास्त्री असाल तर या शास्त्रांची किट्किट् करीत बसा. मुमुक्षु असाल तर तुह्मांला योग्य वाटेल तो मार्ग धरून बसा. माझें तर ठरून गेलें आहे कीं, श्रीकृष्णाची भक्ति करावयाची व मला श्री. सयाजीरावांनीं बोलाविलें आहे तेव्हां विलायतेस जावयाचें आहे. हिंदुस्थानचे लोक इंग्लिशाच्या तोंडून जेव्हां कांहीं निघतें तेव्हांच त्याला मान देतात. म्हणून मला तसें करणें भाग आहे. श्रीकृष्णाची भक्ति कां करावयाची तर तिकडे वाईट बायका फार आहेत. तिकडे त्यांनां तीच पटते म्हणून. अहाहा ! काय हा भागवतधर्म ! स्वतः ज्याला श्रीकृष्णभक्तीचा बाण लागला आहे, त्याला अशाप्रकारें श्रीकृष्णभक्ति विकण्याची बुद्धि होणें शक्य आहे काय ? शिवाय उपदेश करणें ह्मणजे आपल्या जवळ असलें नसलें तेवढें सांगून आपण कोरडे ठणठणीत बनणें असा अर्थ नव्हे, तर आपण जितक्या ज्ञानानें तृप्त झालों असूं त्याच्या लेशमात्रज्ञानानें दुसऱ्यानें तितकेंच तृप्त होणें असें करणें होय. अभ्यास नसतां नुसत्या वाचिक ज्ञानाची पहिल्या उपदेशकाप्रमाणेंच गति होते. मी शब्दसामर्थ्यांत नसलों तरी अर्थज प्रक्रिया रचण्यांत आपल्या कृपेनें प्रबळ आहे. आणि हाच माझ्यामधील विशेष आहे. नाथतुकारामादिकांतही शब्दसामर्थ्यापेक्षां हाच विशेष होता ह्मणूनच मला पृथ्वींतील कोणत्याही पंडिताची आपल्या कृपेनें भीति वाटत नाहीं. " अमरा निर्जरा देवा " इत्यादि श्लोक मला पाठ नाहींत. हवे तर ते करून देतां येतील. असो; नरहरीनें पुढें विचारलें, गुलाबरावची व तुमची भेट झाली होती काय ?

ते म्हणाले छे या ! ! ते आले तर मी घरांत बसून राहीन. वादविवादाच्या किटकिटींत कोण पडे. आमचीं धोरणें ठरलेलीं आहेत शिवाय वाटेल त्याचें खाणेंपिणें देशाच्या हिताकरितां आह्मांला चालतें. मराठा-पक्षखंडणावर व जातिपक्षमंडणावर त्यांचा ( गुलाबरावांचा ) एवढा कटाक्ष कां असावा ? असेंही ते एकाजवळ बोलले. तेव्हां हा एकपक्ष माझ्याविरुद्ध कसा आहे तें सहजच यावरून कळेल. आतां या विलायतेंत जाणाऱ्या देशहितपटूंच्या हातून स्वार्थदृष्टीनें काय चुका होत असतात तें मी निश्चित सांगतों. पहिली चूक यांचा विषयरोध मुळींच होत नसतो. आणि मोठ्या लोकांच्या बरोबरींत जाऊन चैनीच अधिक वाढत असतात. बरें, इकडे आल्याबरोबर मग त्या चैनी सुटत नाहींत. पण ही चूक प्रारब्धानुसार क्षम्य मानली तरी दुसरी एक चूक होत असते ती ही कीं, वाटेल तसा वागण्याचा प्रसंग आल्यामुळें वेदाच्या एका भागावर विश्वास व एका भागावर अविश्वास असा मुद्दाम ठेवावा लागतो. उपनिषदांतील " तत्वमसि " वाक्यावर विश्वास तर " शुचिर्भूत्वा श्रुणुयात् " इत्यादि वाक्यांवर अविश्वास ठेवावा लागतो. त्यामुळें वेद पूर्वी ज्ञानमय होता व पुढें कर्माचें बंड त्यांत शिरलें किंवा रानटी लोकांनीं पूर्वी कर्ममय वेद काढून ऋषींनीं ज्ञानकांड घालून त्याची सुधारणा केली अशा प्रकारच्या खुळ्या समजुती परदेशांत जाऊन ज्ञान सांगणाऱ्या सर्व लोकांत रुजून बसतात. व त्यामुळें वेद पौरुषेय आहेत हाच सिद्धान्त दृढ होत असतो. विलायतेंत जाऊन आलेल्यांच्या पुस्तकांमध्यें असें कांहीं ना कांहीं खूळ सांपडावयाचेंच. याविषयीं एक दोन उदाहरणेंही देतों.

स्वामी विवेकानंद आपल्या ईश्वरविषयक कल्पनेचा विकास आणि माया इत्यादि व्याख्यानांत ह्मणतात, पूर्वी रानटी लोक अमुक प्रकारचा ईश्वर आहे असें मानीत होते परंतु पुढें उपनिषदांत एकेश्वरवादाची उत्क्रांती होऊन सर्व ब्रह्म एकच आहे अशी त्यांत सुधारणा झाली. " इंद्रोमायाभिपुरुरूपमीयत " इत्यादि श्रुतीवरून पूर्वी लोक एखाद्या लहानशा भ्रमालाच माया समजत असत. परंतु अखेर शंकराचार्यांच्या वेळेला मायेला व्यवस्थित स्वरूप लोक देऊं लागले. व जशी जगाची

आंतली बाजू ब्रह्म आहे तशी बाहेरची बाजू माया आहे असें निश्चित दिसूं लागलें. " या विवेकानंदाच्या म्हणण्यांत आमच्या वेदाला किती रानटी स्वरूप येत आहे हें सहजच कळेल. स्वामी आपल्या "Reform of the caste " या व्याख्यानांत म्हणतातः– " जातिभेदाच्या मुळाशीं ब्राह्मण आहेत. शंकराचार्यांनीं आपल्या भट्टींतून हा जातिभेद नवीन उपस्थित केला आहे. " असें परक्या लोकाला सांगणें ह्मणजे हिंदुस्थानांतल्या ब्राह्मणांविषयीं गैरसमज करून देणेंच होय असें माझें मत आहे. यद्यपि वर्णसंशयाविषयीं माझे उद्गार आहेत, तथापि जातिभेद हें थोतांड आहे असा बिलकुलच ऐहिकवाद घेण्याला मी तयार नाहीं. माझ्या वर्णसंशयवादाचा असा अभिप्राय आहे कीं, परजातीमध्यें तुकाराममहाराजांसारखा एखादा महात्मा निघाला म्हणजे त्याला नुस्त्या जन्मावरूनच तुच्छ करणें योग्य नव्हे. मंद गुणकर्मांचा जन्मांतरीय जात्यंतरपरिणाम, आणि तीव्र गुणकर्मांचा इहजन्मनि जात्यंतरपरिणाम योगशास्त्रप्रसिद्ध आहे; म्हणून यथेष्टाचरण करण्याकरितां गुणकर्मवादानें जाति आहेत असें म्हणणारा पक्ष लबाड आहे, असें मी स्पष्ट म्हणतो. कारण तेवढें म्हणणाऱ्यांच्या आंगांत तीव्र गुणकर्मे आहेत असें मला दिसत नाहीं. त्याचप्रमाणें खराच तीव्र गुणकर्मवान् महात्मा एखाद्या जातींत असला, म्हणून तेवढ्यावरूनच त्याला तुच्छ समजणें हें मी उत्तम समजत नाहीं. कारण लिंगशरीराला जाती नसल्यामुळें, व बुद्धि लिंगशरीरांतर्गत असल्यामुळें तिच्या सहायानें मनुष्य आपली सुधारणा एका जन्मांत किंवा अनेक जन्मांत करून घेऊं शकतो, असें माझें मत आहे; म्हणजे मंद गुणकर्मरूपानें जन्मजातिवादाचा व तीव्रगुणकर्मरूपानें गुणकर्मवादाचा पारलौकिक उपयोग आहे. अशा प्रकारचा अनेकविध निर्णय सुरतरूमध्यें केलाही आहे. राहिली खाण्यापिण्याची गोष्ट. पण ती अत्यंत व्यर्थ आहे असें माझें मत आहे, कारण ब्रह्मवेत्त्याचें उष्टें खाल्ल्यानेंच ब्रह्म मिळतें असें कांहीं स्पष्ट कोठें म्हटलेलें नाहीं. शिवाय ब्रह्मवेत्ता माझें उष्टें खाल्लें पाहिजे असें जर शिष्याला ह्मणेल तर त्याचे ठिकाणीं राग दिसून येत असल्यामुळें तो ब्रह्मज्ञानी आहे असेंच मी ह्मणणार नाहीं. संन्याशी सर्वगुणसंपन्न आणि ब्रह्मवेत्ता असला

तरी त्याचे हातचें खाण्याची मनाई आहे. तेव्हां सबगोलंकार करणें हा एक प्रकारचा जिभेचा चवना आहे, दुसरें काय ? माझे वर्ण संशयाचे उद्गार तरी परलोकोपयोगी आहेत असें मी आपणास सांगून ठेवतों. शंकराचार्यांनीं जातिभेद नवीन उत्पन्न केला असें ह्मणणारा नीच मनुष्य तर शंकराचार्याला लुच्चा ठरवूं पहात आहे; आणि त्यांच्या वेदान्तज्ञानावर अभयानंदादिकांचे मुके घेणें त्याला बरें वाटतें. हा आरोप मी प्रमाणपुरःसर करीत आहें. स्वामीरामतीर्थ ह्मणतातः—पूर्वी ऋषींनीं स्मृति ह्मणून ठेवल्या असतील पण आतां तुह्मांला काय वाटतें ? सर्वदां ऋषींवरच अवलंबून राहिल्यानें होईल काय ? ह्मणजे स्वामीरामतीर्थांच्या ह्मणण्याप्रमाणें आमचे ऋषी दूरदर्शी नव्हते असेंच ह्मणावें लागतें; परंतु हें निकालस चुकीचें आहे. एखाद्या कार्याकरितां आपद्धर्मानें कोणाचे हातचें खाणेंपिणें जरी झालें तरी प्रायश्चित्त घेऊन पुनः संपद्धर्मांत येतां येतें, असें आमच्या ऋषींनीं पहिलेंच ह्मणून ठेवलें आहे. दुष्काळांत एका सईसाच्या हातची भाकर एका ब्राह्मणानें घेतली पण त्याचें पाणी घेतलें नाहीं, अशी कथा उपनिषदांत आहे. ह्मणून प्रसंगीं योग्य तसें वागून पुनः आपल्या मार्गावर कायम राहणें असा आमचा आर्ष धर्म आहे. प्रसंगही दोन प्रकारचे आहेत. आगंतुक प्रसंग आणि दैवज प्रसंग. कृत, त्रेत, द्वापार, कलि, हे युग दैवज प्रसंग होत; आणि दुष्काळ, म्लेच्छोद्भव, धरणीकंपादिक आगंतुकप्रसंग होत. आगंतुक प्रसंगानें भ्रष्ट झालेला मनुष्य पूर्व धर्मांत प्रायश्चित्तानें येतो. दैवज प्रसंगांत सांपडलेल्या मनुष्याकरितां मात्र परमेश्वर संतांकडून समयनिर्बंध करीत असतो. हेंच माझ्या वागण्याचें व कामाचें धोरण लक्ष्यांत ठेवावें. आगंतुक प्रसंगाप्रमाणें ऋषींला धाब्यावर बसवून नुस्ता नवीन धर्मच जर प्रसिद्ध केला, व सबगोलंकार इत्यादि रूढी त्याच्या कायमच केल्या तर प्रायश्चित्त घेऊन देखील पुनः आपल्या संपद्धर्मांत आलें पाहिजे अशी कोणालाच इच्छा होणार नाहीं. दैवानें स्वातंत्र्य मिळाल्यावर देखील विषय अधिक सुलभ झाल्यामुळें वैदिक प्रायश्चित्ताच्या भानगडींत कोणी न पडून म्लेच्छधर्मानेंच सर्वांनां रहावेंसे वाटेल. Protestant धर्मांत गेलेल्या लोकांचा जाच बंद झाल्यावरही

पुनः ध्यानला सुलभ अशा मूर्तिपूजक धर्मांत कोठें आगम झाला आहे? मुसलमानांच्या त्रासास्तव वेदधर्माला तुच्छ करून सवगोलंकार करणारा जो नानकधर्म त्यामध्यें तरी जाच बंद झाल्यावर शिखलोक आह्मी हिंदु आहोंत असें ह्मणण्याला कोठें तयार आहेत? तात्पर्य, आपद्धर्माला प्रसंगानुसार मुख्य समजून त्यालाच शेवटपर्यंत संपद्धर्म समजल्यानें एकदम एक पंथच निराळा उत्पन्न होऊन तो कायमचा वैदिक धर्माहून निराळा पडतो. दयानंदाचा आर्यसमाज, केशवचंद्राचा प्रार्थनासमाज, विवेकानंदांचा उदारधर्म यांची अशीच स्थिती होत गेली आहे. आपणाला अशा प्रसंगापासून ह्मणजे कलीपासूनही वैदिक धर्मांचे रक्षण करावयाचें आहे; आणि तेवढ्याकरितां आपली मला मदत अपेक्षित आहे. हें ह्मणणें आपणाला "सुरतरु" वाचून पाहीपर्यंत चमत्कारिक वाटेल हें मी जाणून आहे. ह्मणूनच एकवेळ सुरतरू झाला तितकाच माझ्या प्रियमंडळींनीं ऐकावा, व पुढें पुरा झाल्यावर पुरा ऐकावा, व प्रियमंडळीच्या मतांचाही त्यांत सत्कार व्हावा अशी माझी इच्छा आहे. याप्रमाणें सुधारकपक्ष माझा कसा विरोधी आहे हें मी स्पष्ट सांगितलें. देशाचें काम व धर्माचा चिवडा हे सध्यां सुधारक ह्मणविणारांचें काम ठरलेलें आहे. पारलौकिक स्वार्थ साधावयाची इच्छा त्यांच्या मनांत नसल्यामुळेंच हा घोटाळा होत आहे. जवळ जवळ त्यांचा परलोकावर विश्वासच नसतो, व धर्माचा नुस्ता आव असतो असें मी ह्मणावयास चुकत नाहीं. परलोकावर ज्याचा विश्वास आहे असा मनुष्य एकाद्या देखील शास्त्रवाक्याला झुगारून देण्याविषयीं कचरत असतो. आतां दुसरें असें कीं, मी स्वतः ब्राह्मण-पक्षाचा व वैदिक मताचा असल्यामुळें, माझी मराठा जाती माझ्याविरुद्ध आहे हें प्रसिद्धच आहे. तिसरें, जुना ब्राह्मणवर्ग मी नुस्ता शुद्र आहे ह्मणूनच विरुद्ध आहे. याविषयीं येथलें एक उदाहरण देतो:—लाख-पुरींतल्या स्टेशनमास्तरच्या बापानें व सांबशास्त्री डाऊ यानें महाराजांच्या मंडळींतली ब्राह्मणमंडळी महाराजांचें उष्टें खातात अशीच एक गप्प उठ-विली आहे. दर्यापूरचे दाजीशास्त्री पर्वते यांचेकडे मी गेलोंही होतों. निळकंठ धर्माधिकारीही गेला होता. तेव्हां ते ह्मणाले:—यांची विद्या उप-स्थित असल्यामुळें दुसऱ्याला हे लवकर गळ्यांत पाडतात. शेगांवकर

महाराजांसारखे न बोलणारे साधू बरे होत. यावर वसिष्ठ वामदेवादिक जीवन्मुक्त कसे? असें निळकंठानें विचारलें असतां, ते जीवन्मुक्तही नव्हते व साधूही नव्हते असें ते स्पष्ट ह्मणाले. महाराजानां अमरकोशांतला श्लोक आला नाहीं असेंही एका ब्राह्मणाचें मत पडलें. सुंदरपंत नांवाचे दर्यापूरला वकील आहेत. ते ह्मणाले:——वासुदेवानंदाप्रमाणें यांचे चमत्कार व वैराग्य नाहीं; परंतु या चमत्करांविषयीं मला खरोखरच आश्चर्य वाटतें. चमत्काराविषयीं बोलणारे विलक्षण बोलतात. वासुदेवानंदासारख्या वैदिक महात्म्याचे जे चमत्कार त्यांचे शिष्य सांगतात, तेच चमत्कार एखाद्या वेदबाह्य मुसलकंद्या फकिराच्या हातून झालेत असें त्यांचे पुढारी सांगतात. बरें, ते तरी सर्वांनां सर्वच घडतात असें नाहीं. अल्पशा चमत्कारावरच जर विश्वास ठेवावयाचा असेल तर माझेही कांहीं लोक चमत्कार सांगतात. सर्वत्र सर्वदा त्यांचेही घडत नाहींत व सर्वत्र सर्वदा माझेही घडत नाहींत. आतां चमत्कार तुच्छ आहेत असें माझें म्हणणें नाहीं, परंतु आमच्या गुरूंतच चमत्कार आहेत, तुमच्या गुरूंत कांहीं नाहीं, असें नुसत्या चमत्काराच्या दृष्टीनें ह्मणण्याचा कोणाला अधिकार नाहीं असें माझें म्हणणें आहे. मुसलमानांनां देखील रोगाकरितां हिंदूंच्या देवाची मन्नत करावी लागत नाहीं, तुर्बतवरच त्यांचें भागतें; पण आम्ही मात्र वाटेल त्या महाराजांच्या— खाटीक, वरठी इत्यादिकांच्या नादीं लागतों. आमच्या घरांतला शालिग्राम मात्र कांहीं चमत्कार दाखवीत नाहीं, तर धन्य आहे कीं नाहीं आमची ? प्रसंगीं चमत्कार मोठ्या साधूंचे घडत असतील तर प्रसंगीं माझेही घडतात व प्रसंगीं तुमचेही घडतात. स्वामी वासुदेवानंदांविषयीं पत्रांतील माझे उद्गार पुज्यबुद्धीचे असून, स्वामींचे व त्यांचे शिष्यांचे मजविषयींचे असे कुत्सित उद्गार कां असावे हें मला समजत नाहीं. स्वामी वासुदेवानंदांचे शिष्य मला मान देत नाहींत ही मोठीशी गोष्ट नाहीं, पण शिर्डीकरांनां मात्र मान देतात, आणि बकरा खाणाऱ्या ताजुद्दिनालाही मान देतात. असनारे आदि पटवर्धनांच्या शिष्यांचीही गोष्ट अशीच आहे. अंतामध्यें रागद्वेष असून वैदिक धर्माची कळकळ नसेल तर नुसतें दूध पिऊन राहणारा असला तरी Dyspepsia करितांच पितो

असें ह्मटलें पाहिजे. दुसरें काय ? तात्पर्य जुना ब्राह्मणपक्ष अशा रीतीनें माझा उत्कर्ष सहन नसल्यामुळें विरुद्ध आहे. पुन: एकत्र जेवणारा व वाटेल तसें आचरण करणारा वारकरी पक्षही माझ्या विरुद्धच आहे, व यामुळें इलिचपूरला माझ्या वर्गणीलाही अडथळा झाला. कित्येकांनीं माझ्या ज्ञानेश्वरी सांगण्याला चांगलें ह्मटलें असतां, "गुलाबरावाला चांगलें म्हणून आपल्या गुरूला व आपल्या पंथाला वाईट ह्मणतोस कीं काय ? त्यांची निंदाच करणें चांगलें असें ह्मटलें." मराठाप्रकरणांत, वेडरप्रकरणांत, आणि अवीरप्रकरणांत पैसे घेऊन भलताच न्याय दिल्याबद्दल शंकराचार्यांनां मी उघडपणें दोष दिल्यामुळें, त्यांनींही देवासमध्यें व इंदोरमध्यें माझ्याविरुद्ध उद्गार काढले होते हें बापूरावच्या सांगण्यावरून समजतें. साधारणत: मूर्ख असलेला समाज तर माझें भाषणच समजूं शकत नाहीं. इतकी प्रतिकूल परिस्थिति असूनही मी धैर्यानें धर्मकाम करीत आहें, हें कोणालाही नाकबूल करतां येणार नाहीं. आतां इतके जरी आपल्याविरोधी आहेत तरी, या सर्वांनां आंतून धर्मविश्वासाचें बळ नाहीं हें मी निश्चयानें सांगून ठेवतों. वासुदेवानंदस्वामींनां धर्माचें बळ आंतून असेल, पण त्याचा आतां कांहीं उपयोग नाहीं. माझ्याच्यानें होतें त्या धर्मकामाकरितां आपल्या साह्याची याचना करीत आहे, आणि तें काम इतक्या प्रकारांनीं होऊं शकेल:— कोणाचें नांव न घेतां हिंदुधर्माला भलत्याच रीतीनें वळण देणाऱ्यावर सप्रमाण टीका करणें, माझें वर्तन जों पर्यंत ठीक आहे तों पर्यंत माझ्याविरुद्ध कोणी बोलल्यास त्याचा तेथेंच प्रतीकार करणें, माझीं मतें योग्य आहेत याचा चांगला निदिध्यास करून ती लोकांनां सांगणें, आणि त्याप्रमाणें आपल्याच्यानें होईल तेवढ्या पारलौकिक अभ्यासाचा नियम करणें, आपद्धर्म सांभाळण्याविषयीं माझीं मतें कोणतीं आहेत हें समजून घेऊन तसें सांभाळणें. पण या सर्वांत पारलौकिक धर्मावर विश्वास मात्र दृढ ठेवला पाहिजे, आणि मुख्य भगवद्भक्तीची स्थापना मधुराद्वैतानुसारें करणें, आणि माझें प्रासंगिक धोरण न समजल्यास मला निर्भिडपणें पण एकांतांत विचारून ठरल्यास करणें. धर्ममुख्यान्वयी अशीं सर्व कामें होतात. त्याचप्रमाणें ग्रंथ छापून काढून प्रसिद्ध करणें, हातानें न होईल तर तोंडाचें करणें.

याप्रमाणें जे माझ्याहून लहान आहेत त्यांनीं मला मुख्य समजून म्हणा, व माझ्याहून जे वडील आहेत त्यांनीं आपल्या पुत्राच्या कृतीला अनुमोदन दिलें पाहिजे असें समजून म्हणा, मला साह्य करावें अशी याचना करितो. नरहरीचें म्हणणें असें होतें कीं, अन्यत्र अध्ययन करून आम्ही आपलें कांहींतरी कार्य करावें अशी आमची इच्छा आहे. तर शाब्दिक अध्ययन कोठेंही करावें याविषयीं माझें कांहीं म्हणणें नाहीं, पण मला साह्य करणाऱ्यांनीं आर्षसिद्धान्त मजजवळूनच समजून घ्यावा, अशी मी त्यांनां विनंती करतो; कारण ईश्वर व जीव दोन्ही प्राणाचें धारण करणारे असल्यामुळें कोणता अंश ईश्वर व कोणता अंश जीव धारण करितो, इत्यादि आर्षसिद्धान्तावर न्यायघटित भाषेनें प्रकाश पडला नाहीं. आतां हे सिद्धांत माझ्यावांचून कोणाला कळतच नाहींत असें मात्र मी म्हणत नाहीं. ते कोठूनही घेतले तरी समानच समजून घेतल्या जात असल्यामुळें, त्याविषयीं विवाद नाहीं. तात्पर्य अशा अनेक रीतीनें आपल्याला काम करावयाचें आहे. यश देणें ताताकडे आहे. म्हणून त्यांनां नमस्कार करून हा लेख आपले चरणीं सादर करितो. कळावें.

आपला.

गुलाब.

श्री ज्ञानेश्वर माउली.

उमरावती.

पत्र २२ ९।१।१४

## रा. रा. विष्णु नारायण भातखंडे यानां पाठविलेले पत्र.

वि० वि० आपलें पत्र पोहचलें. आपण लक्ष्यसंगीताविषयीं माहिती देऊं शकत नाहीं असें जें म्हटलें आहे, ते काय त्याचा आपल्यास शोध लागला नाहीं म्हणून, किंवा त्याची आपणास माहिती द्यावयाची नाहीं म्हणून. पहिल्यापक्षीं त्याचा कोठें पत्ता लागेल ते स्थान तरी सांगावे, म्हणजे मी आपला फार आभारी होईन. दुसऱ्यापक्षीं आपण इतिहासाचे चाहते असून आपल्याच हातानें इतिहासाचा लोप केल्या-

सारखे होणार नाहीं काय ? शिवाय लक्ष्यसंगीतावर माझे कांहीं प्रश्न आहेत ते त्या पंडितालाच विचारावे असा माझा हेतू आहे. आपली पद्धती मी दोन तीन वेळ वाचली आहे, व पुनः आता वाचीत आहे. पत्रांत आपण अंधश्रद्धा सोडली पाहिजे असें म्हटलें आहे ते मला मान्य आहे; पण जशा आपल्या इकडे श्रुति मोजण्याची अडचण आहे, तशाच तिकडे ( Vibrations ) नाद कल्लोळ मोजण्याचीही अडचण भासत चालली आहे. जयदेवानीं आपल्या मणिप्रकाशिकेंत " कदंबगोलकन्यायेन शब्दोत्पत्त्यंगिकारेपि नियतगुरुस्थानमपेक्षत एव । अन्यथा अनियत कंपनात् विषमनादोत्पत्तिः । नच संख्यानियत्यैव तन्नैयत्यं षड्जादिस्थान भ्रंश संभवात् इति चिंत्यम् " या शंकेचा खुलासा आपल्या इकडील ग्रंथांत फारसा झालेला दिसत नाहीं. तसा तो पाश्चात्य ग्रंथांतून तरी व्हावा ह्मणून पुष्कळ पुस्तकें वाचली. मणिप्रकाशिका ग्रंथ आपण पाहिलाच असेल; कारण आपण पुष्कळशा पुस्तकांचा शोध केला आहे असें पद्धतीवरून दिसते. मणिप्रकाशिकेचे सध्या शब्दप्रकरणच मजजवळ आहे. त्याची आणखी प्रकरणें आपणास ठाऊक आहेत काय ? पाश्चात्य नाद कल्लोळा ( Vibrations ) संबंधी Scientific American मध्यें आलेले Tindall टिंडालचे उद्गार मला स्मरतात. त्यांत तो ह्मणतो Photo वगैरेवरून जरी आपल्याला (Vibrations) कल्लोळ मोजतां येतात असें आज वाटत असले, तरी ही बाब दिवसानुदिवस कठिण होत जात आहे. कारण ( Atomic

---

मलबार हिल.
ता. ६।  ।१४.

रा. रा. गुलाबराव यांस.

सा. न. वि. वि. आपलें रजिस्टर्ड पत्र पावले. लक्ष्यसंगीताविषयीं मला अधिक माहिती देतां येत नाहीं, म्हणून दिलगीर आहे. तत्संबंधी कारणें देण्याघेण्याची फारशी आवश्यकता आहे, असें वाटत नाहीं. कारण त्यापासून समाजाचे हिताहित होण्याचा संभव नाहीं. आपण वर्णिलेला ( मणिप्रकाशिका ) जयदेवाचा ग्रंथ मी पाहिलेला नाहीं.

theory ) अणूपपत्तिमध्यें अणू केवढा असावा हा नियम ठरलेला नाहीं. रासायनिक मिश्रण ( Chemical Mixture ) करतांनां पहिले भाग तीन असले तर त्याचा एक जीव होऊन एका भागाची जागा सुटून दोन भागाचीच जागा व्यापतो, म्हणून परमाणूंचा आकार नियत पाहिजे, असें आपल्या बुद्धीस वाटते. पण केवढाही लहान आकार घेतला तरी त्याचे तुकडे झालेच पाहिजेत, हा जो मनांत संशय येतो त्याला उत्तर Atomic theory मध्यें सांपडत नाहीं. पुनः अणूचा आकार नियत मानला तर घनत्वाचा (Density) प्रश्न येऊन पडतो; कारण परमाणु अधिक जवळ येणें एवढें जर घनत्वाचें लक्षण केलें तर जितके परमाणु एका पदार्थांत अधिक असतील तितके त्याचे गुरुत्व अधिक असा सहजच नियम निघतो; पण तसें मानलें तर Hydrogen च्या अपेक्षेनें Oxygen च्या एका परमाणूचे वजन १६ पट कसे ? या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लागत नाहीं. बरें पदार्थाला स्वतंत्र वजन आहे असें मानलें तर मोठ्या पदार्थानें लहान पदार्थास ओढणें हा गुरुत्वाकर्षणाचा नियम बराच ढिला पडतो, व त्यामुळें Matter आणि force हे दोन पदार्थ गृहीत धरले म्हणजे पुढें आम्हास श्रद्धा ठेवण्याचे काम पडतच नाहीं, असा बाणा बाळगणाऱ्या आम्हाला खालीं मान घालणें भाग पडते. कारण या गुरुत्वनियमाच्या घोटाळ्यावरून कांहीं नियमावर देखील आम्हाला श्रद्धाच ठेवावी लागते. ही अणूपपत्तीची गोष्ट झाली. आतां वैद्युदुपपत्ति Electron theory कडे पाहिले तर त्याच्या योगानें प्रकाशाचा प्रश्न

---

नादशास्त्रावर देशी व पाश्चिमात्य ग्रंथ आपण बरेच वाचले आहेत, व Chemistry व Physics शास्त्रांच्या आधारानें आपण निरनिराळ्या पंडितांशीं चर्चा करून समाधान न झाल्यामुळें निराश झाला आहां हें ऐकून फारसे नवल वाटलें नाहीं. मी स्वतः त्या शास्त्रांत निपुण नसल्यामुळें त्या दिशेनें पद्धतींत चर्चा करण्याचे मी सोडून दिले आहे. त्या विषयांवर एखादा सुबोध निबंध लिहून आपण मजकडे पाठविल्यास पद्धतीच्या पुढच्या भागांत आपल्या नावानें दाखल करण्यास मला हरकत दिसत नाहीं. एक Appendix रूपानें घालतां येईल. पद्धतींत

जरी सुटल्यासारखा वाटत आहे, तरी त्याची कठिणता तितकीची तितकीच कायम आहे; कारण Electrons हे सर्व पदार्थांत सजातीय आहेत. त्याचप्रमाणें कंपन होण्याला विरलपणा आवश्यक आहे, घनपणांत ते होत नाहीं. जितका घनपणा अधिक तितके कंपन कमी. पुनः कंपन म्हणजे एका परमाणूचे दुसऱ्या परमाणूस धक्का देणें होय. शून्य जागेंत कांहीं कंपन होत नाहीं. म्हणूनच नुस्त्या आकाशांतून (Space) प्रकाश किंवा कांहीं जाऊं शकत नाहीं असें आपण म्हणतो; आणि याचमुळें प्रकाशासाठीं आपण इथरचे कंपन मानतो. पण एका परमाणूनें दुसऱ्या परमाणूस धक्का देतानां मधल्या Space मधून ते कंपन जातें असें म्हणता येत नाहीं काय ? तसें मानलें तर इथर All pervading कसें ? बरें सर्व इथरचे परमाणू एक होतात असें म्हटलें तर त्यांत कंपन संभवणार कसें ? इथरच्या विभागांचा जर नियत आकार मानला नाहीं तर नादाचे किंवा प्रकाशाचे अमुक इतकेच Vibrations होतात हा नियम कसा

---

फक्त आज हिंदुस्थानी संगीत राग कसें आहेत ते माझ्या शिक्षणाप्रमाणें व अनुभवाप्रमाणें मी लिहिण्याचे योजिलें आहे. जे संस्कृत ग्रंथ मला मिळवितां आले त्यांचे रागावर उजेड पाडणारे भाग मी देत आहे. तेणें करून ते ग्रंथ निराळें छापण्याची जरूर राहणार नाहीं, असें मला वाटून तसें केलें आहे. जर पद्धतीचा उपयोग झाला तर करावा, परंतु आपलें अध्ययन जर तिच्या फार पुढें असलें तर तिकडे लक्ष देण्याची गरज नाहीं. हल्लींच्या उपलब्ध संस्कृत ग्रंथांत आपल्या प्रत्यक्ष संगीताला उपयोगी असा कोणता ग्रंथ आपल्या वाचण्यांत आला तेही मला कळविल्यास मी तो मिळविण्याचा प्रयत्न करीन. रत्नाकराचा अभ्यास आपण केला असल्यास त्यांतील रागासंबंधी कांहीं माहिती मला आपण लिहून पाठविल्यास तीही मी आदरानें स्वीकारीन. आपले प्राचीन ग्रंथ जितके समंजस, सुबोध व प्रत्यक्ष उपयोगी होतील तितके ते करण्याकडे माझा सारा प्रयत्न राहील हे निराळे लिहित नाहीं. नुसते प्राचीन वैभवाचे गुणानुवादांत आतां आपल्या समाजाला कौतुक वाटणार नाहीं असें आपलेंही मत असेलच. हा काल असा आहे कीं, ज्याला जें व जितकें

घालतां येईल. Tindall च्या दोन चार वाक्यांचा भावार्थ मला विस्तृत करून सांगता आला तसा लिहिला आहे. आपल्या इकडे परमाणूला नियत आकार न मानल्यास सर्षप मेरूची तुल्यतापत्ति होते असें न्याय-शास्त्रांत म्हटलें आहे; आणि शेवटीं पौर्वात्य नैय्यायिकांनीं किंवा पाश्चात्य Scientists लोकांनीं कितीही विचार केला तरीही बाब अधिकाधिक भद्धेचीच होत गेली असें मला वाटते. बरें वाद्यांच्या षड्जादिकांचे Vibrations नियमित लिहून ठेवले आहेत खरे, पण तेवढ्यानें वाद्यांतील ऋषभाला जर आपण षड्ज कल्पिला तर त्याचेही तितकेंच Vibrations होतील कीं काय ? तसें झाल्यास ध्वनिभेद दृष्टीस कां पडतो; आणि तसा ध्वनिभेद दिसण्यांत कांहीं नुकसान नाहीं असें मानलें तर, ही आपत्ति प्रकाशावरही येणार नाहीं काय ? तेव्हां आपल्या कडच्या श्रुति मोजण्याची जी अडचण पडते तशीच कांहीं अंशीं पाश्चात्य पद्धतींतही पडते असें मला वाटते, ह्मणजे मणिप्रकाशिकेंतील शंकेचा खुलासा तिक-

---

ज्ञान उपयोगी झालें असेल ते त्यानें प्रामाणिकपणें लिहून ठेवावें. मला वाटतें या संगीतासारख्या प्रत्यक्षोपयोगी विषयांत एकमेकाशीं शुष्कचर्चा करण्यांत विशेषतः अर्थ दिसत नाहीं. Time, space, Ether, Atomic theory, physiology, psychology, Electricity यांच्या theories वाचून समजून त्यांचा प्रत्यक्ष उपयोग आपल्या संस्कृत ग्रंथांच्या वाक्यांनीं उत्तम करून दाखविणारे समाजांत मोठा मान पावतील, हें कोणीही म्हणेल; पण तसें लोक आपले येथें अजून उत्पन्न होऊं लागले नाहींत, असा माझा समज आहे.

आपण आपल्या २२ श्रुति कायम केल्या असल्यास त्या कोणत्या ग्रंथांच्या आधारानें करूं शकला, व त्यांच्या योगानें कोणत्या प्राचीन ग्रंथांत रागांची स्वरूपें समंजस झाली अशी माहिती मला पद्धतींत दाखल करण्यास उपयोगी होईल. पद्धतींत ज्या ग्रंथाचे उतारे मी केले आहेत त्याहून निराळे ग्रंथ जे आपण मिळवून वाचले असतील त्यांची नांवेंही मला कळविल्यास मी आभार मानीन. पद्धतींत Vibrations संबंधीं कांहीं ह्मटलें आहे; याचे कारण इतकेंच आहे कीं, आजकाल

डेही चांगला होत नाहीं. रागानें पाळणा हालणें वगैरे कविकल्पना आहे असें आपण पद्धतींत म्हटलें आहे ते मलाही मान्य आहे, परंतु Theosophycal मासिक पुस्तकांत गाण्यानें आग लागल्याची उदाहरणें दिली आहेत ती खरी मानावी कीं नाहीं ? शिवाय गाण्यानें व वाद्यध्वनिश्रवणानें रोग दूर होतात अशा प्रकारचा तिकडील डॉक्टरचा शोध आहे; व जर्मनींत क्षय न होण्याचें कारण गायनवादनाचा विशेष प्रचार हें आहे असें दिले आहे. याविषयीं बालबोध नांवाच्या मासिक पुस्तकांत नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. आपल्या मारुतसंहितेंतही गाण्यानें रोग दूर करण्याचा विधी सांगितला आहे. तो ग्रंथ आपण पाहिला असेलच. त्यांत व यांत कांहीं साम्य आहे काय ? ते अन्यथा असेल काय ? मार्गी संगीतांत अदृष्टजनक समयमहत्व मानीत होते, पण ते देशी संगीतांतही मानले पाहिजे, त्याला Physiologically किंवा मानसशास्त्रीय Psychologically पुरावा मिळूं शकतो, असें J. Bose यांच्या कांहीं प्रयोगा-

---

पाश्चिमात्य लोकांचे कांहीं सिद्धान्त आपल्या संस्कृत ग्रंथावर लादण्याचे प्रयत्न करण्यांत आलेले मला दिसले, ते सिद्धान्त वाईट आहेत, अथवा आजच्या आपल्या हिंदुस्थानी रागांना २२ श्रुति लावून दाखविणें अगदीं गर्हणीय आहे, असें ह्मणण्याचा पद्धतीचा हेतू नाहीं; तसें सिद्धान्त संस्कृत ग्रंथावर उगीच लादूं नये, व नवीन योजनेला नवीन म्हणण्यास हरकत नाहीं, इतकेंच सुचविलें आहे. रत्नाकराच्या २२ श्रुति आंदोलनासहित लोकांपुढें मांडावयाच्या, व त्यांच्या मदतीनें रागरूप तेथल्या लक्षणांनीं एकही सोडविण्याचें पत्करावयाचें नाहीं हें स्तुत्य कसें ह्मणतां येईल ? इतकेंच पद्धतींत सुचविलें आहे. हें आपण पाहिलेंच असेल.

माझी विनंती आपणास इतकीच आहे कीं, मोठाल्या गहन विषयांत मला व्यर्थ प्रश्न वगैरे न विचारतां तसल्या बाबतीवर आपले स्वतःचे विचार आपण स्वतंत्र जाहिर केल्यास, अथवा ते जाहीर करण्यास मला परवानगी दिल्यास आपण संगीताची योग्य सेवा केल्यासारखें होईल. सर्व शास्त्रें मला अवगत आहेत, असा दावा माझा मुळींच नाहीं, हें मी ह्मटलेंच आहे. " औमापत्य " या नांवाचा ग्रंथ मी पाहि-

वरून ठरूं शकत नाहीं काय ? आपणही पद्धतींत समयमहत्त्व मानलें आहे. आपल्या लेखांतील मनाचा मोकळेपणा पाहून स्वराच्या या अडचणीसंबंधांत खुलासा करण्याविषयीं विनंती करीत आहे. पत्रांत माझे उद्गार असळ कडक झाले असल्यास त्याची मी क्षमा मागतो. कारण पुष्कळ पंडितानां मी हे प्रश्न विचारलें, व त्यानीं माझ्या प्रश्नाची उडवाउडवीच केली. तसें आपण करणार नाहीं अशी आशा आहे. कारण आपणाला सुशिक्षितांची आवडी आहे. माझ्या आणखी पुष्कळ शंका आहेत. कांहीं रागमिश्रणें कशी करावी याबद्दलही आहेत, व कांहीं रागाच्या रंजकत्वाविषयीं Psychologically किंवा Physiologically पुरावा कोणता, व तो केवळ Material आहे किंवा Immateral Psychologically आहे याविषयीं आहेत; परंतु घाईनें पत्र लिहिल्यामुळें व मी आंधळा असून मजजवळ चांगला इंग्रजी लेखक कोणी नसल्यामुळें इंग्रजीचे मराठी भाषांतर लेखकाला सांगतानां त्रास बराच पडला, आणि पत्राचा विस्तार बराच झाल्यास आपला अमोल वेळही घेतला जाईल, असें वाटून पत्र एवढेच पुरे केले आहे. औमापत्य ग्रंथ कोठें मिळतो ? आपणास ठाऊक आहे काय ? कृपाकरून उत्तर लवकर पाठविल्यास उपकार होतील. कळावे.

आपला.

**गुलाबराव गुंडोजी मोहोड.**

**मुकद्दम माधान हल्लीं मु. उमरावती.**

*P. S.* रत्नाकराच्या ग्राम मूर्छनेविषयीं बऱ्याच शंका आहेत. त्यांचा अजून खुलासा झाला नाहीं. पद्धतींत आपणाला एका पंडितानें

---

लेला नाहीं. रत्नाकराच्या ग्राममूर्छनावर Mr. Clements I. C. S. यानीं इंग्रजींत ग्रंथ लिहिला आहे. तो आपण एकदां पाहून जावें. तेथें त्या विद्वान गृहस्थानीं ग्राम मूर्छना जाति वगैरे रत्नाकरगत विषयांचा स्वमत्यनुसार विचार केला आहे. तत्संबंधी शंका उत्पन्न झाल्यास त्याचे कट्टे अनुयायी रा. ब. देवल (पुणें) यांच्याशीं पत्रव्यवहार करावा. त्याच प्रमाणें इंदूरचे प्रसिद्ध डॉक्टर प्रभाकर रामकृष्ण भांडारकर L. M. S.

पुष्कळ द्रव्य मागितलें होते असें लिहिले आहे, तर त्यांचे नांव कळवाल काय ? कारण वर्गणी करून तितकी रक्कम जमवून देऊन तो खुलासा करून घेण्याची माझी इच्छा आहे. कळावे.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

## पत्र २३

रा० रा० खापरे यांस साष्टांग प्रणिपात विनंती वि० मला येथें दिनकर गोखले भेटून त्याच्या व माझ्या ज्या एकंदर गोष्टी झाल्या त्यांवरून तेथील मंडळीच्या मनांत माझ्याविषयीं ५ गोष्टी घोळत असाव्या असें मी अनुमान करून हें पत्र लिहीत आहे. हें माझें अनुमान चुकलें असल्यास दोष माझा आहे, दिनकरचा नाहीं.

पहिला मुद्दा असा कीं, माझ्यामध्यें चमत्कार नाहींत. दुसरा मुद्दा, मंडळीच्या महत्वाकांक्षा माझें थोडें ज्ञान बाहेर पडेल ह्मणून मी मारून टाकतों. तिसरा मुद्दा माझ्या सर्व युक्ती जुन्या पुस्तकांतीलच असतात. चवथा मुद्दा मला आपल्या युक्तीचा अभिमान असून दुसऱ्याच्या युक्ती वजनदार असल्यास मी चिरडतो, ह्मणूनच मंडळीच्या आलेल्या पत्रांतील प्रयत्नवादावर मी तांशेरा झाडला. पांचवा मुद्दा वादीशीं प्रसंग आला ह्मणजे तोंड फिरवून पळून जातो. या माझ्या विकारानें काढलेल्या अनुमानांतील पांच गोष्टीसंबंधीं मी कांहीं लिहितो.

---

यांनीं भरताचे संगीत सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्याशीं मला विचारलेल्या शंकांवर चर्चा आपण केल्यास आपणास जरूर फायदा होईल. Physics व Chemistry हे त्यांचे खास विषय आहेत. माझा प्रयत्न निराळ्या दिशेनें आहे हें दिसेलच. आपणास या विषयाची चांगली अभिरुची आहे, व सार्वजनिक हित करण्याची इच्छा असेलच. अधिकोत्तर नाहीं.

आपला.

**वि. ना. भातखंडे.**

*P. S.* उत्तर लिहिण्याचे चुकून राहिल्याबद्दल क्षमा असावी.

पहिल्या मुद्यासंबंधांत मला सांगावयाचें तें इतकेंच कीं, चमत्कार ज्याचा त्याला स्वतंत्र वाटत असतो, आणि ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणें स्वतंत्र होतहि असतो. कोणाचा चमत्कार चव्हाट्यावर आला असें कधींच झालें नाहीं. गोकुळांतलें दावाग्निपान काळयवनाचे भीतीनें पळणाऱ्याच्या ठिकाणीं संभवनीयच नाहीं असे माझ्या इष्टदेवतेविषयीं देखील तर्क होऊं शकतात तेव्हां माझी कथा काय ? जवळ नऊ लक्ष गोपाळ होते, तेव्हां एकेक गोपाळाला एक एक कृष्णाचा वेश देऊन वाममार्गि शिवशक्तिप्रमाणें गाढवीगोंधळाचेच नांव रासक्रीडा दुसरें काय ? या प्रश्नाला मी, माझा बाप, माझा आजा, प्रत्यक्ष व्यास असले तरी काय उत्तर देणार ? रावण मारणें शूराचें काम तर वाळीला पाठीमागून मारणें गांडूचें काम नव्हे काय ? वसिष्ठानें ब्रह्मज्ञान सांगतांनां जर खरें वैराग्य झालें होतें तर बायकोचें नांव घेऊनच वनांत झाडें आलिंगण्याचें कारण काय ? ते ऋषी होते, त्यांनां उद्धरायचेंच होते तर मायेचें नांव घेऊन झाडें आलिंगायाला काय झाले होतें ? लोकांच्या म्हणण्यावर बायको वनांत पाठविल्यावर मग तिच्या संबंधीं रडून गोंधळ करण्याचें कारण काय ? बायकोच्या पातिव्रत्याचा मोठा निश्चयच होता तर लोकांच्या म्हणण्यावरून वनांत पाठविण्याचें कारण काय ? नारदांनीं एक बायको मागितली तेव्हां त्याला बायको करून लागलाच प्रत्यय दाखविला, पण दुसऱ्याच्या हजारो बायका स्वतः व गड्यासुद्धां मिळून भ्रष्ट केल्या तेव्हां प्रत्यय कसा दिसला नाहीं. ? शंकराचार्य शंकराचाच अवतार होते तर, दुसऱ्याच्या शरीरांत शिरूनच मैथुनाचा अनुभव घेऊन कामशास्त्राची परीक्षा देण्याची काय जरूर होती ? पूर्व शंकरदेहांतील उमासंयोगाचा अनुभव नव्हता वाटते ? शंकरानें शरभ होऊन नृसिंहाला मारलें तेव्हां यांचा परस्पर प्रेम कसा ? व प्रसंगीं मांगासारखे कठोर कसे झाले ? व्यासाच्या प्रारब्धानें जर व्यासाला गाढव व्हावें लागलें अशीं कथा काशीखंडांत आहे, तर आमच्या सर्वांच्या नशीवानें त्यांच्या तोंडांतून चुकीचें ज्ञान निघालें नसेल कशावरून ? आठा वर्षांच्या नंदाच्या पोराला काम उत्पन्न होणें असंभवनीय नाहीं, कारण दूध वाजीकरणामध्यें श्रेष्ठ असून, बालाला व वृद्धाला देखील काम उत्पन्न करणें हें

वाजीकरणाचें लक्षण चरकादिकांनीं सांगितलें आहे. दूध तर त्याची माय यशोदा विळांतून सात वेळ पाजीत होती. धर्म स्थापण्याकरितां व देवांच्या कार्याकरितांच जर अवतार होता, तर मुद्दाम इंद्राची पूजा कशाला मोडली ? मग काय म्हणे गोवर्द्धन उचलला. पण पूर्वीच त्या पर्वताखालीं Spring लावून ठेवली नसेल कशावरून ? सर्वांमध्यें जर गोपिकाच प्रेमळ होत्या, तर मथुरेला निघून कां गेल्या नाहींत ? लग्नाच्या राहूं द्याच पण कात्यायनी व्रत करणाऱ्या कुमारींनीं तरी जावयाचें होतें. पुढें दुसऱ्या पतीशीं जर त्या व्यभिचारिणी कुमारींचें लग्न लागलें असेल, तर परमार्थानंतर हा संसार कसा शोभला ? अन्न दिलें नाहीं म्हणून यज्ञ करणारे ब्राह्मण वाऱ्यां गेले, आणि त्यांच्या बायका पूज्य झाल्या अशा प्रकारच्या गोष्टी भोंदू साधूंनां बायका शिष्यिणी मिळविण्यास मदत करीत असतात. ही जर सर्वच लीला तर मग एखाद्या व्यभिचारी पुरुषाची लीला कां नाहीं ? वेदान्तानें मंडन तर कुत्र्याच्या मैथुनाचेंहि करतां येईल, मग रासक्रीडेंत विशेष काय ? अशा प्रकारचे कोट्यावधि तर्क असून त्यांत न्यायदृष्टीचा हेत्वाभास नाहीं. पण यांतील एकाहि तर्काचें उत्तर मजजवळ नाहीं. माझें उत्तर येवढेंच आहे कीं, अझून मला स्वप्नांत स्त्रीसंयोग होऊन धातुपात होत असतो. तेव्हां जेथें आमच्या इष्ट देवतेची अशी स्थिति, तेथें आह्मां अनुयायांची स्थिति काय पहावया-ची आहे ? बरें गोपिका तरी किति भोळ्या ? काय ह्मणे डोळ्यांत खडा गेला, आणि न काढतांनां कृष्णानें मुका घेतल्याबरोबर डोळ्यांची आग नाहींशी झाली, आणि नीतीचा पुतळा तुकारामबोवा त्यांचें वर्णन करतो. साराच खुळ्यांचा बाजार पण या बाजारांतीलच मीहि एक खुळा आहे. तेव्हां तसे चाळे माझ्यांत कांहीं असल्यास आश्चर्य नाहीं. कारण माझी माय व्यभिचारिणी असली तरी, ती सतीच होती असें मला घेऊन चाललें पाहिजे, नाहींतर पुढें अनंताचें लग्नच होणें कठीण आहे, पण मी चमत्कार सांगून कोणाला पैसे मागितले नाहींत, मागत नाहीं, व मागणार नाहीं. हें पहिल्या मुद्याचें उत्तर झालें.

दुसऱ्या मुद्याचें उत्तर लिहितों:— संस्कृताकरितां मी श्रीअण्णासा-हेबांनां गुरू केलें हें सर्वांनां माहितच आहे. आपल्या घरचें काम कोणी

करतो ह्मटल्यास त्याला मी नको ह्मटलें असेल असें मला जन्मांत आठवत नाहीं. प्राज्ञ विशारद शास्त्री परीक्षेला बसण्याला मी कोणाला मनाई केली नाहीं. मंडळीच्या शिकून येण्यानेंच जर माझें ज्ञान बाहेर पडत असेल, तर तें पाडण्याला आजच पुष्कळ जण तयार आहेत. कारण मंडळीपक्षां अधिक ज्ञान पुष्कळांनांच असलें पाहिजे असें ह्मणावें लागेल. ह्मणून मला भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. पण खरी गोष्ट अशी आहे कीं, माझें काम ह्मणून करण्याकरितां मला विचारल्यास मी माझ्या मनाच्या हजारों वेडेपणामुळें कांकूं करतो, व प्रवृत्ति निवृत्ति कांहीं करीत नाहीं. माझें काम नसेल तर कोठेंहि जाण्याकरितां मला विचारण्याची गरजच नाहीं. हें दुसऱ्या मुद्याचें उत्तर झालें.

तिसऱ्या मुद्याचें उत्तरः— या मुद्यासंबंधीं येवढेंच सांगावयाचें कीं, असें ह्मणणाऱ्यानें ते दाखवून दिल्यास मजवर मोठे उपकार होतील. युक्तिसाम्य तर कॉंटचे व शंकराचार्यांचेंहि मिळतें. सॉक्रेटिसपासून तुकाराम महाराज शांति शिकले असतील तर माझ्या सर्व युक्ति जुन्या पुस्तकांतील असतील. नव्या युक्ती कोणत्या व जुन्या पुस्तकांतील माझ्या युक्ती कोणत्या ह्याची निवड माझ्या ग्रंथांतून करणें मला शक्य आहे असें मला वाटतें. पुन्हां जुन्या युक्ती देखील जे तत्व सिद्ध करण्याकरितां मी लावल्या आहेत, त्याच युक्ती जुन्या ग्रंथकारांनीं लावल्या आहेत काय ? मी रसाची अभिव्यक्ति वृत्तिसंधिस्थानीय मानत असल्यामुळें अनध्यस्तविवर्त व ज्ञानोत्तरभक्ति मानणें मला सोपें जात आहे. वृत्तिस्थ रस मानणाऱ्या उज्वलनीलमणिकारादि भक्तांनां व साहित्यदर्पणकारादि पंडितांनां आणि स्वप्रेश्वरादि भाष्यकारांनां माझें अनध्यस्तविवर्त तत्वच मानतां आलें असतें हें मला कोणी सिद्ध करून दाखवितील तर बरें होईल. आतां, रस मात्र मी जुन्या ग्रंथांतून घेतला आहे खरा. किंबहुना जुन्या ग्रंथांतीलच सिद्धान्त मला मान्य आहे. आगमनिर्णयांत शब्दाच्या अर्थाचे नवीन नियम काढून ठेवून कांहीं जुनेहि घेतले आहेत. ते नव्या युक्ती कोणत्या व जुन्या युक्ती कोणत्या हें दाखविण्याला स्पष्ट उदाहरणच आहे. जेथें जुन्या युक्ती आहेत तेथें माझी योजना नवी आहे, व जेथें नव्या आहेत तेथें अवयवनिचय नवा आहे. अनुभव जुना असून

जेथें जुन्या ग्रंथांत त्याला शब्द नाहीं तेथें परिभाषा नवी आहे. प्राचीन शास्त्रकारांनींहि कांहीं यापेक्षां नवीन केलें असेल असें मला माहित नाहीं. शंकराचार्यांनीं देखील ब्रह्मसूत्रावरील भाष्य, सूतसंहितेचें नुसतें वृत्तबंधन तोडून प्रत्येक सूत्राचे ठिकाणीं जसेच्या तशाच अक्षरांनीं गद्य घेतलें आहे, हें मी पुराणवाक्यावरून व आपल्या परिशीलनावरून सिद्ध करून देण्यास तयार आहे; अत्यंत नवीन तत्वज्ञानाची संवय सेनेका वगैरे स्टोइक्स लोकांस आहे, आह्मां हिंदूंस नाहीं. " त एव पदविन्यासास्ता-एवार्थविभूतयः । तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् " या श्लोकाप्रमाणेंच माझी ही कांहींतरी माकडचेष्टा आहे झालें. कोणाला पसंत नसल्यास ग्रंथ विकत घेऊन वाचण्यांत आपला वेळ दवडूं नये.

चवथा मुद्दाः— यासंबंधीं कांहींहि लिहिलें तरी बाजू सांभाळली, अशा समजुतींतच त्याचें पर्यवसान होण्याचा संभव आहे. तथापि त्या पत्रांत हेत्वाभास होते असें मी उत्तरांत लिहिलें आहे. ज्या युक्ती पत्रांत लिहिल्या होत्या, त्या युक्तींची चर्चा माझेजवळ स्वत: आपली होऊन गेली आहे, हें समजून मी थोडीशी भाषा उत्तरांत कडक वापरली होती. एखाद्या गोष्टीवर लिहितांनां किंवा शंका काढतांनां पूर्वोपलब्धपरिहार नांवाचा दोष उत्पन्न होत असतो. तो होऊं नये एवढेंच मला उत्तरांत दाखवावयाचें होतें. पूर्वोपलब्धपरिहार ह्मणजे पुन्हां पहिल्या ठिकाणीं येणें. याचें स्पष्टीकरण असें कीं, कल्पना करा एक लोकायत आहे. त्यानें, प्रत्यक्षच प्रमाण आहे इतर प्रमाणें नाहींत, असें ह्मटलें असतां, त्याला अलोकायतानें असा प्रश्न केला कीं, स्वप्रत्यक्ष प्रमाण आहे असें तूं ह्मणतोस कीं, सर्वांचें प्रत्यक्ष प्रमाण आहे असें तूं ह्मणतोस? पहिल्या पक्षीं तुझें बोलणेंच आह्मांस ऐकूं येत नाहीं असें आह्मी ह्मणतो. प्रत्युत्तर देतां ह्मणून माझें बोलणें तुह्मांला ऐकूं येतें असें ह्मणशील तर हेतुसाध्यादि अवयवास्तव हें अनुमान आहे, प्रत्यक्ष नव्हे. दुसऱ्या पक्षीं तर अनुमान स्पष्टच आहे. या अलोकायताच्या बोलण्यांत लोकायत आस्तिक झाला, व कांहीं दिवस चांगलें आचरण करूं लागला. नंतर त्यानें काढली प्रयत्नवादावर शंका कीं, सर्वच कांहीं प्रयत्नानें मिळत नाहीं, ह्मणून मनुष्य परतंत्र आहे. अत्यंत परतंत्र ह्मणजे जडाचा मनुष्य

तयार होणें, मग आत्मा कशाचा ? या युक्तीनें पुन्हां तो लोकायत पहिल्याच ठिकाणीं येतो. मग त्याला ह्मणावें लागतें कीं, अरे तूं प्रत्यक्षवादी जर आहेस, तर दुसऱ्याला तरी अनुमानानें कसा अडवितोस ? या बोलण्यानें पुन्हां तो आस्तिक होतो. मग एकदोन वर्षांनीं काढतो कृष्ण चरित्रावर शंका कीं, ईश्वरालाहि जर असे चाळे सुचतात, तर ऋण काढून सण करावा, मेल्यावर कोण कोणाचें, या लोकांतच जें कांहीं आहे तें आहे. ईश्वर मानून देखील या शंकेनें तो पुन्हां पहिल्याच ठिकाणीं येतो. मग अकृताभ्यागम कृतप्रणाश इत्यादि दोष दाखविणाऱ्या जुन्या युक्तीनें पुन्हां तो आस्तिक होतो. मग दहा पांच वर्षांनीं काढतो रामाच्या वनवासावर शंका कीं, ईश्वरालाहि कर्मभोग चुकला नाहीं, तेव्हां सर्व पारतंत्र्यच भरलें आहे. जडांत आणि चैतन्यांत कांहीं विशेषसा फरक नाहीं. या शंकेनें तो पुन्हां पहिल्याच ठिकाणीं येतो, आणि शंका काढतांनां पूर्वीच्या युक्तीची आठवणहि ठेवीत नाहीं. त्रिकाराच्या भरांत येऊन विचार करणाऱ्या सर्वांच्या भाषणांत हा दोष उत्पन्न होत असतो. ह्मणूनच योगशास्त्रांत चित्तनिरोधानंतर विवेकख्यातीचें महत्व वर्णिलें आहे. आपण लोकायत नव्हतां हें मला पक्कें ठाऊक आहे. आपलें माझ्या जवळचें पत्र हारपलें आहे. तेव्हां आपल्याजवळ तें कायम असल्यास पुन्हां पाठवावें, ह्मणजे त्यांत पूर्वोपलब्धपरिहार नांवाचा दोष कसा झाला आहे हें मी शब्दाशब्दावर लिहून पाठवीन. पत्रांत माझ्या पूर्व युक्तीचें खंडणहि केलें नव्हतें. हा एक दोष जुनाच असून त्याला मी नवीन नांव दिलें आहे. हा एक दोष दुसऱ्याच्या ह्मणण्यांतील काढतां न आला ह्मणजे खंडणमंडनाचे एकावर एक न्यायामृत, अद्वैतसिद्धि, तरंगिणी, शतदूषणी, ब्रह्मानंदी, सहस्रदूषणी आदि द्वेषजनक ग्रंथावर ग्रंथ होत जातात. पारतंत्र्याचें आणि स्वातंत्र्याचें मूळ तर असें आहे कीं, वृत्ति जेव्हां सत्ताविषयिणी असते, तेव्हां सामान्यचेतनस्थ अविद्येमुळें परतंत्र होते, व प्रारब्धादि पारतंत्र्यसामग्रीला उत्पन्न करिते. जेव्हां ती चितिविषयिणी असते, तेव्हां विशेष चैतन्यामुळें अविद्येच्या विक्षेपांशनाशानें स्वतंत्र होते; आणि प्रयत्नादि स्वातंत्र्यसामग्रीला उत्पन्न करिते. जेव्हां ती आनंदविषयिणी असते तेव्हां तिला दोहींचेंहि खरें फळ मिळतें.

आतां प्रवृत्तिमार्गांत सत्ताविषय बलवान झाल्यास, चितिविषयाची मदत कशी घ्यावी हें समजून घेण्याचेंच नांव शिक्षण आहे. सच्चिदानंद वस्तुतः एक आहे तरी वृत्तिभेदानें ते पृथक भासतात, या पंचपादिकाकाराच्या ह्मणण्यावरून मी ही दैवीपौरुषाची नवी मीमांसा सांगितली आहे. स्थल-संकोचास्तव इच्या विषयींच्या संपूर्ण युक्ती लिहितां येत नाहींत. अशाच रीतीनें कोण्या पुस्तकांत ही सिद्ध केली असल्यास दाखविल्यानें उपकार होतील. समजा इच्यावर जर कोणास शंका काढावयाची असेल, तर प्रथम ब्रह्माचें सच्चिदानंदस्वरूप वृत्तींत भासत नाहीं असें कबूल केलें पाहिजे. नंतर वेदान्त कांहींतरी सांगतो असें कबूल केलें पाहिजे. परंतु असें मानणाराला आह्मी ही युक्तीच सांगत नाहीं. कारण तो पहिल्याच ठिकाणीं ह्मणजे पूर्वोपलब्धपरिहारांत सांपडतो. तेव्हां शंका करितांनां इतक्या गोष्टी मला मान्य आहेत, व इतक्या नाहींत हें प्रतिज्ञेशीं विरोध येऊं न देतांनां प्रतिज्ञापूर्वक आरंभीं सांगावें लागतें; आणि अशीच सर्व प्राचीन पद्धति आहे. नाहींतर निर्णयाच्या ऐवजीं " जिव्हायास्छेदनं नास्ति न तालुपतनाद्भयम् । निर्विशेषेण वक्तव्यं वाचालः को न पंडितः " अशी स्थिति होते. अशापुढें " तयाची फजिती करूं आम्ही " " तोंवरी तोंवरी माळामुद्रांचें भूषण । जों तुकयाचें दर्शन झालें नाहीं " असा ज्ञानाचा अभिमान बाळगणाऱ्या समर्थांनींही हात टेकले आहेत, मग आमची कथा काय ? तो अभंग येणेंप्रमाणें :— पांखड्यानें पाठी पुरविला धुमाळा । तेथें मी विठ्ठला काय बोलों ॥ १ ॥ कांद्याचा खाणार चोजवी कस्तुरी । आपण भिकारी अर्थ नेणें ॥ २ ॥ न कळे तें मज पुसती छळुनी । लागतां चरणीं न सोडिती ॥ ३ ॥ तुझ्या पायांविण दुजे नेणें कांहीं । तूंचि सर्वाठायीं एक मज ॥ ४ ॥ तुका म्हणे खीळ पडो त्यांच्या तोंडा । किती बोलों भांडा वादकांशीं ॥ ५ ॥

शेवटीं त्यांनां देखील " तुका म्हणे तुम्ही करा घटापटा । नका जाऊं वाटा आमुचीया " असें म्हणणें भाग पडलें. त्यांच्यापेक्षां मी अधिक शहाणा आहे असें मला वाटलें नाहीं, वाटत नाहीं व वाटूंहि देणार नाहीं.

अनभ्यस्तविवर्त आम्ही मान्य करूं, पण ऐतिह्यप्रमाण मानणार

नाहीं, असें ह्मणणाऱ्याला कृष्णमूर्तीची आह्मी अनध्यस्तविवर्तता सिद्ध करतो, पण ऐतिह्यप्रमाण ज्याला मान्य नाहीं, त्याला कृष्णच मान्य नाहीं; तेव्हां त्याची सर्व अवतारांवरच शंका होणार, व त्यामुळें ईश्वराच्या साकारतेवर शंका होणार, व त्यामुळें मूर्तिपूजेवर शंका येणार, म्हणून हा पूर्वोपलब्धपरिहारच होतो. याशिवाय मी दुसरें काय उत्तर देणार ? कोणी म्हणेल आम्ही इतक्या शंका करतो, आणि इतक्या शंका येत असल्या तरी करीत नाहीं, तर त्याला मी इतक्या प्रश्नाचीं उत्तरें देतो व इतक्या प्रश्नाचीं उत्तरें सुशी आहे नाहीं देत असें ह्मटलें असतां कोठें सुकलें ? सुर्का चा मुद्दा मननात्मक असून तो बाधकयुक्तिअभिमानीयांनां अपुरा आहे. प्रकाश्य श्रुतार्थसाधक युक्तीच्या संग्रहाचेंच नांव मनन आहे. वृत्तिलोप कांहीं करतां येत नाहीं, सर्व शब्द अनियतार्थ नाहींत ह्मणून; व त्यामुळें मतभेद असला तरी कोणालाहि कोणत्या शब्दाचा अर्थ फिरवितांच येत नाहीं, हा एक नवीन नियम मी आपल्या आगमनिर्णयांत शब्दाच्या अर्थाविषयीं घालून ठेविला आहे. हा जुन्या पुस्तकांत दाखवून द्यावा, किंवा खंडन तरी करावा अशी माझी इच्छा आहे. याप्रमाणें चवथ्या मुद्याचें उत्तर दिलें.

आतां पांचव्या मुद्याचें उत्तर देतों:—मला संस्कृत भाषा ह्मणजे कौमुदी येत नाहीं, म्हणजे पाठ नाहीं; यामुळें व पंडितांनां धातु विचारण्याची संवय असल्यामुळें मी पळून जातो. जें मला येत नाहीं तें मी स्पष्ट कबूलहि करतों. तत्वनिर्णय करतां येत नाहीं या भीतीनें पळून जात नाहीं. आतां कोणी म्हणेल मग तुमच्या शब्दाचे अर्थ बरोबर असतात हें आम्हीं कशावरून समजावें ? तर त्याला माझें उत्तर असें आहे कीं, वाचस्पत्यादि कोश व शब्दकौस्तुभादि ग्रंथ समोर ठेवून जो शब्दाचा अर्थ वादीला मान्य होईल तोच अर्थ घेऊन मी स्वभाषेंत बोलण्याला तयार असतो. ज्याप्रमाणें फुकट धातूंच्या कथ्याकुटीला मी भितो, त्याप्रमाणें शुष्क तर्कालाहि भितों. न्यायांत प्रमाण व तर्क हे दोन निराळे सांगितले असून अनिष्टापादन हें तर्काचें लक्षण आहे, व त्याला भ्रमज्ञानांत घातलें आहे. वाद जल्प वितंडा या तीन कथा शास्त्रामध्यें प्रसिद्ध असून, त्या तिहींतून

कोणतीहि उपपादनाच्या उपयोगी आहे असे "वादजल्पवितण्डानामन्यतमां कथामाश्रित्य उपपादनीयम्" या अद्वैतसिद्धींतील वचनावरून सिद्ध होतें. स्वपक्षाच्या व परपक्षाच्या निर्णयासाठीं जें भाषण तो वाद. आपलाच पक्ष सिद्ध करण्यासाठीं जें भाषण तो जल्प, आणि परपक्षाच्या खण्डणाकरितां जें भाषण ती वितण्डा. या तीनहि कथा प्रमाणाच्या आश्रित असून तर्काच्या साह्यानें एकापेक्षां एक दुर्बल आहेत. तथापि या वितण्डेंत देखील मतनांशानें साधक तर्काचाच समावेश होतो, बाधक तर्काचा नाहीं. प्रमाणरहित तर्काला अतिवाद म्हणून नांव दिलें आहे. "छलजात्यादिभिर्जयात् स महापातकी भवेत्" असें सूतसंहितेचें वचन असून "अतिवादी नव्हे शुद्ध या बीजाचा । ओळखा जातीचा अधम तो ॥ १ ॥ वेदश्रुती नाहीं ग्रंथ ज्या प्रमाण । श्रेष्ठाचें वचन न मानी जो ॥ २ ॥ तुका म्हणे मद्यपानाचें मिष्टान्न । तैसा तो दुर्जन शिवो नये ॥ ३ ॥" असें तुकाराम महाराजांचें वचन आहे. आतां अतिवादक म्हणजे काय याचें थोडक्यांत स्पष्टीकरण करतो. अधिक तर्क करण्याला अतिवाद म्हणतात. जी गोष्ट थोडक्या तर्कांनीं सिद्ध करावयाची व सरळ सिद्ध करावयाची तिला वाचालयुक्तीचें स्वरूप देणें. जसें मूर्तिपूजा कां करावी ? सिद्धांती—आमच्या बुद्धीला आलंबन पाहिजे म्हणून. अतिवादी—त्या मूर्तीच्या व्यक्तींत ईश्वर आहे कीं जातींत ईश्वर आहे हो ? प्रथम पक्षीं ईश्वर परिच्छिन्न झालाच पाहिजे, आणि द्वितीय पक्षीं व्यक्तिभेद विच्छिन्न झाला पाहिजे. इत्यादि एक नाहीं कोटिशः अतिवाद आहेत. त्यांनांहि मी भितो.

मला जें कांहीं माझ्या संबंधाचें लिहावयाचें होतें तें मी या पत्रांत लिहिलें आहे. माझ्या मनांत जसा द्वेष आहे, तसा आपल्या व मंडळींच्या मनांत नसल्यास इष्टदेवताशंकात्मक हें पत्र लिहून मी प्रमाद केला आहे. तें पाप दूर करण्याचें सामर्थ्य आपण मला उत्तररामचरित शिकविलें असल्यामुळें, माझ्या भावनेप्रमाणें आपल्या ठिकाणीं आहे असें समजून मी नमस्कार करितों.

आपला

गुरुवार
ता० २९।५।१३

गुलाबराव गुंडोजी मोहोड
मुकदम माधान हल्लीं मुक्काम कुऱ्हा

## श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ.

## रा. रा. भय्यासाहेब तांबे व बाबुराव तांबे यांस महाराजांनीं पाठविलेलें पत्र नं. २४

बाबुराव यानां यथासंबंध सा. प्रणिपात व आशीर्वाद, व लिहिलेल्या गोष्टी ध्यानांत येण्याकरितां पुन्हा आशीर्वाद.

पत्रद्वारें आपणास वेदान्त शिकविण्याचें मी कबूल केल्यामुळें, आपणास पहिलें पत्र पाठवून, आतां हें दुसरें पत्र पाठवीत आहे. वेदान्त शिकविणें ह्मणजे पंडिताप्रमाणें एकाद्या शास्त्राचा पाठ शिकविणें, किंवा तर्कशास्त्राप्रमाणें वादविवादांत तयार करणें हें नव्हे. वादी व ज्ञानी हे दोघेही निराळे असतात. बापानें एकाद्या मुलाला तुझें लग्न होईल असें ह्मणण्यानें जें सुख होतें तें निराळें, व प्रत्यक्ष स्त्रीसंगानें होणारें सुख निराळें. तितकाच फरक वादी व ज्ञानी या दोघांत असतो. आंधळ्यानें लाल पांढऱ्या व पिंवळ्या रंगावर हजारों व्याख्यानें दिलीं तरी डोळसाच्या दृष्टीनें तीं किती हास्यास्पद होतील ? त्याप्रमाणें अनुभवावांचून वेदान्त बोलणें ही थट्टा होय. आपल्याला अनुभव आणून देईल असा गुरू आवश्यक असतो; परंतु अनुभवाची लालुच दाखवून मागें फिरविणाऱ्या पोटभरू साधूंच्या तडाक्यांत सांपडल्यावर बिचारा मुमुक्षु त्याविषयीं अगदीं निराश होतो, व शेवटीं आपली नीतिमत्ता जेवढी आहे तेवढीच पुरे असें ह्मणून मागें फिरतो. आईबापांवांचून निर्जन अरण्यांत पडलेल्या पोरक्या पोराप्रमाणें त्याची स्थिति होते; व पुढें त्याची दृष्टी मंद होऊन शेवटीं तो कोणत्याही ठिकाणीं दोष पहावयास लागतो. माझ्या मतानें हे दोष पाहणें चांगलेंही आहे, व वाईटही आहे. इतराप्रमाणें पोटभरू साधूंच्या तडाक्यांत आपण सांपडूं नये या दृष्टीनें दोष पाहणें उत्तम आहे, आणि कोणीच चांगला माहात्मा जगांत नाहीं अशा दृष्टीनें दोष पाहणें वाईट आहे. योग्य उपयोग केला नाहीं तर अन्नही विष होतें, व योग्य उपयोग केल्यास विषही रोग हरण करितें, ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. दोष पाहतांनां आपणाला दोष पाहतां येतात किंवा नाहीं याचाही चांगला विचार केला पाहिजे. तांदूळ निवड-

तांनां खडा समजून तांदूळ फेंकून देणाराला कोण शहाणा ह्मणेल ? त्याप्रमाणें दोष पाहतांनां गुणही दोषवत् वाटून ते फेंकून दिल्या जाऊं नयेत ह्मणून आपली दृष्टि निर्मळ केली पाहिजे. दृष्टि तीन प्रकारची आहे. वैयक्तिक, सामाजिक व शास्त्रीय. आपल्या मनाच्या जे जे विरुद्ध तो तो दोष असें समजणें ही वैयक्तिक दृष्टि आहे. ही दृष्टि भयंकर व गुणालाही दोष करून दाखविणारी आहे. घरांत, देशांत, व धर्मांत कलह माजविणारी हीच दृष्टि आहे. एकाद्या सुखी मनुष्याला पैसा मिळत असला ह्मणजे दुःखी सद्गुणी मनुष्यालाही तो पापी समजतो. हें याच दृष्टीचें पाहणें आहे. वाटेल तशा ढोंगानें पैसे मिळवून हजारों लोकांनां जेऊं घालणारा साधु, शांत व एकान्ती असणाऱ्या मुनीला दरिद्री ह्मणतो तो याच दृष्टीमुळें. बाप मुलाला व मुलें बापाला याच दृष्टीमुळें वाईट ह्मणत असतात. म्हणून ही वैयक्तिक दोषदृष्टि सर्वस्वी नाश करणारी व भयंकर असल्यामुळें, हिच्यामार्गें शहाणे पुरुष जात नाहींत. दुसरी दोष पाहण्याची दृष्टी ह्मणजे सामाजिक. ही थोड्या अंशीं बरी आहे, व पुष्कळ अंशीं वाईटही आहे. समाजाच्या विरुद्ध असण्याला दोष ह्मणणें हेंच या दृष्टीचें स्वरूप आहे. परंतु प्रत्येक समाजाची घटना निरनिराळी असल्यामुळें प्रत्येक समाज प्रत्येक समाजाच्या दृष्टीनें सदोष आहे. पुन्हा प्रत्येक मनुष्यांत समाजाच्या दृष्टीनें कांहींतरी दोष असतातच. समाजशास्त्री ( Socialist ) लोकांनीं समाजाला सारखें धन वांटण्याचा प्रयत्न करून पाहिला असतांना तो साधला नाहीं ही गोष्ट प्रसिद्ध आहे. समाजाला अति अनुकूल राहिल्यास कुटुंब दोष देतें, व कुटुंबाला अनुकूल राहिल्यास समाज दोष देतो. ह्मणून सामाजिक दोषदृष्टि इकडे आड व तिकडे विहीर अशा स्वरूपाची असून अंधुक आहे; तथापि हिच्या योगानें मनुष्याला इहलोकांत बरें ह्मणवून घेण्याचा आव घालतां येतो. तिसरी शास्त्रीय दोषदृष्टि होय. ही धन्यतमा असून गरीब मुमुक्षूंचें रक्षण करणारी माता आहे. शास्त्राच्या विरुद्ध ह्मणून जें जें असेल तो तो दोष असें समजणें हिचें स्वरूप आहे. अशा प्रकारचे दोष पाहण्याची शास्त्रीय संवय ज्याला लागली आहे, तो मनुष्य पोटभरू साधूंच्या तडाक्यांतही फसत नाहीं, व शेवटीं समाजाकडून पराभूत न

होतो आपलें परलोकचें कल्याणही साधून घेतो; परंतु ही दृष्टिही गुरुजवळूनच शिकली पाहिजे; शास्त्रें वाचून किंवा वादविवादाचे तर्क करून शास्त्रीय कोणतें, व शास्त्राच्या विरुद्ध कोणतें हें समजत नाहीं. आपल्या मतानें शास्त्रें वाचूं लागल्यास आपल्या पहिल्या मताला अनुकूल असतील अशींच वचनें आपण काढून घेतों. एकाद्या वेश्येनें भागवत ऐकल्यावर गोपिकांच्या गोष्टींवरून जारकर्म करणें शास्त्रीय आहे, असें तिला वाटल्यास तिची सुधारणा काय होणार ? शास्त्रानें आपल्या पहिल्या मतांत बदल पाडला नाहीं तर त्यानें आपल्याला ज्ञान तरी काय शिकविलें ? पाहुणे गेल्यावर शिळें अन्न मिळाल्यास पाहुणचार कोण ह्मणेल. ह्मणून शास्त्र ह्मणजे काय हें सद्गुरूपासूनच समजून घेतलें पाहिजे. परंतु पोटभरू साधूंच्या तडाक्यांत सांपडलेल्या मनुष्याला सद्गुरु कोणाला ह्मणावें हें समजणें अत्यंतच कठीण असतें. खऱ्या महात्म्याचेंही प्रारब्ध निरनिराळें असल्यामुळें वर वर पाहतांना खरे महात्मेही समजून येत नाहींत. व्याख्यानानें तत्काल मनावर परिणाम करणार कांहीं तोंडाचे पटाईत आंतून पक्के गळेकापू असतात, असें कित्येक वेळां आढळून येतें; व त्यामुळें वेदान्ताच्या ऐवजीं आपण कोकशास्त्र शिकत आहों असें मुमुक्षूला वाटूं लागून तो निराश होतो. ह्मणूनच खरा गुरु मिळणें हें ईश्वरानुग्रहावांचून होत नाहीं असें योगवासिष्ठादि ग्रंथांत ह्मटलें आहे

आईबाप देखील प्रेमळ मिळण्याला पुत्राचें भाग्य पाहिजे. दारूकरितां मुलें विकणाऱ्या आया हिंदुस्थानांत सध्यां नाहींत हें थोडेसें भाग्य ह्मणतां येईल. सद्गुरु ह्मणविणाऱ्यानीं योगाचें ज्ञान अनुभवानें करून दिलें पाहिजे. परंतु अनुभवाचे प्रश्न करण्याचीही शिष्याला अक्कल पाहिजे.

योग दोन प्रकारचा आहे. गृहस्थयोग व संन्यासयोग. प्रपंच करून परमार्थ साधणें हा गृहस्थयोग व केवळ परमार्थाच्याच मागें लागणें हा संन्यासयोग. दुसऱ्याची आपणाला कांहीं जरूर नसल्यामुळें, पाहिल्या योगाचीच प्रथम आपल्यास माहिती करून देतों. ढोंगी साधूंची फजीती करण्याकरितां व खऱ्या गुरूंची ओळीख होण्याकरितां मी खालीं प्रश्न लिहितों. त्यांचीं उत्तरें जरी आपल्याला सध्यां ठाऊक नसलीं तरी त्या प्रश्नाचीं उत्तरें आपल्याला पाहिजेत हें आपण आपल्याच मनांत समजून

पत्र वाचून प्रश्न पाठ करून ठेवावे. पुढें त्यांचीं उत्तरें कळतीलच. कोणी महात्मा आहे किंवा नाहीं हेंही या प्रश्नांवरून आपणाला निश्चित कळून येण्यासारखें आहे. हे प्रश्न तर्कदृष्टीचे किंवा कुत्सित दृष्टीचे नसून, केवळ अनुभवाचे आहेत; व ह्यांच्या उत्तराची मुमुक्षूंना फार आवश्यकता आहे. साधारण साधू या प्रश्नांची उत्तरें कशीं देतात, व तीं अनुभवास किती पटतात, हेंही आपण पाहिलें पाहिजे, व त्यावरून ह्या प्रश्नांची मुख्य उत्तरें कांहीं निराळीं असतील हेंही ओळखून घेतलें पाहिजे. ह्मणून ते प्रश्न व साधारण माणसांनीं दिलेलीं त्यांचीं उत्तरें, व त्या उत्तरांचें अनुभवाला न पटणें ह्या दृष्टीनें मी हीं पत्रें आपणाला लिहीत आहे. त्यांतून ह्या पत्रांत कांहीं लिहितों. हें वाचून झाल्यावर आपणास जसें वाटेल तसें उत्तर पाठवावें. प्रश्न विचारतांनां उत्तर देणारा भोंदू असो किंवा साधु असो, त्याच्याशीं नम्र भाषण करावें, व पुढीलप्रमाणें विचारावें.

प्रश्न १ लाः— महाराज, गृहस्थानें जीवब्रह्म दोन्हीं एकच आहेत असें ध्यान सर्व कामें करून कसें करावें ? कारण कामें करतांनां अहंकार थोडासा तरी धरावा लागतो, व ब्रह्म तर अहंकाररहित आहे. या प्रश्नावर अनुभव नसून केवळ शास्त्र शिकणाराचें साधारण उत्तरः— " गृहस्थानां ज्ञानच होणें शक्य नाहीं, त्यानें कर्मेंच करावीं. " यावर त्या साधूला असें ह्मणावें कीं, जनकादिक गृहस्थानां ज्ञान नव्हतें काय ? यावर साधारण उत्तरः— ' त्यांचें प्रारब्ध मोठें होतें ' असें कोणी दिल्यास माझें प्रारब्ध तसें नाहीं याविषयीं आपल्या जवळ काय पुरावा आहे ? मांस खाणाऱ्या धर्मव्याधाला देखील ज्ञान झालें अशी कथा महाभारतांत आहे, त्यापेक्षां तर मी कांहीं वाईट करीत नाहीं; असें ह्मटलें असतां साधारण साधु उगीच राहील. परंतु हे प्रश्न विचारणाराचीही नीतिमत्ता उत्तम पाहिजे. जे दोष दुसऱ्यावर आपण ठेवतों ते दोष आपल्या अंगीं नसावे हें पक्कें ध्यानांत ठेवलें पाहिजे. व्यभिचारी मनुष्याला दोष लावणारा ब्रह्मचारी किंवा एकपत्नी तरी असला पाहिजे.

प्रश्न २ राः— तरुण गृहस्थाला महिन्याचे महिन्याला स्त्रीसंग करणें आवश्यक आहे; परंतु स्त्रीसंगकालीं इतर ध्यान केलें असतां शुक्रसंपातच होत नाहीं. ह्मणून ब्रह्मध्यान करून योग्य रीतीनें वंशवृद्धि कशी

करतां येईल ? यावर साधारण साधूचें उत्तरः— " हा प्रश्न विचारणें सभ्यपणाचें नाहीं " हें उत्तर आल्यास आपण असें म्हणावें कीं, महाभारताच्या अनुशासनपर्वांत संभोगकालीं पुरुषाला सुख अधिक होतें किंवा स्त्रीला सुख अधिक होतें असें जें धर्मराजानें भीष्माला विचारलें आहे तें सभ्यपणाचें नाहीं काय ? यावर ढोंगी चुप बसतो.

प्रश्न ३ राः— आपलें ज्ञान आपल्या संततींत उतरण्याकरितां, व आपली संतती आपल्याप्रमाणेंच नीतिमान होण्याकरितां स्त्रीसंभोगकालीं गर्भस्थापक प्राणायाम करावा असें शास्त्र आहे; परंतु तशा प्राणायामाची संवय केल्यास संध्येंतही प्राणायाम करतांनां काम उत्पन्न होऊन शुक्रपात होतो, आणि गर्भस्थापक प्राणायामाची संवय न केल्यास स्त्रीसंभोगकालीं प्राणायाम करितां येत नाहीं, परंतु गृहस्थाला तर योग्य संतती उत्पन्न करण्याची जरूर आहे; नाहींतर शिवाजीचा मुलगा संभाजी झाल्यास काय उपयोग ? यावर साधारण साधूचें उत्तरः— " तुकारामबोवांची संतती तुकारामासारखीच झाली काय ? " यावर आपण असें म्हणावें कीं, ब्रह्मज्ञान व भक्ति ही ज्याची त्याची स्वतंत्र आहे; परंतु सद्गुण व शौर्य हे तर कुलांत उतरलेच पाहिजेत, नाहींतर अर्जुनाचा मुलगा अभिमन्यु अर्जुनासारखाच निघाला या इतिहासाची वाट काय लागेल ?

प्रश्न ४ थाः— गृहस्थाला शरीर चांगलें ठेवणें जरूर आहे, व त्यामुळें भोजनकाळीं निरनिराळ्या पदार्थांची रुचि घेणें आवश्यक आहे. ती रुचि घेत असतांनां ब्रह्मध्यान कसें करावें ? कारण रुचि घेणें मनाच्या चंचलपणाचा धर्म असून, ध्यान हा मनाच्या एकाग्रपणाचा धर्म आहे. यावर ढोंगी साधूनें, जेवायचे वेळीं ध्यानच करूं नये, असें उत्तर दिल्यास जेवणें हें पोट भरणें नसून, हृदयस्थ परमात्म्याला आहुति देणें आहे असें जें वेदान्तांत सांगितलें आहे, त्याची वाट काय ? विशेष सूचनाः— मूर्ख साधु दोन प्रकारचे आहेत. कांहीं केवळ लुच्चे व कांहीं अर्ध्या हळकुंडानें पिवळे झालेले. हे चार प्रश्न पहिल्याकरितां असून पुढील प्रश्न पहिल्या व दुसऱ्या अशा दोघांही करतां आहेत. पुरा अनुभव न येतां थोड्याशा अनुभवानें शेफारून जाऊन गुरुपणाचा बुरखा

घेणारे दुसऱ्या प्रकारचे साधु असतात. मी हरिद्रार्धपीत म्हणजे अर्ध्या हळकुंडानें पिवळे होणारे असें नांव दिलें आहे. हे पढलेले असून कढलेले नसतात. यांच्याविषयीं तुकाराम महाराजांनी "शिकल्या बोलाचे सांगतील ज्ञान ॥ नकळे प्रेमखुण विठोबाची" "अभ्यासाचे अंगीं असती सर्व कळा । भक्तिचा जिव्हाळा वेगळाची" असें स्पष्ट ह्मटलें आहे.

प्रश्न ५ वा:– विरक्त पुरुष आपल्या आत्मज्ञानांतच निमग्न असल्यामुळें, दुसऱ्याच्या भिक्षेनें तो पोसला जातो. तेव्हां स्वार्थी विरक्त श्रेष्ठ किंवा परोपकारी गृहस्थ श्रेष्ठ ? विरक्त श्रेष्ठ मानल्यास परमेश्वराच्या घरीं अन्याय होईल, आणि गृहस्थ श्रेष्ठ मानल्यास त्याला हळुहळु मुक्ति कां होते ?

प्रश्न ६ वा:— आत्म्याच्या आकाराची अंतःकरणाची वृत्ति करणें याला ब्रह्मज्ञान ह्मणतात, आणि अंतःकरण अज्ञानापासून झालें आहे असें वेदान्त सांगतो. तेव्हां अंतःकरणाची वृत्ति आपल्या अज्ञानरूप कारणाचा नाश कसा करील ? लांकडांतून उत्पन्न होणारा अग्नि लांकडाच्या जातीचा नसतो, ह्मणून तो त्याचा नाश करतो; परंतु अज्ञानांतून उत्पन्न होणारें अंतःकरण अज्ञानाच्याच जातीचें आहे. लांकडांतून उत्पन्न होणारा अग्नि जेथें उत्पन्न होतो तेथें त्या लांकडाचा नाश करतो, परंतु अज्ञानांतून उत्पन्न होणारें अंतःकरण सर्वच ठिकाणीं अज्ञानाचा नाश करतें असें दिसत नाहीं; कारण तसें असतें तर ज्याना ज्याना अंतःकरण आहे, ते ते ज्ञानी झाले असते, परंतु आह्माला अंतःकरण असून आह्मीं अझून अज्ञानीच आहोंत.

प्रश्न ७ वा:– ईश्वराची भीति बाळगावी किंवा त्यावर प्रेम करावा ? भीति देहाच्या आश्रयानें होत असतें, ह्मणून भय बाळगणाराला अहंकारच असतो. भीति सोडून प्रीति केल्यास प्रेमानें परमेश्वराचा अनादर होऊन अहंकारच वाढतो. दूध ऊतूं गेलें असतां कृष्णास टाकून यशोदा दुधाकडे गेली हें पुराण प्रसिद्ध आहे. तेव्हां भगवद्भक्तीनें अहंकाररहित होतां येतें हें कसें ?

प्रश्न ८ वा:— वृत्ति साकार आहे, व ब्रह्म निराकार आहे.

ब्रह्माच्या आकाराची वृत्ति होईल तर ब्रह्महि साकार होईल किंवा उपाधिबद्ध तरी होईल. उपाधिबद्ध ब्रह्माचें ज्ञान होणें व जीवाचें ज्ञान होणें सारखेंच आहे, कारण जीवही उपाधिबद्धच आहे; अशा उपाधि-बद्ध ब्रह्माच्या ज्ञानानें जर मुक्ति होत असेल, तर आह्माला जीवाचें ज्ञान आतांही आहे, त्यानेंही मुक्ति व्हावी.

पुनर्विशेष सूचना:– अर्ध्या हळकुंडानें पिवळे झालेले साधु दोन प्रकारचे आहेत. शास्त्र शिकलेले व थोडासा योग शिकलेले. पैकीं ५, ६, ७, ८, हे प्रश्न केवळ शास्त्र शिकलेल्याकरितांच आहेत. आतां पूर्ण योग न शिकतां थोड्याशा योगानें गुरु ह्मणवून घेणारे जे आहेत त्यांच्याकरितां प्रश्न सांगतों.

प्रश्न ९ वा:– गुरुमंत्र जपण्याकरितां कोणता मंत्र कोणाला सुसिद्ध आहे हें पाहावें लागतें. परंतु गायत्री व भगवन्नाम हें तर सर्वांना सारखेंच दिलें जातें. त्यानें गायत्री सुसिद्ध आहे किंवा नाहीं हें कसें पहावें ? यावर साधारण योगी असें उत्तर देतो कीं, गायत्री व भगवन्ना-माला सिद्ध व सुसिद्ध पहावयाचे नाहींत. तेव्हां विद्यारण्यानीं चोविस पुरश्चरणें करूनहि गायत्री प्रसन्न झाली नाहीं, व संन्यास घेतल्यावर प्रसन्न झाली ती कां ? असें त्याला विचारावें.

प्रश्न १० वा:– थोडासा योग जर पहिल्या जन्मांत झाला असला तर दुसऱ्या जन्मांत गुरूवांचूनच तो योग पूर्ण होतो असें म्हणतात. मग रामकृष्णादिकांनीं गुरु कशाला केले ? यावर साधारण योगी उत्तर असें देतो कीं, रामकृष्णांनीं लोकानीं तसें वागावें हा मार्ग दाखवून दिला. त्यानां तसें करण्याची कांहीं अपेक्षा नव्हती. तेव्हां आपण असें म्हणावें कीं, रामकृष्णादि ईश्वरांची ही लीला होती हें ठीकच आहे, परंतु अर्जुन तर भक्त असून जीव होता ? त्याला देवाचा समागम झाल्यामुळें त्याचा पूर्वी थोडासा योग झाला असला पाहिजे हें तर ठरलेलेंच आहे. मग त्याला देवाला ज्ञान कां विचारावें लागलें ? यावर साधारण योगी हारल्यासारखें करून हें बरें आपल्या पथ्यावरच पडलें असें समजून थोडासा योग शिकलेल्यालाही दुसऱ्या जन्मीं गुरूवांचून ज्ञान होत नाहीं हें कबूल करील; तेव्हां वामदेव जीव असून ईश्वराचा

अवतार नसतांही त्याला गर्भांतच गुरूवांचून ज्ञान झालें अशी कथा ऋग्वेदाच्या ऐतरेयोपनिषदांत आहे त्याची वाट काय असें विचारावें.

प्रश्न ११ वा:- डोळ्यांत दिसणारे पांढरे, पिवळे, लाल, रंग परमेश्वराचीं व्यक्त रूपें आहेत असें यजुर्वेदाच्या श्वेताश्वतर उपनिषदेंत सांगितलें असून तुकारामादि सत्पुरुषांनींही तसेंच म्हटलें आहे. परंतु तसे रंग एकादी झुंबराची कांच घेतल्यास तींतही दिसतात; तेव्हां डोळ्यांतील रूपें परमेश्वररूपें आहेत, व कांचेतील नाहींत, याविषयीं अनुभव प्रमाण कसा होतो? यावर थोडासा शिकलेला योगी असें म्हणेल कीं, डोळ्यांतील रंग शरीराच्या आंतील असून शरीरांचा व आत्म्याचा निकट संबंध आहे, म्हणून त्या दोन दोन रंगांच्या संधींत आत्म्याचें ज्ञान स्पष्ट होऊं शकतें. असें उत्तर आल्यास आपण असें म्हणावें कीं, आत्मा जसा शरीरांत व्यापक आहे, तसा सर्व ब्रह्मांडांत व्यापक आहे असें शास्त्र म्हणतें, आणि योगशास्त्रांत शरीराच्या आंतील भागांचें ध्यान करण्यास सांगितलें आहे, तसें आरसा वगैरे बाहेरील वस्तूंचेंही ध्यान करण्यास सांगितलें आहे. हजारों योगियांनीं मानिलेल्या शास्त्रांस सोडून तुमचें एकट्याचें खरें कसें मानावें? बरें, डोळ्यांतील रंगांत व कांचेतल्या रंगांत फरक नाहीं असें म्हणाल, तर तुमच्याजवळ येऊन योगमुद्रा शिकण्याचें कारण काय, व नासाग्रदृष्टि ठेवण्याची व भोंवयांच्यामध्यें पाहण्याची गीतेंत प्रशंसा कां केली?

प्रश्न १२ वा:- श्वासामध्यें जो हंस शब्द चालतो, तो सुषुम्ना नाडीनें उलट केला असतां सोहं होतो, परंतु सुषुम्ना नाडींतून बाहेर श्वास येण्याला द्वार नाहीं तेव्हां तो एक प्रकारचा कुंभक प्राणायामच झाला, त्यांत अजपाजप कसा होईल? यावर साधारण योग शिकलेल्याचें उत्तर:- "सुषुम्ना एकादी नाडी नसून दोन्ही श्वास बरोबर चालणें याला सुषुम्ना म्हणतात" असें पडेल. तेव्हां पुन्हां आपण ह्मणावें कीं, मग सुषुम्ना नाडीच्या योगानें ब्रह्मरंध्रांत सरळ प्राण नेतां येतो हें योगशास्त्राचें ह्मणणेंच खोटें झालें. यावर साधारण योगी पुन्हां उत्तर असें देईल "प्राणायामाचा योग निराळा व अजपायोग निराळा. प्राणायामानें एकसारखा समाधि राहतो, व अजपायोगांत श्वासाच्या संधींत

समाधि होतो " असें उत्तर दिल्यावर त्याला जोरानें म्हणावें कीं, समाधि म्हणजे चित्तास निराकार ब्रह्मावांचून दुसरें कांहीं न स्फुरणें. परंतु श्वासाच्या संधींत तर राममंत्र जपणें कपिलगीतेच्या तिसऱ्या अध्यायांत सांगितलें आहे, तेव्हां श्वासाच्या संधींत समाधि कसा होईल ?

या बाराही प्रश्नांचीं मुख्य उत्तरें निराळीं आहेत. प्रश्नमालिकेचीं पत्रें झाल्यावर प्रश्न करण्यांत आपण हुशार झाले, म्हणजे कांहीं प्रश्नांचीं उत्तरें पत्रांत देईन, व कांहींचीं उत्तरें समक्ष सांगेन. पुढें असाच पत्राचा क्रम चालू ठेवीन; व हें गुप्त सांगून ठेवतों कीं, पुढें येणाऱ्या पत्रांतील कांहीं प्रश्नाचीं उत्तरें समक्ष देखील सांगणार नाहीं. तर थोडासा योग झाल्यावर मी स्वतः स्वप्नांत सांगेन याची आपण खुणगांठ बांधून ठेवावी, परंतु आपली तयारी मात्र कायम राहिली पाहिजे. पत्रें बहुतेक कोणाला न दाखविण्याचा प्रसंग येईल तितकें बरें, व आल्यास स्वप्नांत सांगेन इत्यादि खुणा तरी दाखविण्याचा प्रसंग न यावा. पत्र वाचून उत्तर लवकर पाठवावें. शुक्लेंदुवत् प्रेमवृद्धि असावी.

मुक्काम हरदा
ता० १०-११-१२

आपला.
गुलाबराव

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ.

## आनंदकुमारस्वामीकृत " आर्यराष्ट्रीयविज्ञानवाद " समीक्षा.

पाश्चात्य तत्वज्ञानाचा अवतार आर्यावर्तांत होऊं लागल्यामुळें, त्याच्या पहिल्या तत्वज्ञानाला एका कोपऱ्यांतच बसावें लागत आहे. आर्यावर्ताचें तत्वविचार पावसाचे पाण्यानें वाढलेल्या गवतांचे परिणाम असल्यामुळें, सुवर्ण पाकशाळेंत तयार केलेल्या पावाची रुचि प्राथमिक रुचीला अधिष्ठान होण्यास तें अगदीं अयोग्य आहे हे कोणालाहि मान्य नाहीं असें नाहीं; परंतु पावाची सामुग्री आर्यावर्ताजवळ नसल्यामुळें, तेथील तत्वज्ञानालाहि पावासारखेंच वळ आपल्या गवतानें येईल तर पहावें म्हणून यत्नारंभ करणें भाग पडलें. शेवटीं त्यानें, " पालखींत बसणाऱ्याचे जीवित खांद्यावर वाहणाऱ्याच्यावर " या म्हणीला अनुसरून

रामकृष्णपरमहंसादिकांच्या हृदयमंदिरांत राहून पाश्चात्य तत्वज्ञानाकडून आपला उपजीवकपणा मिळविला. हें आपल्या घरच्या वेदान्त पुरुषानें कार्य केलें असें पाहून कलेनेंही तीव्रतेनें आपल्या उपजीवकपणा-करितां यत्नारंभ करून आपल्या तेजस्वी सौंदर्यगर्भांतून पाश्चात्य देशांत हेवेल सारखे व सिंहलद्विपांत कुमारस्वामीसारखे पुत्र उत्पन्न केले, व शेवटीं त्यांनां कळूं लागल्यावरहि ते आपल्या मातृदुग्धाला विसरले नाहींत. दहा माणसें लावून व यंत्राच्या सामग्रीनें वीण कामानें तयार झालेलें घर, आपल्या वैयक्तिक यत्नानें झाडाचे पिंज काढून बया जशी एकटीच तयार करूं शकते, तसे आमची आर्य कलामाता सामग्री-वांचून निढळीच्या घामानें जें मिळेल तेवढ्यावरच आपल्या पुत्रांचें समाधान करण्याला समर्थ आहे, असे जोरानें आपला अनुभव सांगणारे पांच पांडव पुत्र अद्याप हयात आहेत.

आपल्याला जो एकंदर आनंद होतो तो खरोखर चित्तैकाग्र्याचे फल असून बाह्यवस्तूशीं त्याचें तादात्म्य करून विषयापासून झाला असें आपण म्हणतो; परंतु त्या विषयाविषयीं मनाची रुचि उडाली कीं, आपल्यास त्यापासून उलटें दुःख होतें. स्वपत्नीविषयीं आलेली शंका हेंच वरील विधानाचें चांगलें उदाहरण होईल. वेदान्ताचें म्हणणें असें आहे कीं, हा आनंद आत्म्याचें प्रतिबिंब असून, तो अगदीं बाह्य सृष्टीचा परिणाम आहे असें व्यावहारिकांचें म्हणणें आहे. या दोघांचीहि सत्यता आपल्याला कलामातेच्या वचनानुरोधानें पहावयाची आहे. हा आपला नेहमींचा अनुभव आहे कीं, बाहेरून घेतलेल्या व रुचलेल्या विषयाची आठवण झाली म्हणजे तोच विषय पुनः मिळावा अशी इच्छा होते, व त्याच आठवणीपासून आनंद न होतां दुःखाचा अनुभव येतो. परंतु धर्म, प्रेम, निर्वेद, तृप्ति, अहिंसा, सत्य इत्यादि मानसिक गुणांच्या नुसत्या आठवणीनेंच आनंद होऊं लागतो. नीति-शास्त्राला बहूपयोगितेचे तत्व आधार मानणारा पाश्चात्य तत्ववेत्ता मिल देखील ईश्वरासारख्या अंधविश्वासोपजीवी तत्वांनां दूर झुगारूनहि सत्या-दि मानसिक गुणापासून होणारे सुख जडापेक्षां पुष्कळपट उच्च आहे असें म्हणतो. कला ही स्वपुत्राला आनंद–दुग्ध पाजणारी माता होय.

तिची मूर्ति व्यवहाराचे प्रतिबिंब आहे कीं आत्म्याचे प्रतिबिंब आहे असा घटकाभर विचार केला, तर पहिल्यापक्षीं तिला आपणाला पूतनेच्या कोटींत ढकलावी लागेल; कारण व्यावहारिक प्रतिबिंबानें घडलेल्या कलामूर्तीला वासनाविषावांचून दुसरें कांहीं पुत्रांनां पाजता येणार नाहीं. एकाद्या सृष्टींतील स्वाभाविक वस्तूचें प्रकाशजन्य चित्र (Photo) पाहण्याचे पर्यवसान ती वस्तु जशीच्या तशी मिळावी या वासनेंतच होतें; म्हणून वासनारूप सामग्रीचा परित्याग करून एकट्या एकट्यांतच समाधान मानणारी आमची आर्यकलामाता आत्म्याचे प्रतिबिंबानें घडलेली मूर्ति आहे हे तिच्या आनंद नांवाच्या पुत्रानेंच कबूल केलें आहे. या आनंद पुरुषानें पुस्तकरूपी पुत्र उत्पन्न करून, आपल्या आईचा वंश वाढविला आहे. या पुरुषाचे नांव आनंदकुमारस्वामी. यांचा मला शारिरीक परिचय नाहीं, तथापि यांच्या तिघा पुत्राशी माझी चांगली मैत्री आहे. पैकीं नुकत्याच जन्मलेल्या पुत्ररत्नाच्या स्वभावाचे थोडेसें वर्णन करितो.

या पुत्ररत्नाचें नांव "आर्यराष्ट्रीय विज्ञानवाद" हें आहे. उत्क्रान्ति तत्वाला अनुसरून या कुलाचे आंगीं आपल्या बापाचा निर्भिडपणा जशाच्या तसाच उतरला आहे. जन्मापासूनच याला लोकमताची भीति नाहीं. योगापासून तर कलेपर्यंत सर्व आर्यतत्वज्ञानाचे सुकुमार अंकुर या मुलाच्या हृदयक्षेत्रांत चांगले वाढले आहेत. तो नेहमीं ह्मणतो, अलिकडे आमच्या आर्यबहिणी पाश्चात्य ईशपुत्रांच्या शाळेंत जाऊन ( Piono ) स्वरनिवेशवाद्यावर गाणें शिकतात, व त्यामुळें स्वयंस्वर गीताला विसरतात. शेवटीं आपल्या मातेच्या स्तन्य रुचीची त्यांनां आठवणहि सोडून जाते. मोहून टाकणारा स्वरनिवेश प्रिय वित्तसौंदर्याच्या टंचाईमुळें जवळ देखील येत नाहीं, त्यामुळें त्यांच्या वासना अधिकच वाढत असतात, आणि प्रियाच्या सान्निध्यावांचून त्या स्वयंस्वर काढण्याच्या बाबतींत अगदीं परतंत्र राहतात; व आपल्या वडिल बहिणींनीं मातृदुग्धाच्या जोरावर काढलेल्या स्वयंस्वराना या नेहमीं तुच्छ करीत असतात. यामुळें अर्धी टाकून सगळीवर धांवण्यासारखी स्थीति होते. हें मूल आणखी असें ह्मणते कीं, प्रतिध्वनिमंजूषा ( Grama-

phone ) नांवाच्या वाद्यानें तर आमचा सजीवपणा हिरून घेण्याची मजल आणिली आहे, ह्मणून तो आतां आपला सजीवपणा योगानींच राखला पाहिजे. असेंच आह्मी वागलो तर आमचे पाश्चात्य बंधु देखील आमच्या स्वातंत्र्याची केव्हां ना केव्हां तरी इच्छा करतील. आमचे आत्मस्वातंत्र्य-च आम्ही आपल्या मातेच्या उपदेशाप्रमाणें मिळवून घेतले नाहीं, तर द्वेषमूलक शारीरिक राष्ट्रीय स्वातंत्र्याचा कांहींच उपयोग नाहीं; म्हटलेंहि आहे कीं, मनामागें काया. ''

या थोड्याशा वर्णनावरून प्रत्येकाला या मुलाचा स्वभाव कळून, या मुलाची मैत्री करणें आपल्याला भूषण आहे असें वाटल्यावांचून राहणार नाहीं.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

# श्रीतुकाराममहाराजांचें प्रयाण.

रा. रा. मुमुक्षुकर्ते यांसः—

वि. वि. २०।३।१३ च्या मुमुक्षूंतील— ' तुकाराममहाराजांचें प्रयाण ' या लेखाचें उत्तर म्हणून एक लेख तारीख २२ माहे एप्रिल १९१३ च्या केसरीच्या अंकांत आला आहे, तो वेदान्तप्रचुर असून त्यांतील वेदांताचीं मतें बरोबर धरलीं, तरी त्यांत ज्या युक्त्या दिल्या आहेत, त्यांसंबंधीं आलोचन करून त्याला वेदान्तांत अनुकूल आधार आहे काय हें मी पहात आहे. अशा प्रकारचे माझे लेख मला मराठी भाषा बरोबर येत नसल्यामुळें, बरेच वर्तमानपत्रकार घेत नाहींत. तसें आपण करूं नये अशी विनंति आहे.

केसरींतील लेखांत, मलमूत्रानें भरलेला हा ओल्या मातीचा देह वैकुंठांत राहण्यायोग्य नाहीं, कारण तो दुर्गंधादिकांनीं पूर्ण आहे, आणि देवांचे देह तेजोमय असतात, व सौगंधिक असतात; पूर्वदेहाचें रूपांतर देह पडल्यावांचून होत नाहीं ह्या मुख्यत: युक्ती असून चुडालाराणीनें आपला देह खोलींत कोंडून ठेवून दुसऱ्या देहानें शिखिध्वजाला ज्ञानोप-देश केला, श्रीशंकराचार्यांनीं अमरुराजाच्या शरीरांत प्रवेश केला, असे

कांहीं ऐतिहासिक मुद्दे असून, देह टाकल्यावांचून त्याचें रूपांतर होत नाहीं असा त्याचा सारांश काढला आहे, व तदनुसार कांहीं वचनांचा अर्थही केला आहे. यासंबंधीं मला लिहावेंसें वाटतें तें असें:–

लेखकाच्या म्हणण्याप्रमाणें तुकाराम वैकुंठास गेले या गोष्टीवर विश्वास ठेवणारे घटकाभर भोळे किंवा हट्टी धरून चाललें तरी त्यांच्या हातून परमार्थाला प्रतिबंधक असा अपराध कोणता घडतो हें समजत नाहीं. शिवाय मानवी देह वैकुंठीं राहण्यास योग्य नाहीं असें म्हटलें तर कोणता देह योग्य नाहीं ? भौतिक कीं मायिक, असा प्रश्न उत्पन्न होतो. प्रथम पक्षीं देवांचे दिव्य देह तेजोमय आहेत असें म्हटलें आहे त्याविषयींही प्रश्न उत्पन्न होतो. देवांचे देह तेजोमय आहेत म्हणजे काय ? त्यांच्यामध्यें पृथ्वी व आप हीं दोन तत्त्वें नाहींत किंवा ते केवळ तेजाचेच बनले आहेत असें समजावयाचें किंवा चार भूतें गौण असून तेजभूत प्रधान आहे असें समजावयाचें ? पैकीं प्रथम कल्पना योग्य होत नाहीं, कारण मंत्रसामर्थ्यानें प्रसन्न होऊन इंद्रादि देवांनीं आपले वीर्य कुंतीचे ठिकाणीं स्थापित केलें असें महाभारतांत सांगितलें आहे. " पृथिव्या ओषधयः औषधीभ्योऽन्नम् अन्नाद्रेतः रेतसः पुरुषः " अशी तैत्तिरीयश्रुति आहे, व पृथ्वीपासून औषधी, औषधीपासून अन्न, अन्नापासून रेत व रेतापासून पुरुष उत्पन्न होतो असा तिचा अर्थ आहे. पृथ्वी व आप हीं दोन भूतेंच जर देवांच्या शरीरांत नसतीं तर कुंतीच्या ठिकाणीं वीर्य त्यांना स्थापित करतां आलें नसतें. त्यांनीं आपलें तेजोमय शुक्र कुंतीचे ठिकाणीं स्थापित केलें हेंही ह्मणणें योग्य होत नाहीं; कारण तसें मानलें तर पांडवांना मलमूत्र होत नव्हतें असें मानावें लागेल. दुसरें, भौतिक शरीर धरून कुंतीचे ठिकाणीं शुक्र स्थापन केलें असें धरून चाललें तरी, चंद्रापासून गुरुपत्नीचें ठिकाणीं राहिलेल्या गर्भाची पौराणिक कथा, देवांचे शरीरांत पृथ्वी व आप भूतें, सिद्ध करण्याला पुरेशी आहे. दुसरा पक्षही योग्य नाहीं, कारण देवादिकांचे देहांत पंचीकरण आहे याविषयीं " तदंतरप्रतिपत्तौ रंहति संपरिष्वक्तः प्रश्ननिरूपणाभ्यां " इत्यादि ब्रह्मसूत्राच्या तृतीय अध्यायाच्या प्रथम पादांतील न्याय प्रसिद्ध आहेत. स्वामी विद्यारण्यकृत पंचदशीच्या तत्वविवेक

नांवाच्या पहिल्या प्रकरणांतही प्रथम पंचीकरण सांगून नंतर देवादिकांची सृष्टि सांगितली आहे. त्यांतही तिसरा पक्ष धरून चाललों तर पार्थिव-प्रधान देह तैजसप्रधान करतां येतात, आणि त्याला मंत्रौषधियोग इत्यादिकांचें प्रमाणही आहे. पुनः असें करतांना पूर्व देह टाकावाही लागत नाहीं. सर्वदर्शनसंग्रहांत एक रसेश्वरदर्शन ह्मणून विद्यारण्यस्वामींनीं लिहिलें आहे. त्यांत रसाच्यायोगानें षाट्कौषिक देह पतन न पावतां हरगौरिसृष्टींतील होऊं शकतो असें दाखविलें आहे. तें हवें असल्यास कोणी वाचून पहावें. तेथेंच कांहीं रससिद्धांचीं उदाहरणें दिलीं आहेत; त्यांचा पूर्वदेह पडल्याचें व त्याचा संस्कार झाल्याचें उदाहरण कोणत्याही ग्रंथांत नाहीं. मंत्रशास्त्रांत पूर्वदेह न पडतां अपर देह घेतां येण्याविषयीं अनेक उदाहरणें आहेत, व तीं इंद्रजालप्रकरणांतच आहेत असेंही नाहीं, तर अन्य प्रकरणांतही आहेत. भावार्थदीपिकेच्या ६ व्या अध्यायांत ज्ञातांनीं कुंडलिनीच्या सामर्थ्यानें पूर्वदेह न पडतां नवा देह घेतां येतो असें स्पष्ट सांगितलें आहे, आणि तो देह आकाशांतून देखील चालण्यास समर्थ असतो असें ह्मटलें आहे. " जात्यंतरपरिणामः प्रकृत्यापूरात् " या पातंजलयोगशास्त्राच्या कैवल्यपादाच्या तिसऱ्या सूत्रांत व त्यावरील श्रीव्यासभाष्यांत प्रकृतीच्या पुरवठ्यानें याच देहांत देहांतरपरिणाम करून घेतां येतो, असें नंदीश्वराचें उदाहरण देऊन स्पष्ट केलें आहे. नंदीश्वराची कथा स्कंदपुराणांतील काशीखंडांत आहे, पण त्याच्याविषयीं पूर्वदेह पडल्याची कथा कोणत्याही ग्रंथांत प्रसिद्ध नाहीं. एका राजाचा सेवक शंकरानें कैलासांत नेला असतां सर्व सैन्य घेऊन तो राजा कैलासांत लढाईला जाऊन आपला सेवक परत आणला अशी कथा त्याच ग्रंथांत आहे. पुनः अर्जुन अस्त्रविद्या संपादन करण्याकरितां याच देहानें स्वर्गांत गेला होता अशी कथा महाभारतांत प्रसिद्ध आहे. धर्मही देहासुद्धां विमानांत बसून स्वर्गास गेले होते अशी महाभारतांतच कथा आहे. तेव्हां भौतिक देह देवलोकीं राहण्यास अयोग्य आहे या ह्मणण्यांत काय तथ्य असेल तें मला समजलें नाहीं.

आतां मायिक देह परमेश्वराचा असतो. सर्व अवतारांचा देह मायाकार्य आहे असें श्रीमच्छंकराचार्यांनीं आपल्या गीताभाष्यांत स्पष्ट

ह्मटलें आहे. तेव्हां तें वेदान्ती लोकांनाही मान्य असलेंच पाहिजे. आतां अवतार न मानणारे कांहीं वेदान्ती असल्यास त्यांच्याकरतां माझें हें लिहिणें नाहीं, परंतु केसरींतील लेखक तसे असतील असें वाटत नाहीं. रामकृष्णादिकांचे मायामय देह होते हें कोणीही प्राचीन शांकरवेदान्ती अमान्य करीत नाहीं, तेव्हां रामकृष्णास मलमूत्र नव्हतें कीं काय अशी साहजिक शंका येते, पण " तुझी विष्ठा पंढरीराया । सारभूत माझी काया । " असें तुकाराममहाराजांनींच ह्मटलें असून " मुते उंबरा आमुच्या आणि हागे । पडे ऊठतां पाय वो त्याची माजी । करी हास्य तेव्हां मुलांच्या समाजीं " असें वामनानें ह्मटलें आहे. ऋषभदेवही देवाचा अवतार असून त्यांच्या विष्ठेचा सुगंध अनेक योजनें जात होता, असें श्रीमद्भागवतांत ह्मटलें आहे. पुनः रामकृष्णादिकांना मळमूत्र होत नसतें तर त्यांच्या आईबापांना मोह पडला नसता, त्यांना ते परमेश्वर वाटले असते. " आम्ही वैकुंठनिवासी । आलों याचि कारणासी । बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताया ॥ " या अभंगांत स्वतःचें अवतारत्व तुकाराममहाराजांनींच कबूल केलें आहे. अवतारदेह मायाकार्य असतो ह्मणून म्हणा किंवा सात्विकभूतकार्य असतो ह्मणून म्हणा, त्याला वैकुंठांत राहण्यास हरकत नाहीं. रामकृष्णांचीं उदाहरणें जीं लेखकानें दिलीं आहेत, त्याचें उत्तर भगवंताची नानाविध लीला हेंच आहे. आतां तशा प्रकारचा अनुभव एखाद्या कोणास नसल्यामुळें आमचें ज्ञान जेवढें आहे तेवढेंच संतांचें व ऋषींचेंही आहे असें घेऊन चालून तुकारामबोवा वैकुंठांत गेले नाहींत इत्यादि प्रतिपादन करणें ह्मणजे ' न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ' या भगवदाज्ञेस झुगारून देणें आहे. स्वामींचे वंशज खुद्द गोपाळबोवांचें उदाहरण लेखकानें दिलें आहे. परंतु त्यांनाहीं कुणबी जातीच्या माणसानें स्वामीविषयीं अनुकूल लेख लिहिल्यामुळें बरेंच वाटेल असें मला वाटतें ! हा लेख मी केसरींतील लेखकाशीं वाद करावा या बुद्धीनें लिहिला नसून तशी मला उमेदहि नाहीं; परंतु माझा भोळा विश्वास श्रीतुकाराममहाराजावरून उडूं नये, कारण त्याला संरक्षण जरूर आहे अशा बुद्धीनें लिहिला आहे, व माझ्यासारखे विश्वासाचे जे असतील त्यांनीं हें वाचून आपला विश्वासतंतु धरून

ठेवावा अशी माझी इच्छा आहे. जीव कितीही झाला तरी अल्पज्ञ आहे. तेव्हां बृहद्योगवासिष्ठ वाचनांना केसरींतील लेखकाची नजरचुक झाली असावी असेंही मला वाटतें. तथापि लेखकांनीं वेदान्त वाचूनही श्रीतुकाराममहाराजांचे ठिकाणीं जें प्रेम व्यक्त केलें आहे त्याबद्दल ते प्रशंसेस पात्रच होतात. थोड्याशा गोष्टीबद्दल मतभेद असल्यानें कांहीं मित्रत्वाची हानि होत नाहीं. मला आणखी यावर पुष्कळ लिहावयाचें आहे, परंतु पुढील केसरी आजच हातीं पडल्यामुळें तें पुढील खेपेवर ढकलणें प्राप्त आहे

आपला.

गुलाबराव गुंडोजी मोहोड,

साधानकर.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

## श्रीतुकाराममहाराजांचें प्रयाण.

तारीख २९ मे सन १९१३

सच्चिदानंदरूपाय शान्ताय परमात्मने ।
दासमानसहंसाय ज्ञानेशाय नमो नमः ॥१॥

रा. रा. मुमुक्षुकर्ते यांस:—

वि. वि. मागील लेख छापून निघण्यापूर्वीच ता. २९ एप्रिल सन १९१३ च्या केसरीच्या अंकांत पुन: ' तुकाराममहाराजांचें प्रयाण ' यावर दुसरा लेख आला आहे. त्याचेंही श्रीतुकाराममहाराजांचे चरणावर माझा विश्वास दृढ होण्याकरितां समीक्षण करितों. लेखक म्हणतात, " तुकाराममहाराज वैकुंठास गेले याविषयीं हूल पिकविण्याचें कारण त्यांनीं जलसमाधि घेऊन मत्स्यादिकांच्या तोंडीं आपला देह दिल्यामुळें तो वर आला नाहीं हें आहे. असें करण्याला तुकाराममहाराजांना कांहीं कारण नव्हतें. त्यांना तसें वाटलें ह्मणून तसें केलें. " पण हें लेखकाचें म्हणणें श्रीतुकाराममहाराजांच्याच म्हणण्याविरुद्ध आहे. " बोले तैसा चाले । त्याचीं वंदावीं पाउलें ॥ " " तुका म्हणे तो दृढ साहील यत्नाचें ।

न करी जो वाचे बोले तैसें ।। " इत्यादि श्रीस्वामीमहाराजांचेंच वचनें असून जीव देण्याच्या विरुद्ध त्यांचीं वचनें आहेत. जसें:– " अतित्याई देतां जीव । नये कींव देवासी ।। १ ।। थोड्यासाठीं राग आला । जीव दिला गंगेंत ।।२।। त्यासी परलोकीं नाहीं मुक्ति । अधोगति चुकेना ।।३।। तुका ह्मणे कृष्णरास । स्मरतां श्रम वारिती " पुनः– " नलगे द्यावा जीव सहजचि जाणार । आहे तो विचार जाणा कांहीं ।। १ ।। मरण जो मागे गाढवाचा बाळ । बोलिजे चांडाळ शुद्ध त्यासी ।। २ ।। तुका ह्मणे कांहीं होईल स्वहित । निधान जो थित टाकूं पाहे ।। ३ ।। " याप्रमाणें तुकाराममहाराजांचें स्वतः मत असतां ते उगीचच्या उगीच आपला प्राण देतील असें वाटत नाहीं. " न मातृवधेन न पितृवधेन न स्तेयेन न भ्रूणहत्यया नास्यपापं नच चक्रुषो मुखान्नीलं वा " ( कौषीतकी श्रुति ) ही श्रुति प्रमाण घेऊन ज्ञानियाच्याकडून भयंकर कृत्यें घडलीं तरी ज्ञानी पापी होत नाहीं असें लेखकानें ह्मटलें आहे. ' तुकाराममहाराज वैकुंठास गेले ' इत्यादि वाक्यास लेखकांनीं अर्थवाद ह्मटलें आहे, पण अशानें आपल्याला न आवडलेले वाक्य अर्थवादांत घालावें असें होऊं लागेल ! वास्तविक पाहतां लेखकानें ' स्तुतिपर वाक्य ' असें जें अर्थवादाचें लक्षण केलें आहे तेंच मुळीं अपुरें आहे. ' विधिप्राशस्त्यबोधक वाक्य अर्थवाद ' असें लक्षण पाहिजे होतें. भलत्या वाक्याला अर्थवाद मानल्यास शब्दाला अनियतार्थता येईल. ती तर प्राचीन ऋषींपैकीं किंवा अर्वाचीन आचार्यांपैकीं कोणीच अंगिकार करीत नाहीं. म्हणूनच अर्थवादाचे तीन प्रकार सांगितलें आहेतः– **गुणवाद, अनुवाद, व भूतार्थवाद,** (१) प्रमाणांतर–विरुद्धार्थबोधक वाक्याला अनुवाद म्हणतात; जसें ' आदित्योयूपः । यजमानो प्रस्तरः' इत्यादि. (२) ' प्रमाणांतरप्राप्तार्थबोधक वाक्याला अनुवाद ह्मणतात; जसें 'अग्निर्हिमस्य भेषजं' इत्यादि. (३) उभयविलक्षणार्थबोधक वाक्याला भूतार्थवाद ह्मणतात; जसें ' इंद्राय वज्रमुदयच्छत् ' इत्यादि. पैकीं गुणवाद व अनुवाद स्तुति आणि अधिक प्रवृत्तीचे प्रयोजकच असतात, पण भूतार्थवादाचे स्वार्थीही प्रामाण्य असतें; म्हणजे तो स्तुतिरूपही असतो आणि खराही असतो. याविषयीं देवताधिकरणावरील सर्व भाष्यकारांचें व टीकाकारांचें ऐकमत्य आहे. श्रीतुकाराममहाराज

वैकुंठास गेले या वाक्यांना जरी घटकाभर अर्थवाद ह्मटलें, तरी त्यांचा गुणवादांत व अनुवादांत समावेश कसा होतो हें लेखकांनीं सिद्ध केलें नाहीं, व मला तर समजत नाहींच. राहिलेल्या भूतार्थवादांत त्यांचा समावेश केल्यास त्या वाक्यांना स्वार्थी प्रामाण्य येऊन, पळें करून तुकाराममहाराजांचें देहासहित वैकुंठास जाणें सिद्ध होत आहे. वास्तविक पाहतां लेखकांनीं जी श्रुति प्रमाण दिली आहे, तीच अर्थवादात्मक आहे असें वासिष्ठांत प्राचीन आचार्यांनीं ह्मटलें आहे. ज्ञान हें वस्तुतंत्र असल्यामुळें, तें प्राप्त झाल्यावर त्याचा कोणत्याच कृत्यानें बाध होत नाहीं, ह्मणून तें कर्मरूप नाहीं, असा त्या श्रुतीचा अर्थ असून ज्ञानी पुरुषाची स्तुति त्या श्रुतींनीं केली आहे. पुनः ही श्रुति भूतार्थवादांत येत नसल्यामुळें, ज्ञानी स्तुतिपर लावण्यास कांहीं अडचण येत नाहीं, तसें ऐतिह्य वाक्यांचें नसतें. यद्यपि श्रीमच्छंकराचार्यांनीं उपनिषदांतील आख्यायिकांविषयीं आख्यायिका विद्यास्तुत्यर्थ असतात असें पुष्कळ ठिकाणीं ह्मटलें आहे, तथापि तें भूतार्थवादाच्या दृष्टीनें ह्मटलें असून त्या आख्यायिकांविषयींचें स्वार्थी प्रामाण्य आचार्यांनीं निराकरण केलेलें नाहीं. शिवाय ज्ञानी पुरुषाला मरण्याची इच्छा उत्पन्न होते हें लेखकाचें ह्मणणें विचित्र प्रारब्ध घेऊनही जुळत नाहीं. कारण प्रारब्ध भोग देणारें असून भोगानुकूलच तें वृत्ति उत्पन्न करितें. व्यर्थ वृत्ति उत्पन्न करीत नाहीं. सुख देणाऱ्या सात्विक वृत्ति व दुःख देणाऱ्या राजस वृत्तीच ज्ञान्याच्या प्रारब्धानें उत्पन्न होतात, व्यर्थ तामस वृत्ति उत्पन्न होणार नाहींत, असें स्वामी विद्यारण्यानीं आपल्या जीवन्मुक्तिविवेकांत स्पष्ट ह्मटलें आहे. मरण हा भोग आहे असें कोणीही ह्मटलें नाहीं. कारण ज्ञानियाच्या मरणकाळीं सर्व वासना क्षय पावत असतात, असा सर्व श्रुतिसिद्धान्त आहे. शिवाय "तस्मात् ब्राह्मणः पांडित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत्" या श्रुतीचा विचार करतांना "अनाविष्कुर्वन्नन्वयात्" या सूत्रांत व त्यावरील भाष्यांत ज्ञानियाच्या यथेष्टाचारणाचा निषेध केला आहे. सुरेश्वराचार्य आपल्या नैष्कर्म्यसिद्धींत व विद्यारण्यस्वामी आपल्या पंचदशींत ज्ञानी जर यथेष्टाचरण करील तर कुत्र्यांत व त्याच्यांत भेद नाहीं असें स्पष्ट ह्मणतात. वसिष्ठ तर रामगीतातत्वसारायणांत असें म्हणतात कीं,

" अभिमानविहीनानां समाध्यासक्तचेतसां । स्वेच्छाचारो न षंढस्य वेश्यालौल्यमिवोल्बणम् ॥ " ( अ० ९ श्लोक १२ ) भावार्थः– ज्यांचा अहंकार नष्ट झाला आहे, व जे नेहमीं समाधींत निमग्न आहेत, त्यांच्या हातून, नपुंसकाला जशी वेश्येची इच्छा होत नाहीं, तसा यथेच्छाचार होत नाहीं. सारांश, वर दिलेली श्रुति अनेक आचार्यांच्या व्याख्यानांवरून अर्थवादरूपच मानली पाहिजे. पराशराविषयींच्या मत्स्यगंधागमनाविषयींच्या कथा भूतार्थवादांत येत असल्यामुळें, त्यांच्या योगानें या श्रुतीचें उपबृंहण होऊन ज्ञानियाचें प्रारब्ध तामसही असतें असें जरी घेऊन चाललों, तरी अनियत प्रारब्ध असल्यामुळें, एकाद्या ज्ञानियाचें देहासहित वैकुंठास गमन करण्याचें प्रारब्ध नसतें, हें ह्मणण्याला श्रुतिप्रमाणही नाहीं, व युक्तिप्रमाणही नाहीं. लेखक एके ठिकाणीं ज्ञानियाच्या क्रिया निर्हेतुक असतात असें म्हणतात, आणि त्याच लेखांत दुसरे ठिकाणीं साधूंचा परोपकार सहेतुक असतो, असाही आशय दाखवितात ! तेव्हां आमच्यासारख्या गरीबानें कोणतें सत्य घ्यावें ? पुनः लेखक म्हणतात, सत्पुरुष भक्तिभावानें जें लिहितात तें सर्व खरेंच असतें काय ? त्यांत कवित्व, प्रेमातिशय, अर्थवाद वगैरे कांहींच नसतात काय ? समर्थप्रतापग्रंथांत समर्थ कोठील कोण, असा जो रामाचा संवाद गिरिधरानें वर्णिला आहे तो खरा मानण्याइतके भोळसर कोणी तरी विसाव्या शतकांत असतील काय ? हें लेखकाचें म्हणणें फारच चमत्कारिक वाटतें. सत्पुरुषांच्या बोलण्यांतील काव्य देखील तीव्र संवेगानें सत्य होतें, हें योगवासिष्ठ वाचल्यामुळें लेखकाला ठाऊक असलेंच पाहिजे; तेव्हां त्याविषयीं कांहीं सांगणें नको. सनकादिक व पांडुरंगाची मूर्त्यादिक तुकाराममहाराजांना प्रत्यक्ष दिसले नाहींत असेंही विधान लेखकांनीं केलें आहे ! यावरून देवतांची व मनुष्यांची भेट होत नसते असाही लेखकाचा समज असावा असें अनुमान होतें; परंतु श्रीमच्छंकराचार्यांनीं आपल्या भाष्यांत देवतांचा व पूर्वलोकांचा संबंध होत होता असें आम्ही ऐकितों, जो नाहीं म्हणतो तो जगाच्या विचित्रतेचाच प्रतिषेध करितो असें स्पष्ट म्हटलें आहे; तेव्हां श्रीमच्छंकराचार्य हे विसाव्या शतकांतील लोकांपेक्षां शहाणे नसावे असेंही लेखकाच्या वाक्यावरून सिद्ध होऊं पाहतें !

श्रीकृष्णांनीं दिव्यदृष्टीनेंच अर्जुनाला आपलें मुख्य रूप दाखविलें हें खरें, परंतु तें विश्वरूप असल्यामुळें तेवढें रूप पाहण्याकरितां अर्जुनाला व्यापक सत्वदृष्टीची अपेक्षा होती, तशी कृष्णमूर्ति पाहण्यास नव्हती हें लेखक लिहिण्याला विसरले. साधु चमत्कार करीत नाहींत हें लेखकांचें ह्मणणें खरें धरलें, तरी साधुपुरुषांना योगशक्ति नसतात हें त्यावरून सिद्ध होत नाहीं. सर्व योग ईश्वरप्रणिधानानेंच सिद्ध होत असतात, असें " ईश्वर-प्रसादाज्जितोत्तरभूमिकस्य नाधरभूमिषु संयमो युक्तः " हें योगभाष्यांत स्वतः व्यासानेंच सांगितलें असून, जो ईश्वरप्रसादानें आपण होऊन वरच्या पायरीवर गेला आहे, त्याला खालच्या पायरीवर संयम करण्याची अवश्यकता नाहीं, असा त्याचा अर्थ आहे. पैल पांडुरंगाची मूर्ति उभी आहे ' इत्यादि अभंगाचा अध्यात्मिक अर्थ करावा असें लेखक ह्मणतात, पण ऋषभदेव वणव्यांत शिरले, ते वणव्यांतच कां शिरले, त्याचा अध्यात्मपर अर्थ कां करूं नये, इत्यादि प्रश्न लेखकाला सोडविणें भाग होतें. पैलतीरींच कां उभा राहिला, इत्यादि प्रश्न खरोखरच निरर्थक वाटले नसले, तरी ते मला वाटतात. हा माझ्या बुद्धीचा दोष आहे असें मी मानून घेतों. ब्रह्मवेत्त्याचें सशरीर आकाशगमन श्रीमच्छंकराचार्यांना मान्य होतें याविषयीं त्यांच्याच सूत्रांतून एक उदाहरण देतों. चवथ्या अध्यायाच्या दुसऱ्या पादांतील " स्मर्यते च " या चवदाव्या सूत्रावरील भाष्य पहावें. " स्मर्यतेऽपि च महाभारते गत्युत्क्रान्त्योरभावः— 'सर्व भूतात्मभूतस्य सम्यग्भूतानि पश्यतः । देवा अपि मार्गे मुह्यन्त्यपदस्य पदैषिणः' इति । ननु गतिरपि ब्रम्हविदः सर्वगतब्रम्हात्मभूतस्य स्मर्यते 'शुकः किल वैयासकिर्मुमुक्षुरादित्यमंडलमभिप्रतस्थे पित्रा चानुगम्याहुतो भो इति प्रतिशुश्राव' इति । न । सशरीरस्यैवायं योगबलेन विशिष्टदेशप्राप्तिपूर्वकः शरीरोत्सर्ग इति द्रष्टव्यम् । सर्वभूतदृश्यत्वाद्युपन्यासात् । न ह्यशरीरं गच्छंतं सर्वभूतानि द्रष्टुं शक्नुयुः तथाच तत्रैवोपसंहृतम् ' शुकस्तु मारुताच्छीघ्रां गतिं कृत्वाऽन्तरिक्षगः । दर्शयित्वा प्रभावं स्वं सर्वभूतगतोऽभवत् ' इति । तस्मादभावः परब्रह्मविदो गत्युत्क्रान्त्योः । गतिश्रुतीनां तु विषयमुपरिष्टाद्व्याख्यास्यामः ॥ " भावार्थः— सर्व भूतांचा आत्मा, भूतांना बुद्धीनें आत्मरूप पाहणारा आणि प्राप्यस्थानशून्य असलेला, अशा

ब्रह्मवेत्त्याच्या पदाची इच्छा करणाऱ्या देवांनाही त्याचा मार्ग समजत नाहीं, या भारतवचनांत ब्रह्मवेत्त्याला मरणही नाहीं, व दुसऱ्या लोकांत जाणेंही नाहीं असें सांगितलें आहे. यावर पूर्वपक्षी ह्मणतो, शुक आदित्य मंडळाकडे जात असतां त्याच्या बापानें त्याला हाक मारली असें महाभारतांत सांगितलें आहे. तेव्हां ब्रह्मवेत्त्यालाही गति आहे असें ह्मणावें लागतें. यावर सिद्धान्ती ह्मणतात, हें पूर्वपक्षीचें ह्मणणें बरोबर नाहीं. शुकाचें हें आदित्यमंडळाकडे गमन स्थूलशरीरासहित आहे, स्थूलशरीराला सोडून नाहीं; कारण सर्व भूतांनीं जातांना त्याला पाहिलें असें महाभारतांत सांगितलें आहे. स्थूलशरीरारहित होऊन जाणाऱ्याला सर्व भूतांना पाहतां येणें शक्य नाहीं. या अर्थाचा श्लोक महाभारतांत आहे. शुक तर वायुपेक्षांही शीघ्रगतीचें अवलंबन करून अंतरिक्षामध्यें गेला, आणि आपला प्रभाव दर्शवून सर्व भूतें व्यापून राहिला. या आचार्यांच्या वचनावरून योगी ब्रह्मवेत्त्यांना सशरीर आकाशगमन कांहीं अशक्य नाहीं, हें वेदान्ती ह्मणवून घेणाऱ्यानें कबूल केलेंच पाहिजे. ऋषभ देवाचें वणव्यांत शिरणें लीलारूप होतें, प्रारब्धरूप नव्हतें; कारण ऋषभदेव अवतार असून, अवताराला कर्म नसतें असें शास्त्र सांगत आहे. लेखक कोठें तर ब्रह्मवेत्ते ह्मणविणाऱ्या पाश्चात्यांप्रमाणें (Theosophist) इतिहासाचीं रूपकें करितात, व कोठें इतिहास जसाच्या तसा प्रमाण घेतात ! त्याला संयोगपृथक्त्वन्यायासारखें न्याय देखील लावीत नाहींत. तेव्हां आपल्याला आवडत नाहीं तें घ्यावयाचें नाहीं असा लेखकानें दृढ निश्चय केला आहे असें दुःखानें ह्मणावें लागतें. समर्थप्रताप ग्रंथांतील कथा खरी मानण्याइतका भोळसर विसाव्या शतकांत मी अजून आहेंच ! म्हणून माझा विश्वास तुकाराममहाराज देहासुद्धां वैकुंठास गेले असाच आहे, व तो असाच रहावा ही मी जन्मजन्म आशा करितों. लेखकांनीं शेवटीं तुकाराममहाराजांच्या नांवाचा त्रिकार घोष केला आहे, तेवढा त्याचा उपदेश मानून मी तुकाराममहाराजांच्या नामाचा सप्तवार

घोष करून हा वेडावांकडा लेख श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरणीं समर्पण करितों.

आपला.
गुलाबराव गुंडोजी मोहोड,
माधानकर.

### श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

## यज्ञोपवीत धारणाचा हक्क.

तारीख २८ आगष्ट सन १९१३

वि. वि. मुमुक्षूंत गद्य लेख लिहिण्याचें आज्ञापत्र पोंचल्यामुळें मी हा लेख पाठवीत आहें. या लेखाच्या पूर्वीचे दोन लेख नुकतेच यष्टींत येऊन गेले आहेत. हा तिसरा लेख आहे. पूर्वीच्या दोन लेखांत वेदोक्त प्रकरणासंबंधीं बरेंच उद्घाटन केलें आहे, व इतरांनीं वेदाचा अधिकार मागणें युक्तिदृष्ट्या बरोबर कसें नाहीं, हें मीं आपल्या मतें सिद्ध केले आहे. आतां दुसरा मुद्दा या मुद्द्यामुळेंच उत्पन्न झालेला आहे. तो मुद्दा प्रत्येकाचा यज्ञोपवीताचा अधिकार हा होय. सुतार, सोनार, शिंपी, रंगारी, न्हावी, कहार वगैरे लोक यज्ञोपवीत घालीत असून घालण्याची खटपटही करीत आहेत. मीही त्यांपैकींच एक आहें. पण केवळ यज्ञोपवीतानें माझें समाधान होत नसून मला प्रश्न उत्पन्न होतात ते असेः–(१) आम्ही यज्ञोपवीत घालणाऱ्यांनीं स्वतः काय ब्राह्मण म्हणवून घ्यावयाचें, क्षत्रिय म्हणवून घ्यावयाचें, किंवा वैश्य म्हणवून घ्यावयाचें ? (२) वर्ण हे गुणकर्मानें मानावयाचे, संस्कारानें मानावयाचे, किंवा जन्मानें मानावयाचें ? (३) इतकेंही करून आम्ही जे द्विज होणार ते काय धर्माकरितां कीं द्वेषाकरितां ? (४) आज नाहीं तर उद्यां तरी चर्चारहित द्विजत्व आम्हांला मिळणें शक्य आहे काय ? आतां या चारही प्रश्नांची क्रमानें समीक्षा करूं. प्रथमपक्षीं आम्ही यज्ञोपवीत घालणारे सर्व ब्राह्मण झालों तर सर्व कामधंदे सोडून देऊन केवळ आम्हांला भिक्षुकच झालें पाहिजे; आणि सर्वच भिक्षुक झालों तर सरकारला जबरदस्तीनें या भिक्षुकांना नोकर करावें लागेल, नाहीं तर सर्वच रिटाळ

भिक्षुकांना भिक्षा देणार कोण ? सर्वच आम्ही क्षत्रिय झालों, तर त्याचा प्रतिकार आजपासूनच सरकारला करणें हिताचें होईल. बरें सर्वच वैश्य झालों तर आपसांत चढाओढ लागल्यावांचून राहणार नाहीं. याप्रमाणें वरवर निरीक्षण केलें तरी पहिला मुद्दा चांगलासा टिकत नाहीं. ( २ ) आतां दुसऱ्या प्रश्नांत तीन पक्ष असून, त्यांचा विचार केला असतांही समाधान होत नाहीं. कारण, गुणकर्मानें जाति मानल्यास उठलासुटला यज्ञोपवीत घालण्यास अधिकारी होऊं शकत नाहीं. शिवाय सर्व गुणकर्म एकत्र दिसणारी व्यक्ति एखादीच कदाचित् सांपडूं शकेल, व तशी हल्लींच्या ब्राह्मणांत देखील सांपडणें कठीण. शिवाय, गुणकर्मासंबंधीं निरनिराळे वाद उपस्थित होण्याचा संभव आहे. अहिंसा हा गुण खरा, परंतु वैद्यक क्रिया न केल्यास तो दोषावह होतो. त्याचप्रमाणें सत्यही प्रसंगविशेषीं दोषावह होतें. ज्या सत्यानें हिंसा होत असेल तें सत्य असत्यापेक्षां वाईट असें शास्त्रांत सांगितलें आहे. शास्त्रालाच मानावयाचें नसल्यास मग उगीच ब्राह्मण होण्याची तरी खटपट कशाला करावी ? सारख्या प्रकारचीं गुणकर्में सारख्या मनुष्यांच्या अंगीं येणें शक्य नाहीं. मन वश करण्याला कठीण आहे. आतां दुसरा पक्ष संस्कारासंबंधीं आहे. संस्कार हे गुणकर्मवान् जातिमतिव्यक्तीस करावयाचे कीं, जन्मजातिमति व्यक्तीस करावयाचे ? प्रथमपक्षीं सर्वांचेंच मन सारखें ताब्यांत नसल्यामुळें सर्वांच्या आंगीं गुणकर्म चांगलें टिकत नाहींत; व त्यामुळें एखादा लग्न झालेला मनुष्य क्षणांत शूद्र, क्षणांत क्षत्रिय होऊं शकेल, व एखादा तर अंत्येष्टीच्या वेळींही चांडाळ होऊं शकेल. असें झाल्यानें संस्काराचा निर्बंधच राहणार नाहीं. द्वितीयपक्षीं जन्मजाता कांहीं आहे असा निश्चय झाला पाहिजे. पण तसा निश्चय आम्हां जानवें घालणाऱ्यांच्या मनांत असतां, तर आम्ही ती परंपरा बंद पडूच दिली नसती ! कांहीं दुःखद परिस्थितीमुळें बंद पडली असें जर ह्मणावें, तर एक वेळ विच्छिन्न झालेल्या परंपरेला पुनः मरु व देवापि यांच्यावांचून मूळस्वरूप देण्याला शास्त्र नाहीं. एवढ्याकरितांच जन्मानें जाति मानावी या पक्षाचें ग्रहण केलें तर आम्ही जन्मानेंच द्विज आहों असें मानणें भाग पडतें. पण तसें आम्हीं म्हटलें म्हणजे धर्मशास्त्रान्वयें

जन्मानें शूद्र असा कोणता तरी वर्ण आम्हांला ठेवावाच लागेल. जन्मानें ब्राह्मण होण्याची खटपट करूं लागले तर मग जन्मानें शूद्र मानून राहणारा वर्ग कोणता ! कदाचित् आम्हाला असाही यत्न करावा लागेल कीं, आम्ही उंचवर्णांत जात आहों म्हणून आमच्या खालच्या लोकांना शूद्रवर्णाकरितां राखून ठेवावें लागेल, पण ते पुनः उंचवर्णांत येऊं लागले म्हणजे आम्हीं त्यांना न येऊं दिले तर कलह व येऊं दिले तर धर्मनाश, अशी स्थिति येणार. यावर कोणी ह्मणेल कीं, आम्ही सर्व एका देवाची लेंकरें असून एकजाति होणार तर असें ह्मणणाऱ्यांना माझेंही असें सणसणीत उत्तर आहे कीं, मग यज्ञोपवीतादिक भेदाचीं चिन्हें पाहिजेत कशाला ? पुष्कळ आर्यरहित देशांत एकजाति आहे. यज्ञोपवीतादि चिन्हें उलटीं भेद करणारीं आहेत, सर्वसंकर करणारीं नाहींत. बरें, यज्ञोपवीत घालून आम्ही सर्वच ब्राह्मण झालों तरी आमच्यापेक्षां वरिष्ठ आपल्याला मानणारे लोक आमच्या डोळ्यासमोर राहतीलच. कारण लिंगाईताच्या चन्नबसवाचार्यांनीं लिंग व यज्ञोपवीत घालणाऱ्यांना वैदिकत्व नाहीं, यज्ञोपवीत सोडून लिंग घालणाऱ्यांनाच वैदिकत्व आहे असें "वीरशैवोत्कर्षदीपिकेंत" स्पष्ट म्हटले आहे. तेव्हां त्या एका लिंगाईत समाजाशीं तरी आमच्या यज्ञोपवीत घालणाऱ्यांचें कायमचें भांडण राहीलच; किंवा त्यांना तरी भांडण मिटविण्याकरितां आपलें लिंग सोडून यज्ञोपवीत घालावें लागेल; पण आमचा जसा आमच्या धर्मावर विश्वास नाहीं, तसा तेही लोक आपला धर्म सोडून देण्यास तयार होतील काय ? वीरशैवोत्कर्षदीपिका ग्रंथ देखील त्या मतांत प्राचीन असून प्रमाण आहे. ( ३ ) आतां तिसरा प्रश्न घेऊं. एखादी गोष्ट धर्मासाठीं करावी ह्मटली कीं, मग तिच्याविषयीं कोणत्याहि विकारानें बनलेला आग्रह चालत नाहीं. मृत्यु जसा कोणत्याही जरूरीची अपेक्षा करीत नाहीं, तसा धर्मही कोणाच्याही वैकारिक जरूरीची अपेक्षा करीत नाहीं. आतां धर्म मनुष्यानें आपल्या सोईकरितां केला असें ज्यांचें ह्मणणें असेल त्यांना वेदाचीं व यज्ञोपवीताचीच काय जरूर ? कारण ज्यानें भांडण मिटेल असा Free mason सारखा धर्मच करणें त्यांना इष्ट आहे, त्याप्रमाणें तिसऱ्या पक्षांतील पहिला पक्ष दुर्बल आहे. दुसरा

पक्ष विचारांत आणण्यायोग्यच नाहीं. कारण आमच्या प्रजावत्सल सरकारानें जातीजातींत द्वेष करूं नये, असा दृढ कायदा केला असून आंतून बाहेरून शांतता राहावी अशी आमच्यावरील प्रेमामुळें त्यांची खटपटही आहे. तेव्हां हा प्रश्न कसा उद्भवतो ? ( ४ ) याप्रमाणें चवथा प्रश्नही विचारांत येण्याजागा नाहीं. कारण, जोंपर्यंत धर्माचें बीज आहे तोंपर्यंत आमच्या द्विजत्वाचा प्रतिकार दुसरीकडून सुरूच राहणार व त्यामुळें मागेंपुढें सरकारला देखील हिंदुधर्मशास्त्र बदलवितां येणें शक्य नाहीं. तेव्हां वेदोक्तप्रकरणाप्रमाणें हें अन्य यज्ञोपवीतप्रकरणही कोणत्याही दृष्टीनें निष्फळ मत्सर वाढविणारेंच होईल असें मला वाटतें. कळावें.

हुर्दा. } आपला,
गुलाबराव गुंडोजी मोहोड.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

## शिवगंगा मठाधिपति आचार्यचरणीं विनंति.

तारीख २५ सप्टेंबर सन १९१३.

रा. रा. मुमुक्षुकर्ते यांस:—

वि. वि. मी हा चौथा लेख पाठवीत आहे, त्याचा कृपा करून स्वीकार व्हावा.

धर्म ईश्वरप्रणीत आहे किंवा तो मनुष्यांनीं आपल्या सोयीकरितां निर्माण केला आहे ? असे दोन पक्ष साधारणतः ज्यांच्या मनावर पाश्चात्य ज्ञानाचा संस्कार झाला आहे, त्यांच्या दृष्टीपुढें असतात. दुसऱ्या पक्षाचें म्हणणें—धर्माच्या कडक नियमांना झुगारून देऊन समाजाच्या सोयीनें त्यांत बदल करीत असावें, असें असून पहिल्या पक्षाचें

---

## शंकरदिग्विजय.

मुमुक्षु ता० २८ आगष्ट १९१३

रा. रा. मुमुक्षुकर्ते यांस:—

वि. वि. शिवगंगामठाचे शंकराचार्यपीठाधिपति श्रीसुब्रह्मण्याभिनवसच्चिदानंदभारती शके १८३३ सालीं येथें येऊन गेले. ते म्हणतात कीं,

ह्मणणें असें आहे कीं, ज्यांनीं तो दिला आहे, त्याच्याशिवाय त्यांत कोणत्याही प्रकारचा बदल होणें शक्य नाहीं, फळाच्या दृष्टीनें पाहिलें तर दोन्ही पक्षांत कांहीं मोठासा भेद नाहीं, पण बीजाच्या दृष्टीनें भेद आहे. मनुष्यांच्या सोयीचा धर्म करणें, हें दुसऱ्या पक्षाचें ह्मणणें व प्रसंगीं आपद्धर्म पाळणें हें पहिल्या पक्षाचें ह्मणणें एकच आहे. पण दुसरा पक्ष पूर्वीच्या धर्माला अगदींच झुगारून देण्याला तयार असतो, व पहिला पक्ष ईश्वरानेंच संपद्धर्म व आपद्धर्म सांगून ठेविले आहेत, आपत्काल संपला कीं पुनः संपद्धर्म मनुष्यानें पाळावा, अगदींच पूर्व धर्माचा परित्याग करूं नये, असें ह्मणतो. हाच दोहों पक्षांतील बीजदृष्टीनें व फलदृष्टीनें भेदाभेद होय. मला असें वाटतें कीं, दोन्ही पक्षांचें फल जर एकच आहे, तर पूर्वधर्मत्याग केला पाहिजे, या दुसऱ्या पक्षाच्या ह्मणण्याला कांहीं प्रमाण नाहीं; ह्मणून पहिल्या पक्षाप्रमाणेंच जर धर्माचा विचार केला तर त्याचें स्वरूप असें दिसतें कीं, कोणताही विकार त्याला प्रतिबंधक असून वैकारिक मनुष्याच्या हातून त्याचें प्रतिपादन कधींही सम्यक् होत नाहीं. धर्म प्रतिपादन करितांना विकारांचा परमाणू देखील त्यांत मिसळला नसला पाहिजे. मनुष्य जीव कोटींतील असल्यामुळें त्याचे ठिकाणीं विकार हे असणारच. परंतु खरा धार्मिक असल्यास विकार उत्पन्न होऊन देखील धर्माचें प्रतिपादन जसेच्या तसेंच करूं शकतो, याविषयीं प्रमाण आहेत.

> शक्नोतीहैव यः सोढुं प्राक् शरीरविमोक्षणात् ।
> कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ॥
>
> श्रीमद्भगवद्गीता, अ० ५ श्लो० २३.

असें भगवंतानीं ह्मटलें आहे. याचा भावार्थ असा आहे कीं, विकार उत्पन्न होत असतात, परंतु त्यांच्या वेगाला तो सहन करतो. या ह्मणण्याचा आशय असा कीं, समाधीमध्यें प्रेताला जसे विकार होत नाहींत, तसे योग्याला विकार उत्पन्न होतच नाहींत; पण व्युत्थानकाळीं ते उत्पन्न

---

" शंकरदिग्विजय " विद्यारण्याचा नाहीं. यास प्रमाण प्रथम सर्गांतील नववा श्लोक, त्या श्लोकांत नवकालिदासाच्या नांवाचा उल्लेख आहे, व

होतात; तथापि तो त्यांच्या वेगाना सहन करूं शकतो. उपवासावर ज्यांची श्रद्धा व प्रेम आहे, त्यांना उत्पन्न झालेलाही क्षुधेचा वेग सहन करितां येतो हें दृष्ट आहे. तात्पर्य, विकार असूनही विकाररहित प्रतिपादन करितां येणें शक्य आहे. कथासरित्सागरांत एक कथा आहे, तिचा सारांश असा:— कोणी यशोधन नांवाचा राजा एका वैश्याच्या सुंदर मुलीची मागणी करीत होता. तिचें स्वरूप असें होतें कीं, एक वेळ ज्यानें तिला पाहिलें, त्यानें कामबाणांनीं व्यथित होऊन शेवटीं मृत्युमुखीं पडावें. असें जेव्हां राजानें ऐकलें, तेव्हां इचा मोह पडल्यानें आपलें राज्य कदाचित् सुरळीत चालणार नाहीं, ह्मणून त्यानें तिच्याशीं विवाह करण्याचें नाकारलें. तेव्हां ती मुलगी वैश्यानें प्रधानाला दिली. पण या राजाच्या कृत्यानें मुलीच्या मनाला फारच वाईट वाटून राजाचा सूड घेण्याकरितां त्याला तिनें एकवेळ आपलें मुख मोठ्या प्रयत्नानें दाखविलें. त्यामुळें राजा कामबाणांनीं व्यथित होऊन थोडक्याच दिवसांत व्याधिग्रस्थ झाला व शतावधी वैद्यांच्या उपायांनींही कांहीं गुण येईना. तेव्हां राजाचें असें होण्याचें कारण काय ? हें प्रधानानें समजून घेऊन एकांतांत राजाजवळ जाऊन हात जोडून ह्मणाला कीं, महाराज ! मी आपला दास आहें, तर माझी पत्नीही आपली दासीच आहे; तर इचा आपण अंगिकार करावा. असें गोड शब्दांनीं म्हणाला. तेव्हां राजा मरणोन्मुख होता तरी प्रधानाकडे डोळे वटारून ह्मणाला, “ मी कामानें पीडलों आहें खरा, परंतु मला अधर्म खपत नाहीं समजलास ? माझ्या राज्यांत अशा प्रकारचा अधर्म शिकविणें शासनार्ह असून, तूं माझा आवडता ह्मणून एकवेळ क्षमा करितों. पुढें ही गोष्ट काढशील तर शिक्षा करीन ” असें बोलून नंतर थोड्याच वेळानें राजा मरण पावला. महात्म्यांना विकार उत्पन्न झाले तरी त्या विकारांचें समर्थन ते कधींच करीत नसतात. भगवंतांनीं आपल्या व्यभिचाराचें कधीं समर्थन केलें आहे काय ? पण आम्हां नवविवेकपटूंच्या ज्ञानावर पाश्चात्य विद्येचे संस्कार

---

विद्यारण्यांनीं ‘ नवकालिदास ’ हें पद कुठेंही धारण केलेलें दिसत नाहीं. शिवाय ही वाणी विद्यारण्याच्या वाणीसारखी दिसत नाहीं. भागवतचंपू-

झाल्यामुळें त्याचें स्वाभाविक स्वरूप जाऊन फोडणीच्या वरणाप्रमाणें चटकमटकपणा त्याला आला आहे. गुरुसेवा न करितां जगदुद्धाराची काळजी आम्हाला जगत्कर्त्यापेक्षांही अधिक असल्यामुळें, भौतिक शास्त्राचा व वेदांताचा मेळ कसा होईल, त्याचा आम्हीं यत्न करूं लागलों ! ! Unmoving ether ह्मणजे ब्रह्म, Moving ether ह्मणजे माया. Response ह्मणजे आत्मा. अशीं नवीं नवीं सूत्रें शारीरक सूत्राच्या समन्वयअध्यायांत प्रविष्ट करण्याचा आमचा यत्न आहे. जेथें आह्मांला समन्वय करतां येत नाहीं, तेथें आम्ही क्षेपकत्वादाचा अंगिकार करून समाधान करीत असतों. अनेक श्रुतींच्या समन्वयाकरितां क्षेपक वादासारखी सोपी रीति सोडून देऊन श्रमानें सूत्रें करणाऱ्या भगवान् व्यासाचें आम्हांस मोठें आश्चर्य वाटतें. समुच्चय व विकल्पानें कर्मकांडाची व्यवस्था लावणाऱ्या जैमिनीचें करणें पोरखेळ नव्हे तर काय ? अरे ! जीं वाक्यें आपणास पटत नाहींत, तीं मागून घातलीं म्हटलें ह्मणजे झालें, झट्दिशीं समाधान होतें; मग हा एवढा द्राविडी प्राणायाम पाहिजे कशाला ? हा माझा तर्कटीपणा बाजूस ठेविला तरी धर्माचार्यांच्या मनावर देखील या क्षेपक वादाचा पगडा बसत चालला आहे हें सुचिन्ह नव्हे असें दुःखानें ह्मणावें लागतें. हल्लींचे धर्माचार्य जीव असल्यामुळें त्यांना विकार होणें जरी संभवनीय असलें, तरी उत्पन्न झालेल्या विकारांचा साक्षी होऊन व्युत्थानकाळीं धर्माचें प्रतिपादन यथार्थ करणें हेंच त्यांचें पहिलें व खरें कर्तव्य आहे, असें मला वाटतें. आपल्या ता० २८ आगष्ट सन १९१३ इसवीच्या अंकांत श्रीकृष्ण व्यंकटेश शुक्ल मु० चोपडें—पूर्वखानदेश यांचा लेख आला आहे. त्यांत शिवगंगामठाचे शंकराचार्य श्रीसुब्रह्मण्याभिनवसच्चिदानंद भारती यांचे " शांकरदिग्विजय विद्यारण्यकृत नसून भागवतचंपूकारांचा आहे " असें ह्मणणें दिलें आहे, व त्यावर योग्य आक्षेपही घेतला आहे. आचार्यांचें ह्मणणें " नव कालिदास " हें नांव विद्यारण्यानें कोठें धारण केलें नाहीं; पण स्वतःचा आत्माशीर्वाद घेतांना कवी आपले

---

काराच्या वाणीसारखी दिसते. भागवतचंपूकार आणि दिग्विजय कर्ता एकच. " असें त्यांचें ह्मणणें आहे. डिंडिमकारांनीं माधवाचार्यांचा उल्लेख

ठिकाणीं पूर्व कवींचा आरोप करीत असतात, ही गोष्ट साहित्यप्रसिद्ध आहे. पुनः आचार्यांचें ह्मणणें कीं, भाषाही विद्यारण्यासारखी दिसत नाहीं, पण एकच पुरुष अनेक प्रकारच्या भाषा लिहूं शकतो, हें माझ्या सारख्या अल्पमति मनुष्याच्या ग्रंथावरून देखील दिसून येण्यासारखें आहे. डिडिम व अद्वैतराज्यलक्ष्मीकारांना झुगारून देऊन असें आचार्यांनीं कां ह्मणावें ? या श्रीयुत शुक्लांनीं केलेल्या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, आचार्यांना इंग्रजी येवो किंवा न येवो, परंतु कर्णोपकर्णीं पाश्चात्य क्षेपकवादाचा त्यांच्या मनावर संस्कार झाला आहे, यांत संशय नाहीं. मागें चार पांच वर्षांपूर्वीं मी जगन्नाथाला गेलों होतों, तेव्हां तेथील शंकराचार्यांचें व माझें प्रत्यक्ष भाषण झालें. त्यांत ते ह्मणाले कीं, उपलब्ध असलेलीं सांख्यसूत्रें खास कपिलाचीं नव्हत ! कारण सांख्यकारिकेच्या तुकड्यासारखीं तीं दिसून पडतात. तेव्हां मी त्यांना ह्मटलें कीं, 'ईश्वरासिद्धेः' इत्यादि जीं सूत्रें आहेत, त्या विषयाचा कारिकांमध्यें नामनिर्देशही नाहीं. तेव्हां सूत्रें कारिकांचा तुकडा आहे, असें कसें ह्मणतां येईल ? यावर नवीन लोकांचें हें म्हणणें आहे, माझें नाहीं असें आचार्यांनीं ह्मटलें. हें आचार्य फार सरळ असून गुरुस्थानीं मला पूज्य आहेत. परंतु अशा प्रकारचें प्रतिपादन धर्माचार्यांच्या मुखांतून निघालें म्हणजे मजसारख्या शूद्राला तर 'ब्राह्मणोऽस्य मुखमासीत्' इत्यादि पुरुषसूक्तांतील मंत्र, 'स्त्रीशूद्रद्विजबंधूनां त्रयी न श्रुतिगोचरा' इत्यादि पुराणांतील श्लोक, सर्व मागून लुच्च्या लोकांनीं घातले आहेत, असें ह्मणण्याला कांहींच प्रत्यवाय रहाणार नाहीं. मी ब्राह्मणेतर जातींत जन्मलों असून माझ्या दुर्दैवानें लागलेल्या व्यसनामुळें कोणाशीं बोलतांना प्रसंगीं मला वेदाचें प्रमाण देण्याचें काम पडतें. परंतु मी आपल्या जातीपुढें आपण शूद्रांनीं वेद म्हणावे, असें सांगत नाहीं. कारण जरी मी व्यसनामुळें वेद म्हणतों, तरी मी पातक करीत असून त्याबद्दल मेल्यानंतर भगवान् सूर्यनंदन मला योग्य शासन करणार हें मी पूर्णपणें जाणून आहें. या

---

केला आहे. अद्वैतराज्यलक्ष्मीकारांचेंही मत तेंच आहे हें पुन्हां सांगायला नको. शिवगंगास्वामींचा अभिप्राय असा कां असावा ? हें त्यांचा समा-

व्यसनांतून सोडविण्याला मला कोणीही वैदिक ब्राह्मण भेटला नसून उलट धर्माचार्यही जर क्षेपकवादाचा अंगिकार करीत आहेत, तर मी वेद जरी ह्मणतों तरी हें मी पातक करीत आहे, हा आपला समज सोडून देऊन शूद्राला वेदाचा अधिकार नाहीं, इत्यादि मंत्रांना क्षेपक समजून वेदाची प्रवृत्ति आपल्या जातींत करावी काय ? असें शुक्लाप्रमाणें मीही आचार्यांचे चरणाजवळ विचारण्याचें धाडस करितों. कारण मी शांकरमताचाच अनुयायी आहें. प्रभूंनीं आपलें दीन लेंकरूं समजून मला उत्तर द्यावें. अमुक गोष्ट अमक्यानीं केली कीं नाहीं, ही गोष्ट कोणत्याही अनुमानिक साधनानें समजत नसून दिव्य दृष्टीनेंच कळत असते, असा आर्ष इतिहासकारांचा समज आहे. त्यावर जर क्षेपकवादानें आचार्यमालेचा विश्वास नसेल तर मजसारख्या अडाणी मुलानें तरी तो कसा ठेवावा ? समर्थ बालभाषेंतील गुणदोषाकडे पहात नाहींत, हा माझा विश्वास आहे. माझा लेख टीकात्मक समजून आपणही अव्हेर न करितां आपल्या पत्रीं छापावा अशी आपणास विनंति आहे.

आपला.

गुलाबराव गुंडोजी मोहोड,

मोकदम मौजे माधान,

हल्लीं मुक्काम हर्दा.

ता. ८।९।१३.

---

गम जास्त न झाल्यामुळें चांगलें कळलें नाहीं. याचा विचार विद्वानांनीं करावा, ही विनंति आहे. कळावें.

मु. चोपडें, पूर्व खानदेश.

आपला जिज्ञासु.
श्रीकृष्ण व्यंकटेश शुक्ल.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

# स्वजातिबांधवांचे चरणीं विनंति.

तारीख २ आक्टोबर सन १९१३

रा. रा. मुमुक्षुकर्ते यांसः---

सा. न. वि. वि. हा मी पांचवा लेख पाठवीत आहें तो कृपा करून छापावा.

" अज्ञः सुखमाराध्यः सुखतरमाराध्यते विशेषज्ञः ।
ज्ञानलवदुर्विदग्धः ब्रह्माऽपि तं नरं न रंजयति ॥ "

( भर्तृहरि—नीतिशतक. )

या भर्तृहरीच्या ह्मणण्याप्रमाणेंच हिंदुस्थानांतील पुष्कळ अज्ञ जनांची स्थिति असून आम्हीही त्यांपैकींच आहोंत. येथील M. A. व विलायतेंतील B. A. किंवा Matric झालेला मनुष्य सारखाच असतो असें अनुभवांतीं आढळून आलें आहे. ही गोष्ट मला शिक्षणखात्यांतील एका मोठ्या अधिकाऱ्यानें सांगितली. कांहीं देशी संस्थानांतून खालचें शिक्षण फुकट मिळत असलें तरी उच्च शिक्षणाचा अभाव असल्यामुळें एखाद्या तत्वावर श्रद्धाही ठेवितां येत नाहीं किंवा निर्णय करण्याकरितां तीव्र बुद्धिही विद्यार्थ्यांना संपादन करितां येत नाहीं. मी कांहीं देशी संस्थानें पाहिलीं असून तेथें आमच्या जातीचें व ब्राह्मणांचें जें सख्य नसलेलें दृष्टीस पडलें तो तरी अर्धवट शिक्षणाचाच परिणाम होय, असें माझें मत आहे. अर्धशिक्षित मुलांना देशी संस्थानिक पुढें शिक्षण देतील तर फार बरें होईल. सार्वभौम ब्रिटिश सरकारचें राज्य करण्यामध्यें जीं अनेक धोरणें आहेत त्यांत कोणत्याही धर्माच्या आड न येणें हें धोरण महत्वाचें आहे. त्यामुळें ब्रिटिश सरकारच्या राज्याला मोठी बळकटी असून त्याला कोणत्याही प्रकारें भीति नाहीं. ब्राह्मणांशीं सख्य केल्यानेंच ब्रिटिश राज्याला अधिक बळकटी आहे, असा हिंदी लोकांसाच्या इतिहासांत havell साहेबानें जो दंश दाखविला आहे, त्यांत माझ्या मतें पुष्कळ सत्यता आहे. अजूनही हिंदुस्थानांत मोठा ब्राह्मणवर्ग धर्म आहे कीं, धर्म करण्याला उत्तम सवड मिळाल्यास सरकारला यत्किंचित् तरी

धक्का पोंहचवावा असें ऐहिक सुखाकरितां त्यांच्या मनांत सुद्धां येणार नाहीं असें मला वाटतें. ही मानसिक स्थिति ब्राह्मणवर्गांच्याच वांट्यास आली नसून पुष्कळ धार्मिक हिंदूंच्याही वांट्यास आली आहे त्याबद्दल लेखकाच्या मनाची साक्ष लेखकाला पुरेशी आहे. ब्रिटिश सरकारानें आम्हांला धर्मस्वातंत्र्य दिलें आहे हे उपकार पुष्कळ असले, तरी आमचा धर्म आम्हांला ते सक्तीनें पाळावयाला लावतील तर त्यांचे आमच्यावर आणखी अनंत उपकार होतील. दुसऱ्या धर्मास इजा न करतां आमचा धर्म आमच्याकडून सक्तीनें पाळवून घेणें ही गोष्ट ब्रिटिश सरकारच्या मनांत आल्यास अत्यंत सुलभ आहे. देशी संस्थानिकांना ही मागणी सध्यां करतां येण्यासारखी स्थिति नाहीं, तरी ब्रिटिश सरकाराप्रमाणें देशी संस्थानिक जर ज्याचा धर्म त्याला पाळूं देतील तर आपसांतील भांडण मिटून त्यांच्याही राज्याला पुष्कळ बळकटी येईल. धर्म-बाबतींत ब्रिटिश सरकारनें स्वीकारलेलें धोरण मोठ्या प्रमाणावर आहे, तेंच लहान प्रमाणावर स्वीकारणें देशी संस्थानिकांना अत्यंत हितावह आहे. विवेकाच्या दृष्टीनें विचार केला तरी वेदोक्त प्रकरणांत आम्हां लोकांचा आग्रहीपणाच दिसून येतो. कुराण, बायबल, बौद्ध ग्रंथ किंवा जैन ग्रंथ जबरदस्तीनें आम्हांला शिकवा अशी आह्मी ओरड मुळींच करीत नाहीं. मग वेदच आम्हांस शिकविले पाहिजेत, अशी कलहमूलक ओरड तरी कशाला हवी ? जैन ग्रंथांचें अवलोकन केलें तरी देखील जन्मतः ब्राह्मणादि चार वर्णांचे कडक नियम दृष्टीस पडतात, मूर्तिपूजक श्वेतांबर जैनाचार्य हेमचंद्र सूरिप्रणीत अर्हन्नीति ग्रंथांत तर ब्राह्मणांनीं शूद्राशीं व्यवहार केल्यास जैनधर्मी प्रायश्चित्त सांगितलें आहे. शिवाय वेद शूद्रांनीं म्हणूं नये असें जें ब्राह्मणवर्गाचें म्हणणें आहे तें तरी केवळ स्वरासहित अक्षरांविषयींच असून अर्थाविषयींचें मुळींच नाहीं. भाषांतराविषयीं तर अति हीनवर्णांना देखील अधिकार स्कांदसूतसंहितादि ग्रंथांत सांगून ठेविला आहे. तेव्हां अर्थ शिकण्यास प्रत्यवाय नाहीं तर अक्षरावर इतर वर्णांचा तरी कां आग्रह असावा ? नुसत्या वेदपठण करणाऱ्याला अलीकडील वैय्याकरणी ब्राह्मणशास्त्री देखील दोष देत असतात. त्याला देखील अर्थापेक्षां अक्षराचें महत्व वाटत नाहीं. मग तें इतर वर्णांस कां वाटावें

बरें ? अर्थ समजूं दिल्यावर मग चोरी ती कशी होत असते ! केवळ अक्षरें पढूं नयेत एवढें म्हटल्यानेंच चोरी होत नाहीं. दिगंबर जैन ग्रंथांत स्त्रियांना मोक्ष होतच नाहीं, असें ह्मटलें आहे; परंतु भाषांतरानें हीन वर्णांना व स्त्रियांना देखील मोक्ष होतो असें वैदिकधर्मांत म्हटलें आहे. तेव्हां आम्हांला सवलती दिल्या नाहींत असें म्हणून अक्षरांविषयींच आग्रह धरण्यांत विशेष काय आहे ? ब्रह्मसूत्रांत जो वेदाच्या अर्थाचा निषेध सांगितला आहे, तो अक्षरश्रवणपूर्वकच सांगितला आहे, केवळ अर्थाचा निषेध सांगितला नाहीं. असें असतां आम्हांला अक्षरेंच पढूं दिली पाहिजेत असा आग्रह धरणें इहलोकाची इच्छा करणाऱ्याला मुळींच शोभत नाहीं; आणि परलोकाची इच्छा असेल तर त्याला जीं अक्षरें सांगितलीं आहेत तींच घोकलीं ह्मणजे झालें. वेदोक्ताचा अधिकार मागणाराच्या मनांत आम्ही क्षत्रिय आहोंत ह्मणून आम्हांला अधिकार द्या असें येतें, हें तरी कलींत अवशिष्ट राहिलेल्या धर्माच्या एका पादाचें सुदैव होय; कारण शूद्रास वेदाचा अधिकार नाहीं इत्यादि वचनावर विश्वास ठेवूनच ते आपला क्षत्रियपणा पुढें करीत आहेत; ह्मणून हे लोक दयानंदापेक्षां अधिक विचारी आहेत असें मला वाटतें. दयानंदानें तर शुक्लयजुःसंहितेच्या २६ व्या अध्यायांतील दुसऱ्या मंत्राचा मनसोक्त अर्थ करून शूद्राला वेदाध्ययनाचा अधिकार आहे असें स्पष्ट म्हटलें आहे, आणि गुणकर्मानें वर्णव्यवस्था मानून तीन वर्णांचेंच उपनयन करावें असें म्हटलें आहे. तेव्हां हा परस्परविरोध नित्य चिंत्य असाच राहणार. आमच्यामध्यें शूद्राला वेदाधिकार नाहीं, या वचनावर विश्वास ठेवण्यापुरता तरी ओलावा असल्यामुळें देशी संस्थानिकादि सर्व स्वजातिबांधवांपाशीं मी गरीब विनंति करितों कीं, बापहो ! आपसांत भांडूं नका. धर्मबाबतींत तरी ब्रिटिश सरकारच्याच धोरणाचें अनुकरण करा. अर्थ जर तुम्हांला शिकतां येतो तर अक्षरांविषयीं उगाच आग्रह करूं नका. ज्याचा त्याचा धर्मवेडेपणा ज्याच्या त्याच्याजवळ राहूं द्या. केवळ अक्षरें न पढविण्यानें तुमच्या बुद्धीच्या उन्नतीस अडथळा होत नाहीं. बिभीषणाला जसें रामापासून राज्य मिळवावयाचें होतें, त्याप्रमाणें मला ब्राह्मणापासून कांहीं मिळावयाचें

नाहीं. माझ्या व्रतादिकांस पैसे देणारे बहुधा ब्राह्मणेतरच असून उलट हर्दा, थूगांव आदि ठिकाणीं ब्राह्मणांच्या हातून थोडासा माझ्याविरुद्ध प्रयत्नही झाला होता; असें असतांही मला जें विचारानुकूल वाटतें तेंच लिहितों, विकारानें कांहींही लिहीत नाहीं. माझी विनंति मानिल्यास आपलें सर्वांचें हितच आहे. ह्मणून गरीबाच्या वाणीचा अव्हेर करूं नका. निदान विचार तरी करा. श्रीआळंदीवल्लभ ज्ञानेश्वरमहाराज आपणा सर्वांस सुविचार व सुबुद्धि देवोत.

| | |
|---|---|
| हल्लीं मु० मुंबई, | आपला, |
| ता. २८।९।१९१३. | गुलाबराव गुंडोजी मोहोड, |
| भाद्रपद व० १२ १८३५ | मुकदम नावान. |

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

# जातिभेदविषयक संवाद.

तारीख ६ नोव्हेंबर सन १९१३

रा. रा. मुमुक्षुकर्ते यांसः—

वि. वि. मी पुढील लेख पाठवीत आहे तो कृपा करून छापावा. हा लेख जिज्ञासु–धार्मिक–संवादरूपानें असून कांहीं किरकोळ मुद्यांची शांत चर्चा केली आहे.

जिज्ञासुः—ब्राह्मणांनीं आमच्या हातचें जेवण जें नाकारलें आहे तें आमच्यापासून विद्या चोरून ठेविली म्हणून आम्ही विष देऊं या भीतीनें नव्हे काय ?

धार्मिकः—छेः भलतेंच ! तूं कूर्मपुराण ऐकून पहा. त्यांत शूद्राचें हातचें कोणकोणते पदार्थ खावेत तें लिहिलें आहे; व ते राजाच्या अन्नाप्रमाणें परिक्षून पहावेत असेंही कोठें लिहिलेलें नाहीं. घरच्या स्वयंपाकापेक्षां त्या पदार्थांत विषाचा विनियोग करतां येणें अधिक सोपें आहे, असें असून ब्राह्मणांनीं शूद्रावर विश्वास टाकला आहे. शिवाय सर्व ऐहिक धंदे ब्राह्मणांनीं इतर जातींच्या हातीं दिले आहेत. केवळ तोंडाचाच धंदा आपल्याकडे घेतला आहे. प्रत्येक जातीनें एकी केली तर ब्राह्मणाला घर बांधून देण्याला सुतार–लोहार देखील मिळणार

नाहींत. ही कल्पना त्यांचे मनांत आली नसेल असें ह्मणतां येणार नाहीं; पण त्यांनीं तडजोड केली नाहीं. शूद्रापेक्षां घरच्या बायकोला विष घालतां येणें अधिक सोपें आहे, पण त्या भीतीनेंही वेद पढवावे असें म्हटलें नाहीं. इतिहासाचें अवलोकन केलें तर सर्वच ब्राह्मण ब्रह्मचारी होते असें नाहीं. कोणाला स्त्रीचा प्रेमा नव्हता असेंही नाहीं. म्हणून अशा प्रकारच्या खुळ्या कल्पना करणें तुझ्यासारख्या जिज्ञासूला शोभत नाहीं असें मला वाटतें. धंदे चोरून ठेविल्यानें जितके आजच्या कालांत लोकांचे अडत आहे, तितके धर्म चोरून ठेविल्यानें अडत नाहीं. पश्चिमेकडे राष्ट्रीय बाब व धर्माची बाब हे दोन निराळे मानले जातात, त्याचेंही कारण हेंच आहे याचा तूं चांगला विचार कर व व्यर्थ भांडणाचें मूळ मनांतून काढून टाक.

जिज्ञासुः— यापेक्षां धर्मांतर करणें मला बरें वाटतें. हिंदुधर्माच्या मताप्रमाणें धर्मांतर करणें चांगलें आहे किंवा नाहीं ?

धार्मिकः— मुळींच नाहीं. दुसऱ्या राष्ट्रांत जाऊन वसाहती करणें जसें राष्ट्राला घातक आहे, त्याप्रमाणें धर्मांतर करणेंही धर्माला घातक आहे. तसेंच दुसऱ्या देशांतील लोक आपल्या देशांत येऊं देणें जसें राष्ट्राला घातक आहे, तसें दुसऱ्या धर्मांतील लोक आपल्या धर्मांत घेणेंही घातक आहे. शिवाय धर्मांतर केल्यानें अमुक धर्म उच्च व अमुक धर्म नीच अशी भेदबुद्धि उत्पन्न होत असते. सर्व धर्म सारखेच परमेश्वराकडे जातात अशी समबुद्धि राहत नाहीं. बरें धर्मांतर करण्यानें भांडणाचें मूळ निघून जाईल असें जें वाटतें ती निखालस चूक आहे. कारण सर्वच लोक प्रत्येकाला आपआपल्या धर्मांत घ्यावयाला लागले, तर भांडण उलटें चौपट जुंपणार आहे. कारण हिंदूचा मुसलमान केलेला हिंदूंस चालत नाहीं. छत्तीसगडांतील Christian केलेले चांभार पुनः आपल्या धर्मांत जातात म्हणून मिशनरी लोक त्यांना Christian करण्याला भितात. मुसलमानांना फारसे Christian करीत नाहींत.

जिज्ञासुः— हिंदुधर्मांत कांहीं अनीतीचे प्रकार फार आहेत म्हणतात.

धार्मिकः— तसे ते सर्वच धर्मांत आहेत. लिंगपूजा करण्याचा

विधि जसा हिंदुधर्मांत आहे तसा पूज्याचें मांस खाण्याचा विधि ईशपुत्रधर्मांत आहे. कारण धर्म केवळ नीतीवर अवलंबून नसून आगमावर अवलंबून आहे. 'ही बाब वरीच विस्ताराची आहे. ती थोड-क्यांत सांगण्यानें तुला समजावयाची नाहीं.

जिज्ञासुः— मग पतितपरावर्तनाविषयीं आपलें ह्मणणें काय आहे ?

धार्मिकः— कर्ममार्गानें पतितपरावर्तन करण्याला मी अनुकूल नाहीं, पण भक्तिमार्गांत पतितपरावर्तनाविषयीं मी अनुकूल आहें. कारण आपली पूर्वीचीच भक्ति संस्कारानें दृढ होणारी असते. धर्मांतर केले-ल्यांची मरतांना मानसिक स्थिति चांगली नसते हें MaxMuller नीं दिलेल्या गोरे शास्त्रीच्या उदाहरणावरून तुला कळेल. पूर्वीचें प्रेम काढून दुसऱ्या ठिकाणीं ठेवणें साधारण मनुष्याला असाध्य आहे. महात्म्याविषयीं मी कांहीं बोलत नाहीं; कारण ते धर्माधर्माचे पलीकडे गेलेले असतात. संदीपनासारख्या गुरूलाच पुत्रापेक्षां शिष्यावर अधिक प्रेम ठेवतां येतें. पण तुझ्या—माझ्यासारख्याला तर दत्तक घेतलेल्या आईवर प्रेम ठेवतां येत नाहीं, हा स्पष्ट अनुभव आहे व त्याचमुळें दत्तक मातापुत्रांचीं भांडणें कचेरीपर्यंत जातात हें आपण पहातों. जे धर्मांतर करितात त्यांचें आईबापांइतकें देखील धर्मावर प्रेम नसतें. तेव्हां त्याच्या हातून धर्मकार्य तें काय होणार ? धर्म सर्वांच्या आंत असणारी मनोवृत्ति आहे. तिचें मूळ अंतःकरणाला अधिक चिकटलेलें असलें पाहिजे, पण बाह्य कुटुंबाच्या प्रेमाइतकीही तिला जो किंमत देत नाहीं तोच अनेक धर्मांतरें करितो.

जिज्ञासुः— मग सर्व धर्मांचें ऐक्य कसें ओळखावें ?

धार्मिकः— तें आचाराच्या द्वारानें ओळखावयाचें नाहीं तर विचाराच्या द्वारानें ओळखावें लागतें. बरें जातिजातींमध्यें भोजन जरी एकत्र झालें तरी सर्वांना सर्व थोडेच खाऊ मागणार आहेत ! पंक्ति श्रीमंतांच्याच होतात, गरिबाला कोणी पुसत नाहीं. ज्या जातींच्या हातचा परस्पर व्यवहार आहे त्या जातींनीं आपल्यांतील गरिबांना तरी आश्रय देऊन पहावा म्हणजे झालें. असें प्रत्येक जातीनें केलें तर

भांडणाचें मूळ नाहींसें होईल व उपाशीं कोणी मरणार नाहीं. लहान संघावांचून मोठी संघशक्ति उत्पन्न होत नसते; शिवाय आपत्कालीं युद्धांत, प्रवासांत व प्राण जात असतांना खानपानाचा अडथळा हिंदुधर्मानेंही शिथिल केला आहे; पण धष्टपुष्ट असूनही आपले पायावर उभें न राहतां परान्न झोडणें हिंदुधर्मास पसंत नाहीं इतकेंच.

धार्मिकः—सर्वांना जर आपापल्या धर्मांप्रमाणें एकच फळ मिळतें तर ब्राह्मणांच्या माथीं एवढे कठीण धर्म कां लावून दिले व ते त्यांनीं तरी कां पाळावेत ? कोणता तरी एखादा सोपा धर्म पाळावा म्हणजे झालें.

जिज्ञासुः—ही गोष्ट तूं ईश्वरास विचार. मत्स्याला सहज पाण्यावर तरतां येतें व मनुष्याला अतोनात श्रम करावे लागतात. कोण विषमपणा हा ! मनुष्य व स्त्री सारख्याच दर्जाची असून गर्भाचें दुःख बायकांनाच कां अधिक ?

जिज्ञासुः—मला वाटतें तें त्यांच्या कर्मांप्रमाणें आहे. जसें पाणी सर्व झाडांना साधारण कारण असून त्याचें त्याचें बीज असाधारण कारण आहे; ज्या कर्मानें रोग उत्पन्न होतो त्या रोगावरील वर्ज्य पदार्थांच्या वैद्यशास्त्रीय नियमांचा त्रास त्याच कर्मानीं सोसावा लागतो तो जर सोसला नाहीं तर रोग वाढतो व वैद्यशास्त्राचें कांहीं चालत नाहीं; जितका जितका रोग जास्त तितका त्याला वर्ज्य–प्रतिबंध जास्त. तसेंच जितका जितका आपल्या कर्मानें जो खालीं उत्पन्न होतो तितके तितके त्याला जास्त प्रतिबंध असतात. तसाच जितका जो उंच उत्पन्न होतो तितकी त्याला जबाबदारी जास्त असते. सर्वच गोष्टी सर्वांना सुलभ नाहींत. मनुष्य उच्च आहे. त्याला आकाशांत उडण्याकरितां विमानादिकांचे श्रम करावे लागतात. पक्ष्यांना ते करावे लागत नाहींत, तर त्यांना बोलण्यावगैरेचे इतर प्रतिबंध आहेत. तसें उच्च ब्राह्मणवर्गाला कठीण धर्म सांगितला आहे. खालच्या वर्गाला तेवढा कठीण सांगितला नाहीं, तर इतर वैदिक प्रतिबंध अधिक आहेत. मिळून बेरीज सारखीच. म्हणून कोणी कोणाबद्दल मत्सर करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

आतां वेद ह्मटल्यानें आम्ही तुह्मांला स्वर्ग देऊं असा पट्टा लिहून दिल्यावरची गोष्ट निराळी.

जिज्ञासुः— मग भक्तीनें एकत्र झालेल्या सर्वांनीं सर्वांचे हातचें जेवावें काय ?

धार्मिकः— छेः जेवणें हें भक्तीचें फळच नव्हे. भक्तीचें फळ एकादशी. जेवणें तर कुत्र्याच्या योनींत देखील सुलभ आहे. त्याच्याकरितां पतितोद्धार कशाला पाहिजे ? जेवतांना चित्राहुति घालणें इत्यादि कर्मकांडाची जरूरी आहे एवढ्याकरितां जेवणें यथाव्यवहारच झालें पाहिजे. धर्माचें ऐहिक प्रयोजन मनांत धरून धार्मिक व सामाजिक प्रश्नांचा मेळ घालण्याची तूं खटपट करूं नको.

जिज्ञासुः— महात्मे विश्वकुटुंबी असले पाहिजेत असें ह्मणतात. आणि असले मनांत तर आपलेपणाचा संकोच फारच दिसतो.

धार्मिकः— विश्वकुटुंबी वर्तन म्हणजे ब्रम्हरूपानें विश्व हें एक आहे असें पाहणें होय, जगद्रूपानें तें एक आहे असें पाहणें नव्हे. नथनी व बाळ्या एकाच सोन्याच्या होतात म्हणून नथनी कानांत व बाळी नाकांत घालणें शोभेल काय ? घट व शरावामध्यें माती एक असते पण तेवढ्यानें शरावामध्यें पाणी भरणें हितावें होत नाहीं. जगद्रूपानें जर आपलेपणा वाढवावयाचा असेल तर जेवणाच्या ताटावरील माशा वारण्याचें कांहीं कारण नाहीं. ढसणाऱ्या चिलटांकरितां मच्छरदाणी नको व प्लेगजंतूंच्या निवारणार्थ कमिशन बसविण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. तुझ्या बायकोवर व मुलावर प्रत्येकजण हक्क दाखवूं लागला तर तुला आवडेल काय हें खरेंच सांग बरें ? अशानें तर समाजाच्या सुधारणेच्याऐवजीं उलटा लवकरच नाश होईल. दाय विभाग कायद्याची जरूरी राहणार नाहीं. कोणी कोणास उपसर्ग देऊं नये इतका आपलेपणा वाढवावा असें तुला ह्मणतां येणार नाहीं. कारण सर्वत्र जर आपलेपणा आहे तर उपसर्ग कोण कोणाला देणार व उपसर्ग देणारा उरला आहे तर आपलेपणा कशाचा ?

जिज्ञासुः— असानें तर उच्च मनोवृत्तीही नाहींशा होतील व

आपली जाति सोडून दुसऱ्या जातीवर कोणीही दया करणार नाहीं.

धार्मिकः—– मनुष्यादिक जातिभेद सत्वगुणाच्या संकोचाकरितां नाहींत, तर रजोगुणाच्या संकोचाकरितां आहेत. जेवणें, खाणें, लग्न करणें इत्यादि विषयांना आळा बसावा ह्मणूनच जातिभेद शास्त्र सांगतें. दया वगैरे सात्विक धर्म आहेत ते कोणावरही करण्याकरितां जातिभेद अडथळा करीत नाहीं. शिवाय दया करणाराला जेवणाच्याऐवजीं जवळचें अन्न दुसऱ्याला द्यावें लागतें. तेव्हां जातिभेदाविषयीं दयेचा प्रश्न उत्पन्न होत नाहीं. आतां एखादी महारीण जर विधवा झाली तर तिला एखाद्या ब्राह्मणानें बायको करून घेणें या दयेला जातिभेद अडथळा करतो खरा, पण तेवढा अडथळा स्वतःची मुलगी विधवा झाली तरी तो करतो.

जिज्ञासुः—– हिंदुधर्मापेक्षां इतर धर्माचे लोक सृष्टींत फार आहेत.

धार्मिकः—– पहिलें कारण कीं, हिंदुधर्माकडून इतर धर्मावर आपत्ति आल्या नाहींत. हिंदुधर्मावर सर्व बाजूंनीं आपत्ति आल्या असूनही त्याचे तेवीस कोटी लोक आज हयात आहेत. इतका आपत्कालीं टिकाव धरणें हें कांहीं थोडें नव्हे.

जिज्ञासुः—– आह्मांला असें वाटतें कीं, एखादे दिवशीं हिंदुधर्म अगदीं नष्ट होईल. कारण त्याचीं योगशास्त्रासारखीं शास्त्रें फार कठिण आहेत. व तीं थोडक्याच लोकांत रूढ होण्यासारखीं आहेत.

धार्मिकः—– हिंदुधर्म अगदीं स्वाभाविक आहे. सांसारिक सुख सगळ्यांनाच सारखें मिळत नाहीं. हा सृष्टिनियम आहे. त्यामुळें कंटाळून जाऊन विषयाचा परित्याग करणारे जे थोडके लोक निघतील त्यांच्याकरितांच योगशास्त्रासारखीं शास्त्रें हिंदुधर्मांत आहेत. सृष्टींतील दुःख बंद पडावयाचें नाहीं, तोंपर्यंत वैराग्य बंद पडावयाचें नाहीं, व जोंपर्यंत वैराग्य बंद पडावयाचें नाहीं, तोंपर्यंत योगशास्त्रही बंद पडावयाचें नाहीं. आतां थोड्या माणसांजवळ तें राहील एवढें खरें पण तें थोड्याकरितांच आहे. सुखदुःखाच्या अनुमानानें कर्माचा नियम अबाधित आहे; व जडाच्या हातून कार्य होत नसल्यामुळें चेतनसंबंधीं

नियम अबाधित आहेत. एवढ्याचकरितां हिंदुधर्म अबाधित आहे. वरसा, माझें स्पष्ट मत असें आहे कीं, ज्यांनीं त्यांनीं आपल्या धर्माप्रमाणें वागूनच सिद्धि मिळवावी. परमेश्वर कोणाचाही पक्षपाती नसल्यामुळें तो त्यांतच राजी आहे. हें बोलणें चाललें असतां जिज्ञासूनें धार्मिकाला अनुमोदन देऊन शेवटीं तोही धार्मिक झाला. हें पाहून लेखकास फार आनंद वाटतो. ह्मणून ही आनंदाची बातमी मुमुक्षुकांचे चरणीं समर्पण केली आहे.

आपला,

हर्दा. } गुलाबराव गुंडोजी मोहोड,
ता. ३०।१०।१३. } माधनकर.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

# हिंदु व महंमदादि.

तारीख ५ मार्च सन १९१४.

लेखकः—गुलाबराव गुंडोजी मोहोड, माधानकर हर्दा मु. हर्दा.

मुंबईस आपण सांगितल्याप्रमाणें मी हा लेख पाठवीत आहें तो कृपा करून येत्या अंकीं छापावा.

माझ्या मतें हिंदुमुसलमानांत धर्मसंबंधीं सर्वदा सख्य आहे; कारण द्वेष धार्मिक किंवा राजकीय असा दोन प्रकारचा असूं शकतो. त्यांत धार्मिक द्वेषच लोकांच्या धर्मश्रद्धेनें परंपरागत टिकूं शकतो. " वारांगनेव नृपनीतिरनेकरूपा " या भर्तृहरीच्या ह्मणण्याप्रमाणें राजकीय द्वेष कधींच चिरकाळ टिकूं शकत नाहीं. माझ्या मतें हिंदुमुसलमानांत धार्मिक द्वेष उत्पन्नच झाला नाहीं व होणें शक्य नाहीं, ह्याकरितां प्रथम मुसलमान धर्मदृष्टि घेऊन व नंतर हिंदुधर्मदृष्टीनें विचार करूं. रसुल्लिला महंमद पैगंबर जोंपर्यंत होते तोंपर्यंत हिंदुस्थानाशीं व मुसलमानाशीं तादृश संबंध इतिहासानें सिद्ध होत नाहीं. महंमदपैगंबरच्या व आर्येतर लोकांच्याच धर्माकरितां लढाया झाल्या असतील. कदाचित् मुसलमानी इतिहासाचें परिशीलन केलें ह्मणजे हिंदुस्थानांत त्यांच्या राजकीय इतिहा-

साचेंच स्वरूप प्रकट झालें असें दिसून येतें. मौलालीच्या मुळापासून शिया व सुन्नींतील लढा मुसलमानांत आपसांत चालू आहे. आणि तो लढा मुसलमानांच्या धार्मिक इतिहासांत नमूद झाला आहे. कदाचित् कोणाच्या मतें मौलालीच्या मुळापासून हा लढा नसेलही. पण तो हिंदु मुसलमानांतील लढ्याच्या पूर्वींचा खास असून धार्मिक इतिहासाच्या स्वरूपानें तो पुढें आला आहे. हिंदूंच्या धार्मिक इतिहासांत जसें देवासुर-संग्रामानें ठाणें दिलें आहे, त्याचप्रमाणें मुसलमानांच्या धार्मिक इतिहासांत शियासुन्नींतील लढ्यानें कायमचें ठाणें दिलें म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. हिंदुधर्मांत ज्याप्रमाणें कर्मकांड, उपासनाकांड व ज्ञानकांड असे तीन विभाग आहेत तसेच शर्यत, तारिकत, आणि हकीकत असे मुसलमानी धर्मांतही आहेत. हकीकती लोक सुफी ( Sufi ) धर्माचे असून सुफी धर्म महंमद पैगंबरापासूनच निघाला आहे असा त्या लोकांचा समजही आहे. कांहीं शर्यती मुसलमानांनीं हकीकती मुसलमानांचा छळ केल्याचा इतिहास आहे. पण तसाच एका काळीं हकीकती लोकांचा शर्यती लोकांपाशीं मान होता असेही इतिहास आहेत. सर्व कांड व धर्म परमेश्वरापासूनच आले आहेत, या समजुतीमुळें हिंदुधर्मांत मात्र असा भयंकर प्रकार घडला नाहीं. ख्रिश्चियन ( Christian ) धर्माची स्थिति तर याहीपेक्षां विलक्षण आहे. त्या लोकांची समजूत अशी आहे कीं, क्रियाकांडात्मक धर्म ईश्वरापासून आला असून तत्वज्ञान ( Philosophy ) जीवबुद्धींतून निघालें आहे. त्यांची ही समजूत परंपरागत चालत आल्यामुळें धर्माची व तत्वज्ञानाची कायमची फुटाफुट झाली आहे. हिंदूंचा व मुसलमानांचा असा समज आहे कीं, कर्मकांड व ज्ञानकांड किंवा शर्यत व हकीकत या सर्व गोष्टी ईश्वरापासूनच आल्या आहेत. महंमद पैगंबर आपल्या आयशा नामक स्त्रीच्या मांडीवर निजले असतां बेहस्त (स्वर्ग) पेक्षांही हा मित्र वरिष्ठ आहे. असे उद्गार काढल्याची गोष्ट सुफी ( Sufi ) सांगत असतात. केवळ मृगचर्म मात्र घेऊन राहणारा तापस व लोंकरीचें टोपरें घालून राहणारा सुफी हे शरीरानें दोन असले तरी मनानें एकच म्हटलें पाहिजेत. ख्रिश्चन धर्माचें व मुसळमानी धर्माचें कधीं ऐक्य झालें तरी

सुफी धर्माच्या द्वारेंच होईल असें Max Muller साहेबानें आपल्या पुस्तकांत ह्मटलें आहे; पण माझ्या मतें हिंदु धर्माचें व मुसलमानी धर्माचें ऐक्य होईल असें म्हणावें लागत नाहीं; तर तें आजच आहे. मी वारंवार उत्पन्न होणाऱ्या गवताप्रमाणें ७७० वेळ जन्मलों "हफत् सद हफ्तात् कॉलिफ दीदा अम् । मिस्लसब्जा कि बारहारो हिदा अम् असें ह्मणून पुनर्जन्माचें तत्व जलालुद्दिन रूआ साहेब यानीं आपल्या " मस्नवी एमानवी " नामक ग्रंथांत कबूल केलें आहे. परमेश्वराला विसरणें याचेंच नांव संसार आहे. बायका मुलांचें नांव संसार नाहीं. " चीस्त दुनिया अस् खुदा गाफिल बुदन । नेकमाषेतुक्रबो फर्जन् दजन् । " इत्यादि पारशी वचनांत अज्ञानापासूनच बंध होतो या आर्यांच्या कल्पनेशीं सुफीच्या कल्पनेचें साम्य आहे. ऋग्वेदादि कर्मकांडाला जसें आर्यांनीं मुंडकोपनिषदांत अपराविद्या मानलें आहे, तसें पोथीपासून ज्ञान होणार नाहीं. असें एका पार्शी वचनेंत ह्मटलें आहे. हिंदु धर्मांतही " कनिष्ठा प्रतिमापूजा " इत्यादि वाक्य असून सुफी धर्मांतही मूर्तिपूजक म्हणजे एकनिष्ठ भक्त अशी अलंकारिक भाषा होऊन गेली आहे. इमामगज्जालीसाहेबाच्या पूर्वी सुफी धर्माची भाषा अलंकारिक होती. त्यांत मूर्तिपूजकांचा कोणत्या ना कोणत्या तरी दृष्टीनें समन्वय झालाच होता आणि हा सर्व प्रकार मुसलमान हिंदुस्थानांत येण्याच्या पूर्वी झाला असल्यामुळें अर्थातच मुसलमानांच्या व हिंदूंच्या धार्मिक द्वेषाला कोणतेंही कारण उरलें नाहीं. हिंदुस्थानांत मुसलमान आल्यावर देखील शेखमहंमद बाबा रसखान वगैरे हिंदुधर्मी झाल्याच्या कथा भक्तचरित्रांत आहेत. अल्ला या संस्कृत शब्दाचा अर्थ आई असा असून ईश्वरमातृत्वाच्या अपेक्षेनें कुराणांत तो जशाच्या तसाच घेतला आहे. कोणी हिंदुधर्मांतील अल्लोपनिषत् मुसलमानधर्माला मूळ आहे असें म्हणतात. एका पंडिताचा पूर्वीचा श्लोक आहे तो येथें देतों:—

अल्ला देवो देवपूजा नमाजो
कल्पा मंत्रो तीसरोजे व्रतानि ।
काजी स्मार्तो पंडितस्तत्र मुल्ला
ख्वाजाचार्यो नैव शास्त्रप्रभेदः ॥

कोणत्याच धर्मबंधांत न राहून वाटेल तसें वागणें मात्र हिंदुधर्माला संमत नाहीं. याविषयीं एका कवीनें ह्मटलें आहे:—

न संध्यां संधत्ते नियमितनमाजा न कुरुते ।
न वा मौंजीबंधो न च खलु कृतः सोन्नतविधिः ।
न रोजान् जानीते व्रतमपि हरेर्नैव कुरुते ।
न काशी वा मक्का शिव शिव न हिंदु र्न यवनः ॥
" राम रहीमा करिमा केशव अलखनाम सब एकहि है ।
जिसकू तुम बिसमिल्ला कहते वोही बिस्नु हमारा है ॥ "

अशी संतांचीं वाक्येंही आहेत. ही हिंदुमुसलमानधर्मांविषयीं स्थिति असून भविष्योत्तर पुराणान्वयें तर हिंदुधर्मांशीं व ख्रिश्चन ( Chsistian ) धर्मांशीं मूळचेंच ऐक्य आहे. असेंच हिंदुधर्माचें व बौद्ध धर्माचेंही ऐक्य आहे. बुद्धाला हिंदु अवतार मानतात हीच त्याची मोठी साक्ष आहे. हिंदु धर्माचें म्हणणें एवढेंच आहे कीं विचारदृष्टीनें सर्व धर्म एक म्हणूनच सर्वांना गोडीगुलाबीनें वागतां येत असून अधिकारी पुरुषांच्या सोयीप्रमाणें आचार मात्र प्रत्येकांचे भिन्न आहेत; व ते तसेच राहूं देणें हेंच प्रत्येक समाजाला भूषणावह आहे. शिया व सुन्नींतील लढा Roman Catholics व Protestants लोकांतील लढा ज्याप्रमाणें धार्मिक होऊन बसला आहे, तसा हिंदुमुसलमानांतील लढा धार्मिक होण्यास जागा राहिली नाहीं. इतकेंही करून हिंदुमुसलमानांतील लढा कोणाला कल्पावयाचाच असेल तर अग्निपूजक अशा पार्शी लोकांशीं व सैतानानें ज्याला उपदेश केला आहे अशा आणखी कोणाशीं तो सामान्यच कल्पितां येतो म्हणून विशेषतः हिंदुमुसलमानांशीं धार्मिक द्वेष नाहीं, व तो उत्पन्न होणें शक्यही नाहीं. हिंदु व ख्रिश्चन लोकांशीं तर भविष्योत्तरपुराणवाक्यानें द्वेष नाहीं हें सिद्ध होत आहे ख्रिश्चन लोकांनीं उपदेशाचा जो मार्ग धरला त्यापेक्षां मुसलमानांनीं कडक तरवारीचा मार्ग धरला असेल व त्यामुळें हिंदूंत व त्यांच्यांत कांहीं काळपर्यंत लढा उत्पन्न झाला असेल तर तो धर्मामुळें आहे असें कधींही म्हणतां येणार नाहीं. इहलोकच्या कोणत्याही कारणामुळें उत्पन्न होणारा द्वेष तें कारण नष्ट झालें कीं नष्ट होत असतो. दोघां समर्थांचा कांहीं कारणामुळें उत्पन्न

होणारा द्वेष दोघेही आपल्या गरिबींत सोडून देत असतात. किंवा दोघां अज्ञान्यांचा द्वेष शहाण्यानें नियमन केलें ह्मणजे ते सोडून देतात. मला वाटतें पूर्वी जो हिंदुमुसलमानांत लढा दिसत होता तो अज्ञानामुळेंच असून दयाळू इंग्रजसरकारच्या हातीं आतां राष्ट्र आल्यामुळें व त्याचें नियमन शहाणपणाचें असल्यामुळें हिंदुमुसलमानच काय, पण जितके हिंदुस्थानांत धर्म असतील, त्या सर्वांना लढा सोडून देऊन गोडीगुलाबीनें वागण्याची उत्तम संवय झाली आहे. स्कंदपुराणांत ज्याचा त्याचा धर्म पाळूं द्यावा, तोच राजा उत्तम असें ह्मटलें आहे, व तशी स्थिति आज हिंदुस्थानांत आहे. म्हणून आपापल्या धर्मांत खरें काय आहे हें उत्तम रीतीनें जाणून विचार करावा. धर्मश्रेष्ठावर कोणीही हात टाकीत नाहींत. धर्माची आवश्यकता युरोपासही भासूं लागली आहे. युरोपमध्यें युद्धसामग्री जितकी जास्त तितकी त्याची बळकटी जास्त अशी स्थिति झालेली आहे. पण प्रत्यक्ष युद्धप्रसंग होईल तेवढा टाळण्याचा प्रत्येक राष्ट्र खटपट करीत असतें. त्याचें कारण एखाद्या क्षुल्लक गोष्टीकरितां अतिशय प्राणहानि होण्याचा संभव आहे म्हणून त्याची त्यांना फार भीति वाटते. जडशास्त्राची दृष्टि युद्धसामुग्री सुलभ कशी होईल या विचाराकडे वरीच झुकली आहे. हिंदुस्थानांत ब्राह्मणांच्या हातीं धर्म असून राजकीय व्यवस्था ठेवण्याचें काम क्षत्रियांचें होतें त्यामुळें आपसांत व परकीयांत कितिही द्वेष वाढला तरी त्याचा धर्माशीं प्रत्यक्ष संबध येऊन पोंचला नाहीं, ह्मणूनच हिंदुस्थानांत कोणाशींही धार्मिक द्वेष उत्पन्न होणें शक्य नाहीं. युरोपला देखील शांतता कायम ठेवण्याकरितां कोणत्या तरी धर्माचा अवश्य आश्रय करावा लागेल. ह्मणून मला असें वाटतें कीं उगीच अन्य गोष्टींत न पडतां आपआपल्या धर्मांत खरें काय आहे, याचा ध्यानाच्या योगानें शोध करावा. ध्यानस्थ पुरुषाचा योगक्षेम परमात्मा करितोच. शिवाजीऔरंगजेबाच्या काळीं ऐतिहासिक लढा प्रत्यक्ष असतां देखील शेखमहमदबाबासारखे मुसलमान महात्मे हिंदूंशीं मिळूनच होते माणिकप्रभु वगैरेच्या स्थानीं अजूनही हिंदुमुसलमानांच्या पूजा होतात. तेव्हां हिंदुमुसलमानांत द्वेष आहे असें समजणें

चांगलें नव्हे. हा लेख श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या चरणीं समर्पण करितों.

( श्रीगुलाबरावमहाराज यांजकडून. )

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

# योग आणि विपर्यास.

तारीख २६ मार्च सन १९१४.

१. हिंदुस्थानांत प्राचीनकालीं योगशास्त्राची भरभराट होती. हें कोणासही नाकबूल नाहीं, पण हल्लींच्या काळीं त्याच्या नांवाखालीं भलत्याच गोष्टींचा प्रचार होत आहे, असें मला वाटतें. साधारण संवयी देखील योगाच्या नांवाखालीं मोडत आहेत. वेदांत व्यवहाराशीं जुळवून घेण्याची जशी खटपट होऊं लागली आहे, तशी योगाविषयीं खटपट चालली आहे. " अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यतें " असें भगवंतांनीं मनाच्या निरोधाविषयीं सांगितलें असून " अभ्यासवैराग्याभ्यां तन्निरोध : " ( पातांजल योगदर्शन, पाद १, सूत्र १२, ) असें पतंजलीचें सूत्र आहे परंतु अलीकडे अविरक्त लोकही योगाचा खेळ करून दाखविण्याची खटपट करितात व त्यांत भोळे लोक किमयेच्या नादीं लागून फसणाऱ्याप्रमाणें फसतात, असें पुष्कळ योगी ह्मणविणाऱ्यांचें दर्शन घेऊन माझ्या हें आढळण्यांत आलें आहे. मोठेमोठे शिकलेले लोक देखील एखादा क्षुल्लक चमत्कार पाहून योगाच्या नांवाखालीं फसले जातात. सर्वांवरच सारखा प्रयोग लागू पडत नाहीं हें मेस्मेरिझमचें तत्व योगास लागू करून भोंदू योगी अधिकारीपणाचें बंड माजवीत असतात; व एखाद्यानें प्रश्न विचारला तर अनुभवाच्या गोष्टींत युक्ति कशाला पाहिजे ' असें म्हणत असतात. कित्येक योग्यांनीं दाखविलेले चमत्कार अत्यंत अडाणी गोंड कोरकूंच्या जातींतही मीं त्याच तत्वावर पाहिले आहेत. सारांश, योग म्हणजे कोल्हाट्यांची कसरत अशी स्थिति होऊन राहिली आहे. रामकृष्णमिशन, श्रीकृष्णमिशन वगैरे लहान मोठ्या सभा योगाविषयीं हल्लीं हिंदुस्थानांत विख्यात आहेत. त्यांतून कोणी माझ्या प्रश्नांचें उत्तर देतील या आशेनें मी पुढील प्रश्न लिहीत

आहे. या प्रश्नांचीं उत्तरें योगशास्त्रांत आहेत असा माझा निश्चय आहे. पण ते मलाच उलट कोणी विचारण्याच्या भ्रांतींत पडूं नये. कारण मी गरीब व यःकश्चित असल्यामुळें " लाददेव, लदादेव, लादनेवाला साथ देव. " या ह्मणीप्रमाणेंच स्थिति व्हावयाची. मला वाटतें कीं, गणिताच्या योगानें भावी अनुमान ठरवून एखाद्या पुलाचा नकाशा काढून पुढील योजना ठीक करितां येते, त्याप्रमाणेंच कितीही अनधिकारी पुरुषास योगशास्त्राची कल्पना ठीक देतां येते. त्याच्या विशेष अवस्थेसच मात्र अनुभवाची जरूरी आहे. " अथयोगानुशासनं " योगदर्शनपाद १, सूत्र १. या सूत्रांतील "अथ" शब्दाचा अर्थ करितांना भाष्यकारांनीं हा आनंतार्थार्थी नाहीं, असें ह्मटलें आहे; ह्मणजे कांहीं विशेष अधिकार प्राप्त झाल्यावरच योग करावा असा विशेष अर्थ कोणीं समजूं नये, तर प्रत्येकास आपल्या अवस्थेंत थोडाबहुत योग करितां येतो, असा त्याचा ध्वनि आहे. अभ्यासाचें व वैराग्याचें पाठबळही त्याच नियमानें वाढवीत गेलें पाहिजे. पण अलीकडे पहावें तर त्रोटक, प्राणायाम, हातवारे इत्यादि अभ्यासाच्या मागें लोक लागले असून वैराग्याविषयीं शून्य आहे. त्यामुळेंच इंग्रजी भाषेंत योगास ology हें नांव प्राप्त होण्याच्या ऐवजीं ism असें नांव प्राप्त झालें आहे! "ते समाधावुपसर्गा व्युत्थाने सिद्धयः" योगदर्शनपाद ३, सूत्र ३७. या सूत्रांत महर्षिवर्यांनीं सिद्धींची निंदा केली आहे. पण आतांचे योगी अत्यंत क्षुल्लक सिद्धींच्या मागें लागले आहेत. यांच्याकडून एक साधारण आक्षेप येत असतो, तो असाः– या क्षुल्लक कृति करून दाखविल्या नाहींत तर योग अगदीं नष्टप्राय होऊन जाईल! या आक्षेपाला माझेंही उत्तर आहे कीं, या क्षुल्लक कृति दाखविल्या तर योग अगदीं नष्टच होऊन जाईल. कारण त्याच्या योगानें अभ्यासाचें पाठबळ जें वैराग्य तें नाहींसें होऊन संसारांत प्रत्येक गोष्ट इच्छाशक्तीनें मिळवून घेऊं अशी हांव सुटत असते. दुसरा या लोकांचा आक्षेप असा कीं वनांत जाऊन बसणाऱ्या साधूंचा आह्मांस सध्यां उपयोग नाहीं. कांहीं समाजाचें कार्य करणारे महात्मेच पुढें आले पाहिजेत. हा आक्षेप मला शिरसामान्य आहे; परंतु इतका समाजावर उपकार करणें देखील

अत्यंत वैराग्याशिवाय होत नाहीं, हें देखील या आक्षेपकारांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे. घरांत एकांतीं बसून अग्नींत प्राण देण्याला जशी देहाची आशा सोडावी लागते, तशीच ती धारातीर्थी प्राण देण्यालाही सोडावी लागते. आपला तकीराम गार करण्याच्या उद्देशानें कोणताच उद्योग साध्य होत नाहीं. दुसऱ्यांवर अंमल चालवावयाचा इतकाच सध्यांच्या योगाचा अर्थ होऊन राहिला आहे. पण ही शक्ति थोडीबहुत सगळ्यांसच लाभली तर जीवनार्थकलहामुळें योगीलोकांमध्येंही परस्परयुद्ध होणार नाहीं काय ? हिप्नॉटिझमसारख्या क्षुल्लक गोष्टी आपल्याकडे वामतंत्रातून अनेक ठिकाणीं चमकत आहेत. म्हणून तिकडे लक्ष न देतां खऱ्या योगासंबंधांतच मी कांहीं प्रश्न करण्याचें धाडस करीत आहें. मी लेंकरूं म्हणून माझ्या तोंडावर थापड मारून माझी समजूत घालण्याच्या उद्देशानें तरी कोणीं या प्रश्नांचीं उत्तरें दिल्यास मी त्यांचा मोठ्या आनंदानें स्वीकार करीन व उत्तरें पटल्यास त्या महात्म्याच्या दर्शनाचाही प्रसंग लवकरच आणीन.

प्रश्न १ लाः– चित्तवृत्तींचा निरोध हें योगाचें प्रयोजन आहे, आणि त्या करितां कांहीं ध्यानाचीं आलंबनें सांगितलीं आहेत. पण चित्ताचा हा एक स्वभाव आहे कीं, जिकडे त्याला लावावें, तेंच त्याचें व्यसन होतें. " मनाचेनि एक निकें । हें देखिलिया गोडीचिया ठाया सोके । " असें तातांनीं स्पष्ट ह्मटलें आहे. तेव्हां सालंबनाचें अत्यंत ध्यान करितां करितां ध्येयाकार झालेलें चित्त ध्येयाचा उपमर्द करून सविकल्प सालंबनास सोडून निर्विकल्प समाधींत प्रवेश करितें कसें ? यावर कोणी असें ह्मणेल कीं, स्थूल स्थूल आलंबनें सोडीत जाऊन सूक्ष्म सूक्ष्म आलंबनें घेत जावें. तर यांत त्रिपुटी कायम राहते; ह्मणजे कितिही सूक्ष्म आलंबन घेतलें तरी ध्यान करणारा पृथक् राहतोच. किंवा अत्यंत केलें तर ध्यान करणारा ध्येयाच्या आकारानें भासूं लागतो. स्त्रीचें ध्यान करणारा स्वप्नांत स्त्री भोगणाराच होतो, स्त्री होत नाहीं हें साधारण सर्वांस माहीत आहे. पण अतिशय ध्यान केलें तर मरणानंतर तो कदाचित स्त्रीही होईल, तेवढ्यानें ध्याता निर्विकल्प होईल, हें ह्मणणें संभवनीय नाहीं. बरें, योगापासून ज्ञान झाल्यावर तो निर्विकल्प होईल

असें ह्मटलें तर हें पोपटी उत्तरही बरोबर नाहीं. कारण विवेकख्यातीचा देखील निर्विकल्प समाधींत रोध होतो, असें योगसूत्रांत सांगितलें आहे तें वाचून पहावें. आतां एक वेळ आरशांतील तोंड पाहिल्यावर ज्याप्रमाणें आरशांतील प्रतिबिंबाची गरज नसते त्याप्रमाणें विवेकख्याति झाल्यावर तिची गरज राहत नाहीं; असें उत्तर कांहीं वेदांतग्रंथ चावणारे, चोखणारे देतील हें मी जाणून आहें. पण विवेकख्याति हा वृत्तिसंधीचा मेळ असल्य मुळें गरज नसली तरी प्रयत्नविशेषावांचून तिचा रोध व्हावयाचा नाहीं व तसा योगिग्रांचा अनुभवही आहे इकडे या ग्रंथरसिकांनीं लक्ष दिलें पाहिजे.

प्रश्न २ रा:– दुसरा प्रश्न असा आहे कीं, प्रमाण, विपर्यय, विकल्प, निद्रा आणि स्मृति या पांच प्रकारच्या वृत्तींचा निरोध करावा म्हणून पतंजलिसूत्रांत पहिल्याच पादांत सांगितलें आहे. त्यावर प्रश्न असा कीं, प्रमाणवृत्तीचा निरोध प्रमाणाला जाणणारा जो प्रमाता त्यांत होतो कीं प्रमाणाचा जो विषय त्यांत होतो ? प्रथमपक्षीं आत्म्यांतच वृत्तीचा संकोच झाल्यामुळें वृत्तिनिरोधाचा प्रयत्न संभवणार नाहीं, आणि द्वितीयपक्षीं समाधीला जडता येऊन निर्विकल्प ध्यानाच्या ऐवजीं पुरुष सविकल्पच दृढ होत जाईल. " तत्र स्थिरं चित्तमन्यत्रापि स्थितिपदं लभते " असें तर भाष्यकारांनीं स्पष्ट ह्मटलें आहे; तेव्हां त्याचा अभिप्राय कसा ? कारण कोणत्याहि ठिकाणीं लागलेलें चित्त आपलें तादृश लागलेलें व्यसन सोडून देऊन दुसरें व्यसन लावून घेईल, हें संभवनीय दिसत नाहीं. आतां ' अन्यत्र ' याचा सदृश विषय असा कोणी अर्थ करून उत्तर देईल तर तें उत्तर एखाद्या मुलीस शोभण्यासारखें आहे. अत्यंत विसदृश अशी निर्विकल्पस्थिति त्यापासून कशी प्राप्त होईल या प्रश्नाला तें उत्तर समाधानकारक नाहीं. पुन: असें कीं, "अभावप्रत्ययावलंबनावृत्तिर्निद्रा असें योगसूत्रांत म्हटलें असून तिचा अभ्यासवैराग्यांनीं निरोध करण्यास सांगितलें आहे. व पुढें " स्वप्ननिद्राज्ञानालंबनं वा " पाद १, सूत्र ३८. या सूत्रांत योगाला निद्रा साधनीभूत आहे, असेंही सांगितलें आहे. या सूत्राचा सात्विकी निद्रा असा वाचस्पतीनें अर्थ केला आहे. परंतु मागील निद्रालक्षणसूत्राशीं तो विरुद्ध आहे. कारण, सत्व, रज,

तम हे भेद भावपदार्थांचे नव्हेत हें सहा शास्त्रांपैकीं कोणासही नाकबूल करतां यावयाचें नाहीं. तथापि दुर्जनतोषन्यायानें तसें घेऊल चाललें तरी निद्रावृत्तीचा निरोध करतांना तिचा साक्षात्कार अवश्य करावा लागेल. कारण साक्षात्कार न केलेल्या वृत्तीचा निरोध होणें संभव-नीय नाहीं. साक्षात्कार न केलेल्या वृत्तीचा निरोध होईल तर दुसऱ्या माणसाच्याही वृत्तींचा निरोध करितां आला पाहिजे. व त्यामुळें एक योगी झाला ह्मणजे सर्व जगासच समाधि लागण्याचा प्रसंग येईल ! बरें, निद्रेचा साक्षात्कार ह्मणजे झोंप येणेंच होय. झोंपेमध्यें अभ्यास व वैराग्य कायम कसें ठेवावें ? याप्रमाणें दोन प्रश्न झाले.

प्रश्न ३ राः—तिसरा प्रश्न असा कीं, "प्रच्छर्दनधारणाभ्यां वा प्राणस्य" पाद १, सू० ३४. या सूत्रांत प्राणायाम हा योगाचा वैकल्पिक उपाय आहे, असें सांगितलें आहे. आणि 'तज्जपस्तदर्थभावनम्' पाद १, सूत्र २८. या सूत्रांत ईश्वरप्रणिधान हा दुसरा एक योगाचा उपाय सांगितला आहे. जप हा प्राणायामापेक्षां बाह्य आहे, हें कोणासही कबूल होण्यासारखें आहे. परंतु प्राणायामापेक्षां त्या ईश्वरप्रणिधानाचें फल मोठें सांगितलें आहे. आतां अदृष्टद्वारा तें फळ आहे, असें कोणी उत्तर देईल, तर शुक्लकर्माचा देखील निरोध करावा असा योगशास्त्रांत विधि आहे. हा प्राणायामांतील जप ह्मणावा तर मानसिक जपानें देखील सूक्ष्म नाडीची क्रिया चालू होते, हा निश्चय आहे. आणि प्राणायामापेक्षां कमी प्रतीच्या 'नियम' नांवाच्या अंगांत कायिक, वाचिक, मानसिक प्रणवजपाची गणना हटप्रदीपिकाकारांनीं केली आहे. कुंडलिन्यादिकांची प्रथम भावना आहे कीं, साक्षात्कार आहे ? आद्य-पक्षीं श्रुतींत अमुकच नाडीनें प्राण न्यावा हा नियम व्यर्थ होईल. आणि दुसऱ्या पक्षीं योगजदृष्टीवांचून साक्षात्कार होणार नाहीं, तर ती योगज दृष्टि कोणती ?

प्रश्न ४ थाः—शेवटचा प्रश्न हा कीं, साक्षात्कार ही योगा[illegible] अंत्यदशा आहे कीं, मध्यदशा आहे ? प्रथमपक्षीं योगांत त्रिपुटी सर्व कायम राहील, आणि द्वितीयपक्षीं ध्यान साक्षात्काराच्या पलीकडे जाऊं शकतें. असें मानावें लागेल. तसें मानलें तर प्रसंगीं ईश्वरापेक्षांही

मन व्यापक होऊन ईश्वरालाही गौण मानण्याचा प्रसंग येईल. अथवा साक्षात्काराशीं ऐक्य होण्यापुरतेंच ध्यान मानलें तर सालंबनयोगांत अहंकारनिवृत्ति होणार नाहीं. आणि निरालंबनयोगांत ईश्वरस्थमनाचा व्यापार व्यर्थ होईल. याप्रमाणें सहस्रावधि प्रश्न आहेत. आणि या सर्वांचें उत्तर शपथपूर्वक योगियानां देतां येतें असा माझा निश्चय आहे. शिवाय निरोध क्रियेचाच होत असतो. स्थिरपदार्थांचा निरोध होत नाहीं. रजोगुण हा क्रियास्वभाव असून तमोगुण व सत्वगुण हे स्थिरस्वभाव आहेत. असें सांख्य, वेदांत व योगशास्त्रांचें स्पष्ट ह्मणणें आहे. तेव्हां सत्व व तमाचा निरोध कसा करावा ? एका गुणाच्या उत्पत्तीनें दुसऱ्या गुणाचा निरोध होतो हें जरी खरें आहे, तथापि त्याच गुणापासून दुसऱ्या गुणाची उत्पत्ति होते, हे ही तितकेंच खरें आहे. ह्मणून गुणाच्या निरोधाकरितां गुणभिन्नप्रयत्नाची आवश्यकता आहे. तो प्रयत्न आत्म्याचा, चिदाभासाचा, कीं प्रकृतीचा ? प्रथमपक्षीं ब्रह्म विकारी होईल. द्वितीयपक्षीं असंप्रज्ञात समाधींत आभास–निरोध होणार नाहीं. आणि तृतीयपक्षीं गुणांचें संक्रमण चालूच राहील, ह्मणून योग घडणार नाहीं. याप्रमाणें थोडेसे प्रश्न लिहिले आहेत यांचें उत्तर कृपाकरून कोणीं द्यावें. या थोड्याशा प्रश्नांचीं उत्तरें दिल्यास प्राणायाम, दृष्टियोग व मुनिचित्तसाक्षात्कार यांतील भयंकर अडचणीचे प्रश्न करीन. यांचें उत्तरच नाहीं, असें मात्र कोणी समजूं नये उत्तर खास आहे. योगियांनीं खटपट करावी. आतां कोणी ह्मणेल कीं, मोठे मोठे शब्द प्रश्नांत उगीच घातले आहेत, तर असें ह्मणणाऱ्यांकरितां माझे हे प्रश्नच नाहींत. ज्यांनीं योगशास्त्र वाचून त्याचा थोडा तरी अनुभव घेतला आहे अशांनाच मी हे प्रश्न विचारीत आहें. एखादा टोपण योगी या प्रश्नांनीं जर भंडावून गेला तर शिकलेल्या कोकांनीं प्रश्न विचारून अशा गुरूला भंडावून सोडावें असें माझें मतच आहे. बरोबर न समजतां पुत्रानें आईबापांची सेवा सोडून व स्त्रियांनीं पतीची सेवा सोडून व्यर्थ बोवांच्या नादीं लागूं नये अशी माझी गरीबाची सर्वांस विनंति आहे. आणि जे वैदिकमार्गावर अवलंबून असतील ते योगीच आहेत असें मीच समजतों. त्यांनीं उत्तर

दिलें नाहीं, तथापि त्यांचा अपमान करण्याकरितां हे प्रश्न नाहींत तर योगाचे अनेक खेळ करून दाखविणाऱ्या सर्वांकरितां आहेत.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

( श्रीगुलाबरावमहाराज यांजकडून. )

# खऱ्या वाणीचा परिणाम.

तारीख २, एप्रिल, सन १९१४.

स्त्रीशिक्षणाविषयीं आमच्या समाजांत अनेक प्रकारची ओरड चालली आहे परंतु स्वधर्मानें व खऱ्या भगवद्भक्तीनें शाळेंत न घेतांना शिक्षण जन्मोजन्मीं मिळतच असतें. माझ्या सुदैवानें न मागतां माझ्याकडे बहिणाबाईची कविता आली आहे. बहिणाबाई ह्या तुकाराममहाराजांच्या शिष्यांपैकीं एक असून ‘ शिष्यादिच्छेत्पराजयं ’ एवढी कृपा तुकाराममहाराजांनीं त्यांच्यावर केली होती, हा अर्थवाद प्रगट केल्यावांचून राहवत नाहीं. बहिणाबाईच्या कवितेंत भक्तिज्ञानाचे उद्गार इतके स्पष्ट आहेत कीं, अद्वैतसिद्धीपर्यंत वेदांत पढणाऱ्याला ते डोलवून सोडतील यांत संशय नाहीं. बृहद्योगवासिष्ठाप्रमाणें त्यांचा दृष्टिसृष्टिवाद शुद्ध आहे. शांकरभाष्याप्रमाणें त्यांची कविता शास्त्रीय आहे. बहिणाबाईचे १३ जन्म स्त्रियांचेच झाले. त्यांत त्या कोण्या शाळेंत शिकावयास गेल्या नव्हत्या. बहिणाबाईचे उद्गार इतके स्पष्ट आहेत कीं, माझा तर्काचा अभिमान व वेदांताच्या शोधाचा अभिमान एकाच अभंगांत त्यांनीं घालवून मला लाज वाटावयास लावली ! भागवताप्रमाणें हें पुस्तक गळ्यांत मंगळसूत्र करावें असें मला वाटूं लागलें. मायेचें अनिर्वाच्यत्व वेदांताच्या शास्त्रीय युक्त्यांनीं यांनीं सिद्ध केलें आहे. वेदरहित आत्मज्ञानी यांना खपत नसून वेदाचें रहस्य यांना कळलें आहे असें माझें मत झालें आहे. ब्रह्मज्ञानीयाच्या निवृत्तिमार्गाला प्रारब्धाचा स्पर्श नाहीं, हें यांचें मत ऐकून तर ह्या वसिष्ठाचा अवतार आहेत काय अशी शंका येते, परंतु त्यांनीं आपल्या १३ जन्माची हकीकत दिल्यामुळें ही शंका आंतल्या आंत दाबून ठेवावी लागते. नाहीं तर निश्चय केला असता.

यांचें वाक्य असत्य असेल ही शंका आणण्याकरितां जन्मल्या दिवसापासून आईच्या वाक्यावरील विश्वास काढून टाकण्याची संवय केली पाहिजे. बहिणाबाईची कविता व त्यांचें चरित्र वाचून त्यांचे मागें जगांत आतां संतांचें कार्य उरलेलें नाहीं ही एक कल्पना माझ्या मनाला शिवून गेली. हें मी नुसती स्तुति करून लिहीत नाहीं तर तात स्मरून लिहीत आहें. पंचपादिका, विवरणप्रमेयसंग्रह इत्यादि ग्रंथांतील गूढ प्रमेयें या कवितांत अति स्पष्ट उतरलीं असून त्यांना स्वधर्माचें पाठबळ व भक्तीचा शिक्का मिळाला आहे आणि असें होऊनही द्वैत किंवा विशिष्टाद्वैत इकडे कल गेला नाहीं; तर शुद्ध शांकरमतच प्रतिबिंबित झालें आहे. छापखान्याची चूक सोडून दिली तर कवितेची भाषा वामनपंडिताइतकी तरी शुद्ध आहे, त्यांच्या सर्वच कविता चांगल्या आहेत पण मला आवडलेल्या कांहीं कवितांचा मासला देतों.

१

प्रपंच असत्य कळों आला जया । विषय हे तया नावडती ॥ १ ॥
उदासीनापरी वर्ततो प्रपंचीं । आशा हे मनाची सांडोनियां ॥ २ ॥
मनाचा स्वभाव संकल्प विकल्प । होय साक्षीरूप तयाचीही ॥ ३ ॥
बुद्धीचा निश्चय अनुसंधानीं चित्त । अहंकारीं हेत अहंकाराचा ॥ ४ ॥
सर्वही मायिक व्यवहार जाणती । निश्चय अद्वैतीं ठेवोनियां ॥ ५ ॥
बहेणी ह्मणे माया सत्य ना असत्य । श्रीगुरूनें तथ्य सांगितलें ॥ ६ ॥

सुरेश्वराचार्यांच्या बृहदारण्यकावरील वार्तिक वाचून नंतर हा अभंग वाचून पहावा ह्मणजे मख्खी कळेल.

२

असत्य हे माया ह्मणों जातां दिसे । सत्य ह्मणतां नसे ज्ञानदृष्टि ॥ १ ॥
ऐसा हा संदेह निवारी सद्गुरु । विवेकनिर्धारू करोनियां ॥ २ ॥
ब्रह्मा हरिहर मायेचेचि गुण । माया ब्रह्मीं जाण बोलो नये ॥ ३ ॥
माया कल्पनीत अकल्पित ब्रह्म । न कळे याचें वर्म कोणे परी ॥ ४ ॥
माया हे सावेव किंवा निरावेव । न कळे याचा ठाव कोणे परी ॥ ५ ॥
बहेणी ह्मणे याचें वर्म कळावया । वोळंगावें पाया सद्गुरूच्या ॥ ६ ॥

३

ब्रह्मापासूनियां झाली ह्मणे माया । उपाधि हे तया केवि घडे ॥ १ ॥
करावा निवाडा सद्‌गुरुवचन । भेद निरसून विकल्पाचा ॥ २ ॥
माया ब्रह्मीं नाहीं ऐसें ह्मणो जरी । स्वतंत्रता तरी ह्मणो नये ॥ ३ ॥
बहेणी ह्मणे ऐसा संदेह मायेचा । निरसी जो साचा तोचि गुरु ॥ ४ ॥

४

ब्रह्म तो अद्वय श्रुतीचे संमतें । वेगळी माया ते ह्मणो कैसी ॥ १ ॥
कोणासी पुसावें मायेचें ठिकाण । सद्‌गुरूवांचून सत्य जाणा ॥ २ ॥
सुवर्ण कंकण नाममात्र भिन्न । ज्ञानदृष्टि जाण ओळखावे ॥ ३ ॥
तोय तरंग एक भेद नाममात्र । ऐक्य हे सर्वत्र ज्ञानदृष्टि ॥ ४ ॥
सूत वस्त्र दोन्ही ऐक्यता सहजें । ज्ञानदृष्टि बोजे पाहिलिया ॥ ५ ॥
बहेणी म्हणे ऐसा पाहतां विवेक । सहजचि ऐक्यता मायाब्रह्मीं ॥ ६ ॥

श्रीमच्छंकराचार्यविरचित विवेकचूडामणींत आणि विद्यारण्यकृत पंचदशींत यापेक्षां अधिक मायाब्रह्माविषयीं शास्त्रीय विवरण काय सांपडतें अशी माझी संस्कृत वाचकांना कर जोडून विनंति आहे. हटयोगादि साधनें आत्मज्ञानाच्या दृष्टीनें तुच्छ असून मनोनिरोधाच्या दृष्टीनें योगाची थोडीसी जरूर आहे, हें तत्व शास्त्रीय तऱ्हेनें बहिणाबाईनें सांगितलें आहे तें पहा.

५

सांसारिक ज्ञानें तरती संसार । हा तुझा निर्धार जाय वायां ॥ १ ॥
यालागीं मूळ आत्मज्ञान साधीं । तोडोनि उपाधि अंतरींचि ॥ २ ॥
स्वर्गासी जाशील तें जरी साधिलें । व्यर्थ तेणें गेले पूर्व तुझे ॥ ३ ॥
ब्रम्हांडीं चढाविला प्राणवायु जरी । व्यर्थ तें अवधारी जाई लया ॥ ४ ॥
मंत्र-उपासने साधिलीं दैवतें । श्रम तोचि तेथें फळा आला ॥ ५ ॥
बहेणी म्हणे शोध करीं आत्मत्वाचा । मग तुज कैंचा जन्ममृत्यु ॥ ६ ॥

६

माझिया हा मनें घेतला उच्चाट । पहावें वैकुंठ पंढरी हें ॥ १ ॥
सांडोनिया सर्व काम धाम धंदा । वेधलें गोविंदा गोपिराजा ॥ २ ॥
अधरापासूनि भेदियेलिं चक्कें । इंद्रियें एकत्रें कसूनियां ॥ ३ ॥

प्राणाचा निरोध करूनि पाहिलें । निश्चयें गाईलें नाम तुझें ॥ ४ ॥
तंव पुढें नाद गर्जताती नाना । तेथील धारणा ठाकियेली ॥ ५ ॥
सोहंशब्द तोहि अरुणाचि पाहे । लक्षीं लक्ष जाय मिळोनियां ॥ ६ ॥
सद्गदित कंठ दाटतांचि मन । करोनियां स्नान चंद्रभागा ॥ ७ ॥
बहिणी म्हणे देव विठ्ठल पाहिला । द्वैतभाव गेला हारपोनी ॥ ८ ॥

पहिल्या अभंगांत आत्मज्ञानाकरितां योग तुच्छ सांगून दुसऱ्या अभंगांत मनोनिरोधाकरितां योगाची अपेक्षा किती आहे हें सांगितलें आहे. आतां माझ्या अत्यंत आवडीचे कांहीं अभंग देतों.

७

निवृत्तीसी नाहीं प्राक्तनाचें बळ । अनुभव केवळ जाणती ते ॥ १ ॥
निर्धारीं आपुलें असत्य शरीर । मानुनी विचारसार घेती ॥ २ ॥
नाहीं दंड जैसा निस्पृहा रायाचा । तैसा प्राक्तनाचा निवृत्तीसी ॥ ३ ॥
बहिणी ह्मणे पाहें प्राक्तन वरिष्ठ । प्रवृत्ति हे श्रेष्ठ मानी तया ॥ ४ ॥

८

शरीराचे माथां वर्ततें प्राक्तन । शरीर तें जाण प्रकृतीचें ॥ १ ॥
ज्ञानियांचें मत देह हाच मिथ्या । प्राक्तनाची कथा तेथें कोण ॥ २ ॥
प्राक्तन भोगवी भोग तो शरीरीं । ज्ञानिया अंतरीं सुखरुप ॥ ३ ॥
बहिणी ह्मणें देह प्राक्तन तोंवरी । विचार अंतरीं निश्चयाचा ॥ ४ ॥

हे अभंग नव्हेत तर ब्रह्मज्ञानीपणा गाजवून प्रारब्धाच्या नांवाखालीं अनन्वित कृत्यें करणाऱ्या साधु ह्मणविणाऱ्यांच्या तोंडावर मारण्याकरितां पैजारा आहेत. ब्रह्मज्ञानियाला प्रारब्धाचा स्पर्श नाहीं. बृहद्योगवासिष्ठासारखे कठीण ग्रंथ वाचून नंतर या अभंगाकडे लक्ष द्यावें ह्मणजे हें तत्व बहिणाबाईनें किती स्पष्ट केलें आहे हें कळून येईल. वामनपंडिताला सुद्धां इतकें स्पष्ट हें तत्व करतां आलें नाहीं. आतां वेदाविषयीं त्यांचें ह्मणणें पहा.

९

असावें स्वधर्मीं जाणावें तें वर्म । जेणें कर्में ब्रम्ह हातं वसे ॥ १ ॥
तेव्हां तें आतुडे ब्रम्ह सर्वगत । भूतीं भगवंत सर्व होय ॥ २ ॥
कर्म आणि ब्रम्ह वेगळे न भासे । तया कर्म दिसे ब्रह्मरूप ॥ ३ ॥

बहेणी ह्मणे ब्रम्ह बळेंचि भावितां । कर्म अधःपाता घालील देखा ॥ ४ ॥

१०

वेदांसी विरुद्ध ह्मणें आत्मज्ञानी । पडला तो पतनीं रौरवाचे ॥ १ ॥
ऐसे ते चांडाळ न पडावे दृष्टि । ज्यांच्यानें हें कष्टी उभय कुळ ॥ २ ॥
वेदांसी विरुद्ध असतां सर्वथा । अनर्थ परमार्थी ह्याचि एक ॥ ३ ॥
बहेणि ह्मणे त्याचें जळो आत्मज्ञान । त्यानें नारायण वैरी केला ॥ ४ ॥

पंडित श्रोतेहो ! आचार्यपरंपरेंत वेदान्तश्रवणाविषयीं सांगितलेला नियमविधि या अभंगांत नाहीं काय ? आत्मज्ञान हें कांहीं डोळे दाबून झगझगीत तेज पहाणें नव्हे तर तें गुरुसंतकृपेनें व श्रवणादिसाधनानीं उत्पन्न होतें असें स्पष्ट सांगतात.

११

आत्मज्ञान डोळां दिसे ऐसें नाहीं । लक्षीं जैसें पाहीं कांहीं बना ॥ १ ॥
बुद्धीचा उपरम होईल सर्वही । आत्मज्ञान ठायीं पडे तेव्हां ॥ २ ॥
आत्मज्ञान नव्हे सुवर्णाचा गोळा । चंद्रसूर्यमेळा सांपडेल ॥ ३ ॥
बहेणी ह्मणे ज्ञान साधेल संगतीं । संतांचे निश्चितीं बुद्धियोगें ॥ ४ ॥

"संतांचे संगतीं शास्त्राचे आधारें" असें एका ठिकाणीं स्पष्ट ह्मटलें आहे. कांहीं अभंगांत तर उपनिषदांचें भाषांतर जशाचें तसेंच पण मार्मिक रीतीनें उतरलें आहे. महाराष्ट्रांतील संतांना न्यायादि शास्त्रीयज्ञान नव्हतें असा आक्षेप करणाऱ्यांनीं तें वाचून पहावें. मी विस्तारभयास्तव लिहित नाहीं.

आतां भक्तीविषयीं आईसाहेबांचें काय म्हणणें आहे तें पहा.

१२

भक्तिप्रेमसुख न कळे आम्हांका । पंडिता वाचका वैदिकासी ॥ १ ॥
जीवन्मुक्त जरी झाला आत्मनिष्ठ । भक्तिप्रेमसुख दुर्लभ त्या ॥ २ ॥
अभेदुनी भेद स्थापिला पै अंगीं । वाढावया जगीं प्रेमसुख ॥ ३ ॥
बहेणी ह्मणे देव कृपा करील कांहीं । तरीच हें ठाईं पडे वर्म ॥ ४ ॥

" देव देऊळ परिवारू । कीजे कोरूनि डोंगरू । तैसा भक्तीचा व्यवहारू । कां न व्हावा " या तातांच्या ओंवीचेंच ह्या अभंगांत प्रतिबिंब पडलें आहे. गीतेच्या मधुसूदनीटीकेंतील ज्ञानोत्तर भक्ति हीच

आहे. मी अशी शिफारस करितों कीं, बहिणाबाईचा कवितासंग्रह मुमुक्षुजनांनीं अवश्य वाचावा; कारण माझ्या ग्रंथांत या कवितांपेक्षां अधिक कांहींच नाहीं, किंबहुना पुष्कळ कवींच्या ग्रंथांत नाहीं उगीच निंदा होईल म्हणून त्यांचीं नांवें देत बसत नाहीं. माझ्या ग्रंथापेक्षां पूर्वी महाराष्ट्र ग्रंथ चांगले झाले नाहींत असें माझ्या ठिकाणीं पूज्यबुद्धि ठेवणारे कांहीं ह्मणतात, त्यांनाही हा कविता संग्रह चांगलें खाद्य आहे. मला कोणी कांहीं प्रश्न विचारल्यास त्यांना हें पुस्तक वाचण्यास सांगण्याचाच मी नियम केला आहे.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

( श्रीगुलाबरावमहाराज यांजकडून. )

## वेदांत व योग.

तारीख ९, एप्रिल, सन १९१४.

वेदांताची व व्यवहाराची जुळवणूक करण्याची अलीकडे सुशिक्षित ह्मणविणाऱ्यांत जी प्रवृत्ति आहे तिचा आमच्या हिंदुधर्मावर समाधानकारक परिणाम होणार नाहीं अशीं चिन्हें आतांच दिसूं लागलीं आहेत. "वैराग्या-वांचूनि कहीं । ज्ञानासी तगणेंचि नाहीं." असें पूज्यपादताताचें ह्मणणें आहे व सर्वोपनिषदांचा सिद्धांतही तसाच आहे. व्यवहाराशीं जुळून वेदान्त आहे अशाप्रकारचें उदाहरण भगवद्गीता आहे असें अलीकडील विद्वान् म्हणत असतात, परंतु तिच्यांतील अवघीं कर्तव्यें वैराग्यमूलक आहेत हें खऱ्या वेदान्त्यास कळून येण्यासारखें आहे. व्यवहाराशीं वेदान्त जुळविण्याकरितां कांहीं विशिष्ट गोष्टीला ब्रह्माप्रमाणें सत्य मानावें लागतें, आणि त्यामुळें कांहीं विशिष्ट अनर्थ घडून येतात. उदाहरणार्थ— हिंदुस्थानचा वेदान्त व (Plato) प्लेटाचें तत्वज्ञान या दोहोंकडे पहा ह्मणजे घोटाळा सहज दिसून येईल. आत्म्याला पुनर्जन्म आहे असें वेदान्तास जरी कबूल आहे, तरी तें वेदान्ताचें मूळतत्व नव्हे. केव्हांना केव्हांतरी या पूर्वजन्माचा ज्ञानाच्यायोगानें नाश झाला पाहिजे. असें वेदान्ताचें सांगणें आहे. हेंच पुनर्जन्माचें व आत्म्याच्या अमरत्वाचें तत्व Plato ला मान्य आहे, पण श्रुतिद्वारा व्यापक परब्रम्हाची त्याला

ओळख झाली नसल्यामुळें, त्या ज्ञानाचा त्यानें भयंकर विपर्यास केला आहे. Plato आपल्या Republic ग्रंथांत ह्मणतो कीं, " पुरुष व बायका या सर्वांचेंच काम राष्ट्ररक्षण हें आहे. माथेफिरू कविलोक राष्ट्रांतून घालवून दिले पाहिजेत. जीं मुलें आंधळीं पांगळीं असतील त्यांना ठार मारून जीं राज्योपयोगी असतील तेवढींच ठेविलीं पाहिजेत. मुलांवरील आईबापांची सत्ता अजिबात नाहींशी करून केवळ सरकारची सत्ताच त्यांच्यावर ठेविली पाहिजे. " आत्मा अमर आहे म्हणून आंधळ्यापांगळ्यांना ठार मारण्यांत Plato ला कांहींच वाटत नाहीं. शरीराची त्वचा काढून परोपकार करण्यास सांगणारी हिंदूवेदान्तांतील भूतदया कोणीकडे व आत्म्याच्या अमरत्वाखालीं आत्मस्वार्थाकरितां आंधळ्यापांगळ्यांना ठार करण्यास सांगणारे Plato चे नीच उद्गार कोणीकडे ? जीवन्मुक्तांचे प्राण लोकान्तराला न जातां येथेंच लीन होतात असें श्रुतीनें सांगितलें आहे; पण (Socrates) साक्रेटीस मेला तेव्हां Athens अथेन्स सोडून मी एका सुखरूप देशास जाईन असें त्यानें Creto क्रेटोला सांगितलेलें प्रसिद्ध आहे. याप्रमाणें डेकार्ट कांट वगैरेची स्थिति हिंदुवेदान्ताशीं तुलना करून पाहतांना दिसून येण्यासारखी आहे Theosophy थिऑसफीनें तिकडच्या व इकडच्या तत्वज्ञानांत तुलना करण्याची खटपट केली आहे खरी, परंतु ती यशस्वी झाली आहे असें मला वाटत नाहीं. कोणत्याही प्रकारचा विकार मनांत न धरून शास्त्रनिरूपण करावें, हें आम्हां आर्यांचें आनुवंशिक शील आहे, परंतु पश्चिमेकडे पाहिलें तर निराळी स्थिति. एक तत्ववेत्ता आत्मा अमर आहे ह्या समजुतीवर दुसऱ्याचीं आंधळीं पांगळीं मुलें जिवंत मारावयास सांगतो तर दुसरा तत्ववेत्ता आपण अमर आहों म्हणून आत्मघात करून घेतो. हिंदुवेदान्त व्यवहाराशीं जुळविल्यास असेच कांहीं तरी विलक्षण प्रकार घडत जातील. योगाविषयीं हीच स्थिति आहे. योगाच्या नांवाखालीं Hypnotism हिप्नॉटिझम फारच पुढें येत आहे. शंभरदीडशें रुपयांचीं पुस्तकें बोलावून मीं Hypnotism चा अभ्यास केला आहे आणि मजवर Hypnotism चालावयाचा नाहीं असें मी कोणत्याही Hypnotist ला आव्हान करून सांगतों. हिंदु योगी ह्मणविणारे बरेच असून त्यांत

ब्राह्मण व सदाचारी फारच थोडे आहेत. अलीकडे तर कित्येक मुसलमानसुद्धां योगी ह्मणवून ब्राह्मणांना उष्टी भाकरी व उष्टें पाणी पिण्यास देतांना मीं पाहिलें आहे! कित्येक योगियांना पूर्वजन्मींच्या आईबहिणी भेटण्यापेक्षां बायकाच पुष्कळ भेटतात! परंतु पूर्वजन्मींची बायको भेटली म्हणून या जन्मीं विवाह केलाच पाहिजे! या आचाराकडे कोण लक्ष देतो? एक मुसलमान योगी कांहीं दिवस समाधींत राहून बाहेर निघाला आहे व लोकांना योग शिकविण्याकरितां मुसलमान करीत आहे. कां बरें असे असावें? हिंदूधर्मी असल्यानें योग होत नाहीं असा ईश्वरानें ताम्रपट लिहिला आहे काय? लोकांनीं योग शिकावयाचा आहे तर हिंदुधर्मांतच शिकावा असें कां बरें म्हणूं नये. आघाड्याच्या बिया खाऊन पिंपळाच्या पानादिकांचें विवर करून ६ महिने पुरून घेतां येतें, याला कांहीं योगच पाहिजे असें नाहीं. खटपट केली तरी या प्रयोगानें एखादें कुत्रें देखील ८।१५ दिवस जमिनींत पुरतां येईल. योगांतील प्रणवाबद्दल बिसमिल्ला जपण्याची कां पाळी यावी? हें धर्मरक्षण करण्याचें लक्षण आहे काय? अशा योगानें हिंदूचा हिंदूपणाच नष्ट होईल कीं काय अशी भीति वाटून राहिली आहे. सर्वच लोक कांहीं योगी नसतात म्हणून मोठ्या समाजांतील धर्माचें रक्षण **आचारानेंच** होत असतें. '**आचारप्रभवो धर्मः**' अशी स्मृति आहे. योग ह्मणजे एकाग्र चित्त होणें इतकेंच जर लक्षण असेल तर ते कोणत्याही ठिकाणीं होऊं शकेल. अनसूयेप्रमाणें पतीच्या चरणावर लक्ष ठेवणें हा योगच होय. त्याच्या-करितां साधूंच्या मागें लागणें नको. योगाकरितां पीराचें थडगें जर पुजावयाचें असेल तर शालिग्राम मूर्तीनें काय केलें आहे? hypnotism ची दिशा संपत्ति मिळविण्याच्या साधनाकडे वळली आहे. प्रत्येक मनुष्य जर संपत्ति मिळविण्याकरितां Hypnotism शिकूं लागेल, तर एकाद्यानें एकाद्याकडे सहज टक लावून पाहिल्यास हा मला Hypnotism कर-ण्याच्या बेतांत आहे असा अर्ज सरकाराकडे करण्याची पाळी येणार नाहीं काय? पतंजलीच्या योगशास्त्रांत प्रथम वैराग्य सांगितलें असून नंतर अभ्यास सांगितला आहे, अभ्यासाला ही दूर करण्याकरितां पुनः पर वैराग्य सांगितलें आहे. तात्पर्य अभ्यासाला दोन्हीकडे वैराग्याची जोड पाहिजे असें योग-

शास्त्राचें म्हणणें आहे. आणि सध्यांचे आम्ही योगी तर अभ्यासच सर्वस्व आहे असें घेऊन बसलों आहोंत. शिवाय आमच्या अशा विपर्यस्त योगी लोकांमध्यें दत्तात्रयाचे अवतारच फार आहेत, म्हणूनच आमच्याकडे गुरुचरित्रांतील फलश्रुति ऐकून पुष्कळ शिष्य येतात. दत्तात्रय ब्रह्मचारी ब्राह्मण. त्यांना मुसलमानवरदी इत्यादिकांच्या जन्मांत येऊन पूर्वजन्मींच्या बायका शोधण्याचें कोणतें काम पडलें, हें कांहीं समजत नाहीं. आतां योगाविषयीं पुनः दोन तीन प्रश्न लिहून हा लांबलेला लेख आटपतों.

(१) शरीरांतील चक्रें विकाराच्या आघातांनीं नेहमीं मुकुलित होत असतात. अत्यंत नवशिक्या योग्यालाही हा अनुभव असला पाहिजे, तरच हा पुढें योग शिकतां येतो. तेव्हां विकार दाबले असतां सर्व कमळें उघडतात काय ? आणि जर उघडत असतील तर कमला—कमलावर प्राण नेण्याची अवश्यकता काय आहे ? आणि उघडत नसतील तर विकाराच्या आघातानें कमलें मुकुलित होतात हा अनुभव खोटा आहे असें तरी अलीकडच्या योगीबोवांनीं म्हणण्याचें धाडस केलें पाहिजे, म्हणजे त्याचें योगज्ञान सध्याच्या युगाला अनुसरून आहे असें म्हणून तरी स्वस्थ रहातां येईल.

(२) योग्यानें धारणेच्या स्वाधीन व्हावें कीं नाहीं ? प्रथमें पक्षीं त्याला स्थूल धारणा सोडून सूक्ष्मावर जातां येणार नाहीं आणि द्वितीय पक्षीं त्रिपुटी कायम राहून समाधि घडत नाहीं.

(३) लययोगानें रंग जे डोळ्यांत दिसतात त्यांचा चक्राशीं कोणत्या प्रकारानें संबंध आहे ? कारण संबंध नाहीं म्हटल्यास षण्मुखी मुद्रा व्यर्थ होईल. हृदयज्योतिसंवित इचा प्रकाश पडतो तो व डोळ्यांतील रंग एकच आहेत काय ? कारण चक्राचा प्रकाश हृदयज्योतीच्या प्रकाशानें होत असतो.

या सर्व प्रश्नांचें उत्तर योगशास्त्रांत यथायोग्य आहे, तें अलीकडच्या योगी म्हणविणाऱ्यांनीं खटपट करून दिल्यास माझें समाधान केल्याचें श्रेय त्यांना प्राप्त होईल. जे वैदिक मार्गानें जात आहेत त्यांचा आचारच योग असल्यामुळें त्यांच्याविषयीं माझें कांहीं म्हणणें नाहीं

परंतु Hypnotism व योगाचा मेळ घालणाऱ्यांनीं, किंवा अवतार म्हणून घेऊन उच्च जातीला पायां पडावयास लावणाऱ्यांनीं, माझ्या प्रश्नांचीं अवश्य उत्तरें द्यावीं अशी मी त्यांना विनंति करितों. योगाचे आणि हिप्नॉटिझम ( Hypnotism ) चे अधिकारी तरी पहा. योगाचा अधिकारी कोण तर साधन चतुष्टयसंपन्न निधड्या मनाचा पुरुष आणि Hypnotism प्रयोग स्त्रियांवरच फार लागू पडतो.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

( श्रीगुलाबरावमहाराज यांजकडून. )

## संत ओळखण्याचा उपाय.

तारीख २३, एप्रिल, सन १९१४.

संसारानें खरा तापलेला मनुष्य असला कीं त्याला खरा साधु मिळतो हा नियम आहे. तरी तो साधारण आहे; कारण संसारतापानें तापलेले पुरुषच दोन प्रकारचे असतात.

(१) वर्णाश्रमकर्मांच्या योगानें ज्यांची चित्तशुद्धि झाली आहे असे; आणि (२) प्रथम संसारामध्यें अधर्मानें वागून नंतर दुःखामुळें पश्चात्ताप पावलेले असे. पैकीं पहिल्या प्रकारच्या विरक्तांना अवश्य सत्पुरुष भेटतो हा नियम बरोबर आहे, पण दुसऱ्या प्रकारच्या विरक्तांमधून भागवतांत सांगितलेल्या कदर्युप्रमाणें एकादाच महात्मा तरून जातो. संत ओळखावे कसे हें पुष्कळ लोकांना गूढ येऊन पडलें असतें. एकनाथी भागवतांत संतांचीं अनेक चिन्हें सांगतलीं आहेत. अमुक चिन्हांनींच त्यांनीं राहिलें पाहिजे असें कांहीं त्याना बंधन नाहीं; त्यामुळें संतांच्या नांवाखालीं वाटेल त्याला फसवेगिरी करतां येते. तथापि कितिही खोटें वाटलें तरी त्यांच्या मुळाशीं कांहीं तरी खरें असलेंच पाहिजे हें अनुमानासिद्ध आहे, म्हणून सर्वच जरी फसवेगिरी करीत असले तरी त्यांत सत्पुरुष असले पाहिजेत हें आपल्या बुद्धीस कबूल करावें लागतें. पण संत ओळखण्याची कांहीं तरी कसोटी आपल्या हातीं असल्याशिवाय कोणीकडे जावें, कोण आपल्यास फसविणार नाहीं,

अशी खात्री आम्हां वाटत नाहीं. केवळ नीतीच्या मार्गानें वागणारे साधु असतात असेंच आपण लक्षण केलें तर पुराणांतील वामदेवादिकांचें उदाहरण देऊन दुसरे लोक आपणांस अडविण्यास तयार असतात. पुराणावर विश्वास नाहीं म्हटलें कीं आपण नास्तिक ठरलोंच; आणि तें बरोबर ही आहे, अशा रीतीनें आपली पहिली कसोटी उपयोगांत फारशी येत नाहीं. आतां दुसरी कसोटी म्हणजे "पाण्यामध्यें मासा झोंप घेतो कैसा। जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे ॥ तुका म्हणे संत ओळखावे कैसे। आपण व्हावें तैसें तेव्हां कळे ॥" 'तुका म्हणे येथें पाहिजे जातीचें। येरा गबाळाचें काम नाहीं." ही आहे; पण ही कसोटी अन्योन्याश्रयदोषानें ग्रस्त आहे. कारण आपण संत होण्याकरितां सत्समागम करावा म्हणून शास्त्रांत सांगितलें आहे आणि संत झाल्याशिवाय तर सत्समागम घडावयाचा नाहीं ! याप्रमाणें दोन्हींकडून पेचांत आणणारी ही कसोटीही व्यवहार्य कितपत होईल ही शंका आहे. हीच कसोटी धरून बसल्यास एखाद्या महात्म्याला ब्रह्मज्ञान झालें तर तो एका क्षणांत तद्रूप होतो, परंतु असे उत्तम अधिकारी फारच थोडे. बहुतेक मध्यमाधिकारी मुमुक्षुच अधिक असतात, तेव्हां त्यांच्याकरितां तिसरी एकादी कसोटी शोधून काढली पाहिजे. एखाद्याच्या वचनानें उत्तम अधिकारीयाला ब्रह्मज्ञान झालेंच तर त्याचा तोच गुरु होतो, मग त्याच्या गुणदोषांकडे पाहण्याची जरूर पडत नाहीं. कारण ब्रह्मज्ञानानंतर कांहीं मिळवावयाचें नसतें. वेश्या, कुत्रा, यांना देखील दत्तात्रयस्वामींनीं आपले गुरु म्हटलें होतें. तेव्हां अशांच्याबद्दल कांहीं म्हणणें नाहीं पण संशयी साधकही तीन प्रकारचे असतात. अंगीं अधिकार नसून उतावळेपणानें सत्समागम करून, वैराग्याचा तडाखा न सोसवल्यामुळें, घरीं परत जाऊन, गुरूच्या नांवानें खडे फोडणारे; दुसरे, अंगीं चांगले गुण असून गुरु चांगला न मिळाल्यामुळें पस्तावून आपल्या घरीं गेलेले; आणि तिसरे, साधनसंपत्ति अंगीं असून लोकांचे फसविणें ऐकून कोणीकडे जावें हा विचार करणारे. या तीन प्रकारच्या लोकांपैकीं पहिल्यांना तर कांहीं उपाय नाहीं. दुसरे लोकही चांगले; परंतु संशयी असल्यामुळें या जन्मांत त्यांच्या हातून खऱ्या साधूंचा देखील अपमान

होण्याचा संभव आहे. म्हणून मनाची तयारी नसली तर घरींच राहून त्यांनीं आपले चांगले गुण वाढवीत राहावें; म्हणजे ह्या जन्मांत किंवा दुसऱ्या जन्मांत गुरु मिळण्याचा उपाय किंवा गुरु तरी खास भेटेल. तिसऱ्या प्रकारच्या संशयी साधक लोकांकरितां मात्र उपाय आहे आणि तो भगवान् पातंजलींनीं सांगून ठेविला आहे.

ते म्हणतात, " मूर्धज्योतिषि सिद्धदर्शनं " पाद ३१, सूत्र ३२. या वरील भगवान् व्यासांच्या भाष्याचा आशय असा आहे कीं, मस्तकामध्यें एक प्रकाशमय छिद्र आहे, तेथें संयम केला असतां, पृथ्वी, स्वर्ग व अंतरिक्ष यांतील सिद्धांचें दर्शन होतें. याचें विशेष रहस्य असें आहे कीं, त्यांतून जो आपला गुरु असतो तो आपल्या द्विदलचक्रावर दिसतो. हीच उत्तम सत्पुरुष शोधण्याची रीत आहे. ज्याचें सदाचरण व ब्रम्हज्ञान मशहूर असेल त्याचा अपमान कोणत्याही रीतीनें करूं नये; परंतु ज्या संबंधांत संशय असेल व तो गुरु व्हावा अशी इच्छा असेल, त्याला प्रथम मला मूर्धाधारणा सांगा म्हणजे मी आपल्या स्वरूपाचा निश्चय करीन असें स्पष्ट म्हणावें. आतां धारणा, ध्यान व समाधि तिन्ही एकाच ठिकाणीं करण्याला संयम म्हणतात. कोणी म्हणेल कीं, पूर्वींच्या कसोटीप्रमाणें यांतही अन्योन्याश्रय आहे, तर हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण संध्येंतील प्राणायामांतच सुधारणा करून ज्यांनीं तो वाढविला आहे, त्यांना प्रत्याहाराकरितां व धारणेकरितां गुरूला असा प्रश्न विचारतां येतो; पण पूर्वींच्या कसोटींत तशी कांहीं सोय नाहीं म्हणून अन्योन्याश्रय होतो. गुरूंनींही तूं द्विदलचक्रावरच खऱ्या माझ्या स्वरूपाची प्रथम ओळख करून घे व नंतर मला पहा असें शिष्याला म्हणावें, हा सांप्रदायिक परिपाठ आहे; परंतु तो अलिकडील गुरूंनीं बिलकूल सोडून दिला आहे. कोणी म्हणतात वरील सूत्रांत सांगितलेलें सिद्धदर्शन देवताविशेषांचें आहे, साधूंचें नव्हे; तर त्यांनीं याच सूत्रावरील भवदेवादिकांचे ग्रंथ वाचून पहावे अशी त्यांस मी शिफारस करितों. या कसोटीनें मिळालेल्या गुरूपासून कोणी फसला आहे असा इतिहास कोणी दाखवून दिल्यास मी त्याला शरण आहें असें उघडपणें कबूल करीन; परंतु गुरु पहाण्याची कसोटी मात्र अशाच्या हातीं असावी, आणि गुरूंनीं मात्र

शिष्याला कसून पाहूं नये असा ज्या लोकांचा समज असतो त्यांच्या-करितां कोणतीच कसोटी उपयोगांत पडत नाहीं. फसणें हें त्यांच्या पाठीं दैवानेंच लागलें आहे. मूर्धासंयम जशी गुरु पहाण्याची कसोटी आहे तशी मूर्धापरिसेकादिक शिष्य पाहण्याचीही कसोटी आहे. शिष्यांनीं गुरुची कसोटी पाहतांना गुरूंनींही शिष्यांची कसोटी पहावी. येथें जे टिकतात तेच धर्माचे आधारस्तंभ होऊन राहतात. कोणाचें ह्मणणें असें आहे कीं, ईश्वराच्या अनुग्रहानेंच गुरु मिळतो; पण याला उत्तर गुरूवाचून ईश्वरानुग्रह होत नाहीं असेंही शास्त्रांत सांगतलें आहे हें आहे. ईश्वरानुग्रहानें गुरु मिळतो हें खरें पण ईश्वरानुग्रह तरी कर्मानें होतो, कीं उगीच होतो ? प्रथमपक्ष श्रुतिसंमत नाहीं आणि द्वितीयपक्ष आम्हांला इष्ट आहे. ह्मणूनच वर्णाश्रमाची परंपरा जेव्हां आपण होऊन साधु ह्मणविणारे असुर मोडतात, तेव्हां जगताचें कल्याण करण्याकरितां पुनः परमेश्वराला अवतार घेऊन तिचें स्थापन करावें लागतें; व नंतर पुढें योग्य सोपानक्रम सुरूं होतो. या पेक्षां गुरु किंवा संत सांपडण्याची युक्ति दुसरी कोणती चांगली असेल असें मला वाटत नाहीं. आतां योग व आमचा विश्वासच बसत नाहीं असें ज्यांचें ह्मणणें असेल त्यांनीं ब्रह्मचर्यादि नीतीवरच कां विश्वास ठेवावा; कारण तिचें फळ कांहीं ऐहिक नाहीं, पारलौकिकच आहे. याप्रमाणें लिहिलेला लेख श्रीतातांचे चरणीं समर्पण करितों.

## अभंगासंबंधीं शंकासमाधान.

### कर्म आणि ब्रह्म.

मुमुक्षु, गुरुवार, तारीख ३०, एप्रिल, सन १९१४.

लेखकः—श्रीहरी केशव वाळिंबे.

संत बहिणाबाई मातुश्रीच्या अभंगाचें पुस्तक मी वाचीत असतां पान १२१ मध्यें एक अभंग असा आहेः—

" कर्म तेंचि ब्रह्म ब्रह्म तेंचि कर्म । ऐसें जिनें वर्म जाणितलें " ॥५॥

ब्रह्म आणि कर्म एकच आहे असें या अभंगांत आहे. कर्म साईकारी असून कर्तृतंत्र आहे. वस्तुतंत्र ब्रह्माचे ठिकाणीं कर्माची गति नाहीं.

असें जर आहे, तर सदर अभंगांत कर्म व ब्रह्म एकच आहे असें मातुश्री बहिणाबाई सांगतात. त्याबद्दल खुलासा कळविण्याविषयीं मी गुलाबराव महाराज यांस लिहिल्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें तो त्यांनीं कळविला आहे:– " कर्म तेंचि ब्रह्म ब्रह्म तेंचि कर्म । ऐसें जिनें वर्म जाणितलें. " कर्म आणि ब्रह्म एकच आहे असें या अभंगांत म्हटलें आहे तें सिद्ध स्थितीला लागू असून " असावें स्वधर्मे जाणावें तें कर्म । जेणें कर्मे ब्रह्म हातवसे " ॥ या अभंगांत कर्म ब्रह्माचें साधक आहे असें दाखविलें आहे, तें साधकाला लागू आहे. आतां कर्म साधनरूप आहे असें सांगूनही तें व ब्रह्म एकच आहे, असें त्याच अभंगांत सांगितलें आहे, तें घृतायुर्न्यायानें सांगितलें आहे. म्हणजे आयुष्याचें साधक घृत असल्यामुळें घृताला आयुः हें नांव आहे. आतां ज्या अभंगांत जें कर्म ब्रह्म एक आहे, असें सिद्धाच्या स्थितीला अनुसरून सांगितलें तें बरोबरच आहे. कारण ब्रह्मज्ञान झाल्यावर कोणत्याच पदार्थास पृथकता रहात नाहीं. कर्म कर्तृतंत्र आहे खरें, परंतु तेवढ्यानें तें मंदज्ञानाच्या विरोधी आहे; दृढज्ञानाच्या विरोधी नाहीं. कारण मंदज्ञानामध्यें ब्रह्मध्यानाची अपेक्षा आहे. कारण न्यायदर्शनाधारें मन एकाच काळीं दोन वस्तूंकडे लागत नाहीं. आत्मा अकर्ता आहे व कर्म कर्तृत्वबुद्धि घेतल्याशिवाय होत नाहीं. म्हणूनच मंदबोधाचें रक्षण करण्याकरितां विधिपूर्वक संन्यासाची अपेक्षा आहे. आणि ज्यांना संन्यासाचा अधिकार नाहीं त्यांना वर्णाश्रमकर्मानें अपूर्व उत्पन्न होऊन येथें किंवा अन्य ठिकाणीं ब्रह्मज्ञान मिळतें; अपूर्व तीव्र उत्पन्न होईल तर येथेंच मिळतें. पण जनकाप्रमाणें ज्याचें दृढ ज्ञान आहे त्याच्या ज्ञानाच्या विरोधि कर्म नाहीं. उलट कर्म न केल्यानेंच ब्रह्मज्ञानी पुरुषाला आग्रह होणार आहे. जसें मी कर्म करीन हा अहंकार आहे, तसें मी कर्म करणार नाहीं हा अहंकारच आहे. ब्रह्मज्ञानाची जोंपर्यंत जरूर आहे तोंपर्यंत मी कर्म करणार नाहीं, हा अहंकार उत्पन्न होत नाहीं. कारण त्याचें मन तेव्हां दुसरीकडे गुंतलेलें असतें. दुसरीकडे गुंतलेल्या मनाला एखादी वस्तु मी मुद्दाम सोडली असा अहंकार उत्पन्न होत नाहीं; पण साक्षात्कारी पुरुषाला निदिध्यासनाची आवश्यकता नसते, त्यामुळें पूर्वसंस्कारानें प्राप्त झालेल्या वर्णाश्रमधर्माचा तो जर विरोध

करील तर दुसरीकडे मन न गुंतल्यामुळें " मी कर्म मुद्दाम सोडणार " या अहंकारापासून अलिप्त राहतां येणार नाहीं. बरें, तें कर्म ब्रह्माहून निराळें समजावें तर अद्वैत समजून द्वैताची भावना केल्यासारखें होईल. शिवाय, कर्मब्रह्माची विषमसत्ता आहे, समसत्ता नाहीं. विरोध समसत्तेंत असतो, विषमसत्तेंत नाहीं. त्यामुळेंच सिद्धाला कर्म व ब्रह्माचा विरोध वाटत नाहीं ह्मणूनच मातुःश्री बहिणाबाईनें तीं दोन्ही एकच आहेत असें सांगितलें आहे. या स्मृतींत एक श्लोक प्रसिद्ध आहे. ' कृष्णो भोगी शुकस्त्यागी उभौ जनकराघवौ । वसिष्ठः कर्मकर्त्ता च ते एते ज्ञानिनः समाः ॥ " श्रीकृष्ण जरी भोग भोगीत होते, शुकाचार्य जरी विरक्त होते, राजा जनक व राजा रामचंद्र जरी राज्य करीत होते, व भगवान् वसिष्ठ जरी वर्णाश्रमकर्म आचरीत होते तरी ते सर्वच समानज्ञानी होते. आतां जीवन्मुक्तिसुखासाठीं ब्रह्मध्यानाची अपेक्षा आहे असें जें ह्मणणें, तें चौथ्या भूमिकेचेंच आहे. सातव्या भूमिकेपर्यंत जाऊनही पुरुष इच्छेस वाटेल तसा वागूं शकतो. हें वासिष्ठांत उत्पत्तिप्रकरणांत सांगितलें आहे. ब्रह्मज्ञानी झाल्यावर निषिद्ध कर्म जर करील तर त्याला एक प्रकरचा अहंकार उत्पन्न होईल; कारण ज्याचा जो स्वभाव पूर्वसंस्कारांनीं बनलेला असतो त्याच्या विरुद्ध थोडीशी देखील गोष्ट करावी ह्मटली कीं अहंकार उत्पन्न होतो. आपले स्वाभाविक श्वासोच्छ्वास चालतात परंतु ते आपल्या गांवींही नसतें. तिकडे कांहीं लक्ष द्यावें लागत नाहीं. परंतु वैद्यानें छाती तपासतांना जर लांब श्वास सोड ह्मटलें कीं मंदबुद्धिपूर्वक तें काम करावें लागतें. जे लोक ब्रह्मज्ञान झाल्यावर वर्णाश्रमधर्माला तुच्छ समजतात व निषिद्धकर्म आवडीनें करतात त्यांच्या शाब्दिक ज्ञानामुळें त्यांना देहाभिमान दृढ झाला आहे असें समजावें. अत्यंत अज्ञानी असेल तर त्यानें आस्थेनें वर्णाश्रम करावे. मंदज्ञानी असेल तर त्यानें वैराग्यपूर्वक संन्यासानें राहावें. आणि दृढज्ञानी असेल तर त्याला गुरुपरंपरारक्षणार्थ पूर्वसंस्कारानें घडून येणारें विहित स्वभाविक कर्म केल्यानें हानि नाहीं ही गोष्ट कर्माविषयीं आहे तशी उपासनेविषयींही आहे. मधुसूदनानें आपल्या गीतेच्या गूढार्थदीपिका नामक टीकेच्या उपोद्घातांत ह्मटलें आहे कीं,

" जीवन्मुक्तिदशायां तु न भक्तेःफलकल्पना । अद्वेष्टृत्वादिवत्तेषां स्वभावो भजनं हरेः " ॥ जीवन्मुक्तिदशेमध्यें भक्तीच्या फलाची कल्पना-च नसते. अद्वेष्टृत्वादि गुण जसे स्वभावतःच असतात त्याप्रमाणें श्रीहरि-गुणानुवाद गाणें हाही त्याचा स्वभावच होऊन राहतो.

चैत्र शु० १२, शके १८३६ ता० ७।४।१५ मु० इवों.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

# योगवासिष्ठ मानभावांचा !

मुमुक्षु, गुरुवार, तारीख १६, जुलै, सन १९१४.

१. आज जीं आम्हांवर अनेक प्रकारचीं संकटें आहेत त्यांत धर्मसंकट सर्वांत मोठें आहे. त्यांत आश्चर्य करण्यासारखी गोष्ट ती ही कीं, तें संकट परक्यांपासून नसून आम्हींच तें आपल्या हातांनीं आपणावर आणून घेतलें आहे ! मुसलमान लोकांकडून पूर्वी आमच्या धर्माला जो त्रास पोहोंचला तसा आम्हांला आतां कोणताही त्रास नाहीं. परक्यां-कडून धर्माला कितीही त्रास झाला तरी तो बाह्यस्वरूपाचाच होणार. अंतःस्वरूपाला होणें शक्य नसतें. ऋषींच्या यज्ञांत राक्षसांनीं दगडमाती टाकली पण त्यांचें तप भंग करण्यास ते समर्थ झाले नाहींत. हल्लीं धर्माच्या अंतरंगाला आह्मी स्वतःच त्रास देत आहोंत. याचें कारण आमच्यामध्यें प्रत्येकाला धर्मोपदेशक होण्याची हांव सुटली आहे हें होय. संस्कृत राहो, पण भाषासंप्रदायासिद्ध वेदान्त वाचून देखील ही धर्मोपदे-शक मंडळी आपलें मत बनवून घेत नाहींत. एक ह्मणतो, जैन ग्रंथांमध्यें वेदांतील अमुक मंत्राचा अर्थ फार चांगला केला आहे; एक ह्मणतो, पारशी ग्रंथांत फार चांगला केला आहे; पण इतिहासपुराणांवरून वेदांचा अर्थ करावा ही जी आमच्यांत ऋषींची परंपरा, तिच्याविषयीं मात्र फारच थोडे बोलतात. कारण आमच्या पुराणांत बहुधा ' भाकड कथाच ' लिहिल्या आहेत असें त्यांना वाटत असतें ! पारशी वगैरे लोकांच्या मनांतून जसे कांहीं रागद्वेष नाहींसेच झाले आहेत ! एक कृष्णचरित्र बंगालींत मीं पाहिलें होतें. त्यांत कृष्णाचे शत्रु जे शिशुपाला-

दिक ते जें बोललें तें बहुधा खरें व इतर सर्व वाक्यें खोटीं असें विधान केलें आहे ! म्हणजे शत्रु जसें कांहीं खरेंच कबूल करीत असतात शिवाय कृष्णाचे अमुक शत्रु हें तरी पुराणांवरूनच समजलें गेलें आहे; तथापि पुराणाला कल्पित ह्मणण्याचें धाडस करण्यांत चरित्रकारानें कमीपणा केला नाहीं. दुसरें या धर्मोपदेशक नव्या टोळीची हांव धर्माचें ऐक्य करण्याविषयींची आहे. प्रमाणसिद्ध शब्दवृत्तींचा समन्वय होत असतो, हा प्राचीन सिद्धांत हे नवे लोक विसरतात; आणि धर्मांचे शब्द खलांत घालून कुटून त्यांचा समन्वय करण्याची खटपट करितात. त्यामुळें संप्रदायशुद्धदृष्टि अगदीं निघून जाते व मग पाकसिद्ध अन्न कोणतें व भिक्षेचें अन्न कोणतें हाही निर्णय करतां येत नाहीं. धर्मोपदेशकाची जरूर दैवी लोकांतील धार्मिक शैथिल्य कमी करण्याकरितांच असते, आसुर लोकांना ताळ्यावर आणण्याकरितां भगवान् स्वतःच अवतीर्ण होत असतो. शंकराचार्यांनीं वर्णत्रयांतील धर्मशैथिल्य दूर करण्याकरितांच उपदेश केला; परंतु रावण कंस इत्यादिकांना धर्माच्या मार्गावर आणण्याकरितां कांहीं धर्मोपदेशक देवांनीं पाठविले नाहींत. धर्मावर दृढ श्रद्धा आहे, परंतु दिशा चुकली आहे अशांचेच मार्गदर्शक धर्मोपदेशक होतात. रागद्वेषांच्या प्रवाहामध्यें सांपडून देहबुद्धीच्या डोहांत अविश्वासाच्या भोंवऱ्यानें खालीं वर जाण्याचा जे अनुभव घेत असतात त्यांना दंडच प्रशामक असल्यामुळें, भगवंताच्या अवताराचीच तेथें अपेक्षा असते. पण आज पैशाच्या लालचीनें हवा तो मनुष्य हवा त्याला धर्मोपदेश करितो आणि त्यांत आश्चर्य हें कीं, धर्मज्ञ अशा हिंदुस्थानांतच हा प्रकार पुष्कळ होतो. त्यामुळें धर्मोपदेशकांना संप्रदायसिद्ध ज्ञानाची मोठीशी महती वाटत नसल्यामुळें मान राखण्याकरितां कोणत्यातरी ग्रंथांतून कांहीं तरी नवें सांगावें लागतें. त्यामुळें इतर धर्मास वेदधर्मांत हात घालावयास सांपडतो. अशीं उदाहरणें सध्यां आर्यवाङ्मयांत देखील सांपडत आहेत हें दुर्दैव होय. याविषयीं मी एकदोन उदाहरणें देतों:—

२. एक **तत्त्वसारायण** नांवाचा संस्कृत ग्रंथ तेलंगी लिपींत छापलेला आहे. तो वसिष्ठांनीं केलेला आहे असें त्यांत लिहीलें आहे. तो अतिशय जुना आहे असेंही तेथल्या लोकांचें म्हणणें आहे. शिवाय या

ग्रंथांत व्याससूत्रांचें विवरण केलें आहे. या ग्रंथाला थिऑसफीचा गंध स्पष्ट येतो ! हा ग्रंथ मद्रास लायब्ररींतच उपलब्ध झाला आहे. या ग्रंथांतील रामगीतेंत रामांनीं हनुमंताला ह्मटलें आहे कीं:—

" यज्जीवब्रह्मणोरैक्यं कार्यकारणयोरपि ।
मतमद्वैतिनां तत्स्याज्जीवोत्पत्तिश्च तन्मते ॥ ६ ॥
उत्पत्त्यनभ्युपगमे तस्य नाशो न सिध्यति ।
अनाशे द्वैतनित्यत्वात्कोपोऽद्वैतश्रुतेर्ध्रुवं ॥ ७ ॥

अध्याय ३.

भावार्थः— येथें मारुतीनें " उत्पत्त्यसंभवात् " या जीवोत्पत्तीचा असंभव आहे या ब्रह्मसूत्रावरील शांकरभाष्यानुसार शंका केली तिचें उत्तर रामानें दिलें आहे. ब्रह्म कारण व जीव कार्य मानल्यासही अद्वैत कायम राहूं शकतें. जीवाचा नाश जर होणार नाहीं तर द्वैतच कायम राहील म्हणून अद्वैतमतांत जीवोत्पत्ति मानलीच पाहिजे असें शांकरभाष्याच्या विरुद्ध ह्मटलें आहे. बरें त्वंपदवाच्यार्थाचा बाध होतो इतकाच अर्थ करावा आणि शांकरमताला जुळवून घ्यावें तर पुढें दोन श्लोकांत त्वंपदलक्ष्यार्थाचा देखील लय होतो असें शहाणा राम सांगतो.

" जीवस्य द्विविधस्यापि विनाशं द्विविधं शृणु ।
जीवस्त्वंपदवाच्यार्थः संसारी देहवानयं ॥ ८ ॥
अविद्या जनितस्यास्य विनाशो विकृतेरिव ।
आभ्यंतरविकारेषु तप्तायःपिंडवत्सतः ॥ ९ ॥
अन्यस्त्वंपदलक्ष्यार्थोऽसंसारी साक्षिचेतनः ।
कूटस्थः प्रत्यगात्माख्यो बिंबभूतो परस्य च ॥ १० ॥
ब्रह्मविद्योद्भवस्यास्य स्फुलिंगस्येव पावकात् " ।
विनाशः प्रकृतौ स्वस्यां ब्रह्मण्यद्वयचिद्घने ॥ ११ ॥

भावार्थः— इतकाच कीं, "जीव व त्याचा नाश दोन दोन प्रकारचा आहे. त्वंपदवाच्यार्थ जीव अविद्येपासून उत्पन्न झालेलें कार्य असल्यामुळें विकृतीप्रमाणेंच त्याचा स्पष्ट नाश होतो; आणि त्वंपदलक्ष्यार्थ ब्रह्मविद्येचें कार्य असल्यामुळें ठिणगी जशी अग्नींत लीन होते तसा ब्रह्मांत तो लीन होतो. " पण अंशत्व वगैरे कल्पना वाच्यार्थासच आहेत, लक्ष्यार्थास

नाहींत; हें वेदान्ताचें तत्व या श्लोकांतून अगदीं नाहींसें झालें आहे. उघड उघड वेदान्ताचा प्रमाद या ग्रंथांत केला आहे तो असा:—

" आरंभवादमाश्रित्य स्वारुरुक्षुर्विचारयेत् ।
परिणामं समाश्रित्य त्वभ्यासी भावयेत्परम् ॥
विवर्तवादस्त्वरूढे स्वयमेवहि सिध्यति ।
जल्पस्तदनुरोधेन गच्छेत्स्वानर्थमात्महा ॥ २३ ॥
रज्जुसर्पस्थाणुचोरवन्ध्यापुत्रादिगोचरः ।
विवर्तवादो नैवेष्टो मुमुक्षोस्संसृतेः परम् ॥ २४ ॥
भृंगकीटदधिक्षीरमृद्घटाद्येक गोचराः ।
परिणामसुवादोऽयं ध्रुवमिष्टतमो मतः ॥ २५ ॥

अध्याय ३.

भावार्थ "योगावर चढण्याची इच्छा करणाऱ्यानें आरंभवादाचा विचार करावा म्हणजे तुकडे तुकडे मिळून जगत् झालें असें समजावें, अथवा लहान लहान वस्तु मिळून मोठ्या वस्तु झाल्या असें समजावें. आणि जो अभ्यासी आहे त्यानें परिणामवादाचा विचार करावा म्हणजे एका मोठ्या वस्तूंतून अनेक लहान लहान विकारी वस्तु निघाल्या आहेत असें समजावें. रज्जुसर्प किंवा शिंपेवरील रुपें याप्रमाणें जो विवर्तवाद आहे तो आपोआपच पुढें समजतो. तो बोलून दाखविण्यांत पाप आहे, कारण तो मुमुक्षूला इष्ट नाहीं. दुधाच्या दह्याप्रमाणें किंवा मातीच्या घटाप्रमाणें मुमुक्षूनें परिणामवादाचाच विचार करावा." आहे कीं नाहीं हा खलांत कुटून केलेला समन्वय? विवर्तवाद म्हणे बोलून दाखवूं नये तर मग त्याचे रज्जुसर्पादि दृष्टांत जगांत कां सांपडतात? विवर्तवाद सांगितला म्हणजे लोक उन्मत्त होतात या भीतीनें हा कांहीं तरी समन्वय केला आहे. हिंदूंच्या वेदान्तावर धाड घालण्याकरितां नीतीचें आमिष दाखविणें बऱ्याच लोकांना फावतें. वेदान्ताकरितां नीतीच्या विरुद्ध कोणी बोललें तर त्याची Bad character आहे असें म्हणण्याला लोक आपल्यातर्फे तयारच आहेत असें या ग्रंथकारांना पक्कें माहीत आहे. वरील श्लोकांत दाखविलेला विचार थिऑसफीच्या ग्रंथांतून मात्र आढळतो. वेदांत व थिऑसफी या पुस्तकांत असें म्हटलें आहे कीं " अष्टो-

तरशत उपनिषदांवरूनच थिऑसफी सिद्ध करून देणें आह्माला कठीण आहे. परंतु सर्वांच्या पलीकडचें असें जें तत्त्वसारायण ह्यांतून मात्र आम्ही थिऑसफीचे तत्व बरोबर काढून देतों, पण मनुष्य दुराग्रही नसला पाहिजे " येथें सामान्यसिद्ध युक्तीची अवहेलना करणारा तो दुराग्रही हा न्यायशास्त्राचा प्राचीन अर्थ मात्र कोणी समजूं नये; तर दुराग्रही म्हणजे आमचें न ऐकणारा असा समजावा ! योगवासिष्ठांत सर्वत्र विवर्तवादाचा अंगिकार आहे तो कोणालाही नाकबूल नाहीं. परंतु वसिष्ठानें तत्वसारायणांत त्याचा निषेध केला आहे ! आतां आम्हांला क्षेपकवाद मान्य नसल्यामुळें भविष्यवादी वसिष्ठांनीं पुढें लोक थिऑसफीस्ट होणार असें समजून ह्यांच्याकरितां हा ग्रंथ केला असेल असें कांहीं तरी म्हणणें भाग आहे. क्षेपकवाद म्हटल्यासही आमची कांहीं हानि नाहीं. कारण संमत नसणें हें दोन्हीकडे सारखेंच आहे. अनुकूल वाक्य तर मुलांचेंही प्रमाण होतें. मग ग्रंथाची गोष्ट कशाला पाहिजे ! हें घोंटाळ्याचें एक उदाहरण झालें. आतां दुसरें सांगतों:—

३. आनंदाश्रमांत व्यासांचीं सिद्धांतसूत्रें निरंजनाच्या भाष्यासह छापलीं आहेत. तीं सूत्रें कदाचित् बरोबर असलीं तरी अलीकडील मेंदूवाद व डार्विनच्या उत्क्रांतिवादाचा दंश यांच्या मतांत दाखविला आहे. तें वाक्य येणेंप्रमाणें:– " अत्रेदं बोध्यं । गवाश्वादीनां यत्प्रकृष्टं ज्ञानं नैपुण्यं च नावलोक्यते तन्मूर्धनीनस्य दौर्बल्यान्मनुजानामपि तथात्वं चेत्तथैवावलोक्यताम् । अत एव चिन्ताचिर्काषूणामपि न यावन्मूर्धनीनप्राबल्यं तावत् ध्यानधारा न संभवेदिति । " भावार्थः– येथें असें समजावें कीं गाई घोडे इत्यादिकांना जें चांगलें ज्ञान नसतें त्याचें कारण त्यांचें डोकें दुर्बल असतें हें होय. मनुष्याचेंही मस्तक दृढ व सशक्त नसलें कीं त्यांच्याकडून विचार, ध्यानधारणादि होत नाहीं असें समजावें. पण वानरांमध्यें हुशार असणाऱ्या मारुतीचें वजन किति होतें हें वाल्मीकीनें लिहिलें नाहीं ही घोडचूक झाली असें ह्मणवयास हा निरंजन कसा चुकला हें आश्चर्य वाटतें ! अशा प्रकारचें वाक्य या भाष्यांतच सांपडलें; दुसरें कोठें सांपडलें नाहीं. आतां संस्कृत ह्मणूनच हे ग्रंथ मानावयाचे असल्यास श्रुतिसंप्रदायविरुद्ध अंश तरी यांतील मान्य नाहीं

असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. आणखीही या निरंजनभाष्यांत वेदान्तविरोध व नव्या मताचे समन्वय पुष्कळ आहेत ते स्थळसंकोचास्तव दाखवितां येत नाहींत. याप्रमाणें दोन उदाहरणें झालीं. आतां तिसरें उदाहरण देतों.

४. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा ह्मणून छापलेला **योगवासिष्ठ** मजकडे अभिप्रायार्थ आला आहे तो उत्सुकतेनें वाचून पाहिला. त्यांतील युगधर्मप्रकरण श्रुतिस्मृतिपुराणांशीं मिळत नसून मानभावांच्या युगधर्मप्रकरणाची बहुतेक प्रतिकृति त्यांत वठली आहे ! वेदान्तांत चैतन्यपरब्रह्म सांगितलें आहे. मानभावमतांत चैतन्यनांत्राची एक माया सांगितली आहे आणि चैतन्याच्या पलीकडे परमेश्वर सांगितला आहे. कृतयुगामध्यें आत्म्याची उपासना करणें हाच धर्म असून त्यानें या चैतन्यमायेची प्राप्ति होते पण मोक्ष होत नाहीं. कृतयुगांत जे हरिहराची भक्ति करितात त्यांना त्रेतायुगांत जन्म होतो आणि त्रेतायुगांत भक्ति करणें हाच धर्म आहे. त्यानें कैलासवैकुंठाची प्राप्ति होते, पण मोक्ष होत नाहीं. द्वापारांत यज्ञ हा धर्म आहे तो केल्यानें स्वर्गाची प्राप्ति होते. कलीमध्यें तीर्थक्षेत्रव्रतदान हा धर्म आहे, तो केल्यानें अंतराळ लोकांची प्राप्ति होते. चारही केले तर अंतराळ लोक मिळतो. दोन किंवा तीन केल्यास अष्टौ देवयोनी लोक मिळतो आणि एखादा केल्यास कर्मभूमींतील यक्षिणीची प्राप्ति होते. या चारही युगांच्या धर्मानें मोक्ष होत नाहीं असें मानभावांच्या युगधर्म नांवाच्या प्रकरणांत स्पष्ट म्हटलें आहे. तो ग्रंथ मानभावाच्या लिपींत माझ्याजवळ लिहिलाही आहे. अशाच प्रकारचा युगधर्म ह्या छापलेल्या वासिष्ठांत लिहिलेला आहे ! ! तो उपलब्ध श्रुतिस्मृतिपुराणांत कोठेंही दिलेला नाहीं. अष्टौ देवयोनी व अंतराळ हे मानभावांच्या प्रकरणांतच लोक आहेत, श्रुतिस्मृतिपुराणांत नाहींत. ते या योगवासिष्ठांत कोठून आले कोण जाणे ? शहामुनीच्या सिद्धांतबोधांतही १७ ते २० अध्यायांपर्यंत हरिहरादिकांची निंदा व मानभावाच्या "अन्यव्यावृत्ति" प्रकरणांतील देवतांचें निरूपण केलें आहे ! ह्मणून तोही ग्रंथ अशाच प्रकारचा एक होय. एका लिखित वज्रशुचि उपनिषदांत एक श्लोक लिहिलेला आढळला तो येणेंप्रमाणें:—

कर्मयोनि देवयोनि अंतरालं सुरालयं ।
सत्य–वैकुंठ कैलासं क्षिराब्धिभैरवस्तथा ॥
विश्वरूपं च चैतन्यं एतन्मायास्वरूपकं ।
मायापरं भवेद्ब्रम्ह तत्परं केवलं विभुः ॥

भावार्थः—कर्मभूमीच्या वर अष्टदेवयोनि आहे. त्याच्यावर अंतराळ आहे. त्याच्यावर स्वर्ग आहे. त्याच्यावर सत्यलोक आहे. त्याच्यावर वैकुंठ आहे. त्याच्यावर कैलास आहे. त्याच्यावर क्षीराब्धि आहे. त्याच्यावर अष्टभैरव आहे. त्याच्यावर विराट्स्वरूप आहे. त्याच्यावर चैतन्य नांवाची माया, त्याच्यावर ब्रह्म आणि त्या ब्रह्माच्या पलीकडे विभु आहे अशा प्रकारची लोकरचना श्रुतिस्मृतींत इतरत्र कोठेंच आढळत नाहीं. फक्त मानभावांच्या अन्यव्यावृत्ति नांवाच्या प्रकरणांत मात्र आढळते. या योगवासिष्ठांतही तिचा दंश आढळतो. शिवाय या योगवासिष्ठांत अभ्यासाच्या मार्गांतही पुष्कळ चुका आहेत. शिवाय अगदीं ऐक्यपर अद्वैताला या वासिष्ठांत स्पष्ट शब्द वापरला नाहीं. तर साम्यपर असे संदिग्ध शब्द वापरले आहेत. त्याचप्रमाणें **तुकाराममहाजांच्या नांवावर एक अभंग** प्रसिद्ध आहे तो येणेंप्रमाणें:—

भक्ति देवतांची करिती । पद वैकुंठ कैलास देती ॥ १ ॥
फळ सरल्या जन्मा येती । पुनः चौऱ्यांशी भोगती ॥ २ ॥
ऐसी देवतांची गती । स्वहित नाहीं त्याहींचे हातीं ।
भक्ता ठाव कैसा देती । विश्रमायेचा हा फेरा ॥ ३ ॥
न चुके ब्रह्मा विष्णु रुद्रा । क्षीरसागरीं नारायन ।
दश योनी तो भोगुन । अवतारादिक येती जाती । इतरांची कोण गती ॥ ४ ॥
तुका ध्याती अविनास । गेले होते मोक्षपदास ॥

तुकाराममहाराजांच्या नांवावर असलेला **दुसरा अभंगः**—

आद्य सूनका खरा पसारा सबकूं मालुम होता है ।
सारा सून जिनोने देखे वोई मारग चलते है ।
चलते मारग चलते जाना कईक सून मिलते है ।
मायारूप भरा है सारा उनकु साई कहते है ।
साई है सो सबसे न्यारा बडा महेल ऊचा है ।

आप अकेला दुजा नही गुरुसाहिबनें देखा है ।
सद्‌गुरुकी सेवा करना उसकू मेवा मिलता है ।
तुका बोले आनेजानेका नही काम वड़ा रहता है ॥

५. याचप्रमाणें **मध्वमुनींच्या नांवावर एक अभंग** प्रसिद्ध आहे:—

ज्ञान ह्मणजे काय कैसें आहे वर्म । जीवसीव आत्माराम ध्यान नाही ॥ तोहंपद तत्वंपद पाही । असिपदा ठायीं ध्यान नाहीं ॥ मध्वनाथ ह्मणे ज्ञान तें पलाउ । गुरुकृपा थोर ज्ञान आहे ॥

मध्वनाथांच्या नांवावर प्रसिद्ध असलेला **दुसरा अभंग:—**

साजन मजवर रुसून गेला हा जीव झाला वारा । एक डाव घरा येईन तरी बरा ॥ कर्मभूमी म्यां सोधून पाहिली देवयोनीमंदी नाहीं । घेतली अंतराळची गाही । म्यां स्वर्गीमंदी सोधून पाह्यल ठाव लागला नाहीं । वैकुंठ कैलास सोधल बाई खिरसागर म्यां सोधून पाह्यल सवालाख सिपाई । जातो मग भैरवाचे ठायीं । तेथून एक मार्ग चालला विश्वरूपाच्या ठाया । तेथ मशी कळू आला वर्ताया । चैतन्यघाट चढून गेली झाली सजनाची भेट । तेव्हां माझ संचित होते नीट । मध्वमुनीची हाव पुरली हा जीव झाला धीठ । हारपली प्रपंचाची खटपट ॥

मध्वमुनीच्या नांवावर **तिसरा** अभंग:—

निराकार निरगुण निरंजन जोती मज दावा । अनंत ब्रह्मांडाच्या वरती स्वरूप ओळखावा ॥ तेहतिस कोटी देव पाहिले इंद्रसभेत । वर्थी त्यांची खटपट त्यामंदी नाहीं भगवंत ॥ दखनामंदी जागा पाहिली एक पंढरपुर । भीमातीरीं उभा राहिला इस्नु अवतार । मध्वनाथ ह्मणे तेथही चैन नाहीं जीवा । अनंत ब्रह्मांडाच्या वरती स्वरूप ओळखाव ॥

६. याप्रमाणें एक नाहीं अनेक ठिकाणीं असे घोंटाळे झाले आहेत. या वरील अभंगांत मानभावांची लोकरचना व जयानंदी पंथाची लोकरचनाच विशेषेंकरून दिली आहे. तीच या योगवासिष्ठांतही दाखविली आहे. गुरूचें कोणतेंही वाक्य पाळावें या न्यायानें तातांचें वाक्य मला पाळलें पाहिजे, परंतु सन्निध गुरु असतील तरच कोणतीही आज्ञा पाळावी अशी आज्ञा लागू आहे. ह्मणून ज्ञानेश्वरांच्या विरुद्ध हा योगवा-

सिष्ठ असल्यास हा ग्रंथ मला प्रमाण नाहीं असें मला स्पष्ट ह्मणतां येतें. ज्ञानेश्वरींत आत्मोपासनेची प्रशंसा केली आहे, आणि योगवासिष्ठांत युगधर्मान्वयें तिची व्यावृत्ति केली आहे हें मी पुराव्यानिशीं सिद्ध करून देण्यास तयार आहें. लहानपणीं मी आपले मामाचे घरीं असतांना मला कांहीं कारणाकरितां मानभावमताचा जो दृढ परिचय करून घेण्याचा प्रसंग आला त्यामुळें हा भेद मला स्पष्ट कळला आहे. याप्रमाणें स्पष्ट नजरेस येणाऱ्या चुका या ग्रंथांत आहेत. आतां संप्रदायसिद्ध वेदान्तदृष्टीनें असणाऱ्या चुका तर अनंत आहेत, त्या स्थलसंकोचास्तव लिहितां येत नाहींत. ह्मणून हा ग्रंथ तातांचा नव्हे असें वाटतें किंवा असला तरी तो आमच्याकरितां केला नाहीं असें दुःखानें ह्मणावें लागतें. आम्हां वारकरी लोकांना स्तन्य देणारे जरी प्रत्यक्ष तात आहेत तरी वंशप्रचारक शंकराचार्य आहेत. उपनिषद् बीजपुरुष आणि वासिष्ठ अंकुरपुरुष आहेत. या चौकडीच्या अद्वैतांत कोठें भेद सांपडत नाहीं मग या ओंवीबद्ध वासिष्ठांतच तो कां यावा हें समजत नाहीं. ग्रंथांतील ओंव्या युगधर्मप्रकरणांत पांचव्या अध्यायांत वगैरे वाचून पहाव्या. आतां कोणी ह्मणेल कीं, श्रुतिस्मृतींत नसलेल्या गोष्टी मानभाव मतांतून घेतल्या ह्मणून काय झालें ? तर हें ह्मणणें स्वाभिमान कमी करणारें असून श्रुतिस्मृतिपुराणांचा अपुरेपणा दाखविणारें आहे आणि वेदान्ताचे ठिकाणीं अपूज्यबुद्धि उत्पन्न करून यज्ञभंजक आहे ह्मणून प्रमाण नाहीं. श्रुतिस्मृतिपुराणांचा अपुरेपणा ज्यांना कबूल आहे अशांशीं प्रामाणिक चर्चा करणें हें वेदान्ती कर्तव्यच समजत नसतात आम्हां आर्य वेदान्तियांचा समज असा आहे कीं, श्रुतिस्मृतिपुराणाव्यतिरिक्त ज्ञानच कोणत्याही धर्मांत नाहीं. यद्यपि परिष्कारग्रंथांत प्रक्रियाबाहुल्य आहे तथापि ह्या सर्वांत सिद्धांत एकच आहे, भिन्न भिन्न व भलते नाहींत. चैतन्याला माया असें कधींही ह्मटलेलें नाहीं. किंवा, ब्रह्मविद्या देखील चैतन्याला ह्मटलें नाहीं तर ती देखील श्रौतशब्दजन्य सात्विकवृत्तिपरिणति आहे. असेंच ह्मटलें आहे. ह्मणून विद्या अविद्या कोणत्याच मायेंत चैतन्याचा समावेश होत नाहीं. आतां ही काथ्याकूट पुरे करितों व हा लांबलेला लेख श्रीज्ञानेश्वरतातचरणीं समर्पण करितों.

श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजकी जय.

ताजाकलमः—अभिप्राय नाइलाजास्तव लांबला आहे. या लेखांत जें अशुद्ध अभंग वगैरे दिले आहेत, ते तसेच छापावे कारण ते उपहासार्थ दिले आहेत. ते गाथ्यांत नसून आमच्या इकडे लोक ह्मणतात. जयानंदी हा पंथ आमच्या इकडे एक आहे त्यांत आनंददेव मानला असून मानभाव एकावर एक जसे १० लोक मानतात तसे त्यांत एकावर एक ४३ लोक मानले आहेत. आणि दत्तात्रयाच्या खालीं सर्व हरिहरादिक असल्यामुळें त्यांची भक्ति करण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें दोघांनींही स्पष्ट म्हटलें आहे या ग्रंथाबरोबर इतर ग्रंथावर दिलेला अभिप्रायही छापावा, कारण या ग्रंथांचा इकडे फार सुळसुळाट आहे. आपल्या पत्रांतील अधिक जागा घेतल्याबद्दल क्षमा असावी.

आपला,

गुलाबराव गोंडुजी मोहोड,

मुकदम माधान; हल्लीं वस्ती उमरावती.

ता० १२।७।१४.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

# पुनः योगवासिष्ठ.

मुमुक्षु, गुरुवार, तारीख ६, आगष्ट, सन १९१४.

लेखांक २.

केसरींतील लेखकानें ज्ञानदेव मानभावी ग्रंथकारांत झाला आहे, हें सिद्ध करण्याविषयीं मला आव्हान केलें आहे. त्यावर मी लेखांक २ रा लिहिलाच आहे. परंतु ऐतिहासिकदृष्ट्या सिद्ध होण्याची संधि मला अकस्मात् सांपडल्यामुळें मी पुनः इतकेंच लिहितों कीं, मानभावांच्या लिपींत ज्ञानदेवाची केलेली पंडुगीता मजजवळ आहे व तींत आमचा महानुभावधर्म संपूर्ण आहे, असें महंतवर्य दत्तराज यांच्या सहीचेंच हल्लीं मजजवळ पत्र आहे. हें फार सरळ असून प्रसंगीं ते ग्रंथ दाखवि-

---

# श्रीज्ञानेश्वरांचें योगवासिष्ठ.

मुमुक्षु, गुरुवार, तारीख ३०, जुलै, सन १९१४.

## आध्यात्मिक कां मानभावी ?

( लेखक—गोविंदसुत. )

१ दैवदुर्विलासाच्या फेऱ्यांत ज्याप्रमाणें कित्येक राष्ट्रें आणि व्यक्ति हीं सांपडतात, याप्रमाणें, त्या राष्ट्रांच्या व व्यक्तींच्या कर्तृत्वाची साक्ष पटविणारे ग्रंथ हेही कालचक्राच्या चरकांत सांपडत असतात ! त्यांपैकीं कित्येक ग्रंथ पुड्या बांधण्याकरितां वाण्याच्या दुकानचा रस्ता पकडीत आहेत, तर कित्येक ग्रंथ अज्ञातवासांत कैक वर्षें धूळ खात पडले आहेत ! पण धूळ खात खात शेवटीं धुळीस मिळणाऱ्या या ग्रंथांना धुळ्यांची सत्कार्योत्तेजक मंडळी धुंडाळून काढून उजेडांत आणीत आहेत, हें पाहून आनंद होतो ! या मंडळींपैकीं श्रीयुत गोविंद काशीनाथ चांदोरकर यांनीं ‘ श्रीज्ञानेश्वरांचें योगवासिष्ठ ’ मिळवून तें छापवून नुकतेंच प्रसिद्ध केलेलें माझ्या पाहण्यांत आलें. योगवासिष्ठांतील श्लोकांचा ‘ नेटका भावार्थ ’ काढून ज्ञानोबांनीं ग्रंथ लिहिल्याबद्दल नामदेवाचा व ‘ योगवासिष्ठ स्वात्मपत्र ’ लिहिल्याबद्दल विसोबा खेचरांचा, असे

त्यासही तयार आहेत. तें पत्र पहावयाचें असल्यास माझ्याजवळ येऊन पहावें, इतकेंच मी याविषयीं लिहूं शकतों.

आतां गोविंदसुत यांनीं ता. ३०।७।१४ च्या मुमुक्षूंत जें माझ्याविषयीं लिहिलें आहे तशी भाषा वापरण्याला मी तयार नाहीं; कारण येथें सामान्य संबंध नसून व्यक्तीचा संबंध आहे. परंतु गोविंदसुत यांना मी इतकेंच विनवून सांगतों कीं, नुसता विश्वास ठेवावयाला मी कोणास लावीत नाहीं व लावणारही नाहीं. हा काळ चिकित्सेचा आहे हें मला ठाऊक आहे. गोविंदसुत म्हणतात, कीं हा ग्रंथ मी वरवर वाचला आहे तर तसें मुळींच नाहीं. त्यांच्याजवळून जरी मी पुनः वाचून घेतला तरी मी आपलें बोलणें सिद्ध करण्यास तयार आहें. गोविंदसुताची भाषा कोठें कडक व कोठें नम्रतारूप आहे तिचा अर्थ कसा होत असतो हें सर्व वाचकास माहीतच आहे. मी यौक्तिकच ( Argumentative ) भाषा वापरणारा आहें. शिवाय माझ्याविषयीं मी दुसऱ्या कामाला बसलों

---

तत्कालीन साधूंचे दोन्ही आधार चांदोरकरांनीं आपल्या प्रस्तावनेंत दिलेच आहेत. या तत्कालीन पुराव्यावरून ज्ञानोबांनीं योगवासिष्ठाचें सार काढलें होतें, हें सिद्ध होत आहे. प्रस्तुतचा ग्रंथ प्रकाशकांस कोठें उपलब्ध झाला, हें त्यांनीं प्रस्तावनेंत न लिहिल्यामुळें चिकित्सक मंडळींत मोठा घोंटाळा उडून गेला होता, पण ' निवृत्तिज्ञानदेवसोपानमुक्ताबाई ' च्या सांप्रदायिक मठांतच हा ग्रंथ उपलब्ध झाल्याचें केसरींत प्रसिद्ध झालें असून या ग्रंथाच्या पुष्टीकरणार्थ गोमांतकांतही एक प्रत चांदोरकरांस मिळाली आहे, मात्र ती अपुरी आहे. काशीस एक प्रत असल्याचें नुकतेंच मीं एका ज्ञानोबाच्या चरित्रांत वाचलें. संशोधकांचा शोध चालू असेलच.

२. या चिमुकल्या साररूप ग्रंथांत दहा प्रकरणें असून ओंवीसंख्या ११२४ आहे. कोणत्याही विषयांत प्रवेश करण्याला प्रथम ज्ञान—जाणीव पाहिजे, त्या जाणिवेला स्फूर्तिस्फुरण पाहिजे नंतर त्या ज्ञानस्फूर्तीनें त्या विषयाचा बोध झाला पाहिजे. यासाठीं कोणत्याही कार्यारंभीं त्या त्या हृदयस्थ देवतांना आवाहन करून त्यांच्या स्तुतिस्तोत्यानें

असतांना गडबडीनें अभिप्राय दिला गेला, इत्यादि जीं अनुमानें गोविंद-सुतानें काढलीं आहेत, त्यांवरही उलट बोलण्याची मला इच्छा नाहीं. कारण ती पंचावयवरूप ठरवितांना सर्वच वाचकांना कठीण पडणार आहे. तेव्हां आपल्याच अनुमानाचें निरसन करीत बसण्यांत मला कांहीं हांशिल वाटत नाहीं. आतां गोविंदसुताच्या भाषेचीं पुटें सोडून देऊन त्यांनीं दिलेल्या मुद्यासंबंधींच मी लिहितों.

त्यांचा पहिला मुद्दा असाः– गोविंदसुत म्हणतात, " चोही युग-धर्मीं वर्ततां । मोक्ष नाहीं सर्वथा । हें मानभावांचें म्हणून मानलेलें मत गुलाबरावांना प्रस्तुत ग्रंथाच्या पांचव्या प्रकरणाच्या ओवींत सांपडलें, त्याच ओवीचे पुढचे दोन चरण " आत्मज्ञानाविण रघुनाथा । निश्चिता नोहिजे । " हे पहाण्यांत आले असते तर याच प्रकरणांतील १९ व्या ओवींत लिहिल्याप्रमाणें हा युगधर्म "वेदें बोलिला यथोक्त" असो, अगर

---

आपलें प्रसन्नांतःकरण झाल्यावर त्या देवतांच्या साह्यानें ग्रंथाला आरंभ करावा, असा आपल्यांत शिष्टसांप्रदाय आहे. त्याप्रमाणें प्रथमतः या ग्रंथांत ज्ञानरूप गणपति, स्फुरद्रूप सरस्वति आणि बोधरूप सद्गुरु यांचें स्तवन करून त्यांच्या प्रसन्नतेचा प्रसाद मागून घेतल्यावर ऋषि, मुनि, योगी, तापसी, ब्रह्मवेत्ते, दिगंबर इ० कांचीं वर्णनें देऊन नंतर संत, सद्गुरु व सच्छिष्य यांचीं लक्षणें. इतका विषय पहिल्या तीन प्रकरणांत आला आहे. चौथ्या प्रकरणांत षड्दर्शनादि मतमतांतरें, पांचव्यांत युग-धर्म, सहाव्यांत गृहस्थाश्रमनिषेध, सातव्यांत अष्टांगयोग, आठव्यांत स्वरूपस्थिति, नवव्यांत सृष्टिरचना व पंचीकरण आणि दहाव्यांत सृष्टीचा, देहाचा व कर्माकर्माचा निरास व उपसंहार याप्रमाणें विषय आहेत; गाण्यामध्यें चिजा कांहीं नवीन नसतात, पण त्या रागरागिणींत वठवि-ण्याचें कसब पाहून तज्ज्ञ मंडळी मान डोलावतात, तद्वत् अध्यात्मग्रंथांत विषय कांहीं नवीन असतात असें नाहीं, पण त्यांची मांडणी आत्मप्रत्य-यानें झालेली आहे किंवा नाहीं हें पाहून मान डोलविली पाहिजे किंवा नाक मुरडलें पाहिजे. समर्थ म्हणतात, ग्रंथ ' शास्त्रेंसहित ' तर पाहिजे पण त्यांत ' मुख्य आत्मप्रचीति ' आहे किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे.

गुलाबरावांच्या म्हणण्याप्रमाणें मानभावीमताचा असो, पण त्याचा उपसंहार शेवटीं " आत्मज्ञानंविना पार्थ सर्व कर्म निरर्थकं " यांत केला आहे असें स्पष्ट होत आहे. "

यथामति उत्तरः— "आत्मज्ञानेवीण रघुनाथा । निश्चिता नोहिजे।" हे ओवीचे दोन चरण मला माहीत होतेच. आतां हा युगधर्म " वेदें बोलिला यथोक्त । असें १५ व्या ओवीचें जें उदाहरण दिलें आहे, त्याविषयीं माझें ह्मणणें असें कीं, चार वेद, ब्राह्मणें आणि अष्टोत्तरशत उपनिषदें इतक्या श्रुतिसमुच्चयांत हा युगधर्म कोठें आहे हें कोणीही दाखवून द्यावें अशी मी विनंती करितों. मानभावी मताचा असला तरी उपसंहार आत्मज्ञानांत झाला आहे, हें गोविंदसुताचें ह्मणणेंही वेदांतयुक्तीस धरून नाहीं. कारण गोविंदसुतांनीं वेदांत वाचला आहे असें त्यांच्या भाषेच्या वजनावरून दिसण्याचा संभव आहे, त्यामुळें कदर्थी वाक्यामध्यें उपक्रम असून उपसंहार दुसऱ्या वाक्यामध्यें असणें असा

---

३. ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर प्रकाशकाकडून तो तज्ज्ञ मंडळींकडे अभिप्रायार्थ पाठविला जातो, त्याप्रमाणें हा ग्रंथ वारकरी पंथाचे अध्वर्यूपैकीं ह० भ० प० गुलाबरावमहाराज, विष्णुबुवा जोग, व विठ्ठलभक्त ल. रा. पांगारकर यांजकडे अभिप्रायार्थ गेला होता, त्यावरून एकसमयावच्छेदेंकरून या त्रयमूर्तींचा अभिप्रायरूप अवतार तारीख १६ जुलई रोजीं ' मुमुक्षु ' च्या उदरीं प्रगट झाला, तो जणूं या ग्रंथाच्या मूळावरच झाला कीं काय असें दिसून आलें ! या ग्रंथावर या त्रयमूर्ति वारकऱ्यांनीं केलेले वार वरवर विचाराचेच केले आहेत असें दिसलें ! अशा वारांनीं एकमतानें या ग्रंथाचें जणूं तीनवार तिरटीम करून टाकून ग्रंथ ज्ञानोबाचा नाहीं ह्मणून खाडदिशीं ठरवून टाकलें ! इतकेंच नव्हे तर गुलाबराव ह्मणतात, हा मानभावी काला ! वाहवा ! विष्णुबुवा ह्मणतात. हें तोतयाचें बंड ! खाशी सोय ! यावर पांगारकर मखलाशी करून सांगतात कीं हा ग्रंथ वरवर चाळला तरी याची तऱ्हा निराळी असल्यामुळें हा ज्ञानोबाचा नव्हे खास; पण ज्ञानोबाचा ठरला तर याची किंमत कांहीं निराळी होईल ! ज्ञानेश्वरीहून निराळ्या तऱ्हेच्या या ग्रंथा-

वेदांताचा संप्रदाय नाहीं, हें त्यांना ठाऊक असलें पाहिजे. ' उपक्रमोपसंहाराबभ्यासोऽपूर्वता फलम् । अर्थवादोपपत्तिश्च लिंगतात्पर्यनिर्णये । ' असें सर्व वेदांतवेत्ते मानतात· उपक्रमपराक्रमांत अप्पया दीक्षिताचार्यांनी कदर्थी वाक्याचें विशेषेंकरून खंडन केलें आहे. गोविंदसुत ह्मणतात– " आत्मज्ञान मानभावाचें मानावयाचें असल्यास गोष्ट निराळी, परंतु अशानें सर्व संतांनाच मानभाव ह्मणावें लागेल, " पण आत्मज्ञान एवढ्या शब्दानेंच तें मानभावांचें नाहीं, असें ठरत नाहीं. कारण, आत्मा या शब्दाचे भिन्न भिन्न अर्थ शास्त्रकारांनीं केले आहेत. आत्मख्याति ह्मणून बौद्धांचा ग्रंथ आहे, तो विज्ञानवादाला पोषक आहे आणि तो वेदांताचा विरोधी आहे. आत्मज्ञान ह्मणून जैनग्रंथांतही आढळतें. परंतु तेथें आत्मा ह्मणजे पुद्गलद्रव्यरहित जीव व ईश्वराचें भेदज्ञान असा आहे. याविषयीं " ज्ञानाधिकरणमात्मा । स द्विविधः " इत्यादि तर्कसंग्रहांतील

---

वरील हा तऱ्हेवाईक अभिप्राय वाचला ह्मणजे ' कोण हा धटिंगण ! ' ह्मणून न कळत उद्गारलेला मनुष्य जांवई आहे असें मागाहून समजल्यावर तोच धटिंगण ' जांवयाची कीड आणि ती इतकी रोड ' दिसलेल्या सासूबाईच्या गोष्टीचें स्मरण होतें ! पांगारकरांचा हा वरवरचा अभिप्राय व त्यासंबंधानें प्रेमानें केलेला हा विनोद आपण वरच्यावरच सोडून देऊन गुलाबरावमहाराजांकडे वळूंया.

४. गुलाबरावमहाराजांकडे हें पुस्तक गेलें त्या वेळीं ते तत्त्वसारायण, सिद्धांतसूत्रें, शहामुनीचा सिद्धांतबोध, व कांहीं अभंग वगैरेंतून थिऑसफी, उत्क्रांतिवाद, मानभावादि मतें हीं घुसडलीं जाऊन त्या ग्रंथांचा व पंथांचा वऱ्हाडांत फार सुळसुळाट झालेला आहे, त्यावर लेख लिहिण्याकरितां बसले होते. थिऑसफी व उत्क्रांतिवाद यावर मुमुक्षूचे साडेतीन कॉलम होतील इतका मजकूर लिहून झाल्यावर शहामुनीचा सिद्धांतबोध घेऊन त्यांतील मानभावी मतावर काय लिहावें, हा विचार चालला असतां त्या संधींत हा ग्रंथ हातीं आला, अर्थात् अशा वेळीं नदीवरील ब्राह्मणाकडे लग्नाची अक्षत आली असतां त्या ब्राह्मणाकडून त्या अक्षतेची जी वाट लागते, त्या ब्राह्मणाप्रमाणेंच गुलाबरावमहाराजांची स्थिति

पंक्ति पहाव्यात. वेदांतांतील आत्मज्ञान शब्दाचा अर्थ तर त्वंपद व तत्पद यांच्या लक्षणेनें जीव व ईश्वर यांचें आभासवादान्वयें बाधसमानाधिकरण किंवा प्रतिबिंबवादान्वयें मुख्यसमानाधिकरण करणें असा आहे. अशा प्रकारचें आत्मज्ञान या वासिष्ठांत नाहीं, व त्याचा उपक्रमाशीं मेळ नाहीं, ह्मणूनच तो ग्रंथ तातांचा असला तरी वेदांती लोकांकरितां नाहीं, एवढें माझें ह्मणणें आहे.

आतां गोविंदसुतांचा दुसरा मुद्दा असा आहे कीं " चैतन्यरूप आत्मा आहे, किंवा चैतन्याच्या पलीकडे आत्मा आहे, याविषयींही पुष्कळ बोलतां येईल. पण स्थलसंकोचास्तव तसें करतां येत नाहीं. " पण तसें अवश्य बोलावेंच अशी मी गोविंदसुतास विनंति करितों. कारण, " चैतन्यमात्मा " असें शिवसूत्र असून तदनन्यत्वमारंभणशब्दादिभ्यः " इत्यादि सूत्रांनीं व त्यावरील शांकरभाष्य भामतीप्रभृति टीकांनीं आत्मा चैतन्यरूप आहे असेंच सिद्ध होत आहे. तातही आपल्या ग्रंथांत

---

होऊन हा ग्रंथही त्यांना मानभावांचा दिसला आणि मानभावादि मतांच्या सुळसुळाटावरील टीकेच्या वाहत्या गंगेच्या ओघांत या ग्रंथाबद्दलही हात धुवून घेऊन ग्रंथ मानभावाचा ठरविला असावा असें त्यांचा एकंदर अभिप्राय आणि विशेषेंकरून त्यांच्या ' ताजा कलमां'तील इतर ग्रंथांच्या सुळसुळाटाची प्रसिद्धि अवश्य व्हावी ह्मणून त्यांची चाललेली तळमळ यांवरून उघड दिसतें. तसें नसतें तर इतर ग्रंथांत व अभंगांत झालेली मतामतांची घुसडाघुसड बाहेर काढण्याकरितां लिहिलेल्या लेखांतच या ग्रंथांच्या अभिप्रायाची घुसडाघुसड करून ' इंद्राय तक्षकाय स्वाहा ' त्यांनीं केलें नसतें खास; गुलाबरावमहाराजांनीं या पुस्तकाचा स्वतंत्र रीतीनें विचार खोल दृष्टि घालून केला, तर प्रत्येक प्रकरणाचा उपक्रम जरी त्यांच्या समजुतीप्रमाणें कोणत्याही मतानें केलेला असला, तरी त्याचा शेवटीं उपसंहार आत्मज्ञानांत, सत्संगतींत केलेला आहे असें त्यांच्या नजरेस येईल आणि त्यावरून हा ग्रंथ तातांचा आहे, असें जरी त्यांना म्हणतां आलें नाहीं तरी हा ग्रंथ अध्यात्माचा आहे असें त्यांना म्हणावें लागेल यांत संशय नाहीं. गुलाबरावमहाराज हे खालील कारणां-

असेंच ह्मणतात:—

" एवं विशेष सामान्य । दोही नातळे चैतन्य ॥
ते भोगिजे अनन्य । तेणेसी सदा ॥

अमृतानुभव.

यद्यपि अमृतानुभवाच्या पांचव्या अध्यायांत " तैसी सच्चिदा-नंदू । आत्मा हा ऐसा शब्दू । अन्यव्यावृत्ति सिद्धू । वाचक नोहे ॥ " असें म्हटलें आहे. तथापि त्याचें समाधान सत्ताचि कीं सुखप्रकाशू । प्रकाशूचि सत्ता उल्हासू । हें न निवडे मिठांशू । अमृतां जेवीं ॥ या ओवीनें त्याच अध्यायांत तातांनीं केलें आहे. सत्ता, चैतन्य व आनंद हे तीन पृथक् भासतात तेव्हां ते मिथ्या असतात, आणि सत्यस्वरूपानें ते वस्तुतः एकच आहेत. वृत्तीनें जो त्यांचा वेगळेपणा भासतो तो तुच्छ आहे. असाच ह्या तातांच्या दोन्ही ओव्यांचा अर्थ आहे:– " ज्ञानाऽ

---

वरून हा ग्रंथ मानभावांचा ठरवितातः—

(१) ग्रंथांतील प्रकरण ५ वें हें मानभावांच्या ग्रंथांतील युगधर्माशीं जुळत असून तो मानभावाचा ग्रंथ त्यांजपाशीं आहे. (२) अभ्यासाच्या मार्गांत पुष्कळ चुका आहेत. (३) या ग्रंथांत आत्मोपासनेची युगधर्मान्वयें व्यावृत्ति केली आहे, हें पुराव्यानिशीं सिद्ध करण्यास ते तयार आहेत. (४) संप्रदायवेदांतदृष्टीनें असणाऱ्या चुका तर या ग्रंथांत अनंत आहेत.

या आक्षेपांपैकीं पहिल्या आक्षेपासंबंधानें मानभावी ग्रंथ पुढें आलेला नाहीं, तरी आणवण्याची जरूरही पण नाहीं. प्रस्तुत ग्रंथांवरूनच त्याचा निकाल होत आहे तो असा कीं, ' चोहीं युगधर्मीं वर्ततां । मोक्ष नाहीं सर्वथा ' हें मानभावांचें म्हणून मानलेलें मत गुलाबरावमहाराजांस प्रस्तुत ग्रंथाच्या पांचव्या प्रकरणांतील ज्या ओंवींत सांपडलें, त्याच ओंवीचे पुढले दोन चरण ' आत्मज्ञानावीण रघुनाथा । निश्चिता नोहिजे ' हे पाहण्यांत आले असते, तर याच प्रकरणांतील पंधराव्या ओंवींत लिहिल्याप्रमाणें हा युगधर्म ' वेदें बोलिला यथोक्त ' असो, अगर गुलाबरावांच्या ह्मणण्याप्रमाणें मानभावी मताचा असो, पण त्याचा

ज्ञान गिळुनी । ज्ञानमात्र जें ॥ असें तर तातांनीं स्पष्ट म्हटलें आहे. तेव्हां वृत्तिनिष्ठचैतन्याभासाहून निराळा—चैतन्यरूप आत्माच तातादिकांस संमत आहे. पंचपादिकाकार पद्मपादाचार्य— " आनंदो विषयानुभवो नित्यत्वं च संति धर्माः ब्रह्मणोऽपृथक्त्वेऽपि पृथगिवावभासंते । " असें स्पष्ट ह्मणतात. पंचपादिकाकारांचें उल्लंघन कोण्याही प्रकरणकारानें आजपर्यंत केलें नाहीं असा वेदांतसंप्रदाय आहे. यद्यपि— " साक्षित्व चैतन्य सत्ता । गुणब्रह्माचिया माथा । आरोपिले गा वृथा । मायागुणें ॥ " असें समर्थांनीं ह्मटलें आहे, तथापि जिनें ब्रह्माच्या माथ्यावर चैतन्याचा आरोप केला ती माया चैतन्याहून निराळी आहे असा त्याचा स्पष्ट अर्थ होतो. कारण आरोप्य आणि आरोपक ह्या दोन्ही वस्तु एक नसतात. शिवाय ही ओवी शब्दाच्या शक्तिवृत्तीसच लागू होते. लक्षणावृत्तीस लागू होणार नाहीं. लक्षणावृत्तीस लागू केली तर सर्व वेदांताचा आजच नायनाट होईल. बरें, या योगवासिष्ठांतील कृतयुगाच्या धर्मो-

---

उपसंहार शेवटीं ' आत्मज्ञानंविना पार्थ सर्वकर्म निरर्थकं ' यांत केला आहे असें स्पष्ट होत आहे. आतां ग्रंथ मानभावी ठरविण्याकरितां आत्मज्ञान हेंही मानभावांचें ह्मणावयाचें असेल तर मात्र कांहीं बोलणें नाहीं, पण मग ज्ञानोबाराय, समर्थ, तुकाराम, एकनाथ इ० चट सारे आत्मज्ञानी संत मानभाव म्हणावे लागतील ! असो, गुलाबरावमहाराजांच्या अभिप्रायांत चैतन्यरूप आत्मा किंवा चैतन्याच्या पलीकडे आत्मा इ० कांवर चर्चा आलेली आहे, त्यावरही पुष्कळ बोलतां येईल. परंतु अनेक कारणांनीं त्यावर बोलणें निदान या ग्रंथाच्या अभिप्रायाच्या प्रसंगांत तरी इष्ट नसल्यामुळें आपण तो विषय सोडून देऊं. या पुस्तकासंबंधीं गुलाबरावांच्या बाकीच्या मुद्यांसंबंधानें गुलाबरावमहाराजांस माझा एवढाच विनंतिरूपानें प्रश्न आहे कीं, ग्रंथ थोतांडी आहे असा स्पष्ट ठराव करण्यापूर्वी अभ्यासाच्या मार्गांत पुष्कळ चुका असतील तर त्या कोणत्या, हें स्पष्ट दाखवावयास नको काय ? आत्मोपासनेची व्यावृत्ति झालेली पुराव्यानिशीं सिद्ध करण्याची तयारी आहे तर ग्रंथप्रकाशक अगर वाचक पुराव्याचें माप पदरांत घेण्यास तयार नसल्यामुळें घोडें अडलें कीं काय ! वारकरी

चरणानें आरोपित चैतन्य प्राप्त होतें, असें म्हणावें तर तेंही योग्य नाहीं. कारण आरोपित चैतन्यधर्माचा आचरण करणाराच प्राप्य, असें कधींही होव नाहीं. यद्यपि आपलें मूळस्वरूपच सर्वांना प्राप्त आहे तथापि तें आरोपित नाहीं. याविषयीं " कर्मकर्तृव्यपदेशाच्च "। (ब्रह्मसूत्र) व त्यावरील शांकरभाष्य पहावें. बरें, गोविंदसुत ह्मणतात कीं, "चैतन्याच्या पलीकडे आत्मा आहे, यावरही पुष्कळ बोलतां येईल," तर बोलावेंच असें मी पुन: विनवितों. चैतन्याच्या पलीकडे आत्मा काय चैतन्यरूप आहे कीं जडरूप आहे ? कारण ज्या वस्तु द्वंद्वसत्वानेंच प्रादुर्भूत असतात त्यांच्यामध्यें तृतीयत्व संभवनीय नसतें. जड व चैतन्य ह्या अंधार व प्रकाशाप्रमाणें तशा वस्तु आहेत. यद्यपि संध्याकाळ तिसरेपणा आहे असें वाटतें, तथापि त्यांत तिसरेपणा नसून त्यांत प्रकाश व अंधाराचें मिश्रण आहे. त्याप्रमाणें संसर्गरूप अध्यासानें जड व चैतन्याचें जें

---

पंथाचा संप्रदायिक वेदांत कोणता व त्या दृष्टीनें या ग्रंथांत अनेक चुका आहेत त्यांपैकीं एक तरी दाखवण्यास नको होती काय ? आमच्यासारख्यांनीं केवळ गुलाबरावमहाराजांच्या वचनावर विश्वास ठेवला, तरी ' बाप दाखव नाहींतर श्राद्ध कर ' अशा मासल्याचे आधुनिक चिकित्सकांचा हल्लीं किती सुळसुळाट झालेला आहे हें महारजांस विदित आहेच त्यांची कशी समजूत पडणार ? यासाठीं गुलाबरावमहाराजांना माझी विनंति आहे कीं, ' समग्र ग्रंथ पाहिल्यावीण । उगाच ठेवूं नये दूषण ' ही आज्ञा तातांची नसली तरी समर्थांची आहे ती ध्यानीं आणून समग्र ग्रंथाचें निरीक्षण करूनच आपण अभिप्राय दिला असेल याबद्दल मला संशय नाहीं, पण तो अभिप्राय ' हा सूर्य आणि हा जयद्रथ ' या झोंकांत आला, ह्मणजे त्या ग्रंथाबद्दल व अभिप्राय देणाऱ्याच्या पूज्यतेबद्दल मुमुक्षूच्या अंत:करणांत लख्ख उजेड पडतो. माझ्या विनंतीचा गुलाबरावमहाराजांकडून अनादर होणार नाहीं अशी मला उमेद आहे.

९. आतां आमचे परमपूज्य ' ह. भ. प. ' विष्णुबोवा जोग या ग्रंथाला ' तोतयाचें बंड ह्मणतात त्याला ते कारणें देतात तीं हीं:—

मिश्रण वाटतें तेंच तृतीयत्व आहे, असें जर गोविंदसुत म्हणतील तर तें चैतन्याच्या पलीकडचें कधींच असूं शकणार नाहीं. कारण सर्व आरोपित पदार्थांना चैतन्यच अधिष्ठान आहे, जड अधिष्ठान होत नाहीं, असा वेदांताचा सिद्धांत आहे, आणि या विषयीं कोणत्याच ग्रंथांत भेद होणें शक्य नाहीं. कारण असें मानण्यालाच वेदांत म्हणतात. पुनः याच योगवासिष्ठांत पांचव्या अध्यायाच्या २० व्या ओवींत कृतयुगींचें निरूपण चाललें असतांना असें ह्मटलें आहे.

तियेयुगीं धर्मू आत्म उपास्ति । जे यथोक्त आचरती ॥
ते चैतन्यप्राप्ति पावती । निर्धारेंसी ॥ २० ॥

आणि चहूंयुगींच्या धर्मांनींही मोक्ष मिळत नाहीं, असें पुढें ह्मटलें आहेच. तेव्हां मानभावांच्या मतांत चैतन्य नांवाची माया एक देवता असून त्या मताशीं हें ह्मणणें जुळतेंही. कारण मानभावमतांतील पारिभाषिक चैतन्य प्राप्त झालें असतां मानभावांना संमत असा मोक्ष

---

(१) सारा ग्रंथ चाळला तरी महाराजांची भाषापद्धति व विचारसरणी कांहीं केल्या आढळत नाहीं.

(२) मूळ श्लोक व त्यावर व्याख्यान असें यांत नाहीं, प्रकरणें मूळाला धरून तर नाहींतच पण अन्वर्थकही नाहींत.

(३) कांहीं ओंव्या ज्ञानेश्वरी व अमृतानुभव यांतील तेच शब्द ठेवून हा ग्रंथ महाराजांचा असावा असा बनावट पुरावा केला आहे.

(४) ज्ञानेश्वरमहाराजांच्या ग्रंथांत मुळींच न आढळणारे शब्द यांत आढळतात.

(५) ग्रंथाची रचना दासबोधाच्या धर्तीवर जात असल्यामुळें हा ग्रंथकार दासबोध वाचणारा असावा.

(६) बाह्य अगर आंतर कोणत्याही प्रमाणावरून हा ग्रंथ महाराजांचा असावा, असा बुवांच्या अंतःकरणांत उजेड पडत नाहीं.

(७) या सर्व कारणांवरून बुवांचें अनुमान असें आहे कीं, एक तर प्रकाशक हे भाबड्याकडून फसविले गेले असले पाहिजेत, अगर वारकरी हे फसणारे आहेत, अगर त्याच्यांत कांहीं राम आहे—दम आहे

प्राप्त होत नाहीं हें खरें आहे. कारण चैतन्याच्या पलीकडे ते परमेश्वर मानतात. पण वेदांती लोकांची गोष्ट तशी नाहीं. वेदांतांत तर चैतन्यच ब्रह्म असा सिद्धांत केला आहे. तेव्हां चैतन्याची प्राप्ति होऊनही मोक्ष होत नाहीं, कारण चैतन्याची प्राप्ति हें कृतयुगींच्या धर्माचें फळ आहे. आणि आत्मज्ञानानें मोक्ष होतो. तेव्हां चैतन्याहून निराळें असें हें आत्मज्ञान कोणतें? हें गोविंदसुत सांगतील तर मजवर उपकार होतील. बरें, कृतयुगींच्या धर्मानें प्राप्त होणारें हें चैतन्य मानभावांचें न घेतलें, वेदांतांतीलच चैतन्य आहे असें घेऊन चाललें तर त्याविषयीं प्रश्न उत्पन्न होतो तो असाः—वेदांतात तीन प्रकारचेंच चैतन्य आजपर्यंत उपलब्ध होत आहे. शुद्ध चैतन्य, शबल चैतन्य व आरोपित चैतन्य शुद्धचैतन्यच परब्रह्म आहे, असें सर्व वेदांताचा समन्वयपूर्वक सिद्धांत आहे. शबलचैतन्य दोन प्रकारचें आहे. ईश्वररूप आणि जीवरूप. आरोपित चैतन्य फक्त समर्थांच्या

---

किंवा नाहीं, हें अजमावण्याचा हा प्रयत्न असावा.

या प्रत्येक आक्षेपाबद्दल महाराजांना मी दोन शब्द विचारण्याची परवानगी घेतों.

आक्षेप १ ला—ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, व हा ग्रंथ यांतील अर्थाकडे बिलकुल लक्ष न देतां नुसतेच तिन्ही ग्रंथ वाचीत असतांना या ग्रंथांतील अशुद्ध शब्द सोडून दिले तर बाकीच्या शब्दांच्या मोडणीवरून या ग्रंथाची भाषा महाराजांची नव्हे अशी चटकन् ओळखून हा ग्रंथ खड्यासारखा निराळा काढतां येईल काय ? व तोतयाच्या बंडातील तोतया हा सदाशिवरावभाऊंची हुबेहूब प्रतिमा दिसत होती, अशी ज्ञानेश्वराची प्रतिमा यांत नसेल तर ' तोतयाचें बंड ' हे नांव याला कसें देतां येईल ? अमुक एका विषयासंबंधानें ज्ञानेश्वरी व अमृतानुभव यांतील विचार अमुक आहे व या ग्रंथांत त्याच विषयाबद्दल विचार त्याच्याशीं निराळा आहे अशी स्पष्ट फोड करून दाखवून त्यावरून ही विचारसरणी महाराजांची नाहीं, असें सिद्ध करतां येण्यासारखें आहे किंवा नाहीं ? असेल व महाराजांकडून पुन्हां एकवार स्पष्टता होईल तर आम्हां अज्ञानी जीवांना या बनावट ग्रंथापासून आपली फारकत करून

ग्रंथांतच सांगितलें आहे आणि त्याचा जीवचैतन्यांतच समावेश होतो. नाहीं तर व्यर्थ गौरवदोष येईल. कारणावांचून अधिक पदार्थ मानण्याला गौरव ह्मणतात. जीव हा मोक्षाला अधिकारी असून तो शुद्धचैतन्यांत मिळाला ह्मणजे मोक्ष होतो, असें कांहीं ग्रंथकार ह्मणतात, आणि ईश्वर-चैतन्यास मिळाला असतां मोक्ष मिळतो असें भाष्यकार व विवरणकार ह्मणतात. हा मोक्ष कांहीं ब्रह्मलोकांतल्या मोक्षाप्रमाणें नव्हे तर, ज्ञानानेंच प्राप्त होतो, असें या सर्वांचें म्हणणें आहे. म्हणून चैतन्यप्राप्तीच्या पलीकडे मोक्ष आहे असा वेदांतनिष्कर्ष निघणें शक्य नाहीं. आतां ब्रह्म-लोक प्राप्ति म्हणजेच चैतन्यप्राप्ति असा एखादा विवक्षित अर्थ जर गोविंदसुत करतील तर तोही या योगवासिष्ठाच्या विरुद्धच होणार आहे. कारण त्रेतायुगाच्या धर्मानें कैलासवैकुंठादिक प्राप्त होतात असें या योगवासिष्ठांत सांगितलें असून चहूंयुगींच्या धर्मफळांतच तें येत असल्या-मुळें मोक्ष नव्हे, असा—अर्थातच निष्कर्ष त्यावरून निघतो. बरें

---

घेण्यास बरें पडेल. कारण मी तर प्रथम ग्रंथ न वाचतां ज्ञानोबाचा ग्रंथ या भपक्यावरच विकत घेऊन फसलों गेलों आहें !

आक्षेप २ राः—भावार्थ ह्मणून काढलेल्या ग्रंथांत श्लोक व अर्थ असलाच पाहिजे, असा नियम आहे काय ? व श्लोक आणि अर्थ नसेल तर तेवढ्यावरून ग्रंथ ज्ञानोबाचा नाहीं ह्मणतां येईल कीं काय ? ज्ञानेश्वरींत श्लोक व व्याख्यान आहे, पण श्लोकाचा अर्थ एकीकडे तर महाराजांचा भावार्थ भलतीकडेच असे कित्येक तरी श्लोक नाहींत काय ? जेथें ग्रंथाचें रहस्यच बाहेर काढावयाचें, तेथें श्लोक असेल तर उत्तमच, पण नसला तरी तेवढ्यावरून ग्रंथ ज्ञानोबाचा नाहीं असें ह्मणतां येईल काय ? मूळ ग्रंथांतील विषय व त्याचें हृद्गत पुढें ठेवून ज्या ज्या उपायांनीं मुमुक्षूंचा भ्रम दूर होईल, तशा तऱ्हेच्या निरूपणानें स्वतंत्र रचना करून सारभूत ग्रंथ लिहिला गेला असेल तर अशा प्रसंगीं मूळाला धरून अगर अन्वर्थक अशीं प्रकरणें असणें अवश्य आहे कीं काय ? या ग्रंथांत ऋषिसिद्धसंघ, शिष्यदूषण, शिष्यसंतप्रशंसा, षड्दर्शनावरण, चतुर्युगधर्म, गृहस्थाश्रमनिषेध, अष्टांगयोग, सर्वांतरात्मप्रशंसा,

चैतन्याच्या पलीकडे असलेला आत्मा जड आहे. असा दुसरा पक्ष घेऊन चाललें तर जडाची प्राप्ति ह्मणजे मोक्ष ठरणार आणि तसा वेदांताचा सिद्धांत कोठें उपलब्धच नाहीं. आतां सत्ता पुरुष व चैतन्य प्रकृति अशाप्रकारचें जें तातांनीं ह्मटलें आहे तें योगवृत्तीला अनुसरून ह्मटलें असल्यामुळें वेदांत जर गोविंदसुतांना माहीत आहे तर त्याविषयीं विवाद नाहीं हेंही त्यांना ठाऊक आहे हें मी घेऊन चालतों व अधिक लिहीत नाहीं. याप्रमाणें दोन मुद्दे झाले.

आतां अभ्यासाच्या मार्गांत चुका कोणत्या ? याविषयीं प्रश्न केला आहे, व तो अभिनंदनीय आहे. यावरून गोविंदसुतांना योगाभ्यासाचीही माहिती आहे असें वाटतें. ह्मणून मी त्यांच्या प्रश्नाला यथामति उत्तर देतों.

" तरी प्रथम परवस्तुपासुनु । जाला लयेंनु । लयनापासुनी

---

प्राणसांकळी, परब्रह्मयोग, अशीं दहा प्रकरणें आहेत. यांपैकीं एकही प्रकरण मूळाला धरून अगर अन्वर्थक नाहीं कीं कसें ?

आक्षेप ३ राः—हा ग्रंथ ज्ञानोबाचा आहे यालाच पुष्टि देतो ! कारण आपल्यास आवडणारे शब्द, दृष्टांत, अगर वाक्यें आपण नेहमीं निरनिराळ्या प्रसंगीं तींच तींच उपयोगांत आणीत असतों. निरानिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या विषयांवर वर्तमानपत्रांतून येणारे लेख कोणाचे आहेत हें त्यावरूनच चटकन् ओळखतांही येतें. कीर्तनकार हे निरानिराळ्या विषयांच्या अभंगावर कथा करीत असले, तरी तेच दृष्टांत, वाक्यें, गोष्टी इत्यादिकांची पुनरावृत्ति करीत असतात, हें महाराजांना विदित आहेच. एका ग्रंथांत दिलेले दृष्टांत दुसऱ्या ग्रंथांत देण्याचा प्रसंग आल्यास निराळ्या तऱ्हेच्या मांडणीनें ओंवी रचण्याऐवजी पहिलीच ओंवी कायम ठेविली तर त्यांत काय बिघडतें ? नाथांच्या ग्रंथांतून असे प्रकार झालेले नाहींत काय ? तात्पर्य एवढ्यावरून बनावट पुरावा ह्मणण्याऐवजीं पुष्टिकारक पुरावा ह्मणतां येणार नाहीं काय ?

आक्षेप ४ थाः—ज्ञानेश्वरमहाराजांच्या ग्रंथांत न आढळणारे शब्द यांत आढळतात ते कोणते ? दहा पांच कळले तर त्याबद्दल विचार

महत्तु । कृतिपक्कु पै ॥ १९ ॥ कृतिपकापासौनी सत्येशु । सत्येशापासौनी आर्यानिर्देशु । तेथुनु जाला प्रकाशु । जोतिसांख्यु ॥ २० ॥ सांख्यापासौनु कैसा । केवळ अंकारिया परियेसा । समरु जाला जैसा । सांख्य-सहशु ॥ २१ ॥ समरी पासौनु गुणक्रतु जाला । गुणक्रुते कृतिवासा रचिला । तेयापासौन उपेंद्रु जन्मला । उपेंद्रें रचिला निद्राहीनु ॥ २२ ॥ निद्राहीनें रचिलें पिंडब्रह्मांड । चतुर्विध भूतग्राम प्रचंड । सप्तद्वीपावती नवखंड । पृथ्वीपर्वत ॥ २३ ॥ ”

योगवासिष्ठ, अध्याय ९.

हा क्रम श्रुतिस्मृतिपुराणांत कोठेंही नाहीं ! ! व तो देहचतुष्टय-वादाशीं समन्वित होणें शक्यही नाहीं. यांतील २२ व्या ओवीवर जी टीप दिली आहे तींत हीं देवतांचीं नांवें आहेत असें ह्मटलें आहे. पण श्रुतिस्मृतिपुराणांत हीं देवतांचीं नांवें कोठेंही नाहींत, किंबहुना मानभावांच्या मतांतही नाहींत. आणि कोण्या योगशास्त्राच्या संस्कृत ग्रंथांतहि

---

करतां येईल.

आक्षेप ५ वाः—दासबोधाच्या पूर्वींचा हा ग्रंथ असेल तर हा ग्रंथ बनावट ह्मणण्याऐवजीं दासबोधच बनावट ह्मणतां येणार नाहीं काय? दासबोधानंतर हा बनाऊ दस्तऐवज झाला असावा असें अनुमान करण्यास या ग्रंथांत कांहीं आधार आहे काय ?

आक्षेप ६ वा:—एखादें प्रमाण स्पष्ट करून दाखवतां आल्यास आह्मां अज्ञानांच्या अंतः-करणांतही त्याचा उजेड पडेल.

आक्षेप ७ वा:—ग्रंथ सोपानदेवाच्या मठांत सांपडला, तो प्रकाशकांनीं जशाचा तसा छापून आपल्यापुढें मांडला, यांत प्रकाशकाची फसगत ती कसली ? यांतील ‘ भावडा ’ हा शब्द उपराधिक आहे कीं काय ? वारकऱ्याना अजमावण्याचा हा प्रयत्न सोपानदेवाच्या मठाधिपतींचा किंवा प्रकाशकाचा ? येणेंप्रमाणें महाराजांच्या आक्षेपावर मला शंका विचारावयाशा वाटल्या त्या मीं श्रद्धापूर्वक महाराजांपुढें ठेविल्या आहेत त्याचा विचार महाराजांकडून होईलच.

६. ग्रंथ ज्ञानोबाचा आहे किंवा नाहीं, हें सांगण्याचा ज्यांचा

नाहींत. बरें, याचा जो दहाव्या अध्यायांतील २९ ते ३४ या ओव्यांत लय सांगितला आहे, तो एका देवतेचा पहिल्या चक्रावर व दुसऱ्या देवतेचा श्रीहाट चक्रावर असा सांगितला आहे. पण असें योगाभ्यासांत होणें अशक्य आहे. कारण त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ हीं चक्रें पश्चिम मार्गाचीं असून समाहंकारानेंच या चक्रावर चढावें लागतें, असा योगियांचा अनुभव आहे. विषमाहंकारानें चढल्यास प्राणाचा विच्छेद होऊन मृत्यु होतो. पण असा क्रमानें देवतेचा लय करूं गेल्यास प्राणाचा विच्छेद झाल्यावांचून रहात नाहीं, हें अभ्यासांतील चुका ज्याअर्थी विचारल्या आहेत त्याअर्थी गोविंदसुतांना माहीत असलेंच पाहिजे. माहीत नसलें तर माझा गरीबाचा तेथें काय उपाय आहे ? पुनः दाहाव्या अध्यायांतील २८ व्या ओवींत षट् चक्रें भेदून गेल्यानंतर मणिफूळ मार्गानें आकाशांत जातो असें ह्मटलें आहे. आणि मणिफूळ शब्दावर

---

अधिकार, जितक्या प्रेमाच्या उत्सुकतेनें ग्रंथ ज्ञानोबाचा ह्मणून ते वाचायला लागून अखेर निराश झाले, तितक्याच प्रेमाच्या औत्सुक्यानें ज्यांच्या अभिप्रायाकडे महाराष्ट्रांतील सर्व वारकरी आणि भगद्भक्तांचे डोळे लागून रहातात, तेच जर असा वरवर अभिप्राय देऊन आह्मांला निराश करूं लागले तर मग काय ह्मणावें ? ' आतां संपलें ह्मणो पां आघवें । विवेकाचें ! ' अथवा ' आतां पुराला आह्मा धिंवसा । आत्मबोधाचा ! ' हे जे अर्जुनानें निराशेचे लडिवाळपणानें भगवंताशीं उद्गार काढले तसेच काढण्याचा आमच्यावर हा प्रसंग होय ' असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें ! 'अर्धांगी पार्वती' असा शंकराची प्रतिमा गुलाबरावमहाराज, विष्णुस्वरूप आमचे विष्णुबुवा, संतचरित्रें निर्माण करणारे ब्रह्मदेव आमचे पांगारकर, अशा ब्रह्माविष्णुहरादिकांपुढें प्रकाशकांनीं हा जो ग्रंथ अभिप्रायाकारितां पाठविला तो कांहीं वर्तमानपत्रीं उडवाउडवीचा अभिप्राय घेऊन ग्रंथ खपवावा यासाठीं खाचित नसेल तर संशोधनाचें सत्कार्य करीत असतांना त्यांत सांपडलेली ही अशोधित चीज ही काय रत्न आहे किंवा गारगोटी आहे, हें आपल्यासारख्या मर्मज्ञ पारख्यापुढें ठेवून आपल्या परीक्षेचा आणि त्याबरोबरच या जिनसेचा व ती घडणाऱ्या

माणिपूर अशी टीप दिली आहे परंतु माणिपूरचक्र हें षट् चक्रांतर्गतच असून षट्चक्रांच्या पलीकडचें नाहीं तेव्हां षट्चक्रें भेदून गेल्यावर माणिपूरपंथानें वायु कसा जातो हें गोविंदसुत कळवितील तर बरें होईल. टीपेंत जी ज्ञानेश्वरींतील ओवी दिली आहे तींतून, षट् चक्रें भेदून गेल्यानंतर वायु माणिपुरासी झुंजतो, असा अर्थ निघत नाहीं, परंतु वासिष्ठाच्या ओवींत तर " षट् चक्रें भेदुनु निर्धारी ' असें स्पष्ट वचन आहे. बरें, माणिपुराच्या मार्गानें षट्चक्रें भेदून असा ओवीचा अर्थ केला तरी होत नाहीं; कारण माणिपुराचा मार्ग स्वाधिष्ठानापासून जसा सरळ तसा पुढें प्राण चढविण्याला सरळ नाहीं. कारण अनाहत चक्रावर प्राण नेतांना हार्दसंकोचधारणा सर्व योगी करीत असतात, तीही गोविंदसुताला ठाऊक आहे असें मी घेऊन चालतों. तेव्हां ह्या अभ्यासांतील चुका नव्हेत काय ? असें मीच गोविंदसुताला विनवून विचारतों किंवा अशा प्रकारच्या धारणादिकांची चक्रभेदाला जरूर नाहीं, असें तरी गोविंद-

---

पुरुषाचा बरावाईट प्रकाश महाराष्ट्रावर पडावा, याच उद्देशानें पाठविला असला पाहिजे यांत संशय नाहीं. आपण महाराष्ट्रांतील सर्व वारकरी भगवद्भक्तमंडळाचें केंद्रस्थान आहांत, ज्ञानोबाच्या आत्मज्ञानांत, मननांत, भजनांत रात्रंदिवस गढलेले मुरलेले असे ' अध्यात्मशास्त्रीं इये । अंतरंगचि अधिकारिये ' या कोटींतील आहांत, ' राजा बोले दळ हाले ' ही भक्तमंडळींत आपली योग्यता, तसेंच आपलेंही सर्व महाराष्ट्रीयांवर प्रेम, म्हणून प्रेमाच्या लडिवाळपणानें तुमच्याशीं बोलण्याचा माझा हक्क आहे असें समजून तुमच्याशीं सलगीनें बोलतों कीं, आपण अभिप्राय दिला खरा, पण तेवढ्यावरून कांहीं आह्मां अज्ञजनांची खात्री होत नाहीं. ग्रंथ ज्ञानोबाचा तुह्मी ह्मणेपर्यंत तुह्मांला सतावून सोडावयाचें असा भलताच विपर्यास मात्र माझ्या म्हणण्याचा आपण करूं नका ! तुह्मी ग्रंथाचा वाटेल तो पंथ ठरवा, पण ' हा सूर्य आणि हा जयद्रथ ' असें स्पष्टपणें दाखवा, आणि आमची स्पष्ट समजूत घालून द्या. शंभर अपराधी सुटले तरी हरकत नाहीं. पण एका निरपराध्याला शिक्षा होऊं नये असा न्याय आहे. तद्वतच हा ग्रंथ ज्ञानोबाचा नसूनही आम्हां हजारों अज्ञान्यांनीं तो

सुतानें म्हणावें म्हणजे मी अगदीं तोंड मिटून बसेन, कांहीं लिहिणार नाहीं. यद्यपि पतंजलीयोगांत मनोनिरोधास षट्चक्रभेदाची आवश्यकता सांगितली नाहीं, तथापि जेथें षट्चक्रानिरूपण केलें आहे, तेथें सर्वत्रच अशा धारणादिकांची जरूरी आहे, असा सर्व योगियांचा अनुभव आहे. पुनः याच ग्रंथांत सातव्या अध्यायांत– " कर्मयोगु तो पवनें । हठयोगु तो भनें । ध्यानें लयो ज्ञानें । राजयोगु ॥ ११ ॥ " असें म्हटलें आहे. आणि पुढें या चार योगांचीं लक्षणें करतांना असें म्हटलें आहे:– " यमनियम तो कर्मयोगु । प्राणप्रत्याहारु तो हठयोगु । धारणाध्यान लययोगु । राजयोगु येरें दोन्ही ॥ १४ ॥ अध्याय ७ वा. तेव्हां ११ व्या ओवींत कर्मयोग हा वायूनें साधतो, असें म्हटलें असून १४ व्या ओवींत प्राणायामाचा समावेश हठयोगांत केला आहे, आणि यमनियमांना कर्मयोग ह्मटलें आहे. यमनियम जर कर्मयोग होय तर पवनाच्या-

---

ज्ञानोबाचा ह्मणून श्रद्धेनें वाचला तरी आह्मी अपराधी होणार नाहीं, पण ज्ञानोबाचा असूनही आपण डोळेझांक करून ' नाहीं ' असा ठरवाल तर हजारों लोकांच्या प्रवृत्तीचा आपण उच्छेद केला असें होणार आहे. या कामांत पुराव्याचा सर्वस्वी बोजा आपल्यावर आम्हीं लादणार, कारण एक तर ज्ञानोबाचें नांव कोरलेली जिन्नस तुम्ही नव्हे म्हणतां, तर ती कशी नव्हे, हें आमची ' आयणी टेंके, पुरे म्हणे ' या भगवंताच्या उक्तीपर्यंत तुम्हीं आमची खात्री करून दिली पाहिजे. दुसरें असें कीं, तुम्हांला स्तन्य देणारी ज्याप्रमाणें ज्ञानेश्वर माउली तुमच्या सन्निध उभी आहे म्हणून तुम्ही सांगतां, त्याप्रमाणेंच आम्ही सर्व महाराष्ट्रीयांना ज्ञानामृत पाजणारे तुम्ही आमच्या सन्निध आहांत, आमचा श्रुतिस्मृतिपुराणोक्त सर्व पुरावा तुम्ही आपल्या ज्ञानानें आपलासा करून घेतला आहे, यासाठीं तुम्हीं आमच्या अंतःकरणांत, आमच्या गट्ठ डोक्यांत ' हा ग्रंथ ज्ञानोबाचा खास नव्हे ' असा लख्ख उजेड पडेपर्यंत पुराव्याचें माप तुम्हीं आमच्या पदरांत बांधलें पाहिजे, असें प्रेमाच्या हक्कानें आपल्यास मी सांगतों, ह्मणून त्रयमूर्तिमहाराज ! सारासारविचारांनीं शृंगारलेल्या सर्वमान्य अशा हंसक्षीरन्यायासनावर पुन्हां एकवार आरूढ व्हा !

योगानें तो कसा साधतो ? त्यांत वायूचें काय कार्य असतें ? हठयोग जर मनानेंच होतो तर त्यांत प्राणायामाचा समावेश कां केला ? शिवाय " ज्ञानावृत्ती राजयोगे प्राणायामासने हठे । " इत्यादि स्मृतिवचनासही ह्या ओंव्या विरुद्ध आहेत. सर्व योगग्रंथांत आसन हें तिसरें अंग सांगितलें असून या ग्रंथांत तें आठवें अंग सांगितलें आहे व राजयोगाचे समाधीचा व त्याची एकवा केली आहे. परंतु " प्राणायामासने हठे । " असें स्मृतिग्रंथांत म्हटलें आहे तें कसें ? ह्या अभ्यासांतील चुका नव्हेत काय ? याप्रमाणें गोविंदसुतांच्या मुद्यांचें माझ्याच्यानें देवविलें तसें उत्तर दिलें. या लेखांत कांहीं पारिभाषिक शब्द आले आहेत, परंतु वेदांत व योग माहीत असल्यामुळें गोविंदसुतांना ते कठीण जाणार नाहींत. आतां संप्रदायवेदांतदृष्टीनें या ग्रंथांत ज्या अनंत चुका आहेत त्यावर एक मोठें पुस्तकच लिहिलें पाहिजे ! माझी प्रकृति सुधारल्यावर कदाचित् तेंही मी लिहीन आणि कांहीं चुका वर दाखविल्याही आहेतच; परंतु संप्रदाय-

---

आत्मप्रत्ययाची कसोटी पुढें ठेवा ! ग्रंथांतील प्रत्येक प्रकरण त्या कसोटीशीं घांसून पहा, त्यांत दोष असतील तर त्याला कारणेंही असतील; तर तीं शोधून काढा, प्रत्येक प्रकरणाचा उपक्रम कोणत्या आधारानें करून उपसंहार आत्मज्ञानांत झाला आहे कीं नाहीं तें पहा, प्रत्येक प्रकरणांत योगवासिष्ठांतील सार आलें आहे किंवा ग्रंथकारानें बगलेंतून काढून त्यांत घातलें आहे हें पहा, ग्रंथ बनावट असेल तर प्रत्येक प्रकरण बनवण्याचा हेतु काय असावा, शेवटीं प्रत्येक प्रकरणाचें आत्मज्ञानांत समर्पण झालें असेल तर ग्रंथ बनावट ह्मणतां येईल कीं काय. इ० सर्व साधक बाधक गोष्टींचा स्वच्छ अंतःकरणानें विचार करा. तुमच्यापुढें आलेला ग्रंथकार अपराधी असेल तर तसें निर्णयांनीं ठरेपर्यंत त्याच्याबद्दल तुम्ही आपलें मन कुलषित करून घेऊं नका. तुह्मीं बाहेर ऐकलें संवरलेलें व तुमच्या अंतःकरणांत खळमळ तर नाहींच परंतु कर्णोपकर्णांत दडून राहिली असल्यास ती बाहेरच्याबाहेर, ठेवा, ' कांद्याला बिस्मिल्ला ' कशाला पाहिजे ? असें कदाचित् आपल्यास वाटेल तर तें मनांतून घालवा आणि पुन्हां एकवार ग्रंथनिरीक्षण करून महाराष्ट्राचा संशय

वेदांत म्हणजे वारकरी वेदांत, असा जो गोविंदसुतानीं अर्थ केला आहे, तो माझा नाहीं, तर उपनिषदें, स्मृति व पुराणांतील अद्वैतकांड, ब्रह्मसूत्रें व त्यावरील श्रीमत् शंकराचार्यांचीं भाष्यें, पंचपादिका आणि विवरणें इत्यादि क्रम हा होय. आतां या मुद्याव्यतिरिक्त दुसरी जी गोविंदसुताची भाषा आहे तिला उत्तर देणें दांत खाऊन हात तोडण्यासारखें मला वाटत असल्यामुळें मला त्याची जरूर नाहीं.

आपला,

**गुलाबराव गोंदुजी मोहोड,**

मुकद्दम माधान; हल्लीं वस्ती उमरावती.

ता० २।८।१४.

---

घालवा, एवढी प्रार्थना करून मी तूर्त आपली रजा घेतों.

७ श्रीज्ञानोबाच्या नांवांत प्रेमाची इतकी काय जादु भरली असेल ती असो. एखाद्या दगडावर ज्ञानोबाचें नांव घातलेलें असलें तरी त्याच्या पायां पडावें असें वाटतें, मग हें तर ग्रंथावर नांव कोरलें आहे, त्या ग्रंथांत काय विषय आहेत याचें जरी आम्हांला ज्ञान नसलें तरी ' ज्ञानोबाचें एवढ्यावरच देहावरील प्रेमाप्रमाणें प्रेम बसतें, पण या श्रेष्ठांच्या अभिप्रायामुळें माझें ' थितें मानसे डहुळलें ' असल्यामुळें घेतलें तर वाधतें, टाकलें तर आपतें, अशी स्थिति झाल्यामुळें नसता उपद्व्याप ह्मणून हा लहान तोंडीं मोठा घांस घेतल्यामुळें यांत जे प्रमाद घडले असतील ते प्रेमातिरेकाचे असल्यामुळें त्रयमूर्ति महाराजांनीं मला क्षमा करावी.

आपला सर्वांचा दासानुदास,

**गोविंदसुत.**

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

# योगवासिष्ठावर पुनः विचार.

मुमुक्षु, ता० ६, आगष्ट, १९१४.

रा० रा० मुमुक्षुकर्ते यांसः—

मी दिलेल्या योगवासिष्ठाच्या अभिप्रायावर कोणाच्या संक्षिप्त सहीनें केसरीच्या ता० २१।७ च्या अंकांत मजकूर आला आहे. त्यांत " मानभावांत कोणी ज्ञानदेव झाला कीं नाहीं हें गुलाबरावला सिद्ध करणें प्राप्त आहे " असें म्हटलें आहे. यावर माझें ह्मणणें असें आहे कीं मानभावांत ज्ञानदेव झाला कीं नाहीं हें सिद्ध करण्याची आवश्यकता मला नाहीं. शिवाय चांदोरकरांची व माझी ओळख नाहीं. ते कोणाला फसविणारे आहेत असें माझें ह्मणणेंही नाहीं. माझें ह्मणणें इतकेंच कीं योगवासिष्ठांत युगधर्म नांवाच्या प्रकरणांत जो मजकूर सांपडतो तो मानभावांच्या ग्रंथांवांचून उपलब्ध श्रुतिस्मृतिपुराणांत मुळींच मिळत नाहीं. आणि "कर्मयोनि देवयोनि" इ० श्लोकांचा व शांकर वेदांताचा समन्वय होणेंच शक्य नाहीं असें मी पंडितांच्या सभेंत छातीस हात लाऊन सिद्ध करण्यास तयार आहे. मूळ योगवासिष्ठ शांकर मताच्या वेदान्ताचा आहे असें माझें मत आहे व तेंही मी सिद्ध करून देण्यास तयार आहे. पूर्वी सिद्धांतबोधावरून जें मानभावाविषयीं कांहीं मी लिहिलें होतें तसें या ग्रंथाविषयीं माझें वरवर ह्मणणें नाहीं तर स्वतःग्रंथ हातांत घेऊन सिद्ध करून देण्यास मी तयार आहें. एवढ्या वरून मानभावमत वाईट आहे असें मी प्रतिपादन करतों असें कोणी समजूं नये व मला त्याची जरूरही नाहीं. अद्वैत वेदान्ताशीं कधींही समन्वय न होण्यासारखा, कितीही व्याकरणानें शब्दार्थ बदलविले तरी दुसरा अर्थ न होण्यासारखा, मानभावग्रंथावांचून श्रुतिस्मृतिपुराणांत उपलब्ध नाहीं असा आणि एखाद्या लिखित ग्रंथांत श्लोक कोणी घालून दिल्यास देखील अद्वैतवेदान्ताशीं फूट पडेल असा मजकूर या वासिष्ठांत आहे हें मी सिद्ध करून देतों. मग तो तातांनी जरी केला असला तरी तातांच्या अमृतानुभवादि ग्रंथांच्या विरुद्ध असल्यामुळें तो आमच्या

करितां केला असें मला वाटत नाहीं. मी आपलें ह्मणणें केव्हांही सिद्ध करून देण्यास तयार आहें. मला हल्लीं ज्वर येत आहे ह्मणून सिद्ध करून मागणाऱ्यानें येथें आल्यास मजवर उपकार होतील. नाहींतर माझी प्रकृति सुधारल्यावर भेट झाल्यास दोन्ही ग्रंथ हातांत घेऊन सिद्ध देईन. यापेक्षां जास्त लिहिणें माझ्याकडून होत नाहीं. मानभावांमध्यें कोणी ज्ञानदेव झाला कीं नाहीं अशा दृष्टीनें मी पूर्व लेखही लिहिला नव्हता. कारण प्रत्यक्ष वेदान्तभेद सांपडला असतां अर्थापत्ति प्रमाणाचें अवलंबन करावें असें मला वाटलें नाहीं व वाटतही नाहीं. वेदान्तग्रंथांत अशा प्रकारचे घोटाळे कोणाच्या तरी नांवावर होतात याच संबंधांत उदाहरणें मी पूर्व लेखांत दिलीं आहेत तीं पाहिजे असल्यास पुन्हा कोणी वाचून पहावीं. इलेक्ट्रिसिटीचे ठोके आणि परब्रह्म एकच आहे असें ज्यांचें ह्मणणें असेल त्यांच्याशीं चर्चा करण्याची मला कांहीं जरूर नाहीं. पण योगवासिष्ठ अद्वैतवादाचा असून, सांप्रदायिक शांकरमतांत, समन्वय हाच पहिलेपासून परिशुद्धीचा मार्ग ठरत आला असल्यामुळें तद्विरुद्ध वचनाला राहण्याला समावेशच नाहीं असें मी स्पष्ट ह्मणतों. यावर माझ्या प्रकृतींत त्राण आहे तोंपर्यंत पाहिजे तितकी लेखालेखी करण्यास मी तयार आहें. अमुक नांवाचा मनुष्य झाला किंवा नाहीं हा वाद इतिहासाचा असून तो सतत संदिग्धच राहणार. तेव्हां त्या बद्दल मला कांहींच बोलण्याची इच्छा नाहीं. इतकें लिहूनच मी केसरींतील लेखकाची क्षमा मागतों.

आपला,

ता० २४।७।१४. } गुलाबराव गोंदुजी मोहोड,
मुकद्दम माधान हल्लीं मुक्काम उमरावती.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

## आचार्य व ज्ञानेश्वर.

तारीख १५, आक्टोबर, सन १९१४.

रा० रा० मुमुक्षुकर्ते यांस:—

सा. न. वि. वि. मी बाळशास्त्री हुपरीकर यांनीं लिहिलेला “ विद्यारण्य व ज्ञानेश्वर यांच्या वेदान्तावरील मतांचें तात्पर्य ” नांवाचा

निबंध वाचला. त्यांत शंकराचार्य, विद्यारण्य व तात यांच्या मतांत भेद दाखविले आहेत. माझ्या मतें तातांच्या मतांत व शांकरमतांत भेद नाहीं. ' तातचरणभूषण ' नांवाच्या ग्रंथांत मी असें प्रतिपादनही केलें आहे. पुनः मायेचा अंगिकार न करून नुसत्या स्फुरणपक्षाचाच तात अंगिकार करितात असें मानलें तर श्रीकांतमतांचे व वैमर्षण मताचे तात आहेत असें जबरदस्तीनें ह्मणावें लागतें. आणि हीं दोन्हीं मतें तर प्रत्यक्ष वेद-विरुद्ध आहेत. जेथें तातांनीं अज्ञानाचा अंगिकार केला नाहीं त्या ठिकाणीं तो शंकराचार्य व विद्यारण्यही करीत नाहींत असें विवरणादि पुराव्या-निशीं सिद्ध करण्यास मी तयार आहें. ह्मणून शंकराचार्यमतांत व तात-मतांत भेद नाहीं असें मी ह्मणतों. परंतु ताताचें मत शंकराचार्यांच्या मताहून निराळें आहे असें कांहीं वारकरी लोकांचें ह्मणणें आहे हें मला येथें एका हरदासानीं सांगितलें. मी प्रत्यक्ष कोणा वारकऱ्याचे तोंडून ऐकिलें नाहीं, परंतु खरोखरच पुष्कळ वारकऱ्याचें असें मत असेल तर तें वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्ध झाल्यास मला पटेल तर मी त्याचा अंगिकार करीन. मात्र त्यांत वेदविरुद्ध जीं वर दोन मतें सांगितलीं तीं टाळतां आलीं पाहिजेत. मला वाटतें वारकरी लोकाचे तसें मत असणें शक्य नाहीं. हरदासबोवांनीं खोटें सांगितलें असल्यास व वारकऱ्यांचें तसें मत असल्यास कोणी वारकरी महात्म्यानें हरदास येथें उमरावतीस आहेत तोंपर्यंत जरूर प्रसिद्ध करावें, अशी कर जोडून विनंति आहे कळावें. आपला,

९।१०।१९१४. { गुलाबराव गुंडोजी मोहोड, माधानकर हल्लीं मुक्काम उमरावती.

---

१ या लेखावर वे. शा. सं. बाळशास्त्री हुपरीकर यांनीं महारा-जांस पत्र पाठवून ह्या वाद वर्तमानपत्रांतून चालविण्याची इच्छा प्रदर्शीत केली होती पण लवकरच महाराज तिरोभूत झाल्यामुळें तो प्रश्न तसाच राहिला. पुढें महाराजांचे पट्टशिष्य गुरुभक्तिपरायण नारायणराव पंडित यांनीं स्वकर्तव्य ह्मणून तो वाद पुढें मुमुक्षु पत्रांतून चालविला व शंकरा-चार्यमतांत व तातमतांत भेद नाहीं हें विवरणादि पुराव्यानिशीं सिद्ध करण्यास मी तयार आहे" ही महाराजांची प्रतिज्ञा पुरी केली. तो पत्रव्य-वहार " आचार्य व ज्ञानेश्वर पुढें चालू " या सदराखालीं शेवटीं दिला आहे.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

# माझ्यासंबंधीं गैरसमजुती व त्यांचा प्रतिकार.

मुमुक्षु, गुरुवार, तारीख १९, नोव्हेंबर, सन १९१४.

रा० रा० मुमुक्षुकर्ते यांसः—

स्वतःची महती गाणें हें प्राचीन अर्वाचीन सज्जनमंडळींत वाईट गणलें गेलें आहे ' परैः प्रोक्ता गुणा यस्य निर्गुणोऽपि गुणी भवेत् । इंद्रोऽपि लघुतां याति स्वयं प्रख्यापितैर्गुणैः ॥ असें एक सुभाषितही प्रसिद्ध आहे. परंतु अधर्माला प्रतिबंध करण्याकरितां स्वतःची महती देखील गावी असें वसिष्ठ ह्मणतात. या वचनाचा आधार धरून एकतीस वर्षे न काढलेले उद्गार कांहीं परिस्थितीमुळें काढणें भाग पडत आहे. त्याबद्दल वैदिक संत मंडळींच्या चरणाजवळ मी क्षमा मागून घेतों. कांहीं ब्राह्मणव्यक्ति, माझ्याविषयीं जरी हलकें मन करीत असल्या तरी त्यांनीं माझ्याविषयीं लोकांत फारसें वाईट मत फैलविलें नाहीं, परंतु ब्राह्मण होण्याकरितां हपापलेले ब्राम्हणेतर माझ्याविषयीं गैरसमजुती लोकांत उत्पन्न करीत आहेत, त्यांत सर्वांनीं मिळून एकत्र जेवावें असें ह्मणणारे कांहीं वारकरीही आहेत. ह्या गैरसमजुती कसकशा फैलविल्या आहेत त्या क्रमानें देऊन त्यांचें यथामति उत्तर देतों.

१ पहिली गैरसमजूतः—गुलाबराव महाराज देखील स्वतःला कागदपत्रीं 'क्षत्रिय' लिहितात.

प्रतिकारः—आमच्या कांहीं मंडळीनें 'क्षत्रिय' लिहिण्याचा प्रचार नवीन पाडला आहे. यापूर्वी आम्ही आपल्यास तिरोळे कुणबी लिहीत होतों. तें कांहीं असलें तरी स्वतःला मी क्षत्रिय लिहीत नाहीं, 'शूद्र' लिहितों. घटकाभर खोटी कल्पना करून मी द्विज आहें असें जरी घेऊन चाललों तरी अनंत कालापासून संस्कारविच्छिन्न झाल्यामुळें कलियुगाच्या शेवटीं होणाऱ्या मरु व देवापी या दोन महात्म्याशिवाय मला क्षत्रियत्व देणें दुसऱ्याच्या हातीं नाहीं हें वैदिक धर्मावर विश्वास असल्यामुळें मला ठाऊक आहे. बरें वैदिक धर्मावर माझा विश्वासच नसला तर मग मला द्विजत्वच कशाला हवें आहे ! काय इतर लोकांना कलाकौशल्य साधतां येत नाहीं ?

२ दुसरी गैरसमजूत—ब्राह्मण स्वतः ग्रंथ करितात व त्यांवर गुलाबराव महाराजांचें नांव घालतात. ब्राह्मणांनीं गुलाबरावास मुद्दाम पुढें केलें आहे.

प्रतिकारः—ही गोष्ट अत्यंत खोटी आहे. या गोष्टीचें प्रत्यंतर दाखविण्याकरितां मी केवढ्याही मोठ्या समाजांत ग्रंथ रचण्यास तयार आहें. शिवाय मजजवळ असलेल्या मंडळीलाही माझे सर्व ग्रंथ सध्यां समजत नाहींत. शिवाय मी स्वतः ग्रंथ रचतों कीं नाहीं हें प्रत्यक्ष येऊन वाटेल त्यानें पहावें; नाहींतर पुढें गुलाबराव आमच्या जातीचेच होते, त्यांना पुढें करून ब्राह्मणांनीं कांहीं तरी ग्रंथ रचले असा कुत्सित वाद गुप्तपणें लोकांनीं सुरू करण्याचा संभव आहे.

३ तिसरी गैरसमजूत— गुलाबरावाला मंडळी ग्रंथ वाचून दाखवितात व नंतर इकडचें तिकडचें ते लिहितात.

प्रतिकार— या म्हणण्यावर प्रश्न असा आहे कीं मी जे ग्रंथ लिहितों ते समजून लिहितों कीं न समजून लिहितों ? पहिल्यापक्षीं 'चित्सुखी'सारखे ग्रंथ समजावून देणारा मजजवळ कोण आहे याचा शोध अवश्य करावा. अथवा 'चित्सुखी'सारख्या ग्रंथांतील अक्षरें वाचून त्यांतील प्रमेयें तरी या मंडळींतील कोणी लिहून दाखवावीं. उमरावतीस येण्यापूर्वीं हे ग्रंथ मजजवळ नव्हते हें सर्व मंडळीस ठाऊकच आहे. मागाहून उमरावतीस येऊन मला १०।११ वर्षें झालीं. त्यापूर्वीं संस्कृत व्याकरण शिकलेल्या वाचकांशीं माझा संबंधच पडला नाहीं; आणि उमरावतीस येऊन जरी हे ग्रंथ मी मागविले तरी त्यांचा समजदार वाचक मला कोणीच मिळाला नाहीं. या माझ्या म्हणण्याची सत्यता पाहण्याकरितां कोणाहीजवळ कोणीही शोध करावा याबद्दल मी सरसकट परवानगी देतों. या चित्सुखीसारख्या ग्रंथाचे उतारे माझ्या ग्रंथांत समीक्षापूर्वक आले आहेत. अनार्य भाषेंतील ग्रंथ मात्र मी दुसऱ्याकडून वाचून घेतों हे खरें आहे. वेदांत ग्रंथही मी दुसऱ्याकडून अलीकडे वाचून घेतों पण त्यांचें पूर्वप्रमाण मीच सांगत असतों. यावरून मी कोणी अलौकिक आहे असें भासविण्याचा माझा प्रयत्न नाहीं तर ही वस्तुस्थिति खरी आहे कीं नाहीं; हें माझ्या जातिबांधवानें येऊन पहावें.

४ चवथी गैरसमजूत-गुलाबरावमहाराज शौच्याच्या वेळेस ग्रंथ वाचतात. त्यांनीं कांहींतरी यक्षिणीसाधन केलें ह्मणूनच त्यांना इतका शौच्याला वेळ लागतो.

प्रतिकार- चार वर्षांपूर्वी मला शौच्यास इतका वेळ लागत नसे हें सर्व मंडळीस ठाऊक आहे. पुण्याकडील मंडळीशीं देखील माझा पहिला परिचय झाला तेव्हां इतका वेळ लागत नव्हता. हा वेळ मला रोगामुळें लागतो. शिवाय शौच्याच्या वेळीं जप करून प्रसन्न होणाऱ्या देवता वेदांतज्ञान सांगूं शकतात असें उपलब्ध तंत्रवाक्यानें जर हे आक्षेपक सिद्ध करतील तर बरें होईल; कारण अशा शूद्र देवतांचीं साधनें तंत्रांतच असावयाचीं. शौच्याला फार वेळ लागतो ह्मणून करमणुकीकरतां मी आढून दुसऱ्यानें वाचलेले ग्रंथ ऐकतों हें खरें आहे; परंतु ते ग्रंथ शौच्याला पाणी घेऊन गेलेंच पाहिजे असा नियम जी भाषा सांगत नाहीं त्या भाषेचेच असतात. आतां शौच्याचा रोग असल्यामुळें एनिमा घेण्याकरितां पाणी मागण्यासाठीं मला कधीं कधीं तोंडानें हांका मारणें भाग पडतें. माझा हा रोग कोणी बसवून देईल तर हें पाप मी पुढें करणार नाहीं हें शपथ घेऊन सांगतों.

५ पांचवी गैरसमजूत-गुलाबरावमहाराज ब्रह्मचर्याला पुष्टि देत नाहींत.

प्रतिकार-ही गोष्ट अत्यंत खोटी आहे. माझें मत यासंबंधीं इतकेंच आहे कीं हिमालयावर संतत समाधि लावून बसल्याशिवाय अधुकल्या मधुकल्या खाऊन रामराम जपणाऱ्या माझ्यासारख्याला कडक ब्रह्मचर्य साधत नाहीं, मग तें झांकून नेण्याकरितां भलते प्रयत्न करण्यापेक्षां विवाह करणेंच उत्तम असें मी स्पष्ट ह्मणतों. ह्मातारा, रोगी, मध्यमप्रकृति आणि एकाही दिवसापुरतें खावयास नाहीं असा दरिद्री हीं चौघें वर्ज्य करून बाकी राहिल्या सर्वांनीं विवाहच करावा असें मीं स्पष्ट लिहून ठेवलें आहे. ब्रह्मचर्य पाळावयाचेंच असेल तर दोघांनीं मिळून पाळावें, पण विवाहावांचून राहूं नये. साधु होऊन उपद्व्याप करणें मला पसंत नाहीं. आतां ब्रह्मचर्याच्या दोन परीक्षा. पहिली बाह्य आहे ती अशी. गण्यरज्जु कंठापासून स्तनापर्यंत घेऊन नंतर मस्तकावर धरावा. त्या

रज्जूंत बालकाच्या मस्ताकाप्रमाणें मस्तक आलें ह्मणजे ब्रम्हचर्य आहे असें समजावें, पण या परीक्षेला अपवाद असण्याचा संभव आहे. दुसरी परीक्षा अशी कीं, साधुपुरुषाला एक दिवसभर खुर्चीसारख्या उच्च आसनावर बसलेलें ठेवून अन्नपाणी न देतां त्याचे स्वर पहावे. स्वर तिथीवार, व घटकेप्रमाणें बरोबर पालटत गेले पाहिजेत आणि ज्या स्वरांत जें तत्व चालतें तें त्या त्या वेळीं त्याच स्वरांत बरोबर चाललें पाहिजे ह्मणजे ब्रह्मचर्य आहे असें समजावें. तत्व पाहणें तें योग येत असेल तर आपल्या तत्वाशीं मिळवून पहावें आणि योग येत नसेल तर काशाचा आरसा समोर धरून पहावें ह्मणजे रंगांचीं प्रतिबिंबें स्पष्ट कळतात; तसेंच त्याचें वजन पाण्यात कागद टाकून पहावें. कातणीचें घर मिळाल्यास चांगलें पाहतां येतें. पुन: मी प्रबळ निग्रह करीत असलों तरीही मला मानसिक विकार कधीं कधीं उत्पन्न होतात हें दौर्बल्य माझ्यामध्यें आहे. ह्मणूनही मीं आपल्या ग्रंथांत असें लिहिलें. योगाभ्यासाहून निराळ्या वेळीं माझें हें क्षणिक मानसिक दौर्बल्य दूर करण्याचा यत्न जर कोणी सांगेल तर मी त्याला तातांप्रमाणें समजून त्याच्या ह्मणण्यानें आपल्या ग्रंथांतून हा भाग काढून टाकीन.

६ वी गैरसमजूत:—बोवा शूद्र ह्मणवितात तर बोवाच्या मुलाला मुलगी मिळणार नाहीं.

प्रतिकार:—मिळणार नाहीं तर माझ्यावंशाचें जसें व्हावयाचें असेल तसें होईल. परिस्थितीनें बलेंकरून मला अधर्मांत ओढून नेलें तरी मी तोंडानें दुसऱ्याला धर्म सुचवून मरेन हा माझा निश्चय आहे.

हा लेख कृपा करून लवकर छापावा याची सर्व जबाबदारी मजवर आहे.

आपला

ता. १।११।१४ } गुलाबराव गोंडुजी मोहोड, मुकदम, माधान. हल्ली मु० उमरावती.

## धार्मिक व वैद्यकदृष्ट्या गोरक्षणाची आवश्यकता.

पुढील लेख ऱ्हाडांतील सुप्रसिद्ध साधु श्रीज्ञानेश्वरभक्त गुलाबराव महाराज यांचा आहे. हे जातीनें मराठे असून जन्मत: अंध अस-

तांहि श्रीज्ञानेश्वरप्रसादानें आपल्या प्रज्ञाचक्षूंच्या योगेंकरून यांनीं बहुतेक सर्व प्राचीन व अर्वाचीन शास्त्रांचें आलोडन केलें आहे. अमुक एक शास्त्रांत त्यांची गति नाहीं असें नाहीं. श्रीज्ञानेश्वरांनीं बाळपणीं ज्ञानेश्वरी केली, एकट्या नामदेवरायांची वाणी ५४।९५ कोटी अभंग बोलली. या गोष्टी खोट्या अगर असंभवनीय आहेत असें ज्यांस वाटत असेल त्यांनीं एकवार या मूर्तीचें दर्शन घ्यावें. हे बसल्या बसल्या सहज शेंकडों ओव्या, अभंग बोलत जातात; वयाच्या आठव्या वर्षी यांनीं 'प्रणवोपासना' नांवाचा वेदांतावर ग्रंथ केला. यांचें एकंदर चरित्र पाहिलें ह्मणजे 'दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न जातां । बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥' या ज्ञानेश्वरवचनाची सत्यता दिसून येते. प्रत्येकानें वेदशास्त्रविहित अशा आपल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणें वागावें असें यांचें मत आहे. गाईविषयींहि यांचें फार प्रेम आहे. तिच्याकरतां स्वतः रोज पांच घरें गोग्रास मागतात आणि ज्याच्या घरीं गाय नाहीं व जो गोरक्षणास मदत करीत नाहीं अशास ते आपला अनुयायी करीत नाहींत. श्रीविठ्ठभकुलांतहि गोरक्षणाबद्दल असाच नियम आहे. या त्यांच्या नियमाचें अनुकरण इतर साधुसंतांनीं केल्यास सहजासहजीं पुष्कळ कार्य होईल.

संपादक गो.

### श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

आळंदिपति करुणाघन वंदुनि तच्चरणपंकजा भावें ।  
गोचरणधूलिधूसर पांडुरंगसम निजांग शोभावें ॥ १ ॥  
निर्विकार परमात्मा व्यापक सर्वत्र शुद्ध सामान्य ।  
प्रकटे विशेष परि तो वेद वदे जेथ पूज्यता मान्य ॥ २ ॥  
वर्णधर्म जन सोडिति तें गाई रक्षिजे असें वाचे ।  
वदले संत महाजन जे आवडले अखंड देवाचे ॥ ३ ॥  
कृष्णदास ह्मणवी तो व्हावा गोरक्षणासि अनुकूल ।  
गोवर्धन धरुनि नखीं गोपाळें पाळिलें स्वगोकूल ॥ ४ ॥  
सत्संप्रदायिकांनीं धेनूतें पाळणें अशी आज्ञा ।  
गर्वें वा नम्रत्वें संमत हें कार्य होय सर्वज्ञा ॥ ५ ॥

ज्या ज्या विषयीं वचनबळ असेल त्या त्या ठिकाणीं परमेश्वराची उपलब्धि होते असा वैदिक धर्माचा सिद्धान्त आहे. एकादी वस्तु मलिन असो किंवा ती निर्मल असो परमेश्वराचें वास्तव्य त्यांत नाहीं असें नाहीं; परंतु त्याला व्यक्त कसें करावें हें श्रुतिमातेलाच ठाऊक आहे. सामान्य रूपानें निर्गुण परमेश्वराचें सर्वत्र वास्तव्य असून अवताररूपानें व विभूतिरूपानें विशेष वास्तव्य आहे. देव, मनुष्य, व तिर्यक् या योनीं-मध्यें परमेश्वराचे अवतार व विभूति स्पष्ट दृष्टीस पडतात. एवढ्यावरू-नच आमचा वैदिक धर्म अत्यंत निःपक्षपाती आहे. सर्वांवर पूज्यबुद्धि, किडामुंगीपासून तों उच्च प्राण्यापर्यंत सर्वांवर भूतदया अशी बुद्धि याच धर्मापासून उत्पन्न होते. सर्वत्र ब्रह्मबुद्धि ठेवावयास सांगणाऱ्या जगज्ज-ननि भगवति श्रुतीच्या उपदेशापुढें आपलें वीतभर पोट जाळण्याकरितां व निर्दयपणानें मांस भक्षण करून पुष्ट होण्याकरितां काढलेल्या " cow has not a soul " ' गाईला आत्माच नाहीं ' इत्यादि वाक्यांची मातब्बरी काय ? गाईचें रक्षण करण्याविषयीं अनेक श्रुति स्मृति उपलब्ध आहेत; त्यांचा स्थलविशेषीं उद्गार करीन. गोरक्षणाविषयीं हिंदु व जैन या दोन धर्मांचें अत्यंत एक मत असून मुसलमान धर्माचाहि विरोध येईल असें वाटत नाहीं. कारण मुसलमानांच्या जुबे करण्याच्या मंत्रामध्यें गाईचें नांव कोठेंही नाहीं; तो मंत्र असा " नबितोअन् अरबाराकोतन् दुम्भन् हलालन् तैय्यबन् सुन्नतन् खैरूल इम्राईल बिस्मिल्लाह अल्लाह अक्बर " या मंत्रांत दुम्भा नांवाची एक मेंढराची जात आहे तिचा उल्लेख केला आहे. श्रीमद्भागवतांत यज्ञाच्या हिंसेविषयीं अति खाणाऱ्यालाच थोडें खावें ह्मणून जो संकोच सांगितला आहे तसाच संकोच मुसलमानी मतासहि लागू असला पाहिजे. नाहींतर दुम्भा ह्मणून जर कोणत्या तरी पशूवर आपत्ति यावयाची आहे तर प्राणि ह्मणून मनुष्यावरहि येण्याचा संभव आहे. बाबासाहेब शेखमहंमद यांनीं हिंसेचा स्पष्ट निषेध केला असून कबीर, नानक या यवनमतांतील सार वेंचून घेणाऱ्यांनीं हिंसेवर तडाखा झाडला आहे. वैद्यशास्त्राचा इतिहास पाहिला तर गाईचा अपमान केल्यामुळें व तिची हिंसा झाल्यामुळें कित्येक रोगांचें आमच्या देशांत ठाणें होऊन बसलें आहे. "अतिसारचिकित्सा-

ध्यायां''त अशी कथा आहे. "भगवंतं खलु आत्रेयं कृताह्निकं कृताग्निहोत्रमासीनमृषिगणपरिवृतमुत्तरे हिमवतः पार्श्वे विनया उपेत्याभिवाद्य अग्निवेश उवाच-भगवन्। अतिसारस्य प्रागुत्पत्ति-निमित्तलक्षणोपशमनानि प्रजानुग्रहार्थमाख्यातुमर्हसीति ॥ १ ॥ अथ भगवानात्रेयस्तदग्निवेशवचनमनुनिशम्योवाच श्रूयताम् अग्नि-वेश। सर्वमेतदखिलेन व्याख्यायमानम् ॥ २ ॥ आदिकाले खलु यज्ञेषु पशवः समालंभनीया बभूवुर्नारंभाय प्रक्रियन्तेस्म। ततो दक्षयज्ञप्रत्यवरकालं मनोः पुत्राणां मारेष्यन्नाभागेक्ष्वाकुकुकुविडच-र्येत्यादिनां च क्रतुषु पशुनामेव अभ्यनुज्ञानात् पशवः प्रोक्षणमवापुः अतश्च प्रत्यवरकालं पृषध्रेण दीर्घसत्रेण यजमानेन पशुनामलाभाद्ग-वामालंभः प्रावर्तितः। तं दृष्ट्वा प्रव्यथिता भूतगणास्तेषां चोपयो-गादुपकृतानां गवां गौरवादौष्ण्यादसात्म्यत्वादशस्तोपयोगाच्चोपह-ताग्नीमुपहतमनसाम् अतिसारः पूर्वमुत्पन्नः पृषध्रयज्ञे ॥ ३ ॥

अर्थः—अग्निहोत्र व आन्हिक इत्यादि ज्यांचें संपूर्ण झालें आहे अशा सुखासनस्थ भगवान् आत्रेयांना अग्निवेश ह्मणाले, भगवन् मला अति-साराची उत्पत्ति सांगा. तेव्हां भगवान् आत्रेय ह्मणाले, सर्वांनीं ज्या प्रकारचीं उत्पत्ति सांगितली आहे त्याच प्रकारची उत्पत्ति तुला सांगतों ऐक. पूर्वी यज्ञामध्यें पशूची हिंसा होत नव्हती, परंतु पुढें इक्ष्वाकु वगैरेच्या यज्ञांत पशूंची हिंसा होऊं लागली. पुढें पृषध्रांनीं दीर्घकालपर्यंत एक यज्ञ केला. त्यांत पशु न सांपडल्यामुळें त्यानें गाईचा वध करण्यास आरंभ केला, त्यामुळें सर्वांवर कृपा करणाऱ्या त्या जगन्मातेसाठीं सर्व प्राण्यांना ताप लागला. गाईचें मांस अतिशय जड, अविहित व अयोग्य असल्यामुळें पृषध्र राजाच्या यज्ञांतच अतिसाराची उत्पत्ति झाली. तोंपर्यंत या पृथ्वीवर अतिसार ह्मणून ठाऊक नव्हता. असा या वचनाचा भावार्थ असून याचा विशेष विचार मी संप्रदायसुरतरूंत केला आहे. गाईच्या शुद्ध दुधाचा, शुद्ध तुपाचा, व शुद्ध ताकाचा व दह्याचाही अनेक रोगांवर उपयोग सांगितला आहे. सुवर्ण उगाळून नुस्तें गाईचें दूध क्षयावर फार उपयोगी होण्यासारखें आहे. दहीं एकंदर वैद्यशास्त्रांत जड सांगितलें आहे तरी गाईचें दहीं ग्रहणीवर अत्यंत उपयोगी आहे. गाईचें

ताक तर अत्यंत उपयोगी असून हजारों औषधें दिलीं तरी गाईचे ताकाशांचून संग्रहणी जात नाहीं असें स्पष्ट ह्मटलें आहे. आमच्या पाश्चात्य भ्रातृवर्गालाही ताकाचें महत्व चांगलें कळूं लागलें असून ताकानें ह्मातर-पण येत नाहीं असे त्यांचे लेख आंग्ल वैद्यक मासिक पुस्तकांतून चमकत आहेत. हे गुण गाईच्या ताकांत विशेष आहेत. गाईच्या तुपाचा तर आरोग्य स्थितींत व रोगी स्थितींत सारखाच उपयोग आहे. तात्पर्य, धर्मतः अर्थतः कामतः गाईचें रक्षण करणें आह्मां आर्यांचें पहिलें कर्तव्य असलें पाहिजे असें मला वाटतें. द्वैत, विशिष्टाद्वैत, केवलाद्वैत इत्यादि वैदिक मतांत अनेक भेद असले तरी गोरक्षण करण्याविषयीं त्या सर्वांचें मतैक्य आहे. त्यामुळें गोरक्षण करणें ह्मणजे कोणत्याही धर्माचा द्वेष करणें नसून त्यांत केवळ स्वधर्मपालनच आहे. दयाळु ब्रिटिश सरकारानीं जो Animal Act केला आहे त्याचेंही उल्लंघन गाईचा अपमान करणाऱ्याकडून होतें. ह्मणून सर्वांनीं इकडे लक्ष देऊन जी आपल्या वासराकडे न पाहतां आम्हां मनुष्यपुत्रांचें दुग्धानें रक्षण करिते त्या धेनुमातेची चरणसेवा करण्यांत आपलें आयुष्य सतत उपयोगांत आणावें. आपत्कालीं गोरक्षणच श्रेष्ठ आहे असें एकनाथस्वामींनीं ह्मटलें आहे. गाई व ब्राह्मण वैदिक धर्माचा मुख्य पाया आहे, तथापि प्रसंगीविशेषीं कलींतील ब्राह्मण धर्म सोडतील असें ह्मटलें आहे, परंतु गाईमधील धर्म निघून जाईल असें वाक्य कोठेंही नाहीं. ह्मणून वेदोक्ताचा व्यर्थ हट्ट धरणाऱ्या लोकांचा ब्राह्मणांशीं थोडासा विरोध असला तरी गोरक्षणाक-रितां त्यांनीं उत्तम ह्मटलें पाहिजे. तात्पर्य कोणींच धेनुजननीचा अव्हेर करूं नये अशी माझी गरिबाची सर्वांच्या चरणाजवळ विनंति आहे, तिचा आळंदिवल्लभकृपेनें सर्वच स्वीकार करोत.

आपला

मि. अश्विन शु० २. गुरुवार, शके १८३९. } गुलाबराव गुंडोजी मोहोड, मुकदम माधान हल्लीं मु० मुंबई सरदारगृह.

# आचार्य व ज्ञानेश्वर.

( पुढें चालू. )

मुमुक्षु, ता० १, सप्तेंबर १९१७.

## रा० रा० नारायणराव पंडित यांचें पत्र.

रा. रा. मुमुक्षुकर्ते यांस:—

वि. वि. वे. शा. सं. बाळशास्त्री हुपरीकर संस्कृत शिक्षक राजाराम हायस्कूल कोल्हापूर यांनीं विद्यारण्य व श्रीज्ञानेश्वर यांच्या मतांचें तात्पर्य ह्या नांवाचा निबंध लिहिला असून त्यांत विद्यारण्यांचें वेदांतावरील मत व श्रीज्ञानेश्वर महाराजांचें वेदांतावरील मत यांतील भेद दाखविला आहे, व तसाच श्रीशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर या मथळ्याखालीं शंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर यांचीं वेदांतावरील मतें सांगून त्यांतीलही भेद दुसऱ्या एका निबंधांत दाखविला आहे. यावर श्रीगुलाबराव महाराजांनीं, विद्यारण्य किंवा श्रीज्ञानेश्वरमहाराज त्याचप्रमाणें श्रीशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्या वेदांतांवरील मतांत मुळींच भेद नाहीं, तर ज्या ठिकाणीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं अज्ञानादिकांचा अंगिकार केला नाहीं व त्याचें खंडण केलें त्याच ठिकाणीं श्रीशंकराचार्य व विद्यारण्य हेही अज्ञानाचा अंगिकार करीत नाहींत, असें सिद्ध करून दाखविण्याची प्रतिज्ञा मागें आपल्या पत्रांतून केली होती. पण तो त्यांचा मनोरथ पूर्ण न होतां त्यांचें देहावसान झाल्यामुळें तसाच अपूर्ण राहिला. ह्मणून त्यांचे मनोरथ आपण यथाशक्ति पूर्ण करावे या इच्छेनें मी आपले पत्रांतून वे. शा. सं. बाळशास्त्री हुपरीकर यांच्या दोन्ही निबंधांची समीक्षा करण्याचें योजिलें आहे. तरी त्याला आपल्या पत्रांत जागा द्याल अशी आशा आहे.

( १ ) "तमोरजःसत्वगुणा प्रकृति द्विर्विधा च सा"।

पंचदशींतील तत्त्वविवेक प्रकरणांतील या श्लोकांत विद्यारण्यस्वामींनीं अज्ञानाचा अंगिकार केला आहे. त्याचप्रमाणें— "एवमयमनादिरनन्ता नैसर्गिकोध्यासोमिथ्याप्रत्ययरूपः कर्तृत्वभोक्तृत्वप्रवर्तकः सर्वलोकप्रत्यक्षः।" ही पंक्ति देऊन श्रीशंकराचार्यांनीं ब्रह्मसूत्रशांकर-

भाष्यांत मायेचा अंगिकार केला आहे पण वे. शा. सं. बाळशास्त्री हुपरीकर यांनीं " अपूर्वी ज्ञानाक्षरीं । वसतां ज्ञानाची थोरी । शब्दार्थीची उजरी । अपूर्व नव्हे ॥ " ही ओवी देऊन ज्ञानविरोधी आज्ञानाची सिद्धि नाहीं, कारण " अहो आत्मेनें जें बाधे । तें आत्मेनसी नांदे । ऐसी कायसी विरुद्धे । बोलणी इयें ॥" ज्या अज्ञानाचा आत्म्यानें बाध होतो तें ज्ञानाच्या विरोधी असलेलें अज्ञान आत्म्याचा आश्रय करून कसें राहील ? कारण विरोधी पदार्थ एकाधिकरणक नसतात. याचप्रमाणें अमृतानुभवांतील ७ व्या अध्यायांतील अज्ञानखंडणपर ओव्या प्रमाण देऊन श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे मतांत अज्ञानाची सिद्धि नाहीं असें दाखविलें आहे. पण माझ्यामतें श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं अज्ञानाचें सर्वथा खंडण केलें नसून अंधार जर पदार्थांचें ज्ञान होऊं देईल तर त्याला अंधार म्हणणें जसें व्यर्थ आहे म्हणजे नुसता अंधार हा शब्दच राहतो, अंधाराचा जो धर्म " पदार्थांचें ज्ञान न होऊं देणें " तो प्रगट होत नसल्यामुळें अंधाराची प्रतीति नाहीं. त्याप्रमाणें अज्ञान या शब्दानें दाखविलेला धर्म " स्वरूपाचें ज्ञान न होणें " तो प्रगट न झाल्यामुळें त्याला अज्ञान म्हणणें व्यर्थ आहे; कारण आत्म्याला अपरोक्ष करणारी वृत्तिच असल्यामुळें व वृत्ति हें अज्ञानकार्य असलें तरी अज्ञानाचा धर्म तिचे ठिकाणीं नाहीं. पदार्थ दाखविणाऱ्या अंधारास अंधार म्हणणें जसें शब्दमात्र आहे किंवा सुवर्णाची गौर किंवा अंबिका करून त्या सुवर्णावर केलेल्या मूर्त्यारोपामुळें सुवर्णबोधाचा लोप होत नसून त्याला अंबिका किंवा गौर इत्यादिक नांवें देऊन सुवर्णाहून शब्दभिन्न मात्र प्रतीति आपणाला येते तसें अज्ञानाच्या योगानें ज्ञानाचा ( आत्म्याचा ) लोप होत नसून उलट अज्ञानकार्य जी वृत्ति तिच्यानें आत्म्याचा प्रकाश होतो. म्हणून अज्ञान हें शब्दमात्र आहे.

अमृतानुभव, अ० ७, ओ० २७९. " ज्ञान आणि अज्ञान हे दोन्ही शब्दच भिन्न आहेत, ह्यांचा अर्थ भिन्न नाहीं. " असा या ओवीचा भावार्थ आहे. या विवेचनांत रज्जूच्या ठिकाणीं भासलेला सर्प जरी रज्जूवर भासतो तरी ज्याप्रमाणें तो रज्जूवर मुळींच नसतो व त्याची स्थिति व निवृत्ति शब्दमात्र आहे, त्याप्रमाणें अज्ञान हें अज्ञानाच्या दृष्टीनें जरी

असलें तरी त्याच्या योगानें आत्मस्वरूपाचा लोप होत नाहीं; म्हणून त्याची प्रतीति व निवृत्ति शब्दमात्र आहे असें, अज्ञानाचें व ज्ञानाचें खंडन करून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं सिद्ध केलें आहे; अज्ञान्याच्या दृष्टीनेंही अज्ञान नाहीं असें त्यांनीं प्रतिपादन केलें नाहीं. हा अर्थ प्रतिपादन ज्या ओव्यांत त्यांनीं केला आहे, त्या ओव्या मी येथें देतों—

" एवं माध्यान्हींची दिवी । तम धाडिनो दिवो दात्री ॥
तैसीं उभयतां पदवी । शब्दा झाली ॥ अ० ६, ओ० ९५.
आतां अविद्या नाहींपणें । नाहीं तियेतें नाशणें ॥
आत्मा सिद्ध या कोणें । काय साधावें ॥ अ० ६, ओ० ९६.
बागुला आला म्हणिजेत । बोलणें जैसें रितें ॥
का आकाश ओळंबतें । तळहातीं काई ॥ अ० ६, ओ० ९९.
तैसीं निरर्थकें जल्पें । होवोनियां सपडपें ॥
शोभती जैसे लेपें । रंगावरी ॥ अ० ६, ओ० १००.
एवं शब्दैकजीवनें । बापुडीं ज्ञानें अज्ञानें ॥
साचपणें उणें । चित्रींचे जैसीं अ० ५, ओ० १०१.

ही अज्ञानाची शब्दमात्र प्रतीति ज्ञानदृष्टीनेंच आहे असें सांगून "जैसी स्वप्नीं स्वप्नमहिमा । तसीं भानु असें तमा । तेवि अज्ञान गरिमा । अज्ञानींचि" ॥ या ओवींत अज्ञान्याचे दृष्टीनें अविद्येचा अंगिकार केला आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें अज्ञानखंडण " अज्ञानें जेथें असावें । तेणें सर्व नेण होवावें । ऐसी जाति स्वभावें । अज्ञानाची " या ओवींत सांगितल्याप्रमाणें अज्ञान जर आहे तर अज्ञानाचा जो जातिस्वभाव—कांहींच समजूं न देणें—हा प्रगट झाला पाहिजे, व हा जातिस्वभाव प्रगट होत नसला तर तें अज्ञान शब्दमात्र समजावें या मुद्याला धरून आहे. याप्रमाणें " एवं कोणेही परी । अज्ञानभावाची उजरी । न पडेचि नगरीं । विचाराचिये ॥ [अमृ०, अ. ७, ओ० ६७.] यांत सांगि... प्रमाणें ज्ञानकाळीं अज्ञानाची असिद्धि व ' अविद्ये ... जीवपणाचें भेवें । नया चैतन्याच्या धांवें । धांवकारु ... ॥ ... मायाकुंजरू । मुक्तिमोतियाचा डोंगरू । जेवविला सद्गुरु श्रीनिवृत्ति वंदू ॥ जयाचेनि कृपातुषारें । परतले अविद्येचे मोहरे । परिणमे अपारें बोधा-

मृतें ॥' यांत सांगितल्याप्रमाणें अज्ञानकालीं अविद्येचें ग्रहण श्रीज्ञानेश्वर महाराजांनींहि केलें आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांप्रमाणें श्रीशंकराचार्यांनीं आपल्या विवेकचूडामणीमध्यें ज्ञानकालीं अज्ञान नसून अज्ञानाचें कार्य जें विश्व तें आत्मस्वरूपच आहे, त्याची भिन्न प्रतीति मुळींच नाहीं असें सांगितलें आहे. ते श्लोक येणेंप्रमाणें:—

यत्र भ्रान्त्या कल्पितं यद्विवेके । तत्तन्मात्रं नैव तस्माद्विभिन्नम् ॥
भ्रांते नाशे भ्रान्तिदृष्टाहितत्वं । रज्जुस्तद्वद्विश्वमात्मस्वरूपम् ॥३८८॥
तरङ्गफेनभ्रमबुद्बुदादि । सर्वं स्वरूपेण जलं यथा तथा ॥
चिदेव देहाद्यहमन्तमेतत् । सर्वं चिदेवैकरसं विशुद्धम् ॥ ३९१ ॥

त्याचप्रमाणें ' तदनन्यत्वमारंभणशब्दादिभ्यः ' या सूत्रांत अज्ञानाची शब्दानें स्थिति व शब्दानें निवृत्ति असल्यामुळें तें अधिष्ठान-स्वरूपच आहे असें आचार्यांनींहि प्रतिपादन केलें आहे. आचार्यवेदान्त किंवा विद्यारण्यवेदान्त या दोहोंतही अज्ञानाचें कार्य जें जगत् तें ब्रह्माचे ठिकाणीं विवर्तस्वरूप मानलें आहे, व विवर्तकार्य हें अधिष्ठानाशीं विषम-सत्ताक असल्यामुळें अधिष्ठानाहून कधींच भिन्न नसतें. समसत्तेंतील दोन पदार्थच दोन्हीं सत्य असल्यामुळें परस्पर विरोधी असतात. विषमसत्तेंतले दोन पदार्थ विरोधी नसतात, तर त्यांपैकीं जो पदार्थ सत्य असेल तत्स्व-रूपच तो दुसरा मिथ्या पदार्थ असतो. विषमसत्तेंतले दोन पदार्थ अभिन्न असून भिन्न भासणें हेंच अज्ञान किंवा मिथ्या प्रतीति आहे. आचार्यांनीं अध्यासाचें लक्षण असेंच केलें आहे. अध्यासो नाम अतस्मिंस्तद्बुद्धिः विषमसत्ताक दोन वस्तूंपैकीं मिथ्या वस्तूचे ठिकाणीं सत्यबुद्धि होणें याचें नांव अध्यास आहे, व तें कार्य विवर्त असून आपल्या अधिष्ठानाहून भिन्न नाहीं असें समजणें हें ज्ञान आहे. अर्थातच ज्ञानकालीं विवर्त कार्य अधिष्ठानस्वरूपच असतें. त्याचप्रमाणें ज्ञानकालीं अज्ञानाची सिद्धी विद्यारण्यांनाहि संमत नाहीं. " आकाशादिस्वदेहान्तं तैत्तरीय-श्रुतीरितम् । जगन्नास्त्यन्यदानन्दादद्वैतब्रह्मता ततः ॥ ' इत्यादि श्लोकांनीं आरंभ करून पंचदशींतील " ब्रह्मानंदे अद्वैतानंदः ' याप्रकरणांत ज्ञानका-ळीं अज्ञानप्रतीति मुळींच नसते व ज्ञानदृष्टीनें अज्ञान शब्दमात्र आहे असें 'बालस्य हि विनोदाय धात्री वक्ति शुभां कथाम्' या २२ व्या श्लोकापासून

बालकाख्यायिकेवेत्थ भवस्थितिमुपागता ॥ " या २७ व्या श्लोकापर्यंत व अज्ञानाची निवृत्ति दोन्ही शब्द मात्रच आहेत असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे; व त्याचप्रमाणें पंचदशीच्या कूटस्थदीपप्रकरणांत व ' विवरणप्रमेयसंग्रहांत " यत्र प्रमाणाभावेऽप्यपरोक्षं दृश्यते तत्र साक्षिप्रत्यक्षेणेति हि वेदांतमर्यादा " । या वाक्यानें साक्षीचें स्वतःप्रामाण्य सिद्ध करून अज्ञानाच्या योगानें ज्ञानाचा लोप होत नाहीं असें प्रतिपादन केलें आहे. याप्रमाणें श्रीज्ञानेश्वरमहाराज, विद्यारण्य व श्रीशंकराचार्य या तिघांनींही अज्ञानकाळीं अज्ञानाचा स्वीकार करून अज्ञान नुसतें शब्दमात्र आहे, व त्याची ज्ञानकाळीं मुळींच स्थिति नाहीं, तसाच तिन्हीकाळीं आत्म्याचे ठिकाणीं त्याचा संपर्क नाहीं असें ऐकमत्य दाखविलें आहे. आतां श्रीज्ञानेश्वरमहाराज अज्ञानकाळींही अज्ञान मानीत नाहींत, चैतन्यस्फूर्तिवाद मानतात असें गृहीत धरल्यास यावर मी असें विचारतों कीं, ती स्फूर्ति तत्स्वरूप आहे कीं भिन्न स्वरूप आहे ? प्रथम पक्षीं निरवयव व निर्गुण अशा ब्रह्माचे ठिकाणीं सावयवत्व काय ह्मणून दिसतें ? श्रीज्ञानेश्वर महाराजांप्रमाणें इतर सर्व जीवांनाही ब्रह्मबोध कां होऊं नये ? सर्वांना ब्रह्मबोध आहे व सर्व मुक्त आहेत असें मानल्यास शास्त्रप्रवृत्ति व्यर्थ होईल. परब्रह्म नित्य असल्यामुळें व त्याची स्फूर्तिहि नित्य असल्यामुळें, जगतूही नित्य होईल. मग जगताचा प्रेत्यभावें किंवा आविर्भाव संभवणार नाहीं. जाग्रद्दशेंत आपल्या चेतनत्वाची जशी प्रतीति आहे तशी सुषुप्तिकाळीं कां नसते? आतां ब्रह्मस्फूर्ति तत्स्वरूपच असून भ्रमानें त्याहून भिन्न स्वरूपाची भासते असें ह्मणाल तर याच भ्रमाला आचार्यादिक भ्रम मानतात, मग श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या मतांत अज्ञानाचा अंगिकार नाहीं असें म्हणण्यांत काय अर्थ आहे. दुसरा पक्ष संभवत नाहीं कारण आकाशाचा धर्म अंधार आहे असें म्हणण्यासारखें हें म्हणणें आहे. मायेशिवाय परब्रह्म जगद्रूप झालें आहे असें मानणारे शुद्धाद्वैतवादी व प्रत्यभिज्ञावादी आहेत. यांचें मत श्रुतीविरुद्ध असल्यामुळें मान्य नाहीं व त्याचें खण्डन करितां येतें. याप्रमाणें श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें मत मानल्यास तेंही श्रुतिविरुद्ध आहे असें म्हणावें लागेल. असो यापु-

हील समीक्षा वे० शा० सं० बाळशास्त्री हुपरीकर यांचेकडून उत्तर आल्यावर करीन. कळावें.

आपला,

नारायण पंडित.

# वेदशास्त्रसंपन्न बाळशास्त्री हुपरीकर यांचें उत्तर.

मुमुक्षु, ता० १ नोव्हेंबर १९१७.

रा० रा० मुमुक्षुकर्ते यांसः—

वि. वि. श्रीयुत नारायण पंडित यांनीं आह्मीं मागें लिहिलेल्या 'विद्यारण्य व ज्ञानेश्वर' आणि 'शंकराचार्य व ज्ञानेश्वर' या दोन निबंधांवर आपल्या पत्रांत आक्षेप घेतले आहेत; त्याबद्दल आह्मी यथामति उत्तर लिहून पाठवीत आहों; तर आपण त्यास आपल्या पत्रांत जागा द्याल अशी आशा आहे.

अज्ञान या शब्दानें दाखविलेला धर्म स्वरूपाचें ज्ञान न होणें तो प्रगट न झाल्यामुळें त्याला अज्ञान ह्मणणें व्यर्थ आहे; कारण आत्म्याला अपरोक्ष करणारी वृत्तिच असल्यामुळें, व वृत्ति हें अज्ञानकार्य असलें तरी अज्ञानाचा धर्म तिचे ठिकाणीं नाहीं. शिवाय अज्ञानाच्या योगानें ज्ञानाचा ( आत्म्याचा ) लोप होत नसून उलट अज्ञानकार्य जी वृत्ति तिच्यानें आत्म्याचा प्रकाश होतो. ह्मणून हें शब्दमात्र आहे, असें पूर्वपक्षकाराचें ह्मणणें आहे.

[illegible] दिसत नाहीं. कारण, अज्ञान जर शब्दमात्र [illegible] त्या [illegible]चा अर्थ जर कांहींच नाहीं, तर तें भावरूप होऊन जगतास कारण कसें होईल ? आत्म्याला जर वृत्तिच अपरोक्ष करील तर 'घटद्रष्टा घटाद्भिन्नः सर्वथा न घटो यथा' या न्यायानें वृत्तीस आत्मा अपरोक्ष झाल्यानें ( दृश्य झाल्यानें ) आत्मा हें जीवाचें स्वरूप नव्हे असें ह्मणण्याचा प्रसंग प्राप्त होईल ! ज्या वृत्तीस आत्मा प्रकाशित करतो ती वृत्ति आत्म्यास प्रकाशितें हें बोलणें विरुद्ध आहे, व त्यायोगानें येनेदं सर्वं विजानाति तं केन विजानीयात् व "यतो

वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह " इत्यादि श्रुति व्यर्थ होतील. दोरीवरच्या सर्पानें दोरी लुप्त होत नाहीं, त्याप्रमाणें अज्ञानानें जर आत्मा लुप्त होत नाहीं, तर जीवाचा अध्यास होतो असें कसें ह्मणता येईल ? केवळ ' अज्ञान ' शब्दानें जर जगत्कार्य भासत असेल, तर तें कोणत्याही शब्दांनीं भासावयास पाहिजे, मग शब्दमात्र अज्ञान व जगत्कार्य यांचा कार्यकारणभाव कशास हवा ? सारांश शशशृंग व खपुष्प इत्यादि शब्दांप्रमाणें अज्ञान या शब्दाची प्रवृत्ति झाली असल्यामुळें त्यास भावरूप व कारण ह्मणणें हें विसंगत आहे. ह्मणून आह्मी वर जें सांगितलें आहे तेंच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं अमृ० अ० ६ ओं० ९५, ९६, ९९, १००, १०१ यांत सांगितलें आहे, असें आमचें ह्मणणें आहे. पूर्वपक्षकारही " अज्ञानें जेथें असावें । तेणें सर्वेनेण होवावें " व " एवं कवणेही परी । अज्ञानभावाची उजरी । न पडेचि नगरी । विचाराचिये ॥ " या ओव्यांवरून अज्ञान हें शब्दमात्रच समजतात. शब्दमात्र ह्मणजे फक्त शब्दाचेंच अस्तित्व होय; त्यामुळें अर्थाचें अस्तित्व आहे असें सिद्ध होत नाहीं. अर्थात् अज्ञान हा शब्द जगद्रूप कार्य करण्यास कारण होत नाहीं, हें उघड आहे. अमृतानुभवां-तील द्वितीय प्रकरणांतल्या ओंव्या गुरुस्तुतिपर असल्यामुळें त्या अज्ञानाचें अस्तित्व सिद्ध करण्यास पुरेशा नाहींत असें आमचें मत आहे. अविद्या ही मुळींच नसतांना ती भावरूप आहे असें मूढ मानतात. याप्रमाणें वार्तिककारही ह्मणतात:—

अविद्यमानैवाविद्या वस्तुतत्त्वविचारणात् ।
अविचारेण मूढानां वज्रादपि दृढायते ॥

या वचनावरून मूढांनीं अविद्येस भावरूप मानलें तरी तिचें मूळचें स्वरूप अभावरूपच आहे, हेंच आह्मी आमच्या मागील निबं-धांत सांगितलें आहे.

तत्त्ववेत्याच्या दृष्टीनें भावरूप अज्ञान नसो; पण मूढांच्या दृष्टीनें भावरूप अज्ञान असलें, तरी याविषयीं श्रीज्ञानेश्वर काय ह्मणतात तें पहा:—

मृगजळ जेथें नुसंडे । तेथें असे पां कोरडें ।

मा उमंडे तेथें जोडे । बोल्हासु काई ॥ १ ॥
दिसताचि स्वप्न लटिकें । हें जागरीं होय ठावुकें ।
तेवीं अविद्याकाळीं सतुकें । अविद्या नाहीं ॥ २ ॥

तत्त्ववेत्त्याच्या ठिकाणीं मृगजळासारखें अज्ञान न भासो; पण अज्ञाच्या ठिकाणीं मृगजळासारखें तें अज्ञान भासतें, ह्मणून तें कार्य उत्पन्न करण्यास क्षम होईल काय? ज्याप्रमाणें मृगजळाच्या योगानें जमीन भिजत नाहीं, त्याप्रमाणें अज्ञानाच्या योगानें कांहीं एक कार्य होत नाहीं. १. स्वप्न खोटें आहे हें जागृतींत कळतें, तथापि तें दिसत असतांनाच खोटें असतें; त्याप्रमाणें ज्याकाळीं जीवांना अविद्या भासते त्याकाळीं सुद्धां ती नाहीं. २ या ज्ञानेश्वरांच्या वचनांवरून अज्ञांना देखील शब्दमात्रच अज्ञान असतें हा सिद्धांत कायम ठरतो; पण तो त्याला भावरूप मानतो ही गोष्ट निराळी होय.

पुन: पूर्वपक्षकार असें म्हणतात:—

" आचार्यवेदान्त किंवा विद्यारण्यवेदान्त या दोहोंतही अज्ञानाचें कार्य हें जगत् विषमसत्ताक ब्रम्हाचे ठिकाणीं विवर्तरूप मानिलें आहे व विवर्तकार्य हें विषमसत्ताक असल्यामुळें अधिष्ठानाहून कधींच भिन्न नसतें; समसत्तेंतील दोन पदार्थच दोन्ही सत्य असल्यामुळें परस्परविरोधी असतात. विषमसत्तेंतील दोन पदार्थ विरोधी नसतात. त्यापैकीं जो पदार्थ सत्य असेल तत्स्वरूपच तो दुसरा मिथ्या पदार्थ असतो. विषमसत्तेंतील दोन पदार्थ अभिन्न असून भिन्न भासणें हेंच अज्ञान किंवा मिथ्या प्रतीति आहे. "

यावर आह्मी असें विचारतों कीं, जीवास ज्याप्रमाणें 'जीव' रज्जुचे ठिकाणीं सर्पभ्रम होतो, त्याप्रमाणें हा भ्रम जीवास झाला, साक्षीस झाला, चिदाभासास झाला किंवा ईश्वरास झाला? असे चार विकल्प संभवतात, प्रथमपक्षीं स्वत: जीवासच जीवभ्रम भासतो असें ह्मणणें अशक्य आहे; कारण भ्रमास पाहणारा अन्य कोणी तरी असेल तर भ्रमाची सिद्धि होईल, नाहीं तर होणार नाहीं; ह्मणून प्रथम पक्ष संभवत नाहीं. द्वितीयपक्षीं साक्षीस भ्रम होतो असें ह्मटल्यास, साक्षी असंग निर्विकार असल्यामुळें,त्यास भ्रम होतो हें ह्मणणें सिद्ध होत

नाहीं. तृतीय पक्षीं चिदाभास हा जड असल्यामुळें त्याला भ्रम झाला असें म्हणतां येत नाहीं. चतुर्थ पक्षीं भ्रम झाला असें म्हटल्यास भ्रमाची निवृत्ति ईश्वरासच करावी लागणार; मग जीवास वेदान्तविचार करण्याचें प्रयोजनच राहणार नाहीं. याप्रमाणें भ्रम कोणास झाला हें जर सांगतां येणें कठीण आहे तर जीव या विवर्ताची सिद्धि कशी करावयाची व कोण करणार ? विषमसत्ताक सर्प रज्जूहून भिन्न असत नाहीं असें मानिलें, तरी रज्जुज्ञानानें सर्पनिवृत्ति झाल्यावर रज्जु ही भिन्नच वाटत असल्यानें तो तर कधींच भिन्न नसतो असें मात्र म्हणतां येत नाहीं. अध्यासकालीं दोन पदार्थ भासतात हें म्हणणेंच असंगत होय; कारण अज्ञानकालीं एक सर्पच भासत असतो व ज्ञानकालीं तर एक रज्जु भासत असते; म्हणून अध्यासकालीं व ज्ञानकालीं दोन पदार्थ भासतात असें म्हणतां येत नाहीं. याचप्रमाणें रज्जुसर्पाचे ठिकाणीं अभिन्नता आहे ही गोष्ट खरी धरली तरीही सर्पाची भिन्नता समजणें हेंच अज्ञान किंवा मिथ्या प्रतीति आहे, असें पूर्वपक्षकार म्हणतात; पण त्यांचें हें म्हणणें खरें कसें होणार ? आम्हांस तर असें वाटतें कीं, रज्जु व सर्प यांची भिन्नता समजणें—' रज्जु आहे, सर्प नाहीं–' असें समजणें हें ज्ञानच होय. अभिन्न असून भिन्न आहे असा म्हणण्यानें विवर्तवादाची सिद्धि होत नाहीं. रज्जूची सत्ता सत्य आहे व सर्पाची सत्ता मिथ्या आहे ह्याच दोन विषमसत्ता होत; याप्रमाणें दोहोंस दोन नांवें जरी प्राप्त झालीं तरी सर्पभ्रांतिकालीं एकच सर्पसत्ता भासत असते, दोन्ही सत्तांचा भेद भासत नाहीं. दोन्ही सत्तांचा जर भेद भासेल तर अधिष्ठानसत्तेचें ज्ञान होऊन मिथ्या सर्पसत्तेची निवृत्तीच होत असल्यानें अभिन्न असून भिन्न भासणें हें अज्ञानाचें लक्षण होत नाहीं, व असल्या अज्ञानाच्या योगानें विवर्तवादाचीही सिद्धि होत नाहीं, हें उघड आहे.

पुनः पूर्वपक्षकार असें म्हणतात—" श्रीज्ञानेश्वरमहाराज चैतन्यस्फूर्तिवाद मानतात असें धरल्यास यावर मी असें विचारतों कीं, ती स्फूर्ति तत्स्वरूप आहे कीं भिन्नस्वरूप आहे ? प्रथम पक्षीं निरवयव व निर्गुण अशा ब्रह्माचे ठिकाणीं सावयवत्व काय म्हणून दिसतें ? "

पण आमचें ह्मणणें असें आहे कीं, ज्यावेळीं स्फूर्तीचे ठिकाणीं हें चित्त व हा आत्मा असा भेद करितां येत नाहीं तर चित्तास 'चित्त' असें ह्मणतां न येऊन तेंही असत होतें किंबहुना सर्वास आत्मरूपताच येते, त्यावेळीं सावयव व निरवयव किंवा सगुण व निर्गुण इत्यादि भेद स्फूर्तींत भासतील हें ह्मणणें अशक्य नव्हे काय? अर्थात् स्फूर्ति व जगत् यांचाही भेद करितां येत नाहीं हें निराळें काय सांगावें? श्रीगौडपादाचार्यही असेंच ह्मणतात:—

चित्तस्पन्दितमेवेदं ग्राह्यग्राहकवद्वयम् ।
चित्तं निर्विषयं नित्यमसंगं तेन कीर्तितम् ॥

जगताचे प्रत्यभाव व आविर्भाव होतात हें ह्मणणें भ्रममूलक आहे, हें वरील विवेचनावरून पूर्वपक्षकारांच्या लक्ष्यांत येईल असें वाटतें. याप्रमाणें अमुक पदार्थ सचेतन आहे व अमुक एक पदार्थ अचेतन आहे हें ह्मणणें तरी कसें सिद्ध व्हावें? कारण जेथें एका आत्म्याचीच सिद्धि आहे तेथें वरील प्रकारचीं द्वैतें राहतील हें ह्मणणेंच असंभवनीय होय. द्वितीय पक्षाचें निरसन मागील विवेचनांत आलेंच आहे, ह्मणून येथें विश्रांति घ्यावी हेंच बरें.

आतां श्रीज्ञानेश्वरांचें मत श्रुतिबाह्य ह्मणावें लागेल, असें पूर्वपक्षकार म्हणतात; पण आम्हांस तें श्रुतिबाह्य होईल असें वाटत नसल्यामुळें, प्रसंगानुसार त्याबद्दल आम्ही विवेचन करणार आहों. तथापि आम्ही श्रीयुत पंडित यांना इतकाच सवाल करतों कीं,

"न विरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो न च साधकः ।
न मुमुक्षुर्न वै मुक्त इत्येषा परमार्थता" ॥

या श्रुतिवचनांत उत्पत्ति, प्रलय, बंध, साधन, मुमुक्षुत्व व मुक्ति हे प्रकार नाहींत असें जें सांगितलें आहे तें नास्तिकपणाचें लक्षण कीं काय? ही श्रुति असल्यामुळें तिला नास्तिक ह्मणण्याचें धाडस कोण करणार आहे? ब्रह्मदेवत्यास तत्त्वज्ञान झालेलें असतें ह्मणून तो एकटा मुक्त होईल म्हणावें तर कोणीही मुक्त नाहींत असें श्रुतिच सांगत आहे; अज्ञानामुळें बंध, साधन वगैरे प्रकार आहेत म्हणावें, तर कोणी बद्धही नाहींत व साधकही नाहींत असा श्रुतीचा इषारा आहे त्यावरून कोणी

अज्ञानीही नाहींत व कोणी ज्ञानीही नाहींत, असें म्हणावयास नको काय? या सर्व गोष्टींचा श्रीयुत पंडित विचार करतील अशी आम्हांस आशा आहे.

ता. ३०।९।१९१७

बाळशास्त्री हुपरीकर

संस्कृत शिक्षक, राजाराम कॉलेज, कोल्हापूर,

सूचनाः—आमच्या या लेखासंबंधीं श्रीयुत पंडित यांचेकडून जर योग्य उत्तर येईल तरच त्यासंबंधीं विचार करण्यांत येईल.

## मुमुक्षु ता० २१ जानेवारी १९१८.

लेखक- रा. नारायणराव,

रा. रा. मुमुक्षुकर्ते यांसः—

सा. न. वि. वि. वे. शा. सं. बाळशास्त्री हुपरीकर यांनीं माझ्या गरीबाच्या विनंतीकडे लक्ष देऊन ता० १ सप्टेंबर १९१७ या अंकांत दिलेल्या माझ्या लेखाचें उत्तर दिलें हें पाहून त्यांच्या सौजन्याबद्दल आनंद होतो न होतो तोंच त्यांचें आलेलें उत्तर वाचल्यावर शेवटीं त्यांनीं केलेली सूचना वाचून खेद वाटला. कारण त्यांना माझ्या आक्षेपांत कांहींच राम वाटला नाहीं व म्हणूनच ' रा. पंडितांकडून योग्य उत्तर आल्यास त्यासंबंधीं विचार करण्यांत येईल, ' असा त्यांनीं मला इषारा दिला. माझ्या सारख्या अल्पश्रुत मनुष्याकडून त्यांच्यासारख्या बहुश्रुत विद्वानांस पटेल असें उत्तर कसें लिहितां येईल याची मला चिंता पडली. कारण माझे बुद्धीनें तें जरी समर्पक उत्तर असलें, तरी तें त्यांना कसें पटावें? एकाचें समर्पक उत्तर सर्वांनाच पटतें असें अलीकडे वर्तमानपत्रांतून अर्वाचीन विद्वान लोकांच्या चाललेल्या चर्चेवरून तरी दिसत नाहीं. तेव्हां योग्य उत्तर आल्यास विचार करण्यांत येईल असा रोख जबाब दिल्यावर वादाचें कामच राहत नाहीं. दुसऱ्यांच्या आक्षेपांचें उत्तर देतां आलें नाहीं तर उत्तर न देतां चूप राहण्यानें आपली बाजू सांभाळली जाऊन अनायासेंच लोकांमध्यें आक्षेपकाराचे आक्षेप योग्य नव्हते असा समज पसरतो. अशा प्रकारची टाळाटाळी

करणें विद्वानास उचित नाहीं. अल्पश्रुत समाजही बहुश्रुत समाजाशीं चर्चा करितां करितां बहुश्रुत होतो. किंबहुना बहुश्रुत समाजाची अल्पश्रुत समाजानेंच मातब्बरी आहे. वे. शा. सं. बाळशास्त्री हुपरीकर यांना जेव्हां मी त्यांच्या मताप्रमाणें श्रीज्ञानेश्वरमहाराज व श्रीशंकराचार्य यांच्या मतांत भेद आहे असें कबूल करीन तेव्हांच माझें उत्तर योग्य आहे असें वाटेल कीं काय ? श्रुति युक्ति व स्वानुभवपरंपरा या तीन प्रमाणांना धरूनच वेदांतांत सिद्धांतमंडण करीत असतात. व जोंपर्यंत माझें प्रतिपादन वरील तीन प्रमाणबाहिर्भूत होत नाहीं तोंपर्यंत तें अयोग्य आहे असें शास्त्रीबोवानाच काय पण कोणत्याही विद्वानाला म्हणण्याचा अधिकार नाहीं. असो. हा लेख वाचून शास्त्रीबोवाचें समाधान झाल्यास ठीकच आहे. न झाल्यास त्यांनीं माझें प्रतिपादन कोठें प्रमाणबाहिर्भूत झालें हें दाखविलें पाहिजे.

श्रीज्ञानेश्वरमहाराज ज्याप्रमाणें सिद्धावस्थेंत किंवा जीवन्मुक्तावस्थेंत अविद्या व तिचें कार्य जगत् हें कांहींच नसून सर्व चेतनाविलास किंवा स्फूर्ति आहे असें मानतात त्याचप्रमाणें श्रीशंकराचार्य व विद्यारण्य हेही सिद्धावस्थेंत अविद्या व तिचें कार्य संसार याचा प्रत्यय मानीत नाहींत; तेहि महात्मे अज्ञानाच्याच दृष्टीनें अविद्या आहे, परमार्थत: ती मुळींच नाहीं असें मानतात असें दाखविण्याकरितां मी मागला लेख लिहिला होता. मला वाटतें तो लेख थोडा संदिग्ध असावा म्हणूनच हुपरीकर शास्त्रीसारख्या विद्वानाचा कोठें कोठें समज चुकीचा झाला. नाहीं तर त्यांचा तसा समज झाला नसता, आतां हा लेख थोडा जास्त स्पष्ट लिहून शास्त्रीबोवांचा कोठें कोठें कसा कसा गैरसमज झाला हें दाखवितों. व लेख जास्त लांबल्यामुळें एकाच अंकांत घेतां न आल्यास पुढल्याही अंकांत आपण छापावा अशी मी आपणास विनंति करितों.

वे. शा. सं. हुपरीकर शास्त्री म्हणतात, श्रीज्ञानेश्वर महाराजांचे मतें अज्ञान मुळींच नाहीं, व आचार्यादिक अज्ञानाचा अंगिकार करितात; पण श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं अमृतानुभव हा ग्रंथ सिद्धानुवाद म्हणजे भक्तगुरूंच्या अनुभवांचा अनुवाद किंवा ब्रह्मानंदामध्यें तल्लीन

झालेल्या पुरुषाच्या तृप्तीचा ढेकर आहे असें, " तरी ग्रंथ प्रस्तावो। न घडे हें म्हणो पावो । तरी सिद्धानुवाद लाहो । आवडी करूं ॥ १ ॥ पढियंते सदा तेंचि । परि भोगीं नवी रुची । म्हणोनि हा उचितुची अनुवादु सिद्धु ॥ २ ॥ ' इत्यादि ओव्यांत व श्रीसिद्धानुवादे । श्रीमदनुभवामृते । इत्यादि संकल्पांत सांगितलें आहे. म्हणून हा अनुभवामृत ग्रंथ ज्ञानानंतरच्या सिद्धस्थितीचा अनुवादक असल्यामुळें त्या सिद्धदृष्टीनें अज्ञान व तत्कार्य जगत् हें मुळींच नाहीं, हें बरोबर आहे; व हीच दृष्टी परमार्थस्वरूप म्हणजे त्रिकालाबाधित असल्यामुळें खरी आहे. म्हणून अज्ञान वस्तुतः नाहींच. भगवान् आचार्यही ' तरंगफेनभ्रमबुद्बुदादि । सर्वं स्वरूपेण जलं यथा तथा । चिदेव देहाद्यहमंतमेतत्सर्वं चिदेवैकरसं विशुद्धम् ॥ १ ॥ या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें ज्ञानोत्तर काळीं अज्ञान व तज्जन्य संसार काहींच नसून सर्व चेतनस्फूर्तीच आहे, असेंच मानतात. अशा परमार्थांत नसणाऱ्या अज्ञानाची व तज्जन्य संसाराची जीवकल्पना करून व तो संसार खरा मानून संसारिक सुखदुःख भोगितो, असें भगवान् आचार्य, श्री ज्ञानेश्वर महाराज, विद्यारण्य हे तीघेही मानतात, असें मी म्हणतों. या नसलेल्या भावाला भावरूप समजणें यालाच अध्यास म्हणतात, व या जीवाच्या ठिकाणच्या अध्यासाचें ग्रहण करूनच सर्व लौकिकवैदिक व्यवहाराची प्रवृत्ति झाली आहे, असें

" तमेतम् पुरस्कृत्य सर्वे प्रमाणप्रमेयव्यवहाराः प्रवृत्ता लौकिका वैदिकाश्च । ' असें या पंक्तींत आचार्यांनीं म्हटलें आहे.

शास्त्रीबोवा म्हणतात, " अज्ञान जर शब्दमात्र आहे, म्हणजे त्या शब्दाला जर अर्थ कांहींच नाहीं तर तें भावरूप होऊन जगतास कारण कसें होईल. ' हा प्रश्न शास्त्रीबोवांनीं माझा लेख पूर्ण न वाचतां किंवा न समजतां मला विचारिला आहे. ही अज्ञानाची शब्दमात्र ' प्रतीति ज्ञानदृष्टीनेंच आहे, असें श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या अमृतानुभवांतील सहाव्या अध्यायाच्या ९५।९६।९९ ओव्या प्रमाण घेऊन मीं सांगितलें आहे. अज्ञान दृष्टीनें अज्ञान शब्दमात्र आहे व तें जगत् करण्यास समर्थ आहे असें मी म्हटलें नव्हतें. परमार्थतः नसणाऱ्या स्व-

प्रांतील व्याघ्रभीतीनें जसा पुरुष ओरडून उठतो, व स्वप्न जसें स्वप्नकालींच प्रतीतिमात्रच आहे, जागृतींत आल्यानंतर त्याचें मुळींच अस्तित्व नसतें, त्याप्रमाणें स्वरूपाचे ठिकाणीं अत्यंत सत्वानें राहणाऱ्या अज्ञानाच्या धर्मांचा जीव आपले ठिकाणीं अध्यास करितो व हा अध्यास जोंपर्यंत ज्ञानानें निवृत्त होत नाहीं तोंपर्यंत अज्ञदृष्टीनें सत्य असल्यामुळें अज्ञान किंवा अध्यास भावरूप होऊन तो जगताचें कारण होऊं शकतो ब्रह्मसूत्र अध्याय २, पाद १, सूत्र १४. यांत भगवान् आचार्यही असेंच ह्मणतात " सर्वव्यवहाराणामेव प्राग्ब्रह्मात्मताविज्ञानात्सत्यत्वोपपत्तेः. स्वप्नव्यवहारस्येव प्राक् प्रबोधात् । यावद्धि न सत्यात्मकत्वप्रतिपत्तिस्तावत्प्रमाणप्रमेयफललक्षणेषु विकारेष्वनृतत्वबुद्धिर्न कस्यचिदुपपद्यते विकारानेव त्वहंममेत्यविद्ययात्मात्मीयेन भावेन सर्वो जंतुः प्रतिपद्यते स्वाभाविकीं ब्रह्मात्मतां हित्वा तस्मात् प्राग्ब्रह्मात्मता प्रतिबोधादुपपन्नः सर्वो लौकिको वैदिकश्च व्यवहारः यथा सदास्यप्राकृतस्य जनस्य स्वप्न उच्चावचान्भावान्पश्यतो निश्चितमेव प्रत्यक्षाभिमतं विज्ञानं भवति प्राक्प्रबोधात् । नच प्रत्यक्षप्रभासाभिप्रायस्तत्काले भवति तद्वत् ।" याप्रमाणें अज्ञान्याचे दृष्टीनें अज्ञान असून ज्ञान होऊन तें निवृत्त होई तोंपर्यंत भावरूप आहे असें सांगून ' नहिरज्जुसर्पो दष्टो म्रियते नापि मृगतृष्णिकांभसा पानावगाहनादि प्रयोजनं क्रियते ' या पंक्तीनें मिथ्या अज्ञान कार्यकारी कसें होऊं शकतें अशी शंका येऊन " शंकाविषादि निमित्तमरणादिकार्योपलब्धेः स्वप्नदर्शनावस्थस्य च सर्पदंशनोदकस्नानादिकार्यदर्शनात् । ' या पंक्तीनें त्या शंकेचें निराकरण करून तें कार्यही खोटच आहे, ( तत्कार्यमपि अनृतमेवेतिचेत् ब्रूयात् ) असें ह्मणाल तर आचार्य ह्मणतात. स्वप्नकालीन सर्पदंशादिक कार्य जागृतीनंतर जरी मिथ्या होत असलें तथापि त्याचें सुखदुःखादि कार्य मात्र सत्यच होतें ( यद्यपि स्वप्नदर्शनावस्थस्य सर्पदंशनोदकस्नानादिकार्यमनृतं तथापि तदवगतिसत्यमेव फलं प्रतिबुद्धस्याप्यबाध्यमानत्वात् । ) याप्रमाणें अज्ञान्याला ज्ञानदृष्टीनें मिथ्या असणारें अज्ञान सत्य वाटत असल्यामुळें त्याचे ठिकाणीं तें सुख दुःखरूप संसार भासवूं शकते असें आचार्य ह्मणतात पुनः वरील सूत्रावरील भाष्यांतच " यत्र त्वस्य सर्वमात्मैवाभूत्तत्केन

कं पश्येत् इत्यादिना ब्रह्मात्मत्वदर्शिनंप्रति समस्तस्य क्रियाकारकफललक्षणस्य व्यवहारस्याभावम् । या पंक्तीनें ब्रह्मज्ञानी पुरुषाला संसाराची प्रतीति नाहीं असें त्यांनीं सांगितलें आहे. स्वप्नकाळीं स्वप्नांतील भाव सत्य असून जागृतीनंतर मिथ्या भासतात किंवा रज्जूवर भासणारा सर्प ज्ञानकाळीं सत्य असून रज्जूनंतर समूळ मिथ्या ठरतो, किंवा आईनें बागूल आला म्हटल्यावर मुलगा सत्य मानून भितो व बागूल मेला म्हटल्याबरोबर सत्य मानून आनंदित होतो. त्याप्रमाणें जीवाला अज्ञान व त्याचें कार्य संसार हे सत्य वाटतात तोंपर्यंत ते त्याचे दृष्टीनें सत्य असून ज्ञानानंतर मुळींच नसल्यामुळें अज्ञान शब्दमात्र आहे असें मीं मागें म्हटलें होतें. असें शब्दमात्रानें असणारें अज्ञान सत्य वाटल्यावर भावरूप ठरून तें जगताचें कारण होण्यास काय हरकत आहे? रज्जूद्रष्टा, जागृतींतला मनुष्य व आई हें सर्व ज्ञान्याच्या स्थानीं असून सर्पद्रष्टा, स्वप्नद्रष्टा व मुलगा हे सर्व बद्धाचे स्थानीं आहेत. रज्जुद्रष्ट्यादिकांच्या दृष्टीनें सर्पभावादिकांचा जरी अत्यंताभाव आहे तरी सर्पद्रष्ट्यादिकांच्या दृष्टीनें सर्पादिक भ्रमांची भ्रमनिवृत्ति होईपर्यंत स्थिति असून ते सुखदुःखादि कार्य करण्यांत समर्थ होतातच. या सर्व भ्रमांची अबाधित स्थिति नसल्यामुळें प्रतीतिकाळींही ते नाहींतच हें खरें, पण तें मुक्तदृष्टीनेंच, बद्धदृष्टीनें नाहीं. भिंतीवर काढलेलें वाघाचें चित्र मिथ्या असतें, भिंतीहून पृथक् नसतें, किंबहुना ती भिंतच होय पण ही भिंत आहे असें सम्यक् ज्ञान ज्या मुलाचे ठिकाणीं नसतें, जो त्या चित्राला खरें समजतो त्या मुलाचे ठिकाणीं तें वाघाचें चित्र भीति उत्पन्न करीत नाहीं काय? वास्तविक बागूल नसून बागूल आला म्हटल्यानें मुलाचे मनांत भीति व बागूल मेला म्हटल्यानें आनंद उत्पन्न होत नाहीं काय? मधुसूदनसरस्वतीनें मिथ्या वस्तुही सत्य वाटल्यास कार्यकारी होते असें अद्वैतसिद्धींत प्रतिपादन केलें आहे. गौडपादाचार्यही म्हणतात—" आदावन्ते च यन्नास्ति वर्तमानेऽपि तत्तथा । वितथैः सदृशाः सन्तोऽवितथा इव लक्षिताः ॥ ' शास्त्रीबोवा म्हणतात— " शब्दमात्र म्हणजे फक्त शब्दाचें अस्तित्वच होय, त्यामुळें अर्थाचें अस्तित्व आहे असें सिद्ध होत नाहीं. अर्थात् अज्ञान हा शब्द जगद्रूप

कार्य करण्यास कारण होत नाहीं हें उघड आहे. केवळ अज्ञान शद्बानें जर जगत्कार्य भासत असेल तर तें कोणत्याहि शद्बानें भासावयास पाहिजे. मग शब्दमात्र अज्ञान व जगत्कार्य यांचा कार्यकारणभाव कशास हवा ? सारांश, शशशृंग व खपुष्प इत्यादि शद्बांप्रमाणें अज्ञान या शद्बाची प्रवृत्ति झाली असल्यामुळें त्यास भावरूप व कारण मानणें विसंगत आहे या शास्त्रीबोवांचे म्हणण्यांत खालीं दिलेले मुद्दे आहेत. (१) शद्बमात्र म्हणजे शद्बाचेंच अस्तित्व, अर्थाचें नाहीं. (२) अज्ञान शद्बमात्र असल्यामुळें जगद्रूप कार्य करण्यास समर्थ नाहीं. (३) केवळ अज्ञानशद्बानें जर जगत्कार्य भासत असेल तर तें कोणत्याही शद्बानें भासावयास पाहिजे. (४) अज्ञान व जगत्कार्य यांचा कार्यकारणभाव सिद्ध होणार नाहीं.

## पृष्ठ २२ वरील पत्राचा अर्थ

(१) ज्यानीं अतिकरुणेनें सच्चिदानंदतनु धारण केली, ज्यांच्या चरणसुखस्पर्शानें श्रीइंद्रायणीच्या जलाला तीर्थत्व प्राप्त झालें; संसारदुःखाच्या निवृत्तिकरितां अनेक साधनें करूनहि दुःखनिवृत्ति न झाल्यामुळें ज्यांची हृदयें विदीर्ण झालीं आहेत, असे पुरुष दीन होत्साते तनुमनसमर्पणपूर्वक आळंदींत राहून ज्या दयाब्धीला भजतात, अशा त्या श्रीसद्गुरुज्ञानेश्वरमहाराजांना मी नमस्कार करितों.

(२) जिचें स्तनपान करून मला हें सुंदर शरीर प्राप्त झालें आहे. जी देवी नेहमीं प्रेमानें माझें मस्तकावघ्राण करून ( सुख देत होत्साती ) माझे बाल्यांतील अनेक कष्ट निवारण करिते, व जी ब्रह्मानंदरसाच्या योगानें नम्र झालेल्या आपल्या मृदुल करानें अज्ञानापासून होणाऱ्या माझ्या त्रिविध दुःखरूपी अग्नीला शमवीते, त्या यमुनाआईच्या करुणाविकसित शोभायमान चरणकमलाला मी नमस्कार करितों.

(३) अध्यारोप व अपवाद यांच्या योगानें भासणाऱ्या संसाराला व संसारभावालाच अनुक्रमें बंध व मुक्ति अशा संज्ञा आहेत. अध्यारोपानें हें सर्व मायिक जगत् चैतन्यावर भासतें. वेदान्तनिष्णात

अशा आचार्यांपासून प्राप्त झालेल्या बोधानें आत्मसुखाचे ठिकाणीं तल्लीन झालें असतां जो संसाराच्या अत्यंताभावाचा प्रत्यय त्याला अपवाद ह्मणतात. आई! हें मी तुला विस्तार करून सांगतों ऐक.

(४) एकस्वभावात्मक वस्तूचे ठिकाणीं जो भिन्नपणा भासवितो त्याला उपाधि ह्मणतात. सूर्य एक असूनहि घट व जल या उपाधीमुळें दोनपणाला प्राप्त होतो, त्याप्रमाणेंच येथें सत्वादिगुणानीं युक्त असणारी, सदसद्विलक्षण, ब्रह्मसत्तेनें सत्तावान् झालेली माया, ब्रह्माच्या आनंदस्वभावाचें आच्छादन करून खोटाच जगद्रूपी भिन्न आभास भासविते.

(५) अस्मत्प्रत्ययगोचर विषयी व युष्मत्प्रत्ययगोचर विषय हे प्रकाश व अंधाराप्रमाणें परस्पर विरुद्ध आहेत. ( अस्मत्प्रत्ययगोचर विषयी हा कधीं युष्मत्प्रत्ययगोचर विषय होत नाहीं व युष्मत्प्रत्ययगोचर विषय हा कधीं अस्मत्प्रत्ययगोचर विषयी होत नाहीं. ) म्हणून त्यांचा ऐक्याध्यास होणें शक्य नाहीं; तथापि सर्व लोक या जड देहालाच मी ह्मणजे आत्मा आहें असें समजत असल्यामुळें या त्यांच्या प्रतीतीवरून ( विषयविषयींचा ) ऐक्याध्यास झालेला दिसतो. गुरुचरणावर ज्यांचा दृढ विश्वास आहे असे पुरुष मात्र या अध्यासस्वरूपी अविद्येचा नाश करून घेतात.

(६) ईश्वर, जीव, शुद्धब्रह्म, जीवेश्वरांचा भेद, माया, व चैतन्य यांचा योग, असे सहा पदार्थ मुनींनीं अनादि मानिलेले आहेत. या सहांपैकीं नित्य, पूर्ण व अतिसुखरूप असें ब्रह्म मात्र केव्हांहि नाश पावतनाहीं; बाकी पांच पदार्थ अैतज्ञानानें बाधित होतात.

(७) भ्रमकालीं भ्रमानें बद्ध असतो म्हणून व भ्रम नाहींसा झाल्यावर भ्रमच राहत नाहीं ह्मणून ज्याप्रमाणें भ्रमाचा आदि कळत नाहीं, त्याप्रमाणें जीव मायेमध्यें असतो तोंपर्यंत मायाबद्ध असतो ह्मणून व माया निवृत्त झाल्यावर मायाच राहत नाहीं ह्मणून मायेचा ( जीवाला माया केव्हांपासून लागली याचा ) आदि कळत नाहीं. आई! मी तुलाच विचारितों, तुला आत्मविस्मृति केव्हां पासून झाली सांग बरें? जर तूं ह्मणशील कीं मला याचें ज्ञान नाहीं तर मग

अज्ञान अनादि आहे हेंच सिद्ध होतें; तरी पण तें अज्ञान ज्ञाननाश्य आहेच.

(८) जगताचें कारण प्रधान आहे असें सांख्याचें मत आहे तें योग्य नाहीं कारण प्रधान जड आहे; ( जड स्वतंत्र प्रवृत्त होत नाहीं व दुसऱ्याला प्रवृत्त करीत नाहीं ) ; ( बौद्ध मानतात त्याप्रमाणें ) निःसाक्षीक असें शून्यही जगताचें कारण होऊं शकत नाहीं कारण अभावापासून भावोत्पत्ति होत नसते ) ; नैयायिकाप्रमाणें ईश्वराधिष्ठित परमाणू जगताचें कारण मानल्यास ते परमाणू स्थूल आहेत किंवा सूक्ष्म आहेत ? प्रथमपक्षीं त्या परमाणूंचे आणखी भाग होऊं शकत असल्यामुळें त्यांचें परमाणुत्व नाश पावतें. दुसरेपक्षीं तुला ईश्वराचा नाश होतो असें मानणें भाग पडतें ( कारण परमाणू सूक्ष्म मानल्यास, एक ईश्वर सूक्ष्म व दूसरें परमाणू सूक्ष्म असे दोन सूक्ष्म पदार्थ मानावे लागतात. पण दोनपणा त्रिविधपरिच्छेदाशिवाय संभवत नाहीं. ईश्वर व परमाणू यांचे ठिकाणीं परिच्छेद मानल्यास ते सावयव व नाशिवंत ठरतात ) ; ( हीं सर्व मतें दुष्ट आहेत ) म्हणून उपनिषदानें ठरविलेला अज्ञानोपहित परमात्माच जगताचें कारण होऊं शकतो.

(९) हें कारणहि दोन प्रकारचें आहे. एक उपादान व दुसरें निमित्त. घटाचे ठिकाणीं माती, पटाचे ठिकाणीं तंतु व अलंकाराचे ठिकाणीं सुवर्ण हीं उपादान कारणाचीं उदाहरणें असून कुलाल कोष्टी व सुवर्णकार हीं अनुक्रमें निमित्त कारणाचीं उदाहरणें आहेत; पण ज्याप्रमाणें ऊर्णनाभी आपल्यापासून निघणाऱ्या तंतूंचें उपादान व निमित्त असें उभयविधकारण आहे किंवा जसें स्वप्नांतील सर्व पदार्थांचें उभयविध कारण मन आहे त्याप्रमाणें, आमच्या वेदान्तसिद्धान्तांत जगताचें उपादान व निमित्त असें उभयविध कारण ब्रह्म आहे.

(१०) हें उपादानकारणहि दोनप्रकारें दृष्टीस पडतें. एक विवर्तोपादान व दुसरें परिणामी उपादान. रज्जुसर्पाचे ठिकाणीं रज्जू विवर्तोपादान आहे व दधि घृत यांचे ठिकाणीं दूध हें परिणामी उपादान आहे. निमित्तकारण याहून भिन्न असतें या जगताचे ठिकाणीं चेतन विवर्तोपादान असून अनादिमाया ही परिणामी उपादान आहे. ही मा-

ज्याच्या आज्ञेनं जगन्निर्माण करितें तें शिवाख्य चैतन्य या जगताचें मित्त कारण होय.

(११) स्वतः ब्रह्मस्वरूप होऊनही गुरुचरणाचे ठिकाणीं ज्यांच्या चित्ताची संतत प्रेमधारा वाहात असते व विक्षेप शान्त त्यामुळें जे पराशान्तीला प्राप्त झाले आहेत असे पुरुष धन्य होत. अशा पुरुषांची समाधि अखंड स्वरूपानुसंधानामुळें कधीं खंडित होत नाहीं, व ते अज्ञानी जनांचा उद्धार करण्याकरितां नेहमीं पृथ्वीवर फिरत असतात ह्मणून सर्व जगताला मान्य होतात. इंद्रियानां गोचर होणारे जे भौतिक विषय त्या भौतिक विषयाप्रमाणें विषयरूप नाहींत पण विषयरूप आहेत ( ह्मणजे ज्याचें इदंत्वेंकरून पृथगिव भान होतें ) अशा श्रीविष्णूचे किंवा शिवाचे ठिकाणीं ते प्रेमवृत्ति स्थापन करीत असतात ह्मणून ( आत्मरति आत्मक्रीड या श्रुतींत सांगितल्याप्रमाणें आत्म्याचे ठिकाणीं अगदीं एकतान झालेले असतात व नेहमीं श्रुतिमाऊलीचें बोधामृत प्राशन करीत अंबेच्या अंकावर खेळत राहतात.

(१२) कार्यरूपाला आल्यानंतर जो कारणांत पुनः लय पावत नाहीं तो परिणाम समजावा; व आपलें पूर्वीचें रूप न सोडतांच जो स्वरूपांतरानें भासतो तो विवर्त समजावा. हा विवर्त दोन प्रकारचा आहे. एक अध्यस्त व दुसरा अनध्यस्त विवर्त. हे अंबे ! रज्जुसर्प अध्यस्त विवर्त आहे व सुवर्णालंकार अनध्यस्त विवर्त होय. जगत् हें अध्यस्त विवर्त असून भगवान् श्रीकृष्ण अनध्यस्त विवर्त असल्यामुळें ज्ञानानें त्याचा नाश होत नाहीं.

(१३) ( ज्ञानानंतर भगवच्छरीर नाश पावत नसल्यामुळें ) अर्थातच श्रीगुरु व ईश्वर यांचे ठिकाणीं ज्ञानोत्तरभक्ति सिद्ध आहे. आत्मज्ञान दृढ झालें असतां शिवभजनरूप परमानंद प्राप्त होतो प्रेमानें सगुणध्यान साधून चित्ताचे ठिकाणीं परमेश्वरचरणकमल दृढ स्थापन करावेत, आणि विरहवृत्तिमध्यें निजनेत्राश्रूंनीं त्या चरणांचे ठिकाणीं अभिषेक करून लालनभावानें त्यांचा अनुभव घ्यावा.

(१४) परमात्मसुख हाच कोणी समुद्र त्याचे ठिकाणीं माधूर्यरसावेशानें किंवा शुद्ध वात्सल्यरसावेशानें पुष्ट होऊन चित्ताची

प्रेमधारा अखंड वाहिली असतां, अखंड प्रेमानें पुष्ट होणारी हरिहरचरणकमलानुराग स्थायी, संसारासक्ति नाहिंशी होतांच अत्युत्कटभाक्ति सानंदाला प्राप्त होतो.

(१५) जीव अणु असेल तर सर्व शरिराच्या ठिकाणीं संवेदन कां व्हावी ? जीवाचें मध्यम परिमाण मानल्यास तो विनाशी ठरतो, ह्मणून तो विभु आहे असा कापिल आणि श्रौत सिद्धान्त आहे; पण सांख्यांत प्रकृतीचें स्वतंत्र कर्तृत्व मानलें आहे व तें अनेक युक्तींनीं त्याज्य ठरतें. ह्मणून श्रुतिवाक्यांनीं ज्याची मीमांसा केली जाते असें आमचेंच मत उत्तम आहे.

(१६) कित्येक काम्यकर्मविरहित नित्यकर्म मोक्षाला हेतु आहे असें ह्मणतात, तर कित्येक काम्यकर्मविरहित उपासनायुक्त केलेलें नित्यकर्म मोक्षहेतु आहे असें ह्मणतात. कित्येक ज्ञानकर्मसमुच्चयाला मोक्षहेतु मानतात, तर कित्येक यज्ञयागादि कर्मासहित विद्या मोक्षाला हेतु मानतात; पण श्रुतीनें ज्ञानानेंच मोक्ष होतो असें सांगितल्यामुळें आम्ही वरील कोणताही पक्ष मानीत नाहीं.

(१७) देहादिकांचा व वर्णाचा ज्यांना अभिमान आहे त्यांना, अमक्या वर्णाचा मी असल्यामुळें त्या वर्णाला विहित कर्म मला केलें पाहिजे, अशी साभिमान कर्तृत्व बुद्धि राहते व त्या कर्तृत्वबुद्धीमुळें त्यांच्याकडून कर्म घडतें; व श्रुत्यैकशरण जे झाले आहेत त्यांना कर्तृत्व-बुद्धि सुटल्यानंतर परब्रह्माचें ज्ञान होतें. कर्म व ज्ञान यांचा ( एकांत कर्तृबुद्धि असली पाहिजे व एकांत कर्तृत्वबुद्धि नसली पाहिजे ) असा भेद असूनहि जे मूर्ख लोक ज्ञान व कर्म यांचा समुच्चय मोक्षाला हेतु आहे असें ह्मणतात ते आपली तृषा भागविण्याकरितां एकच वेळीं अग्नि व पाणी पितात.

[१८] ज्या सर्वज्ञापासून या जगताची उत्पत्ति स्थिति, लय होतात, जें नित्य व अत्यंत सुखरूप असून आंत व बाहेर व्यापून भरलें आहे; तेंच एक जाणण्यास योग्य आहे; तेंच दूर आहे; तेंच जवळ आहे; या वेदवेत्त्यांच्या अनुभवानुसार तेंच एक समजून घ्यावें; सर्व वेद त्याच पदाची महति गातात; पण ज्यांना दृश्याभासच सत्य वाटतो

ते मूढ मात्र मोह पावतात.

[१९] त्रिगुणांपैकीं शुद्धसत्वाला आश्रय असणारें जें चेतन तें या जगताचें निमित्त कारण होतें व तमः प्रधानोपहित चेतन जगताचें उपादान कारण होतें मिश्रसत्वांत पडलेलें चेतनाचें प्रतिबिंब विषयभोग मागणारें असून त्यालाच त्वंपद [ जीव ] ह्मणतात हें मायात्रैविध्य नाहिंसें झाल्यास बाकी लक्ष्यब्रह्मच शेष राहतें

[२०] हा मिश्रसत्वात्मक मलीनांश अनेकविध असल्यामुळें त्यांत पडलेले प्रतिबिंबरूपी जीवहि अनेक आहेत असें कित्येक ह्मणतात. अज्ञान एकच असल्यामुळें तदुपाधिक जीवहि एकच मानण्यांत लाघव असल्यामुळें जीव एक आहे अनेक नाहींत असें कित्येक मानतात. अशा रीतीनें जीवाचे ठिकाणीं विवाद असला तरी जगत्कर्ता, जगद्भर्ता, अनुमंता, सज्जनाचे हृदयांत वास करणारा, सर्वशक्ति, सर्वांतर्यामी असा परमेश्वर एकच हें सर्वांना मान्य आहे.

[२१] वाचस्पतीच्या मनांत प्रत्येक जीवाची सृष्टि निरनिराळी असल्यामुळें, त्या प्रत्येक जीवसृष्टीचा नियंता परमेश्वरहि निरनिराळा आहे असें मानिलें आहे, पण येथें आम्ही असें विचारतों कीं, हे सर्व परमेश्वर व्यापक आहेत किंवा अव्यापक आहेत ? आद्यपक्षीं अनेक व्यापक होऊं शकत नसल्यामुळें अनेकत्वाची हानि होते. दुसरेपक्षीं सर्व ईश्वर अव्यापकतेमुळें नाशिवंत ठरतात; ह्मणून हा वाचस्पती हत झाला व त्याचें मत स्वीकारणारा तूं मूर्ख आहेस.

[२२] आत्मा, दिशा, काल, आकाश, हे चार पदार्थ न्यायांत विभु मानले आहेत. आम्हीं त्यांना असें विचारतों कीं या चार पदार्थांचा संकर होतो किंवा संकर होत नाहीं ? आद्यपक्षीं ( त्यांचा चारपणाच राहत नसल्यामुळें चार निरनिराळे विभु मानण्याची ) ही कुकल्पना असल्यामुळें त्याज्य आहे. दुसरे पक्षीं प्रत्येक पदार्थ अव्यापक ठरल्यामुळें व्याघात दोष देतो; ह्मणून ( आम्ही वेदान्ती मानतों त्या प्रमाणें ) एक चैतन्यच विभु असून तद्व्यतिरिक्त सर्वच अव्यापक असल्यामुळें नाशिवंत आहे.

( २३ ) जीवईश्वर, जीवजीव, जडजीव जडईश्वर असा

पांच प्रकारचा भेद ( सत्य ) आहे असें मानल्यास ईश्वर अव्यापक ठरतो व पूर्व दोष येतात आह्मी हि व्यवहारामध्यें भेद मानतों पण ते स्वप्नवत् अविद्याकल्पित मिथ्या मानतों. या सर्वांचा ( सत्य भेद मानून ) संघात मानल्यास, सर्व सावयव ठरून अनवस्थादोष येत असल्यामुळें ( ह्मणजे प्रत्येक सावयव ठरून त्याच्या अवयवांचा संघात मानावा लागून, संघातामुळें ते अवयवहि सावयव ठरून त्या अवयवांच्या अवयवांचा संघात, पुनः त्यांच्याहि अवयवाचा संघात पुन त्यांच्याहि अवयवांचा संघात अशाप्रमाणें संघातपरंपरा मानावी लागत असल्यामुळें ) ही कुबुद्धिकल्पित भेदकल्पना मिथ्या आहे.

( २४ ) जीव हा दुःख भोगतो ह्मणून तो अत्यंत परतंत्र आहे असें कित्येक ह्मणतात. कित्येक ह्मणतात जीव हा पूर्ण स्वतंत्र आहे ( कारण तो चेतन असल्यामुळें ) परमेश्वरहि चेतनाचा नियंता होऊं शकत नाहीं; पण आह्मी असें मानतों कीं, कर्तृकाळीं जीव स्वतंत्र असून ईश्वर ( त्या कृतीचे ठिकाणीं ) अनुमंता आहे, व वासनावश होऊन अविचारानें तो जें बरें वाईट कर्म करितो त्याचें फळ मात्र तो ईश्वराच्या परतंत्र होऊन भोगतो.

( २५ ) नेहमीं प्रारब्धच प्रबल आहे असें ह्मणत असशील तर हे वादी तूं हालाहल पी. नित्य यत्नच समर्थ आहे असें ह्मणत असशील तर मग सारखे श्रम करूनहि सर्वदा तुझा यत्न सफल कां होत नाहीं? ज्या अर्थी अतितर प्रबल प्रयत्नानें बुद्धिवान् पूर्वकर्म जिंकूं शकतो त्या अर्थी भोग दैवावर टाकून श्रीगुरूच्या पदाचें सेवन करीत मुक्तीकरितां यत्न करावा.

( २६ ) पूर्व कर्माचें फळ भोगण्यांत जीव हा परमेश्वरनियंतीच्या अधीन असल्यामुळें, त्याच्याकडून यत्न होणें कसें शक्य आहे असें ह्मणशील तर परमेश्वर जीवाला त्याच्या प्रयत्नानुसार फळ देणारा होणार नाहीं, तर तो निर्दय व कुबुद्धि ठरेल, मग तो एकादे वेळीं आपल्या इच्छेनें, पापानें स्वर्ग व पुण्यानें नरकहि जीवाला भोगावयाला लावील, व असें होऊं लागल्यास श्रुति व्यर्थ ठरून वेदाचें महत्वच अस्ताला जाईल.

( २७ ) आई ! आत्म्याचा नाश होतो हें कसें जाणावयाचें ? ज्ञानानें किंवा अज्ञानानें ? ज्ञानानें आत्मनाश कळतो ह्मटल्यास ( आत्म्यालाच आत्म्याचा नाश कळतो असा ) आत्माश्रय दोष येतो. दुसरेपक्षीं ( अज्ञानानें आत्मनाश कळणें शक्य नसल्यामुळें ) व्याघात दोष येतो. त्याच प्रमाणें ( आत्मनाश मानल्यास ) अकृताभ्यागम व कृतप्रणाश हेहि दोष येतात. आत्मभाव मानूनहि हे दोष कां येऊं नयेत असें ह्मणूं नको, कारण हें युक्तीनें व दृष्टानुभवानें सिद्ध आहे.

( २८ ) आत्मा अनित्य आहे किंवा नित्य आहे ? प्रथमपक्ष मानल्यास पूर्वींचे सर्व दोष येतात. दुसरा पक्ष मानल्यास मांसास्थि-मज्जामलरुधिरमय अशा अचेतन शरीराहून तो निराळाच सिद्ध होतो ( आत्मा नित्य आहे ) याविषयीं सुषुप्ति प्रमाण आहे. ( कारण ) दुसरे दिवशीं ( आपल्याला पूर्व दिवशींच्या किंवा सुषुप्तिकालच्या अनुभवाचें ) स्मरण असतें. ( आतां हा पूर्व दिवशींचा किंवा सुषुप्तीचा अनुभव सांगतो ) असे कसें ह्मणतां ? ( तो जें सांगतो तो सुषुप्तींचा अनुभव किंवा पूर्व दिवशींचें स्मरण नव्हे तर ) तो ( दोन अवस्थां-ची ) तुलना करितो ( असें ह्मणाल तरी ) पूर्व अवस्थेंतहि तो असलाच पाहिजे ( तेव्हांच त्याला तुलना करितां येईल ). ( ह्मणून सुषुप्तींत जसा आत्म्याचा नाश कल्पितां येत नाहीं ), त्याप्रमाणेंच मर-ण हीहि निद्रा सजातीय दीर्घकालिक अवस्था असल्यामुळें, मरणानंतर आत्मा नाश पावतो असें काल्पितां येत नाहीं.

( २९ ) सुज्ञलोक तत्त्वमस्यादि वाक्यानीं जीवपरमात्मैक्य जाणतात. त्यांत तत्पदवाच्य जो परमात्मा त्याचें दोनप्रकारचें लक्षण आहे. एक स्वरूपलक्षण व दुसरें तटस्थलक्षण. ज्याच्या पासून भू-म्यादि सर्व सृष्टीचे जन्म स्थिति लय होतात तें तटस्थलक्षण जाणावें, आणि सत्यज्ञानानंत पूर्ण सुखरूप हें स्वरूपलक्षण आहे.

( ३० ) तत्त्वमसीत्यादि वाक्य श्रवण करणाऱ्याच्या देहेंद्रिया-दिकांहून निराळें असणारे चेतन त्याला त्वंपद ह्मणतात. हें त्वंपद चेतन दोन प्रकारचें आहे. भोक्ता व साक्षी. मानसोपाधीनें भोक्ता व उपाधि-निर्मुक्ति झालें असतां तेंच साक्षी होतें. हा साक्षी गमनागमनरहित

असा कूटस्थ व स्वतःच स्वतःला अपरोक्ष होणारा आहे. भोक्तृत्व व साक्षीत्व ही दोन्ही उपाधींचा त्याग केला असतां लक्षणेनें सहजच जीवब्रह्मैक्य होऊन मुक्ति होते.

( ३१ ) आत्मस्वरूप जाणण्याकरितां प्रत्यक्षप्रमाण उपयोगाचें नाहीं, कारण आत्म्याचे ठिकाणीं शब्दस्पर्शादि गुण नाहींत. अनुमानहि उपयोगाचें नाहीं, कारण त्याच्या योगानें सामान्य ज्ञान होतें. ह्मणून आत्म्याला अपरोक्ष करणाऱ्या अशा श्रेष्ठ प्रमाणाचा ह्मणजे श्रुतिप्रमाणाचा आश्रय कर. तत्त्वमसीत्यादि वाक्याच्या वैदिक अर्थानें ब्रह्मबोध करून घ्यावा, व पदांचा विचार करून वाक्यार्थ समजून घ्यावा. त्यांत आद्य जें तत्पद त्याचे दोन प्रकारचें लक्षण मागें सांगितलें आहे.

( ३२ ) सत् कोणतें असें ह्मणशील तर ज्याचा तिन्ही काळीं बाध होत नाहीं तें सत् होय, तें ब्रह्म आहे. ज्ञान कोणतें असें ह्मणशील तर आई ! जाग्रदादि अवस्थेंत जें सर्वदा स्वप्रकाशमान असतें तें ज्ञान होय; व आनंद कोणता असें ह्मणशील तर ज्याच्याकरितां सर्व प्रिय असतें असा परमप्रेमास्पद आत्मा तोच आनंद आहे; ह्मणून तूंच आत्मा आहेस. व तो आत्मा ब्रह्म आहे असें श्रुतीवरून, युक्तीनें व अनुभवानें जाणून घे.

( ३३ ) त्रिगुणात्मक मायोपाहित जें चेतन, त्या चेतनानें ईक्षण केल्यामुळें त्या ईक्षणालाच सांख्यांत बुद्धिसंज्ञा आहे, व अहं बहु स्याम् हा संकल्प अभिमानपूर्वक असल्यामुळें, सांख्यांत यालाच अहंकार ह्मटलें आहे ह्मणून सांख्य व वेदान्त यांचें ऐक्य आहे. पुढें त्या अहंकारापासून प्रथम तन्मात्ररूपी आकाश, आकाशापासून वायु, वायूपासून अग्नि, अग्नीपासून जल. व जलापासून पृथ्वी असें प्रकृतिविकृतिरूप पंचक उत्पन्न झालें.

( ३४ ) त्या प्रत्येक भूतांच्या निरनिराळ्या सत्वांशापासून निरनिराळें ज्ञानेंद्रिय झालें असून सर्वांचा सत्वांश मिळून एक चित्त झालें. हें चित्त दोन प्रकारचें आहे. विचार करणारें तें मन व निश्चय करणारी बुद्धि. त्याचप्रमाणें प्रत्येक भूतांच्या रजोंशापासून एकएक कर्मेंद्रिय झालें असून सर्वांचा रजोंश मिळून क्रियाशक्तियुक्त असा प्राण

झाला आहे व तो उपाधिभेदानें व्यानोदानादि संज्ञेस प्राप्त होतो.

( ३५ ) मायेच्या शुद्ध सत्वांत प्रतिबिंबित झालेल्या चैतन्याला ईश्वर संज्ञा आहे व तिच्या मिश्र सत्वांत प्रतिबिंबित चेतनाला जीव ह्मणतात. ईक्षणापासून तर प्रवेशापर्यंत ईश्वरकृत सृष्टि असून कर्तृत्व भोक्तृत्वादिकांचा अभिमान धारण करण्यापासून तर मोक्षापर्यंत सृष्टि जीवभावनाजन्य आहे.

( ३६ ) ( एकजीववादाच्या दृष्टीनें ) मायेमध्यें प्रतिबिंबित झालेलें चेतन जीव असून त्याच्या अपेक्षेनें बिंबत्वारोपानें युक्त असलेलें शुद्ध चेतनच आमचा वासुदेव आहे. त्या वासुदेवाच्या ठिकाणीं आपल्या कर्माचें फळ मिळण्याकरितां जीवानेंच सर्वज्ञत्वादिक धर्मांची कल्पना केली आहे; तरी पण या भ्रमरहित विवर्ताच्या ठिकाणीं केलेलें निष्काम प्रेम वस्तुतंत्रच आहे.

( ३७ ) हा जीव मरणानंतर दुसरें शरीर घेण्याकरितां जातो तेव्हां पूर्व शरीरांतील भूतांनीं युक्त असूनच जातो किंवा त्या भूतांना सोडून जातो ? पंचभूतें कोठेंहि समान व केव्हांहि उपलब्ध होणारीं असल्यामुळें जीव त्यांना सोडून जातो असें पूर्वपक्षी ह्मणतो. पण सिद्धान्त मत असें आहे कीं पांचव्या आहुतींत पुरुष होतो या वचनावरून व युक्तीवरून जीव हा पंचभूतयुक्तच गमन करितो. पापी नित्य संसारमार्गांत पडो. पण पुण्यवानहि स्वर्गांत नित्य राहतात असें नाहीं. तेहि पुण्यक्षयानंतर फिरून संसारांत पडतात ह्मणून शिव शिव ! आई या दोन्ही मार्गांचा विरक्तांनीं त्यागच करावा.

( ३८ ) सूक्ष्म भूतांच्या शेष राहिलेल्या तमोंशापासून स्थूल भूतपंचक उत्पन्न होतें. त्याची प्रक्रिया अशी आहे. प्रत्येक भूताचे दोन भाग करावयाचे. त्यांत पुनः त्या प्रत्येक भूताचा एक एक अर्धा भाग घेऊन त्याचे चार भाग करावयाचे. नंतर शेष राहिलेला प्रत्येक भूताचा अविभज्य अर्धा भाग घेऊन त्यांत तद्व्यतिरिक्त दुसऱ्या भूतांचा अष्टमांश मिळवावा. अशाप्रमाणें आकाशादि स्थूल भूतें उत्पन्न होतात.

( ३९ ) शक्षेत्र ज्यांत आदि आहे असा दैवसर्ग आठ-

प्रकारचा आहे. आणि आई ! तिर्यग् सर्ग पांच प्रकारचा आहे. मानुष सर्ग एक प्रकारचा आहे व तो पुनः ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य, शूद्र, या भेदांनी चार प्रकारचा आहे. कर्मकर्ता व फलभोक्ता जीव असून परमात्मा अनुमंता आहे. आपल्या बुद्धीची ज्या मानानें सत्वशुद्धि असेल त्या मानानें या वेदान्तज्ञानांत बुद्धीचा प्रवेश होतो.

( ४० ) येथें कित्येक असा पूर्वपक्ष करितात कीं, वेदामध्यें सृष्टीनंतर उत्पन्न झालेल्या राजांचें वर्णन असल्यामुळें, ईश्वराची प्रार्थना असल्यामुळें व लक्षणावृत्तीची कल्पना केली असल्यामुळें, वेद हे ईश्वरप्रणीत नसून जीव प्रणीत आहेत. पण हा त्यांचा पूर्वपक्ष बरोबर नाहीं ( कारण ईश्वरज्ञानांत जीवाच्या ज्ञानाप्रमाणें तीन काळ नाहींत तर ) ईश्वराला सर्वच वर्तमान असतें म्हणून, ( ईश्वरप्रणीत वेदांत होऊन गेलेल्या राजांचें वर्णन आल्यास बाध नाहीं ) ( परमेश्वराची प्रार्थना कशी करावी हें जीवाला माहित नसल्यामुळें, बाप जसा लहान मुलाला वडिलांशीं कसें वागावें, त्यांना नमस्कार वगैरे कसा करावा हें सांगतो त्याप्रमाणें परमेश्वराची प्रार्थना कशी करावी हें आपण केलेल्या वेदांमध्यें जीवाला कृपेनें दाखवून देणें परमेश्वराला विरुद्ध नाहीं. तत्त्वमसि वाक्याचे ठिकाणीं लक्षणावृत्ति स्वीकारिली पाहिजे हें परमेश्वरचोदनेशिवाय जीवाला स्वतंत्र रीतीनें कळणें शक्य नाहीं म्हणून परमेश्वरकृत वेदांत लक्षणावृत्तिनिर्देश विरुद्ध नाहीं ( म्हणून वेद जीवप्रणीत नसून ईश्वर प्रणीतच आहेत. ( कृतीपेक्षां कर्त्याचे ठिकाणीं अधिकतर विज्ञानवत्ता असते या अनुमानावरून ) वेदापेक्षां वेदकर्ता अधिक तर विज्ञानवान् असला पाहिजे ( तो ईश्वरच होऊं शकतो जीव होऊं शकत नाहीं. कारण जीव म्हणजेच अल्पज्ञ. ) मुलाला ज्या प्रमाणें आई नेहमीं त्याचे कल्याणाचें सांगत असते त्या प्रमाणें ईश्वरही जीवाला नेहमीं कल्याणाचा मार्ग सांगत असल्यामुळें ( व तेहि निरपेक्ष रीतीनें सांगत असल्यामुळें )परम दयालु आहे.

( ४१ ) हें भ्रांतिजन्य विश्व नेहमीं नाश पावत असल्यामुळें सत्य नाहीं, प्रतीति येत असल्यामुळें असत नाहीं, पदार्थांची प्रत्यभिज्ञा व स्मृ